**(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

## सभागृहातील गणपूर्ती

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सभागृहात आवश्यक ती गणसंख्या नाही.

**अध्यक्ष** : सभागृहात आवश्यक ती गणपूर्ती नसल्यामुळे घंटी वाजविण्यात यावी.

( घंटी वाजल्यानंतर व आवश्यक ती गणपूर्ती झाल्यानंतर )

**अध्यक्ष** : आता प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात करण्यात येईल. संसदीय कार्यमंत्री आपण सभागृहाचा कोरम ठेवणे हे आपले काम आहे. यापुढे सत्ताधारी पक्षाने कोरम पूर्ण ठेवला पाहिजे. ठीक आहे, आता कोरम पूर्ण झाला आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. काल 31 मार्च अखेरपर्यंत शासनाच्या वतीने जो निधी वितरीत केला जातो, त्यामध्ये आपली बीडीएस सिस्टीम रात्री बंद होती. एक तास बंद ठेवल्यानंतर ती पुन्हा सुरू करण्यात आली. ही यंत्रणा बंद ठेवल्यामुळे वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून फोन येत होते. जिल्हा स्तरावर वितरीत व्हावयाचा जवळपास 1200 कोटी रुपयांचा निधी ही बीडीएस यंत्रणा बंद असल्यामुळे वितरीत होऊ शकला नाही. यामध्ये एक तर सरकारकडे वितरणासाठी निधी शिल्लक नाही काय, ही बीडीएस सिस्टीम सुरू करणे आणि बंद करण्यामुळे निधी वितरीत होऊ शकला नाही. हे वास्तव विचारात घेऊन याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करणे गरजेचे आहे. निदान प्रश्नोत्तराच्या तासानंतर ताबडतोब शासनाने याचा खुलासा करावा, अशी विनंती आहे.

**अध्यक्ष :** ठीक आहे.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, प्रश्नोत्तराच्या तासानंतर नाही. पण आम्ही दिवसभरात खुलासा करु.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

01-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

PPD/ 10:00

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**कुळगाव बदलापूर (जि. ठाणे) येथील स्वस्त धान्य दुकानांवर भरारी पथकाने छापे टाकल्याबाबत**

**(१) *41745 श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(**१**) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील स्वस्त धान्य दुकानांवर मुंबईतील भरारी पथकाने छापे टाकून रेशनिंग धान्याचा काळा बाजार होत असल्याचे माहे जानेवारी, 2016 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(**२**) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(**३**) असल्यास, चौकशीततकाय आढळून आले, त्यानुषंगाने स्वस्त धान्य दुकानांमध्ये होणारा काळाबाजार थांबविण्यासाठी व गोरगरीब जनतेला हक्काचे रेशनिंग मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(**४**) तसेच काळाबाजार करणाऱ्या दुकानदारांवर व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती ीकारवाई केली वा करण्यात येत आहे,

(**५**) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (1) होय, हे खरे आहे.

(**२**) व (**३**) फिरते पथक शाखेच्या तपासणी मध्ये अ.शि.दु.क्र. 46 फ 77 मध्ये 1309 किलो ोअतिरिक्त गहू व 600 किलो तांदूळ कमी आढळून आला. तसेच अ.शि.दु.क्र.46फ 41 मध्ये 166 किलो तांदूळ साठा व 187 किलो गहू कमी आढळून आल्याने, सदर दोन्ही दुकानदारांविरुध्द बदलापूर (पूर्व) पोलीस स्टेशन जि. ठाणे येथे गु.र.क्र.II01/2016 o II01-2016, दिनांक 6 जानेवारी 2016 रोजी गुन्हे नोंद करण्यात आले असून दिनांक 13 जानेवारी, 2016 रोजी सदर दोन्ही दुकानांचे प्राधिकारपत्र निलंबित करण्यात आले आहे.

(**४**) व (5) प्रश्न उद्‌भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. किसन कथोरे : अध्यक्ष महोदय, रेशनिंगच्या बाबतीत नेहमीच तक्रारी असतात. वारंवार तक्रारी करुनही त्यात काही बदल होत नाही. मुंबईतील भरारी पथकाने बदलापूरला धाडी टाकल्या होत्या. त्या धाडीमध्ये दोन दुकाने निलंबित केले असल्याचे शासनाने सांगितले आहे. अशा प्रकारची

3......



श्री. किसन कथोरे......

किती दुकाने भरारी पथकाने पकडलेली आहेत आणि त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे. अशाच प्रकारची भरारी पथके ग्रामीण भागातील दुकानांची चौकशी करण्यासाठी नेमण्यात येतील काय ?

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महाराज, एक तर प्रश्न विचारताना स्पेसिफिक ऐरिया मेन्शन केला पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली की, अशी किती दुकाने बंद आहेत. कुठे बंद आहेत ते नमूद केले नाही. आपल्याला जे प्रश्न विचारायचे आहेत ते विचारावेत, त्यांची उत्तरे देण्यासाठी मी सक्षम आहे. पण हा प्रश्न अनिश्चित आहे की, किती दुकाने म्हणजे तालुक्यातील, जिल्ह्यातील किंवा राज्यातील नेमकी कुठली विचारली हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. आपण प्रश्नाच्या बाहेरील माहिती विचारली तरी मी ती उपलब्ध असल्यास देण्यास तयार आहे.

**अध्यक्ष :** बदलापूर नगरपालिकेच्या हद्दीतील एवढीच माहिती द्यावी.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महाराज, बदलापूर नगरपालिकेच्या हद्दीत दोन दुकाने आता दुसऱ्यांना हस्तांतर करण्यात आली होती. त्या ठिकाणी भरारी पथक पाठविण्यात आले होते. शासनाचे भरारी पथक कार्यान्वित आहे. यासंबंधी कोणत्या बातम्या किंवा नागरिकांनी तक्रारी केल्या तर दुकानांवर कार्यवाही होते, त्याप्रमाणे या दुकानांवर कार्यवाही झाली आहे. या कार्यवाहीमध्ये तेथील रजिस्ट्रर्स तपासण्यात आली. नंतरच्या काळात त्या ठिकाणी गृह भेटी देखील देण्यात आल्या. त्यानंतर त्यांचे दुकान रद्द केले. पण न्यायिक प्रकरणामध्ये ते जेव्हा अपिलामध्ये आले तेव्हा दोन्ही मिळून दंडाची रक्कम काही तरी 30-40 हजार रुपये होती. तर त्यांना मुद्देमालासह 50 हजार रुपये मालाचे आणि 50 हजार रुपये दंड आणि 5 हजार रुपये, असे करुन ती दुकाने पुन्हा सुरू केली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41745........

श्री.सुरेश लाड : अध्यक्ष महोदय, फिरत्या पथकाने पाहणी केल्यानंतर आढळून आलेल्या 1309 अतिरिक्त गहू दुकानदाराने कुठून आणला किंवा वितरण व्यवस्थेत दिलेल्या गव्हापैकी होता. त्याबाबत दुकानदारांने काय खुलासा केलेला आहे. 600 किलो तांदूळ कमी आढळल्याबाबत काय खुलासा केलेला आहे.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, जेव्हा सुनावणी ठेवली होती त्यावेळेस याची तपासणी करण्यात आलेली आहे. काही ठिकाणच्या पावत्या केलेल्या होत्या तर काही ठिकाणच्या पावत्या केलेल्या नव्हत्या. त्यांचे रजिस्ट चेक केल्यानंतर त्यामध्ये थोडा अपहार असल्याचे आढळून आलेले आहे. म्हणून अपहाराच्या काही पटीत त्यांच्याकडून मुद्देमालाची रक्कम वसूल करण्यात आली. ती जवळ जवळ 55 हजार रुपये आहे. 5 हजार रुपयांचे त्यांचे डिपॉझिट जप्त करण्यात आले आणि 50 हजार रुपये वेगळा दंड करण्यात आला. त्यामुळे रजिष्टरची तपासणी, गृहभेटी, नागरिकांच्या तक्रारी या सर्वांचा विचार केला. त्या दिवसाचे त्याच दिवशी अपडेट करायचे असते. काही दुकानदार काम चालू असल्याने दुसऱ्या दिवशी अपडेट करतात म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. शिवाय हे प्रकरण कोर्टामध्ये पाठविलेले आहे आणि त्यांच्यावर गुन्हाही दाखल करण्यात आलेला आहे. कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, शिधावाटप कार्यालयातील माहितीशिवाय हे होणे शक्य नाही. मुंबईवरुन भरारी पथक जाऊन त्याठिकाणी कारवाई होते. या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी आहेत त्यांच्यावर कारवाई केली काय? काल मी डिमांडवर चर्चा करताना सांगितले की, अन्न सुरक्षा योजना राबवित असताना सगळ्यात मोठी अनियमितता झालेली दिसते. याबाबत दुकानदारांनी तहसिलदारांकडे यादी दिलेली आहे. यामध्ये बऱ्याच याद्या बोगस होत्या, मुळ नावे राहून गेलेली आहेत. नाशिक जिल्ह्यात असा प्रायोगिक तत्वावर प्रयोग करण्यात आला त्यात 40 टक्के अपहार झाल्याचे वर्तमानपत्रामध्ये वाचतो. या अधिकाऱ्यांवर काय कारवाई झाली हे कळायला पाहिजे. राज्यामध्ये ज्या बोगस याद्या तयार केल्या जात आहेत याची पुन्हा चौकशी करुन अपडेट करण्यात याव्यात की मुळ लाभार्थ्यांना धान्य मिळाले पाहिजे. परंतु आजही बोगस

.........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41745........

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.......

शिधापत्रकांच्या माध्यमातून दुकानदार आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या संगनमताने भ्रष्टाचार होत आहे याबाबत काही उपाययोजना करणार काय?

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, आधार कार्ड रेशनकार्डशी लिंकअप करण्याचा कार्यक्रम राज्यभर मोठ्या प्रमाणावर चालू आहे. मराठवाड्यातील नांदेड विभागात 98 टक्के काम पूर्ण झालेले आहे. पुणे शहरामध्ये आता लिंकअप केल्याशिवाय धान्यच दिले जात नाही. आम्ही ग्राहकांना सांगतो रेशनकार्ड लिंकअप केल्याशिवाय धान्य मिळणार नाही. साधारणपणे अडीच-पावणेतीन लाख बोगस कार्डांची पुणे शहरात तपासणी चालू आहे. पुणे शहरामध्ये 78 टक्के रेशनकार्डांचे लिंकअप झालेले आहे. ही झाली त्याची दिनांक 15 एप्रिल, 2016 ही शेवटची तारीख आहे. आतापर्यंत राज्यामध्ये 82 टक्के लिंकअप करण्याचे काम पूर्ण झालेले आहे. खात्यामार्फतच आधार लिंकअपची सोय केलेली आहे आणि ती दिनांक 15 एप्रिल, 2016 पर्यंत करुन देण्यात येईल. उरलेली कार्ड आहेत ती बोगस आहेत असे होईल. 8 ते 9 टक्के रेशनकार्ड हे बोगस असल्याची माहिती 15 एप्रिल, 2016 नंतर देता येईल. अन्न सुरक्षा कायद्याने एपीएल आणि बीपीएल यांचे क्लेरीफिकेशन झाले. यामध्ये बीपीएल कार्डामध्ये प्रचंड प्रमाणावर खोट्या याद्या आहेत. मागे सभागृहामध्ये सांगितले की, माझ्या मतदारसंघामध्ये जेव्हा मी रेशन दुकानामध्ये बीपीएल कार्डाचे वाटप करण्यासाठी गेलो तेव्हा त्या बिल्डींगचा मालक त्याचे त्याठिकाणी हॉटेल आहे त्याचेच पहिले नाव यादीमध्ये होते. म्हणून या याद्या चुकीच्या झालेल्या आहेत या एपीएल आणि बीपीएल कार्डांची दुरुस्ती केली पाहिजे यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करीत आहोत. ही कार्ड जुन्या काळातील असल्याकारणाने त्यात सुधारणा करता येत नाही. पुढच्या काही महिन्यांमध्ये बीपीएल याद्यांची सुधारणा केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या मदतीने केली जाईल. बदलापूरच्या याद्या तपासण्यात आलेल्या आहेत. वर्षातून दोन वेळा तपासणी करण्याचे बंधन अधिकाऱ्यांवर घातले आहे. या भागामध्ये तीन वेळा रेशन दुकानांची तपासणी करण्यात आली होती. अशी ज्याठिकाणी अनियमितता दिसून आली तेव्हा ऑनलाईन कम्प्लेंट यायला लागल्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41745........

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मुंबई भरारी पथक गेल्यानंतर याचा शोध लावला तर शिधावाटप कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय हे होणे शक्य नाही. तुम्ही दुकानदारावर दंड करुन फौजदारी गुन्हा दाखल करणार, पण अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, अधिकाऱ्यांना शोकज नोटीस दिली पण आज राज्यामध्ये 55 हजार शिधावाटपाची दुकाने आहेत. त्याठिकाणच्या अधिकाऱ्यांनी वर्षातून दोन वेळा व्हिजीट द्यायला पाहिजे ती तीन वेळा देण्यात आलेली आहे. तरीही यामध्ये अनियमितता आढळून आली. रोजच्या रोज दुकानांची तपासणी करु शकत नाही. म्हणून त्यांना नोटीस दिलेली आहे की सदरहू दुकानांमध्ये जो अपहार झालेला आहे याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

डॉ.जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कबूल केलेले आहे की, यामध्ये अपहार झालेला आहे. माझा पहिला प्रश्न आहे की, यामध्ये अपहार झाला असेल तर संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय? आणि दुसरा प्रश्न असा की, दुकानदारांना माहिती आहे की काहीही केले तरी जास्तीत जास्त दंड लागतो. दुकान निलंबित होते आणि अपिल केले की परत चालू करता येते. म्हणून ज्या दुकानांमध्ये अपहार झालेला आहे त्या दुकानदाराला परत दुकान चालू करणार नाही याची काळजी सरकार घेणार आहे काय?

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, पहिले असे की, गुन्हा दाखल झाला आहे काय असे विचारण्यात आले होते. तर भारतीय दंड विधानाप्रमाणे पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल झालेला आहे. दुसरे असे की, अपहार केला असेल त्याच्या दुप्पट म्हणजे 50 हजार रुपये दंड ठोठावण्यात आलेला आहे. शिवाय त्याचे डिपॉझिट जप्त करण्यात आलेले आहे. अनेक ठिकाणी दुकाने परत चालू करायला देत नाही. राज्यभर जाहिरनामे काढावे लागतील आणि बचत गटांना प्रथम प्राधान्य द्यावे लागेल. नंतर दुकाने ट्रान्सफर करावी लागतात. त्यामुळे यावर दंडात्मक कारवाई झालेली आहे आणि कोर्टामध्ये केसही दाखल करण्यात आलेली आहे आणि कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून पुढील कारवाई करण्यात येईल.

डॉ.जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न असा होता की, दुकानदारांना माहिती झालेले आहे की, अपहार केला तर दंड लागतो, दुकान निलंबित होते, परत अपिल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41745........

डॉ.जयप्रकाश मुंदडा......

केल्यानंतर दुकान चालू करता येते. एका महिन्यात धाड टाकली तो सापडला ठीक आहे. पण अपिल करुन परत दुकान चालू केल्यानंतर दोन-चार महिने अपहार केला तरी कोणी बघत नाही. म्हणजे शासनाने लावलेला दंड दुकानदार एक महिन्यात परत कमावतो. म्हणून ज्या दुकानदाराचे दुकान निलंबित झालेले आहे त्या व्यक्तीला परत दुकान मिळणार नाही याची काळजी सरकार घेणार आहे काय?

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, दुकानदारावर कारवाई केल्यानंतर पहिल्यांदा त्यांना डीएसओकडे अपिल करता येते. नंतर मंत्री महोदयांकडे सुध्दा अपिल करता येते. कारण बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आता दुकाने रद्द केलेली आहेत. सदर दुकानाची आणि मालकाचा इतिहास बघून मगच दुकान द्यायचे की नाही हे ठरविले जाते. परंतु अडचण अशी होते की, एक दुकान रद्द केल्यानंतर त्या परिसरामध्ये दुसरे दुकान नसेल तर तसे करता येत नाही. इतिहास बघावा लागतो की त्याच्यावर किती गुन्हे दाखल झालेले आहेत. मग ते बघून पुढची कारवाई केली जाते. म्हणून यामध्ये दंडात्मक कारवाई करुन त्याची न्यायालयीन चौकशी चालू आहे.

श्री.पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, मला मंत्री महोदयांना असे विचारायचे आहे की, आपण रिपेअरची शक्यता तपासून पाहत आहात ही चांगली गोष्ट आहे. परंतु लोकांना कार्डच मिळत नाहीत. सहा महिन्यापूर्वी मी माझ्या मतदारसंघामध्ये सांगली जिल्ह्यात आढावा घेतला तर गरीब माणसांना 50 टक्क्यांच्यावर रेशनकार्डच मिळत नाहीत. कारण कार्डच मिळाले नाही तर धान्य कुठून मिळणार. यादृष्टीने आढावा घेणार काय? हा माझा स्वतःचा अनुभव मी याठिकाणी सांगतो.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पंतगराव कदम यांनी सांगितलेल्या सांगली जिल्ह्यातील अर्ध्या ठिकाणी रेशनकार्ड नाहीत ही तपासण्यात येईल. उलट सांगली जिल्ह्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील सांगली जिल्ह्यामध्ये पायलट लॉट म्हणून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

एक बायोमॅट्रीक सिस्टीम चालू केली. त्याच्यावर सांगली जिल्ह्यामध्ये एक हजार क्वींटल धान्य दर महिन्याला वाचते. बोगस कार्ड यामध्ये असल्याने हे धान्य वाचते आहे. आधारकार्ड लिंकअपच्या

........5



ता.प्र.क्र.41745........

श्री.गिरीष बापट........

माध्यमातून ही सर्व बोगस कार्ड बाहेर येत आहेत. आपण सांगली जिल्ह्यातील प्रश्न विचारला म्हणून हे सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी ही मोहित चालू केल्याने राज्यात सर्वात जास्त धान्य सांगली जिल्ह्यामध्ये वाचते. तरीही सन्माननीय सदस्यांच्या मागणी नुसार ज्यांना कार्ड मिळाली नसतील त्यांना तपासणीनंतर सांगली जिल्ह्यामध्ये रेशनकार्ड देण्यात येतील.

C-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41745

श्री.गिरीश बापट......

बायो मेट्रीक सिस्टीम सुरु केली, त्याच्यावर सांगलीमध्ये 1000 क्विंटल धान्य दर महिन्याला वाचते आहे, कारण तेथे बोगस कार्डे होती. आता आधार लिंकअप चालू आहे. त्यामुळे ही सगळी बोगस कार्डे बाहेर येत आहेत. आपण सांगली जिल्हयाचा प्रश्न विचारला. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी ही खास बाब म्हणून मोहिम केल्यानंतर राज्यात आता सर्वात जास्त धान्य वाचत आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, मत्री महोदयांनी उत्तर देताना सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे या प्रकरणी नाव घेऊ नये.

**अध्यक्ष** : चांगल्या गोष्टीसाठी नाव घेतले तर हरकत नाही.

श्री.गिरीश बापट : सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार ज्यांना कार्डे मिळाली नसतील, त्यांना तपासणीनंतर सांगली जिल्हयामध्ये कार्डे देण्यात येतील.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मला एवढेच सांगायचे आहे की, लोकांना धान्य व्यवस्थित मिळणे हा योजनेचा महत्वाचा उद्देश आहे. बऱ्याच वेळेला असे लक्षात येते की, धान्य आले, गेले, त्याच्या तपशिलात जात नाही. माझा प्रश्न स्पेसिफिक आहे. यामध्ये इलेक्ट्रॉनिकली करणे, बायोमेट्रीक करणे, एवढे सोपे नाही, त्याला फार वेळ लागतो. सिस्टीम बसणे, ती स्टेबल होण्यास फार वेळ लागतो. किमान महाराष्ट्रातल्या सर्व स्वस्त: धान्य दुकानदारांनी बाहेर बोर्ड लावून प्रत्येकाच्या वाटयाला एक लिटर रॉकेल, दोन किलो गहू, तीन किलो धान्य तुम्ही त्या महिन्यात वाटप केले आहे व कोणत्या कॅटेगिरीच्या लोकांना केले, याचा फलक लावला पाहिजे. हा फलक लावायचे सक्तीचे केले पाहिजे. प्रत्येक गावामध्ये एस.एम.एस. जातो, शासनाची ती पूर्वीची योजना आहे. पण फलक जर लावला तर नवीन धान्य येईपर्यंत प्रत्येकाचा हक्क इस्टॅब्लीस होईल. प्रत्येक ग्राहकाला समजेल की आपल्याला या महिन्यात काय मिळणार आहे. तसेच प्रशासनालाही समजेल यांनी फलक लावला आहे. त्यांचे काम योग्य चालले आहे. अशी व्यवस्था आपण केली तर महाराष्ट्रातील जनतेला फार मोठी मदत होईल, अशी माझी विनंती आहे, तसे सरकारला करता येईल का ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41745..........

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, सूचना योग्य आहे. तसे केले जाते, ते नियमाप्रमाणे करावे असे आहे. परंतु तसे न करणा-यांवर गुन्हा नोंदविला जातो, रजिस्टर अप टू डेट ठेवणे, पावत्यांची जुळणी करणे, बोर्ड लावणे, दुकान 8 तास उघडे ठेवणे, त्यामध्ये कामगार ठेवणे, असे न करणा-यावर कारवाई केली जाते. पण बोर्डाच्या संदर्भात अधिक कडक तपासणी केली जाईल.

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, जी यादी केली जाते ती, रेशन दुकानदार करीत नाहीत.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, ज्या दुकानदाराकडे माल जाईल त्याच्या भोवतीच्या त्या भागातील ग्रामपंचायत असो, पंचायत समिती असो, जिल्हा परिषद आणि तेथील प्रमुख जी लोक आहेत, दक्षता कमिटया आहेत, हया 25 लोकांना आजही माल गेल्यानंतर लगेच एस.एम.एस. जातो याची मी स्वतः तपासणी केली. लाभार्थ्यांची संख्या 500 असेल तर साधारण पक्ष प्रतिनिधी, तेथील पी.एस.आय., असोसिएशन, आमच्या समितीचे सदस्य, सरपंच, हया सगळयांना एस.एम.एस. जातो. एका दुकानाच्या मागे 25 लोकांना एस.एम.एस. जातो.

**अध्यक्ष :** मंत्री महोदय, त्या फलकावर एकूण कार्ड किती, आणि आलेले नियतन किती याचा उल्लेख नसतो.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, याचा उल्लेख करायला लावू.

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, जी यादी केली जाते ती यादी रेशन दुकानदार करीत नाहीत. ती यादी तहसिलदार कार्यालय करते. माझ्या मतदार संघामध्ये मी आमदार झाल्यानंतर दोन हजार लोकांची कार्डे रद्द केली. आज अंत्योदय योजनेमध्ये लाभ कोणाला मिळतो ? ज्यांचा मुलगा 18 वर्षाचा झाला, त्याचे नाव कमी केले पाहिजे. माझी स्पेफिक मागणी आहे की, बोगस नावे नोंदविणा-या अधिका-यांवर काय कारवाई करणार ? त्यामध्ये ग्रामसेवक, तहसिलदार कार्यालयातील अधिकारी असतो. माझ्या रायगड जिल्हयामध्ये बरीचशी लोक मुंबईला राहतात त्यांचे मुंबईला नाव आहे आणि जिल्हयात सुध्दा आहे. काही नावे रद्द झालेली आहेत. जे खरोखर लाभार्थी आहेत, त्यांना त्याचा लाभ देणार का ?

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41745.........

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, दोन ठिकाणी कार्ड असेल तर दोन्ही ठिकाणी लाभ मिळणार नाही. हया आधार लिंकअप मधून अशी प्रकरणे बाहेर येत आहेत. अनेक मोठया शहरांमध्ये,गावांमध्ये शेकडो, हजारांनी बोगस कार्डे सापडलेली आहेत. नगर मधील 350 लोकांची नावे शिरूरमध्ये सापडली. या तपासणीमधून सर्व बाहेर येतील. बोगस कार्ड राहणार नाही. दोन्ही ठिकाणी लोक राहतात. त्यातील एकाच ठिकाणी लाभ मिळेल. रायगडच्या संदर्भात वेगळे पथक पाठवून त्याची तपासणी केली जाईल.

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

01-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही )

C-4

SVK/ MMP/ AKN/ 10:20

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याबाबत*

***५१२८२ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

***(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सन २००६ पासून १८७ पाणीपुरवठा योजनांची कामे सुरु असून गत १० वर्षात केवळ ४७ योजना पूर्ण झाल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,***

***(२) असल्यास, उर्वरित १२२२ योजनांपैकी सध्या ६ योजना कार्यान्वित आहेत तर २४ पाणीपुरवठा योजनांत गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,***

***(३) असल्यास, सदरहू उर्वरित योजना अद्याप पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,***

***(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर योजना पूर्ण करुन गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,***

***(५) तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?***

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मुरबाड तालुक्यामध्ये सन २००५ पासून १८७ पाणी पुरवठा योजनांची कामे मंजूर असून मागील १० वर्षामध्ये त्यापैकी ४९ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत.त उर्वरित १३८ योजनांपैकी ३४ योजना पूर्णत्वाच्या मार्गावर असून या योजनांमधून पाणी सुरु करण्यात आले आहे, २१ योजनांची कामे सुरु आहेत व २३ योजनांमध्ये आर्थिक गैरव्यवहार निदर्शनास आल्याने संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष / सचिव यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर योजना ह्या ग्राम पाणी पुरवठा समितीची उदासिनता व अंतर्गत वाद, कंत्राटदारामार्फत कामामधील दिरंगाई, जागेची अनुपलब्धता, बहुतांश कामे अनुभवी कंत्राटदारांमार्फत न करता समितीमार्फत करण्यात येणे, तसेच समितीमार्फत वेळोवेळी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न करणे इत्यादी कारणांमुळे अपूर्ण आहेत.

(४) याबाबत विभागीय आयुक्त यांचेमार्फत ठाणे जिल्ह्यातील मागील १० वर्षातील सर्व योजनांची चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल अंतिम टप्प्यात आहे. सदर अहवालाचे अनुषंगाने रखडलेल्या योजनांबाबत कारवाई करण्यात येणार आहे.

तसेच जिल्हा परिषदेमार्फत संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती तसेच ग्रामपंचायतीस वेळोवळी काम पूर्ण करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत व पाठपुरावा करुन कामे पूर्ण करणे नियोजित आहे.

(५) गैरव्यवहार निदर्शनाससआलेल्या योजनांबाबत संबंधित समितीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच विभागीय आयुक्त यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या अहवालान्वये उर्वरित योजनांबाबत कारवाई

करण्यात येणार आहे. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्‍भवत नाही.

.....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282.....

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, मुरबाड, जिल्हा ठाणे तालुक्यातील पाणीपुरवठा योजनाअंतर्गत ठाणे जिल्हयात सन 2005 पासून 300 कोटी रुपयांचा निधी देऊनही पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या नाहीत, हे खरे आहे का ? या योजनेतंर्गत त्या समित्यांच्या अध्यक्ष, पदाधिका-यांवर गुन्हे दाखल झाले का ? तत्कालीन अधिका-यावर कोणीतीही कारवाई झाली नाही हे, खरे आहे का ? जो भ्रष्टाचार झालेला आहे त्या भ्रष्टाचाराची रक्कम वसूल करणार का ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, या मतदार संघाचे माननीय आमदार श्री.किसन कथोरे यांनी माझ्याकडे तक्रार केली होती. तक्रारीवरुन जिल्हयातील 1500 पाणीपुरवठा योजनेची विभागीय आयुक्तांच्यामार्फत तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले. त्या तपासणीचा अहवाल अंतिम टप्यामध्ये आहे. या पाणीपुरवठा योजनेमध्ये 138 पैकी 49 पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या, सन 2005 मध्ये निधी मिळाला, परंतु ही कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यंत्रणेचे अधिकारी, लोकप्रतिनिधींच्या संदर्भात बैठका झाल्या आणि संपूर्ण जिल्हा भरातल्या 1500 पाणी पुरवठा योजनांची तपासणी करुन प्रथम दर्शनी जी माहिती हाती आली, चौकशी अंती कार्यकारी अभियंत्यांना निलंबित करण्यात आले. शाखा अभियंत्यांना निलंबित करण्यात आले. सर्व तपासणीचा अहवाल विभागीय आयुक्तांच्यामार्फत शासनाला सादर होईल, आणि ज्या पाणीपुरवठा समित्यांनी 10 वर्षे निधी असताना कामे पूर्ण केली नाहीत, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, अंतिम टप्यामध्ये ही चौकशी आहे. 10 वर्ष झाल्यानंतर सभागृहामध्ये जेव्हा प्रश्न आला तरी सुध्दा ही चौकशी अंतिम टप्यात आहे. एकदा हा विषय निघुन गेल्यानंतर पुन्हा दोन तीन वर्षात प्रश्न आला की, त्याला उत्तर द्यायचे लवकरात लवकर करण्यात येईल असे द्यायचे. माझी अशी विनंती आहे की, जे कोणी दोषी असतील त्यांना आपण सस्पेंड केले, हे ठिक आहे. त्यांनी इतके गंभीर प्रकार करुन ठेवले असल्यामुळे त्यांना सेवेतुन मुक्त केले पाहिजे. म्हणून एक टाईम बाऊंड फ्रेममध्ये

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282.....

श्री.प्रशांत बंब .......

आपण त्यांना सेवेतून मुक्त करणार काय ? पैसा आपला निघून गेलेला आहे. योजना अपूर्ण राहिल्या आहेत. म्हणून जे पदाधिकारी होते, सरपंच, अध्यक्ष, ऑडिटचे पदाधिकारी असतील ज्यांनी यामध्ये अपहार केला ते प्रथम दर्शनी लक्षात आले आहे. त्यांच्या प्रॉपर्टया त्यांनी विकू नये, जो पर्यंत प्रकरणाचा निकाल लागत नाही, अशी कार्यवाही आपण करणार काय ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, ज्या पाणीपुरवठा समित्यांनी अपहार केलेला आहे, अशा पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष आणि सचिव यांच्यावर एफ.आय.आर. दाखल करुन गुन्हे दाखल केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, त्यांची प्रॉपर्टी हस्तांतर होऊ नये. म्हणून त्यांच्या सर्व 7/12 च्या उता-यावर कर्जाचा बोजा टाकण्यात येईल.

D-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282 .....

श्री.पांडुरंग वरोरा .....

माननीय मंत्री यांनी उत्तर दिलेले आहे की, कार्यकारी अभियंता व संबंधितांना निलंबित केलेले आहे. पण ही माहिती चुकीची आहे. कारण कार्यकारी अभियंता यांना अँटी करप्शन ब्युरोने पकडले आहेत. नंतर ज्यांच्याकडे ॲडीशनल चार्ज दिलेला आहे, त्यांनाही अँटी करप्शन बुरोने पकडले आहे. असे प्रकार घडत असतील तर या योजना कशा पूर्ण होणार आहेत ?

अध्यक्ष महोदय, शहापूर व मुरबाड हे मुंबईची लाईफलाईन असलेले तालुके आहेत. शहापूर तालुक्यातील भातसा धरणातून मुंबईला 100 टक्के पाणी पुरवठा होतो. पण तेथील पाणीपुरवठा योजना तकलादू स्वरूपाच्या आहेत. शहापूर तालुक्यातील भावली धरणातून कायमस्वरूपी 159 गावांची पाणी योजना पूर्ण करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी याच अधिवेशनात प्रश्न विचारला होता. यावर उत्तर दिले होते की, याच अधिवेशनात याकरिता मंजूरी देऊन 50 कोटीची तरतूद करण्यात येईल. परंतु खरोखर भावली धरणातून या पाणीपुरवठा योजनेस मंजूरी दिली आहे का ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, 2005 साली 300 कोटी रुपये ठाणे जिल्हयाच्या पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर झाले होते. मागील 10 वर्षात हे काम पूर्ण करणे अपेक्षीत होते. परंतु दोन वर्षाचा कालावधी असताना 300 कोटी रुपये मिळूनही या जिल्हयातील जनतेला पिण्याचे पाणी मिळू शकले नाही. म्हणून 10 वर्षाचे रेकॉर्ड तपासण्याचे काम व त्याची चौकशी चालू आहे. याबाबतचा अहवाल 1 महिन्याच्या आत शासनाला सादर होईल. विभागीय आयुक्तांनी अशा प्रकारे बैठकीमध्ये सांगितले आहे.

सन्माननीय सदस्यांनी भावली धरणातून पाणीपुरवठा करण्याबाबत प्रश्न विचारला आहे. या धरणातून 87 गावे 249 पाडयाच्या पाणीपुरवठा योजनेसाठी मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतून काम हाती घेतलेले आहे. लोकप्रतिनिधी व आदिवासी जनतेची या योजनेबाबतची मागणी अनेक वर्षापासून आहे. तेथून पाणी मुंबईला येत आहे हे त्यांना दिसत आहे पण त्यांना पाणी मिळत नाही. म्हणून शासनाने आदिवासी गावे, वाडया, पाडे यांची नोंद घेतलेली आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतून हे काम मंजूर करण्यात आलेले आहे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282 .....

श्री.किसन कथोरे : अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यातील योजना या जनतेसाठी केलेल्या नव्हत्या तर त्या फक्त ठेकेदारांसाठी केलेल्या होत्या. 10 वर्षात त्या योजनांना मोठा निधी मिळूनही त्या गावांना पाणी मिळालेले नाही. मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो की, त्यांच्याकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी आम्हा सर्व संबंधितांच्या बैठका घेतल्या आहेत. त्यांनी याबाबतची चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी. तसेच मी विचारु इच्छितो की, या योजनेचे रिवाईज अंदाजपत्रक तयार करुन या योजनांचे तातडीने काम करण्याची परवानगी मिळेल का, त्याचबरोबर पाणीपुरवठा समित्या बरखास्त करुन पुन्हा निविदा काढण्याची प्रक्रिया किती दिवसात पूर्ण करणार ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, मागील 10 वर्षात पाणी पुरवठा समित्यांनी ही कामे पूर्ण केलेली नाहीत. पाणीपुरवठा समित्या व ग्रामपंचायतीची उदासीनता यामुळे ही कामे पूर्ण होऊ शकलेली नाहीत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला की, पाणीपुरवठा समित्यांच्या माध्यमातून कामे पूर्ण होत नाहीत व त्यास विलंब लागत आहे. म्हणून ही कामे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केली जातील काय. याबाबत मी सांगू इच्छितो की, याबाबत अहवाल मागवून या पाणीपुरवठा योजनेसाठी किती निधी लागेल याची संपूर्ण माहिती घेऊन जिल्हापरिषद स्तरावर याबाबत निविदा काढून ही कामे पूर्ण करण्यात येतील.

श्री.दीपक चव्हाण : अध्यक्ष महोदय, लेखी उत्तरामध्ये सांगितले आहे की, उर्वरित 138 योजनांपैकी 34 योजना पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत, राहिलेल्या योजना अपूर्ण आहेत. अपूर्ण योजना राष्ट्रीय पेयजल योजनेच्या माध्यमातून सुरु होत्या. मी विचारु इच्छितो की, या योजना राष्ट्रीय पेयजल योजना किंवा नवीन मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजना यापैकी कोणत्या योजनेतून कधी पूर्ण करणार आहे ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, मी अगोदर सांगितले की, मागील 10 वर्षात या योजना पूर्ण होऊ शकलेल्या नाहीत. पाणीपुरवठा समित्या व ग्रामपंचायतीकडून हे काम पूर्ण झालेले नाही. या योजनेसाठी नवीन डीएसआर प्रमाणे किती निधी लागेल याचा अंदाज घ्यावा लागेल. याबाबत काल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा झालेली आहे.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282 .....

श्री.बबनराव लोणीकर.....

त्यांना सूचना देण्यात आल्या आहेत की, सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन शासनाकडून निधी मिळण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यात यावा. या योजनेसाठी जिल्हा परिषदेच्या कोणत्या हेडमधून निधी द्यायचा हे पाहून शासन स्तरावर या योजना पूर्ण करण्यात येतील. समित्याच्या बरखास्तीबाबत विभागीय आयुक्तांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्हयातील कार्यकारी अभियंता श्री.बावीस्कर यांना अँटी करप्शन ब्युरोने पकडले, नंतर त्यांच्याकडील ॲडीशनल चार्ज डयेप्युटी इंजिनियर श्री.मोहन पाटील यांच्याकडे देण्यात आला. नंतर त्यांनाही पकडण्यात आलेले आहे. याचा अर्थ ही सर्व यंत्रणा पोखरलेली आहे. सरकारच्या या यंत्रणेला जनतेपर्यंत पाणी पोहचविण्यात अपयश आले तर वावगे ठरणार नाही.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्य 10 वर्षापूर्वी म्हणजे 2005 पासून हे चालू आहे असे म्हणतात. पण आम्ही काहीही विचारले तरी मागील इतिहास काढूनही तुम्ही पुढे जात नाहीत याची आम्हाला चिंता वाटते.

अध्यक्ष महोदय, त्यामुळे अशा फेल्युअर झालेल्या यंत्रणेऐवजी शासन खाजगीकरणाने या योजना पूर्ण करुन पाण्याचे डिस्ट्रीब्युशन करण्याचा प्रयतन करणार आहे का ? गावातील लोकांच्या समित्यामध्ये कोणीही टेक्नीकल नसते त्यामुळे त्यांना माहिती नसते. आदिवासी सरपंच किंवा कमकुवत सरपंच असेल तर त्याच्या सहया घेतल्या जातात व दुसराच कोणी तरी कारभार चालवत असतो. भारत निर्माण योजनेचा मुळ गाभा असा होता की, लोकांना त्यांचा विकास स्वतः करु द्यावा. पण त्यातील अपयश आपल्यासमोर येत आहे. म्हणून या समित्या बरखास्त करुन यासाठी स्वतंत्र अधिक इफेक्टीव्ह आपल्या पै न पै चा हिशोब अधिक पारदर्शीपणे दाखविणारी यंत्रणा सरकार करणार का ? याबाबत खाजगीकरणाचा विचार करीत असल्याचे मला समजले आहे. मी विचारु इच्छितो की, खाजगीकरणाचा विचार सरकार करणार आहे का ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, ही बाब खरी आहे की, कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांना अँटी करप्शनने पकडले आहे. कार्यकारी अभियंता यांना निलंबित करण्याची घोषणा

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282 .....

श्री.बबनराव लोणीकर.....

या सभागृहात केली होती. त्यांना शासनाने निलंबित केलेले आहे. 10 वर्षात 300 कोटीची कामे पूर्ण करीत असताना पाणीपुरवठा समित्या व ग्रामपंचायती यांनी दुर्लक्ष केलेले आहे. शासनातील अधिकारी कर्मचारी यांच्याकडून दोन वर्षात काम पूर्ण होणे अपेक्षीत होते परंतु 10 वर्षात हे काम पूर्ण होऊ शकले नाही. आमचे सरकार आल्यानंतर पाणीपुरवठा खात्याचा मंत्री म्हणून मी गंभीरपणे 1500 गावाच्या पाणीपुरवठा योजना तपासण्याचे काम विभागीय आयुक्तामार्फत चालू केलेले आहे. याबाबत एक महिन्याच्या आत अहवाल प्राप्त होईल. ज्यांच्यामुळे पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊ शकल्या नाहीत अशा दोषी पाणीपुरवठा समित्या व दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात येईल असे मी यापूर्वी सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, खाजगीकरणाच्या माध्यमातून या योजना करण्यात येतील का. याबाबत मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारची मागणी आल्यास सरकार याबाबत विचार करेल.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न समित्या बरखास्त करण्याबाबतचा होता. या समित्या बरखास्त झाल्या की व्हायच्या आहेत ?

. श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, या योजनेतील 1500 गावातील अपहाराच्या मागील दहा वर्षाच्या चौकशीचा अहवाल एक महिन्याच्या आत येईल.

यानंतर ई-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282.........

श्री.बबनराव लोणीकर.....

आणि एका महिन्याच्या आत अहवाल आला तर त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**अध्यक्ष :** राज्यातील पाणीपुरवठा समित्या नीट काम करीत नाहीत. अशा समित्या शासन चालू ठेवणार आहे की बंद करणार आहे ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, हा धोरणात्मक निर्णय आहे. याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, मागील अधिवेशनाच्या वेळी माननीय मंत्री यांनी उत्तर दिले होते की, या समित्या बरखास्त करण्यात येतील. आपण मागील अधिवेशनाचा रेकॉर्ड काढून बघावा. आता माननीय मंत्री मात्र उत्तर देत आहेत की, हा धोरणात्मक निर्णय असून याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, राज्यभरातील पाणीपुरवठा समित्यांमध्ये अपहार झाल्याचे प्रकार निदर्शनास आलेले आहेत. पूर्वी पाणीपुरवठा समितीला 2 कोटी रूपयापर्यंतची कामे मंजूर करण्याचे अधिकार होते. या कामांना तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार पाणीपुरवठा समित्यांना देण्यात आले होते. राज्यभरातील पाणीपुरवठा समित्यांमध्ये होणारे गैरप्रकार व अपहार लक्षात आल्यानंतर पाणीपुरवठा समित्यांकडे कोणतेही अधिकार ठेवण्यात आले नाहीत. पाणीपुरवठा समित्यांचे तांत्रिक मान्यता देण्याचे व निविदा प्रक्रियेचे असे सर्व सर्व अधिकार काढून घेण्यात आलेले आहेत.

श्री.राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री मान्य करीत आहेत की, राज्यभरामध्ये पाणीपुरवठा समित्यांमध्ये गैरप्रकार व अपहार होत आहेत. राज्यभरामध्ये पाणीपुरवठा समित्यांचे गैरप्रकार सिध्द झालेले आहेत. यासंदर्भात सभागृहात गेल्या वर्षीपासून हा प्रश्न तीन वेळा उठविण्यात आलेला आहे. तरीही या कमिटया बरखास्त करण्यासंबंधी धोरणात्मक निर्णय असून सकारात्मक विचार करण्यात येईल, असे उत्तर मंत्री महोदयांकडून देण्यात येत आहे. पाणीपुरवठा समित्यांचा राज्यातील पाणीपुरवठा योजनांचा बट्टयाबोळ करण्यामध्ये मोठा हात आहे. याबाबत तातडीने निर्णय होण्याची गरज आहे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282.........

श्री.राजेंद्र पाटणी.....

याबाबत शासन तातडीने निर्णय घेणार आहे का ? पाणीपुरवठा समित्यांच्या अध्यक्षांनी काम न करता पैसे काढलेले आहेत, त्यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आलेल्या आहेत. परंतु त्या अध्यक्षांच्या मालमत्तेवर टाच आणण्याचे काम केलेले नाही. एफआयआर दाखल केल्यानंतर ते ॲण्टिसिपेटरी बेलवर बाहेर येतात. या गैरव्यवहारामध्ये शासनाचे कोटयवधी रुपये अडकलेले आहेत. शासन या पाणीपुरवठा समित्यांच्या अध्यक्षांच्या संपत्तीवर टाच आणण्याचे काम करणार आहे का ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, मी सांगितले की, पूर्वीच्या काळामध्ये पाणीपुरवठा समित्यांना 2 कोटी रुपयापर्यंतच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार होते. आता पुढील काळामध्ये हे अधिकार काढून घेण्यात आलेले आहेत. या कामांच्या निविदा प्रक्रिया व इतर संबंधित कामे जिल्हापरिषदेच्या माध्यमातून होतात.

श्री.सुभाष पाटील. : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 2 कोटी रुपयापर्यंतच्या कामाच्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार समित्यांकडून काढून घेण्यात आलेले आहेत. जिल्हापरिषदेच्या कमिटीला केवळ 50 लाख रुपयापर्यंतच्या कामांचे अधिकार असतात. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी हे बोलत आहे. जिल्हापरिषदेने मंजूर केल्यानंतरही पाणीपुरवठा कमिटी मार्फतच त्यासंदर्भातील निविदा प्रक्रियेची कामे पूर्ण केली जातात.

श्री.बबनराव लोणीकर: अध्यक्ष महोदय, पाणीपुरवठा समितीला 2 कोटी रुपयापर्यंतच्या कामांना मान्यता देण्याचे अधिकार होते. जिल्हापरिषदेला 5 कोटी रुपयापर्यंतच्या कामांना मान्यता देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. ग्रामपंचायतींना 2 कोटी रुपयापर्यंतची कामे मान्य करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. आता मात्र या पाणीपुरवठा समित्यांचे सर्व अधिकार काढून घेण्यात आलेले आहेत.

डॉ.पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये पाणीपुरवठा समिती व पाणीपुरवठा योजनांसंदर्भात फार व्यापक स्वरुपात चर्चा सुरु आहे. या राज्यातील 90 टक्के पाणीपुरवठा योजना बंद आहेत.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282.........

डॉ.पतंगराव कदम....

या योजनांच्या माध्यमातून पाणी मिळण्याऐवजी केवळ पैसाच पाण्यासारखा वाहत आहे. राज्यभरामध्ये एकूण किती पाणीपुरवठा योजना चालू आहेत ? किती पाणीपुरवठा योजना बंद आहेत ? शासनाने यावर काय कारवाई केलेली आहे ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न कक्षेच्या बाहेरचा आहे. या राज्यातील 1100 पाणीपुरवठा योजना बंद आहेत. या बंद असलेल्या पाणीपुरवठा योजना पुनरूज्जीवित होऊन त्यामार्फत लोकांना पिण्याकरिता पाणी मिळू शकते. शासनाने या बंद असलेल्या 1100 पाणीपुरवठा योजना मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजनेमध्ये घेतलेल्या आहेत.

श्री.भारत भालके : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री यांनी सांगितले आहे की, राज्यातील बंद पाणीपुरवठा योजना पुनरूज्जीवित होऊ शकतात. राज्यामध्ये काही पाणीपुरवठा योजना अशा आहेत की, जिल्हापरिषदा आणि आणि एमजेपीच्या वादात एकमेकांकडे वर्गीकरण करून न घेतल्यामुळे बंद पडलेल्या आहेत. शासनाने याबाबत तातडीने वर्गीकरणाचा प्रस्ताव असेल तर तो मान्य करावा. शासन संबंधितांना त्या संदर्भातील योग्य त्या सूचना देणार आहे का ? काही दुष्काळी भागातील योजना 90 टक्के पूर्ण झालेल्या असतांनाही शासनाने 2-4 कोटी रूपयांचे पाईप खरेदी न करून दिल्यामुळे बंद पडलेल्या आहेत. आता दुष्काळी भागामध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याकरिता जेवढा खर्च लागेल तेवढया खर्चामध्ये शासनाने त्यांना पाईप खरेदी करून दिले तर तेथील लोकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल. ज्या योजनांवर 70-80 कोटी रूपये खर्च झालेले आहेत. माझ्या मंगळवेढा तालुक्यातील एका योजनेंतर्गत केवळ शासनाने 4 कोटी रूपयांचे पाईप घेऊन न दिल्यामुळे लोकांना पाणी मिळत नाही. केवळ शासनाने पाईप खरेदी न केल्यामुळे पाणीपुरवठा योजना बंद आहेत.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक योजनेबाबत प्रश्न विचारलेला आहे. याबाबत त्यांनी माझ्याकडे माहिती द्यावी.

श्री.भारत भालके : अध्यक्ष महोदय, याबाबत मी तीन दिवसांपूर्वी माननीय मंत्री यांना भेटून पत्र व माहिती दिलेली आहे. प्रधान सचिव महोदयांनी या पाणीपुरवठा योजनेला भेट दिलेली आहे.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282.........

**अध्यक्ष :** मंत्री महोदय, यामध्ये 70-80 कोटी रुपये खर्च झाले असून केवळ 2-4 कोटी रुपयांच्या पाईपकरिता लोकांना पाणीपुरवठा होत नाही. कधीतरी शासनाला या 2-4 कोटी रुपयांच्या पाईपचा विचार करावा लागणार आहे. शासनाकडून दुष्काळी भागातील या पाणीपुरवठा योजनेच्या पाईप खरेदीकरिता तातडीने विचार झाला पाहिजे.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पाईपलाईनच्या योजनेसंदर्भातील पत्र त्यांनी तीन दिवसापूर्वी मला दिलेले आहे, ही गोष्ट खरी आहे. याबाबत मी त्यांच्याशी चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या योजनेसंदर्भात तातडीने निर्णय घेण्यासंदर्भात बैठक बोलावून त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री उत्तर देत आहेत की, योजनांकरिता मुख्यमंत्री जल निधीतून निधी देण्यात येईल. कायद्यातील तरतुदीनुसार एखादी पाणीपुरवठा योजना राष्ट्रीय पेय जल योजनेमध्ये मंजूर झालेली असेल तर त्या योजनेला पूर्वी मंजूर केलेल्या एस्टिमेटनुसार बजेट दिलेले असते. कामे अर्धवट असतील तर चौकशी करण्यात यावी. एकदा राष्ट्रीय पेय जलमध्ये मंजूर झालेल्या योजनांना शासन पुन्हा नव्याने निधी देऊ शकते का ? अशा प्रकारे एकदा मंजूर झालेल्या योजनांकरिता नव्याने निधीची तरतूद करता येत नाही. शासनाने मुख्यमंत्री पेय जल योजनेमधून या योजनांना मागील वर्षीपासून एकही रुपया दिलेला नाही. त्याकरिता तरतूद केलेली नाही. एका वर्षात मुख्यमंत्री जल योजनेतून निधी मिळेल,असे जे सांगितले गेले,त्या संदर्भात स्पष्टीकरण करावे. पाणीपुरवठा कमिटयांची चौकशी करुन त्यामध्ये जे दोषी असतील त्यांच्या 7/12वर बोजा कायद्याने चढविता येतो का ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, राज्यातून या संदर्भात तक्रारी आलेल्या आहेत. दोषी आढळलेल्यांच्या 7/12 वर बोजा टाकलेला आहे. ही कारवाई करण्याचे अधिकार शासनाला आहेत. अपूर्ण पाणीपुरवठा योजना,राष्ट्रीय पेय जल योजनांची कामे केंद्र शासन व राज्य शासनाच्या माध्यमातून मिळून हाती घेण्यात आली आहेत. याकरिता जसा निधी उपलब्ध होईल. त्याप्रमाणे अपूर्ण पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यात येतील.

...5

ता.प्र.क्र.51282.........

श्री.सत्यजित पाटील-सरूडकर : अध्यक्ष महोदय, राज्यात राष्ट्रीय पेय जल योजनेच्या माध्यमातून 4,000 योजना मंजूर झालेल्या आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांनी काढलेल्या एका परिपत्रकामुळे प्रशासकीय मान्यता मिळालेल्या वर्क ऑर्डर निघालेल्या पाणीपुरवठा योजना रद्द झालेल्या आहेत. शासन या चार हजार पाणीपुरवठा योजना नव्याने मुख्यमंत्री पेय जल योजनेमध्ये समाविष्ट करणार आहे का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51282.........

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने नवीन योजना हाती घेऊ नयेत अशा प्रकारचे पत्र आणि आदेश दिले आहेत. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी पुरवठा योजनेची कामे हाती घेण्यात आली होती. ही कामे पूर्ण झालेली नाहीत. जोपर्यंत हाती घेण्यात आलेल्या योजना पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत केंद्र शासनाने नवीन योजना घेऊ नयेत अशा प्रकारचे पत्र आणि आदेश दिले आहेत.

**अध्यक्ष** : ठीक आहे. आता प्रश्न क्रमांक 3 चर्चेला घेण्यात येईल.

------

......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*आडवली-माडली (ता. **मालवण**, जि.सिंधुदुर्ग) नळपाणी*
*योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार*

*(३) * ५०६०७ श्री.वैभव नाईक (**कुडाळ**) : सन्माननीय पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) आडवली-माडली (ता. **मालवण**, जि.सिंधुदुर्ग) नळपाणी व आडवली नळपाणी योजनेच्या कामातत गैरव्यवहार झाल्याचे` माहे **फेब्रुवारी**, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले **आहे**, हे खरे आहे **काय**,*

*(२) **असल्यास**, सन २००९ ते २०१० या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या नळपाणी योजनेत टाकी तसेच अन्य कामे पूर्ण न करता कामाच्या निधीत गैरव्यवहार झाला असून गत पाच वर्षे सदर कामे अपूर्ण अवस्थेत **आहेत**, हे ही खरे आहे **काय**,*

*(३) **असल्यास**, याबाबत शासनाने चौकशी केली आहे **काय**, चौकशीत काय आढळून **आले**, तद्नुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत **आहे**,*

*(४) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. बबनराव लोणीकर : (१) **होय**, हे खरे आहे.*

*(२) अंशत: खरे आहे. योजनेचे काम पाच वर्षे अपूर्ण अवस्थेत असले तरी सद्य:स्थितीत योजनेच्या उद्भ ाव विहिरीचे व अन्य उपांगाची कामे पूर्ण करण्यात आली असून योजनेच्या पाणी पुरवठ्याच्या चाचणीचे काम चालू आहे.*

*(३) **होय**, भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत सन **२००९-१०** मध्ये रुपये **१४.७६** लक्ष किंमतीच्या मौजे आडवली माडली नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती. ी सदर योजनेचा मक्ता ग्रामीण पाणी पुरवठा समितीद्वारे खाजगी कंत्राटदारास देण्यात आला होता. ा सदर योजनेच्या कामासाठी जिल्हा परिषदेद्वारे पहिल्या व दुसऱ्या हप्त्याद्वारे रुपये **११.०३** लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.` योजनेच्या कामाचे मुल्यांकन रुपये **६.००** लक्ष इतके झाले आहे.` मुल्यांकनाशिवाय रुपये **७.४७** लक्ष इतका निधी अधिकचा खर्च केला आहे.` यात जिल्हा परिषदेद्वारे दिलेले अनुदान व अन्य योजनांच्या शिल्लक रक्कमेचा समावेश आहे.` मुल्यांकनापेक्षा अधिकच्या खर्चाबाबत तत्कालिन समितीच्या पदाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या आहेत.त तसेच सद्य:स्थितीत योजनेचे काम अन्य तांत्रिक सेवा पुरवठादाराकडून करुन घेण्यात येत आहे.*

*(४) प्रश्न उद्भवत नाही.*

श्री. वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. सदर योजना सन 2009-2010 मध्ये मंजुर झालेली होती. सदर योजनेस त्यावेळी 22 लाख रुपयांचा खर्च आलेला होता. लोकांनी तक्रार केल्यानंतर सदर योजनेच्या बाबतीत चौकशी करण्यात आली. त्यावेळी सदर योजनेचे 15 लाख रुपयांचे बिल मंजुर केले होते. सद्य:स्थितीत या योजनेचे 6 लाख रुपयांचे मूल्यांकन झालेले आहे. त्यावेळी सदर योजनेमध्ये 9 लाख रुपयांचा अपहार झालेला होता. त्यावेळी तक्रार केली नसती तर 22 लाख रुपयांचा निधी वितरित झाला असता.

अध्यक्ष महोदय, सदर योजनेत ज्या लोकांनी अपहार केलेला आहे, अशा लोकांच्या विरोधात कारवाई केली जाईल काय ? सन्माननीय सदस्यांनी एखादा प्रश्न विचारल्यानंतर मग

......3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 50607.....

श्री. वैभव नाईक......

त्याची चौकशी केली जाते आणि त्यानंतर कारवाई केली जाते. अनेक गावांमध्ये अशा प्रकारच्या योजना आहेत आणि त्यामाध्यमातून संबधितांना बिले अदा केलेली आहेत. अशा गावांमध्ये पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. अशा वेळी संबंधित दोषी लोकांवर, पाणी पुरवठा समितीवर कारवाई केली जाते. पण अशा वेळी पाण्याचा प्रश्न कसा सोडविणार हा माझा मुळ प्रश्न आहे. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी वेगळा निधी किंवा दुसऱ्या योजनेतून तो प्रश्न सोडविला जाणार काय ?

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सत्यजित पाटील-सरुडकर यांनी सांगितल्यानुसार राष्ट्रीय पेयजल योजनेचा 20 कोटी रुपयांचा आराखडा मंजुर झालेला आहे. माननीय पाणीपुरवठा मंत्र्यांनी मुख्यमंत्री योजनेतून तो आराखडा घेतला जाईल असे उत्तर दिलेले आहे. राष्ट्रीय पेयजल योजनेचा आराखडा मुख्यमंत्री योजनेतून घेतला जाईल काय ?

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय पेयजल योजना बंद झालेली नाही. जुनी कामे पूर्ण होईपर्यंत राष्ट्रीय पेयजलमधील नवीन कामांना स्थगिती दिलेली आहे. राज्य आणि केंद्र शासनाचा निधी एकत्रित करुन जुनी आणि अपूर्ण कामे पूर्ण केली जाणार असे उत्तर मी पूर्वीच दिलेले आहे.

श्री. वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, योजनेस त्यावेळी 22 लाख रुपयांचा खर्च आलेला होता. लोकांनी तक्रार केल्यानंतर सदर योजनेच्या बाबतीत चौकशी करण्यात आली. त्यावेळी सदर योजनेचे 15 लाख रुपयांचे बिल मंजुर केलेले होते. सद्य:स्थितीत या योजनेचे 6 लाख रुपयांचे मूल्यांकन झालेले आहे. त्यावेळी सदर योजनेमध्ये 9 लाख रुपयांचा अपहार झालेला असल्यामुळे संबंधितांच्या विरोधात कारवाई केली जाईल काय ?

अध्यक्ष महोदय, माननीय पाणीपुरवठा मंत्री संबंधित दोषी लोकांवर, पाणी पुरवठा समितीवर कारवाई करतील. पण अशा वेळी पाण्याचा प्रश्न कसा सोडविणार हा माझा मुळ प्रश्न आहे. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी वेगळा निधी किंवा दुसऱ्या योजनेतून तो प्रश्न सोडविला जाणार काय ?

......4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 50607.....

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, सदर पाणी पुरवठा योजनेतील भ्रष्टाचाराची चौकशी सुरु आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर 100 टक्के कारवाई केली जाणार आहे. कोणत्याही दोषी अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही.

**अध्यक्ष** : मी माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांना सांगू इच्छितो की, गावातील लोकांना कोणत्या मार्गाने पाणी देणार असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, टँकरची मागणी आल्यास टँकर उपलब्ध करुन दिले जातील.

श्री. वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, आमचा जिल्हा टँकरमुक्त जिल्हा आहे. मग टँकरमुक्त जिल्ह्यास कोणत्या पध्दतीने टँकर देणार असा माझा प्रश्न आहे.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, मी पूर्वीच उत्तर दिलेले आहे. अपूर्ण पाणी पुरवठा योजना आहेत. सदर योजनेसाठी निधी मंजुर झालेला होता. असे असताना गेली 10 वर्षे त्या योजनेचे काम पूर्ण झालेले नाही. सदर योजनेच्या संदर्भात विभागीय आयुक्तांच्यामार्फत चौकशी सुरु आहे.

**अध्यक्ष** : मी माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांना सांगू इच्छितो की, एखाद्या गावात पाणी पुरवठा योजनेचे काम अपूर्ण असेल आणि ते काम पूर्णत्वास जाणार आहे आणि त्यासाठी आणखी थोडासा निधी लागत असेल तर अधिकचा निधी देऊन सदर योजना कार्यान्वित करावी असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, "होय"

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. वैभव नाईक यांनी आमचा जिल्हा टँकरमुक्त जिल्हा आहे, मग टँकरमुक्त जिल्ह्यास कोणत्या पध्दतीने टँकर देणार असा प्रश्न विचारलेला आहे. यानंतर माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी मी टँकर सुरु करण्यासाठी परवानगी देतो, असे सांगितलेले आहे. टँकरमुक्त जिल्हा असल्यामुळे टँकर देता येत नाही. असे असताना विशेष बाब म्हणून तशी परवानगी दिली जाणार आहे काय ?

**अध्यक्ष** : विशेष बाब म्हणून देता येईल.

........5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 50607.....

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, आवश्यकतेनुसार टँकर उपलब्ध करुन देण्यात येतील, मी असे बोललो आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांचे सरकार असताना पाणी पुरवठा योजनेसाठी 317 कोटी रुपये दिले होते. असे असताना गेल्या 10 वर्षापासून लोकांना पाणी मिळालेले नाही. हा आपल्या काळात झालेला भ्रष्टाचार आहे. आमचे शासन या जिल्ह्यास पाणी देण्याबाबत गंभीर आहे.

**अध्यक्ष** : आता प्रश्न क्रमांक 4 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सदर योजनेत कोणामुळे अनियमितता झालेली आहे असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे.

**अध्यक्ष** : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी चौकशी करुन कारवाई केली जाईल असे उत्तर दिलेले आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, टँकरमुक्त जिल्ह्यात टँकर देता येत नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी गलथान कारभार केलेला आहे, त्यामुळे अशा अधिकाऱ्यांना माननीय पाणी पुरवठा मंत्री पाठीशी का घालित आहेत ? गावातील लोकांना पाणी पुरवठा सुरळीतपणे देण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे शासनाने धोरण असले पाहिजे. मग अशा वेळी माननीय पाणी पुरवठा मंत्री मागिल 10 वर्षे तुम्ही काय केले असे उत्तर देत असतील तर ते चुकीचे आहे. आपले सरकार आल्यानंतर ही योजना सुरु झालेली आहे. हे काम आता सुरु झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. वैभव नाईक यांनी विचारलेल्या प्रश्नास उत्तर मिळत नाही. माननीय पाणी पुरवठा मंत्री 10 वर्षाचा इतिहास सांगणार असतील तर ते चुकीचे आहे.

**अध्यक्ष** : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी चौकशी करुन कारवाई केली जाईल असे उत्तर दिलेले आहे.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. वैभव नाईक यांनी प्रश्न विचारलेल आहे. त्यांच्यासमवेत बैठक आयोजित करुन पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

......6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 50607.....

श्री. बबनराव लोणीकर.......

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांचे सरकार असताना पाणी पुरवठा योजनेसाठी 317 कोटी रुपये दिले होते. असे असताना गेल्या 10 वर्षापासून लोकांना पाणी मिळालेले नाही. हा आपल्या काळात झालेला भ्रष्टाचार आहे. आमचे शासन या जिल्ह्यास पाणी देण्याबाबत गंभीर आहे. त्यांच्या कार्यकाळात झालेल्या भ्रष्टाचाराची सर्व चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. दोषी लोकांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही.

श्री. वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी बैठक आयोजित करण्याबाबत आश्वासन दिलेले असून, मी त्यांचे आभार व्यक्त करीत आहे.

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय पेयजल योजनेतून ज्या योजनांचा आराखडा मंजुर झालेला आहे, अशा योजना मुख्यमंत्री निधीतून घेणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय पाणी पुरवठा मंत्री वारंवार 317 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे, असा उल्लेख करीत आहेत. माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी ठाणे, मुरबाड आणि शहापूरच्या बाबतीत देखील तेच उत्तर दिलेले आहे. सिंधुदुर्गत जिल्ह्याशी संबंधित प्रश्न असताना माननीय पाणी पुरवठा मंत्री 317 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, असे उत्तर देत आहेत. मुळ प्रश्न वेगळा आहे. 317 कोटी रुपयांचा जो घोटाळा झोला आहे, त्याची चौकशी करण्यात यावी. यामध्ये कोण ठेकेदार आहे ? चौकशी करण्याबाबत आमचा कोणताही आक्षेप नाही.

**अध्यक्ष** : ठीक आहे. आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्रीमती विद्या ठाकूर (महिला व बालविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा सन 2008-2009 ते 2012-2013 या वर्षाचे स्वतंत्र लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**अध्यक्ष** : लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महाराज, मला मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, सन 2008-2009 पासूनचा हा अहवाल असून तो आता सन 2016 मध्ये सादर करीत आहात. सदरचा अहवाल सादर करण्यास एवढा उशिर लागण्याचे कारण काय आहे?

श्रीमती विद्या ठाकूर : अध्यक्ष महाराज, विलंबाची कारणे सभागृहाच्या अहवालासोबत पटलावर ठेवण्यात आली आहेत.

श्रीमती विद्या ठाकूर : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**अध्यक्ष :** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, या सभागृहात यापूर्वीच्या माननीय अध्यक्षांचे रुलिंग आहेत की, एखाद्या विभागाचा कोठलाही अहवाल हा विलंबाने आलातर तो अहवाल मांडण्यापूर्वी संबंधित मंत्री महोदयांनी माननीय अध्यक्षांकडे कारणमिंमासा दिली पाहिजे आणि सभागृहामध्ये ती वाचली पाहिजे, त्याशिवाय असा अहवाल मांडण्याची अनुमती द्यावयाची की नाही, याचे डिस्क्रीशन्स त्या ठिकाणी आहे. आज कदाचित मंत्री महोदयांकडे त्याचे कारण नसेल तर यापुढील काळात कोणत्याही मंत्री महोदयांनी असा अहवाल मांडत असताना त्याचे कारण दिले पाहिजे. बऱ्याच वेळेला अधिकारी ऑडिट झाले नाही, बऱ्याचे वेळेला थातुरमातूर कारणे दिलेली असतात. अधिकाऱ्यांनी आपल्याला जे ब्रिफ केलेले असते तेच आपण सभागृहत वाचून दाखविता. मंत्री महोदयांनी त्याची खात्री करुन घेतली पाहिजे. अहवाल सादर करण्यास एवढा विलंब होण्याचे कारण काय आहे, त्यांना विचारले पाहिजे आणि कारवाई सुध्दा केली पाहिजे तरच या

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील...

विधानसभेचे महत्व राहील. अध्यक्ष महाराज, असा माझा पाईंट ऑफ प्रोसिजर आहे. आपण यासंबंधी मंत्री महोदयांना तसेच शासनाला निदेश द्यावेत.

**अध्यक्ष** : कोठलाही अहवाल कारणाशिवाय सभागृहात सादर करु नये. तो अहवाल सादर करताना उशीर झाला तर त्याची कारणे त्याला जोडली पाहिजेत. संबंधित खात्याच्या सचिवांना तसे निर्देश आपण द्यावेत, कारणांशिवाय अहवाल सभागृहात मांडता येणार नाही.

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महाराज, अहवाल सादर करण्यास उशीर का झाला, याची कारणे दिलेली आहे.

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री.चरण वाघमारे : अध्यक्ष महाराज, महारष्ट्र शासनाने मागील वर्षी भंडारा जिल्ह्यातील धान खरेदी घोटाळ्याची सीआयडीकडे तपास सुरु केलेला असताना काल भंडारा जिल्ह्यातील विर्शी धान खरेदी केंद्रावरुन धान्य लोड केलेला ट्रक आंध्र प्रदेशाच्या बॉर्डरवर सडक अर्जूनी बाजार समितीच्या संचालकांनी पकडलेला आहे, शासनाने याची नोंद घ्यावी.

**अध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, याचा अहवालाशी काही संबंध नव्हता. मी आपणास अहवालासंबंधी बोलण्यास परवानगी दिली होती.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.** : स्थगन प्रस्तावाच्या सूचना.

**अध्यक्ष** :सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण यांनी "शिर्डी, जि.अहमदनगर येथील पोलीस स्टेशनमध्ये अटक करण्यात आलेल्या 18 वर्षीय युवकांचा पोलिसांच्या मारहाणीमुळे झालेला मृत्यू" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले मनोगत व्यक्त करावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र विधानसभा नियम 97 अन्वये मी स्थगन प्रस्तावाची सूचना आपल्याकडे दिली आहे. एक गोष्ट मला माहित आहे की, या सभागृहाची प्रथा आणि परंपरेनुसार साधारणपणे ज्या दिवशी आर्थिक बिझिनेस असतो, त्या दिवशी तो स्थगन प्रस्ताव आपण घेत नाही. विशिष्ट परिस्थितीमध्ये या सभागृहामध्ये ही प्रथा राहिलेली आहे...(अडथळा)... मंत्री महोदय सभागृहात बोलत आहोत, आपापसात गप्पा मारत आहेत त्यामुळे आम्ही काय करावयाचे....(अडथळा)... माननीय मंत्री महोदय आपले ऐकत नाहीत, आपण आमहाला जास्त संधी दिली तर आम्ही बघतो....

**अध्यक्ष** : ही परंपरा अनेक वर्षापासून चालू आहे.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी धमकी दिली आहे, त्यामुळे आपण आम्हाला संरक्षण द्यावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, मी नमस्कार करुन बघतो...(अडथळा)... आपल्याला अयोग्य वाटत असेल तर ते आपण कृपया काढून टाकावे. रेकॉर्डवर असे राहू नये. मी चांगल्या हेतुने बोललो. या सभागृहाचे पूर्वीचे प्रेसिडेंटस् माझ्याकडे आहेत. पोलीस कस्टडीत ज्यावेळेला एखाद्या कैद्याचा मृत्यू विधानसभेचे अधिवेशन सुरु असताना होतो, त्यावेळेला या सभागृहाने ते स्थगन प्रस्ताव ॲडमिट करुन घेतलेले आहेत. स्थगन प्रस्तावाचे जे निकष आहेत, जे कौल आणि शंकर मध्ये आहेत, जे आपल्या नियमांमध्ये आहेत. ती घटना नुकतीच घडलेली असली पाहिजे. It should be recent occurrence. ही घटना नुकतीच घडलेली आहे. सदरची घटना काल घडलेली आहे. यामध्ये तो सार्वजनिक महत्वाचा विषय पाहिजे, त्याही

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील....

निकषामध्ये ही घटना पाहिजे, ज्यामध्ये सरकारचे फेल्यूअर पाहिजे त्याही निकषामध्ये ही घटना बसते. म्हणून सदरची स्थगन प्रस्तावाची सूचना स्वीकारण्याचे जेवढे निकष होते, त्या निकषामध्ये ही घटना बसत असल्यामुळे मी त्याच्या मेरिटमध्ये जात नाही. ज्यावेळेला आपण हा स्थगन प्रस्ताव स्वीकारला त्यावेळेस या सभागृहात माझे म्हणणे मी जरूर मांडेन. यापूर्वीच्या काळात या सभागृहात सना 1990 साली एक घटना घडली होती. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी ताबडतोबीने स्थगन प्रस्तावाची सूचना स्वीकारण्याची भूमिका घेतली होती. त्यानंतर दुसरी घटना घडली, त्यावेळेला तत्कालीन माननीय विधानसभा अध्यक्षांनी आणि सरकारने ती स्थगन प्रस्तावाची सूचना दाखल करण्याची भूमिका घेतली. म्हणून माझी आग्रहाची भूमिका आहे की, आज फायनान्शियल कामकाज असले तरी हा विषय सार्वजनिक महत्वाचा असल्याने, आणि सरकाराशी फेल्यूअरची संबंधित विषय असल्यामुळे ही स्थगन प्रस्तावाची सूचना स्वीकारली पाहिजे, आपण तो स्वीकारावा, अशी मी आपणांस विनंती करतो.

**अध्यक्ष :** आपण या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवर एक तास चर्चा घेऊ.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, स्थगन प्रस्ताव आणि एक तासाची चर्चा यामध्ये खूप फरक आहे. The Adjournment Motion is like a censor motion. सरकारवरील अविश्वासाच्या प्रस्तावासारखाच हा प्रस्ताव असतो. यावर मतदानाची तरतूद आहे.

यानंतर H-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

असे असताना मला असे वाटते की, आपण स्थगन प्रस्ताव न स्वीकारता चर्चा घेणे म्हणजे हा विषय डायल्यूट केल्यासारखा होतो. खरे म्हणजे अशी घटना ज्यावेळेस घडते, त्यावेळेस स्थगन प्रस्ताव ज्यावेळेस मेन्शन केला जाईल, त्यावेळेस गृह मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित राहणे अभिप्रेत आहे. या राज्याचे गृह मंत्री हे राज्याचे मुख्यमंत्री महोदय आहेत. यापूर्व काळात तसा आग्रह श्री. केशवरावजी धोंडगे व अन्य सन्माननीय सदस्यांनी धरलेला होता. आज दुर्दैवाने सभागृहात राज्याचे गृह मंत्री आणि मुख्यमंत्री महोदय उपस्थित नाहीत. माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे की, आपण स्थगन प्रस्तावाच्या स्वरुपातच हे स्वीकारावे. आपला निर्णय हा अंतिम असेल.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य मी थोड्या वेळाने निर्णय देतो. आता आपण पुढील कामकाज घेऊ या. आपले म्हणणे मला मान्य आहे. असे अनेकवेळा घडले आहे, मला माहीत आहे. सभागृहात मी देखील त्यावर बोललो नाही असे नाही. आज आठवड्याचा शेवटचा दिवस आहे, शिवाय विभागीय मागण्यांवरील चर्चा या सर्वांचा विचार करता आपण जरा वेळेचे नियोजन करु.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपल्यालाशासनासमवेत चर्चा करावयाची असेल तर, आपण 10 मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज तहकूब करुन संबंधितांशी चर्चा करावी. आपण ज्या बाबीवर चर्चा करीत आहोत, त्यावरुन आपण एकदा पुढे गेलो की, मग आपल्याला मागे येता येत नाही.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य मागे येता येत नाही असे नाही. नाही तरी आपण तास-दोन तासांच्या कालावधीतील चर्चा साधारणतः शेवटी घेतो, दुपारी घेतो तसेच बरेचसे कामकाज झाल्यावरही घेतो. आपण असे करीत असल्याने त्याकरिता अजून वेळ आहे. आपण चिंता करु नका मी, आपल्याला थोड्या वेळातच त्याबाबतचा निर्णय देतो.

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आज आपण औचित्याचे मुद्दे घेणार नाही.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपण विभागीय मागण्या असल्याने स्थगन प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत असे सांगितलेले आहे. मात्र कामकाजपत्रिकेमध्ये आपण स्थगन प्रस्ताव, औचित्याचे मुद्दे दर्शविलेले आहेत. आम्ही कार्यक्रमपत्रिकेप्रमाणे विषय मांडतो.

**अध्यक्ष :** कामकाजपत्रिकेमध्ये ते दर्शविले असले तरी, ते स्वीकारायचे की नाहीत याबाबत सभागृह ठरवते.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** औचित्याचे मुद्दे

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ( विरोधी पक्ष नेते ) : अध्यक्ष महोदय, माझा पुढील महत्त्वाचा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, आज पोलीस अंमलदार व त्यांच्या कुटुंबीयांवर येत असलेल्या ताणतणावामुळे त्यांच्या गृहिणी सर्व महिला आझाद मैदानावर उपोषणाला बसलेल्या आहेत, याकरिता मला हा विषय औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून सांगावयाचा आहे.

अध्यक्ष महोदय, पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या आहेत. त्यांना 8 तासापेक्षा जास्तवेळ ड्युटी करावी लागते, त्यांना ओव्हरटाईम मिळत नाही. बऱ्याचदा मुलांच्या शिक्षणाच्या जबाबदारीकडे त्यांचे दुर्लक्ष होते. व्हीआयपी दौरे, आंदोलने अशा जबाबदाऱ्या त्यांना दिल्या जातात. एखाद-दोन कार्यकर्ते आंदोलनाकरिता बसले असते, तर मी हा मुद्दा उपस्थित केला नसता. परंतु, पोलीस दलातील पोलीस अंमलदारांच्या गृहिणी या 16 तारखेपासून उपोषणाला बसलेल्या आहेत. त्याठिकाणी मंत्री महोदय तसेच संसदीय कार्य मंत्री महोदय जाऊन आले आहेत.

अध्यक्ष महोदय, एकच अपेक्षा आहे की, त्या महिलांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री महोदय हे गृह खात्याचे मंत्री आहेत त्यांच्यासमवेत आज केव्हातरी एक बैठक घ्यावी. असे झाल्यास या प्रश्नाला काही तरी न्याय मिळेल. पोलीस दलातील कर्मचारी, हवालदार 24 तास उभे राहून ड्युटी करतात. आता त्यांच्या पत्नीला आंदोलन करावे लागत आहे, हे बरोबर नाही. त्यामुळे या औचित्याच्या मुद्याद्वारे किमान त्या बैठकीचे आयोजन करावे, अशी मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करतो.

**अध्यक्ष :** शासनामार्फत बैठकीचे आयोजन करुन प्रश्न निकाली काढावा.

............

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, या सभागृहाचे आणि राज्य सरकारचे मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनद्वारे याकडे लक्ष वेधू इच्छितो की, केंद्र सरकारने सन 2016-2017 च्या बजेटमध्ये सराफांवर 1 टक्के उत्पादन शुल्क लावण्याचा निर्णय घेतलेला आहे. या 1 टक्के अबकारी करामुळे 1 मार्चपासून देशातील सर्व सराफांनी दुकाने बंद ठेवलेली आहेत. मी महाराष्ट्राबाबतही सांगणार आहे. 1 मार्चपासून महाराष्ट्रातील सराफांची दुकानेही बंद आहेत. महाराष्ट्रात जवळपास 45 लाख गुणकौशल्य असलेले कामगार या व्यवसायात काम करत आहेत तर जवळपास 30 लाख व्यापारी आहेत. हा संप ज्या पध्दतीने सुरु आहे ते पाहिले तर देशामध्ये 7 आत्महत्या झाल्या आहेत. त्यातील 3 आत्महत्या महाराष्ट्रातील या कामगारांच्या आहेत.

अध्यक्ष महोदय, हा कर रद्द करण्यासाठी राज्य सरकारने देखील केंद्र सरकारकडे शिफारस करावी. जेणेकरुन या गुणकौशल्य कामगारांवर जी उपासमारीची पाळी आलेली आहे, ती दूर होईल. याबाबतचा निर्णय सरकारने घ्यावा व अशी शिफारस करावी.

.........

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, या विषयाच्या सपोर्टमध्ये मलाही बोलावयाचे आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे देखील या विषयाच्या सपोर्टमध्ये बोलत आहेत.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, गेला जवळपास महिनाभर भारतातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील सराफांनी आंदोलन केलेले आहे. महाराष्ट्रातील सर्व सराफांची दुकाने आज बंद आहेत. आजपर्यंत एवढ्या दिवसांचा संप त्यांना कधी करावा लागला नव्हता. कोल्हापूर जिल्ह्यात वडगाव सारख्या ठिकाणी मला त्यांनी निमंत्रित केले होते. त्यावेळेस त्यांनी मला सांगितले की, आम्ही उत्साहाने या आंदोलनात भाग घेत आहोत याचे कारण म्हणजे आमच्यावर अन्याय होण्याची शक्यता व खात्री आम्हाला झाली आहे.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. सुभाष साबणे )**

श्री. जयंत पाटील ....

अध्यक्ष महोदय, त्यांनी काही माहिती मला दिली. सन 2012 मध्ये असाच एक संप भारतातील सुवर्णकारांनी केला होता. सुवर्णकारांनी केलेल्या त्या संपामध्ये माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान होण्याआधी त्या सुवर्णकारांना पाठिंबा देण्याचे भाषण केले होते. ते भाषण करताना हा अशाप्रकारचा टॅक्स कसा चुकीचा आहे आणि सुवर्णकारांना या जाचातून कसे मुक्त केले पाहिजे हे माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी अतिशय स्पष्टपणाने सांगितले होते. याबाबतच्या क्लिप्स, वृत्तपत्रातील बातम्यांची कात्रणे मी पाहू शकलो.

अध्यक्ष महोदय, ते नंतर भारताचे पंतप्रधान झाले. या देशाच्या प्रधानमंत्री महोदयांनी जे बोलले, एखाद्या संपाला प्रतिसाद करीत असताना ज्या प्रकारे त्यांनी त्या संपकाऱ्यांना पाठिंबा दिला, जी भाषा बोलले, जी वक्तव्ये केली, त्या सर्वामुळे या देशातील सुवर्णकारांना असे वाटले की, आपण भारतीय जनता पक्षाला निवडून दिले तर आपल्याला अच्छे दिन येतील. परिस्थिती बदलली हे विरोधी पक्षात होते ते सत्तेत गेल्यावर भाषा कशी बदलते याचा उत्तम नमुना ...

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य कोणत्या बाबीवर बोलत आहेत

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. सुभाष साबणे) :** ते औचित्याच्या मुद्यावर बोलत आहेत.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, औचित्य मोठे असल्याने .... ..(अडथळा)..

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्याला सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील सपोर्ट करीत आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपण आपला मुद्दा थोडक्यात संपवावा.

श्री. जयंत पाटील : सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू साहेबांनी अतिशय महत्त्वाचा .. ..(अडथळा)..

श्री. विनोद तावडे : त्यांनी वेगळ्या आयुधाद्वारे विषय मांडावा.

श्री. जयंत पाटील : मंत्री महोदय सभागृहाचे कामकाज कसे चालावे हे कसे सांगू शकतात?

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण आपला मुद्दा थोडक्यात संपवावा.

...I-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपण या सर्वांना प्रथम जागेवर बसायला सांगावे...(अडथळा)...काय वाईट बोललो. देशाचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी हे पंतप्रधान होण्यापूर्वी जे बोलले त्याची आठवण करुन देणे, हा गुन्हा नाही...(गोंधळ)... देशातील व राज्यातील सुवर्णकारांनी संप केलेला आहे. अध्यक्ष महोदय, मला संरक्षण द्यावे.

**तालिका सभाध्यक्ष** : आपल्याला संरक्षण आहे. आपला मुद्दा लवकर संपवावा.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सदस्य वेलमध्ये येतात)

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, हे काल क्रिकेटच्या मैदानावर होते, आज इकडे का आलेले आहेत. महाराष्ट्रातील आणि भारतातील सुवर्णकारांचा बराच दिवसांपासून संप सुरु आहे. त्यांना इतक्या दिवस संप करण्याची गरज पडत आहे. त्यावर जी एक्ससाईज ड्युटी लावलेली आहे, ती रद्द करण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे...(अडथळा)...त्यांना असे वाटते की, एकही भूल, कमल का फूल, असे त्यांना वाटत आहे...(गोंधळ)...यांना जागेवर बसवायचे शिकविण्यात यावे. यांना जागा दाखवावी, नाहीतर जनता यांना जागा दाखवेल.

**तालिका सभाध्यक्ष** : माझी सभागृहाला विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी मांडलेल्या मुद्याला पाठिंबा देण्यापुरतेच वक्तव्य करावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, राज्यातील संपूर्ण सुवर्णकार व त्या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो कामगारांवर आज उपासमारीची वेळ आलेली आहे...(अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष** : सदरहू मुद्दा अध्यक्ष महोदय तपासतील. त्यानंतर तो मुद्दा काढला जाईल. माननीय मंत्री बोलत असून कृपया सर्वांनी शांत बसावे.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. मघाशी माननीय अध्यक्षांनी औचित्याचे मुद्दे नाकारल्याचे घोषित केले. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू बोलले असतील तर त्याबाबीवर सुरु असलेली पाठिंब्याची भाषणे कोणत्या नियमाखाली सुरु आहेत आणि त्यामध्ये माननीय पंतप्रधान यांचे नाव घेण्याचे काय कारण आहे. व्यापाऱ्यांना सवलत दिली तर हे व्यापाऱ्यांचे सरकार आहे, असे म्हणता. म्हणजे प्रत्येक वेळी भाषा बदलत जाते. तो विषय वेगळ्या आयुधामार्फत आणावा. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे अर्थमंत्री होते. या संदर्भात

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे.....

झालेल्या निर्णयाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होणार आहे, याची एकदा चर्चा करावी. एखाद्या मुद्यावर चुकीच्या पद्धतीने माननीय पंतप्रधानांचे नाव घेण्यास आपण परवानगी देणे, हे चुकीचे आहे. ते ताबडतोब काढण्यात यावे, अशी माझी विनंती आहे. तसेच ही भाषणे कुठल्या मुद्यांवर सुरु आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** देशाचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी साहेबांच्या नावाचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी केला. माननीय पंतप्रधान यांच्या नावाचा उल्लेख काढण्यात यावा, अशी मी सूचना करीत आहे. कृपया आता सर्व सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे. कृपया आपापल्या जागेवर बसावे. या सभागृहाशी संबंध नसलेल्या बाबीचा उल्लेख करण्यात येऊ नये.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सुवर्णकारांचा संप सुरु असल्यामुळे त्यावर अवलंबून असलेल्या कामगारांची मोठी उपासमार सुरु आहे.

श्री. रामदास कदम : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सभागृहामध्ये देशाचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्रजी मोदी यांचे नाव घेऊन त्यांनी केलेली भाषणे व त्यांच्या क्लिप याचा देखील उल्लेख करण्यात आला. एखाद्या व्यक्तीचे नाव घ्यायचे असेल तर नियम 35 प्रमाणे त्यांना नोटीस द्यावी लागते. देशाचे माननीय पंतप्रधान या सभागृहात उत्तर देण्यासाठी नाहीत. नियमाप्रमाणे त्यांचे नाव घेता येत नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी जेवढे वक्तव्य केले, ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे. हे सभागृह नियमानुसार चालते. नियम 35 प्रमाणे नोटीस दिल्याशिवाय माननीय पंतप्रधानांचे नाव घेता येत नाही आणि त्या नोटीसला उत्तर देण्यासाठी माननीय पंतप्रधान येथे नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. जयंतराव पाटील यांनी जे वक्तव्य केले ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी साहेबांच्या संदर्भात जो उल्लेख केला आहे, ती बाब कामकाजातून काढून टाकण्यात आलेली आहे...(गोंधळ)...हरकतीवर हरकत होऊ शकत नाही.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये सराफांचा संप सुरु आहे. त्या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो कामगारांची उपासमार होत आहे. गेल्या एका महिन्यापासून हे आंदोलन सुरु आहे. या व्यवसायावर मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्था अवलंबून आहे... (अडथळा)...

**अध्यक्ष :** सन्माननीय विरोधी पक्षनेते बोलत आहेत. कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी आपल्या जागेवर बसावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या व्यवसायावर हजारो व्यावसायीक, कामगार अवलंबून आहेत. हा संप बऱ्याच दिवसापासून सुरु आहे. केंद्र सरकारने आपली फसवणूक केल्याची भावना त्यांच्यामध्ये आहे. केंद्रीय अर्थसंकल्प सादर केल्यानंतर देशामध्ये हा संप सुरु आहे. परंतु आपल्या राज्यामधील सराफाचे व्यापारी व महत्त्वाचे म्हणजे त्या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो कामगारांची उपासमार होत आहे. याकडे सरकार लक्ष देत नाही. आम्हाला त्यांचे शिष्टमंडळ भेटले, आम्ही त्यांच्याशी चर्चा केली. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील म्हणाल्याप्रमाणे आमच्या व्यवसायाला उभारी येईल, आमच्या व्यवसायाला भरभराटी येईल, या भावनेने त्यांनी केंद्रामध्ये असलेल्या सरकारला मतदान केले. परंतु सरकारने आमची फसवणूक केल्याची त्यांची भावना झाली आहे.

**अध्यक्ष :** येथे मतदानाचा प्रश्न येत नाही. आपण आपले म्हणणे मांडावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या संपाबाबत सरकार वेळकाढू पणा का करीत आहे. त्यांचा विश्वासघात झाल्याची भावना आहे. सुवर्णकारांच्या बाबतीत व कामगारांच्या बाबतीत सरकारने हस्तक्षेप करावा व करवाढ तत्काळ रद्द करावी, अशी शिफारस केंद्र सरकारला करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, नियम क्रमांक 25, यामध्ये असे दिलेले आहे. ज्या सदस्यास एखाद्या व्यक्तीवर मानहानीकारक किंवा अपराधारोपाच्या स्वरुपाचे कोणतेही अभिकथन ज्या दिवशी करायचे त्या दिवशी त्यांना नोटीस द्यावी.

...J/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.जयंत पाटील......

अध्यक्ष महोदय, माझे दोन मुद्दे आहेत. भारतीय जनता पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य मला या देशाचे माननीय पंतप्रधान यांचे नाव घेण्यासाठी मज्जाव करुन माझ्या व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणत आहेत. पंतप्रधान महोदयांचे नाव घेण्यासाठी बंदी .... अडथळा .. त्यांना नोटीस द्यावी लागत नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांनी जो मुद्दा सदनामध्ये उपस्थित केला होता .... अडथळा ...

**अध्यक्ष :** ..... वाईट अर्थाने ......अडथळा ....

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माणूस मंत्री झाल्यावर कसा बदलतो, हे याचे उत्तम उदाहरण आहे...... अडथळा ... शासनाने याप्रकरणी ताबडतोबीने लक्ष द्यावे.

**अध्यक्ष :** शासनाने सराफांनी पुकारलेल्या संपासंदर्भात लक्ष द्यावे व त्यासंबंधी विचार करुन त्यांच्या शिष्टमंडळास भेटून सदर प्रकरणी निर्णय घ्यावा.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, औचित्याचे मुद्दे फेटाळले, असे आपण मघाशी म्हणाला होता.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.अजित दादा पवार यांना मी सांगू इच्छितो की, यापूर्वी उपस्थित करण्यात आलेला मुद्दा औचित्याचा नव्हता. औचित्याचे मुद्दे आपण पुढे ढकलू या. सन्माननीय सदस्यांनी मला बोलण्याची परवानगी मागितली होती व मी त्यांना बोलण्यासाठी परवानगी दिली होती.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू कोणत्या मुद्यावर बोलले ? ते जर माहितीच्या मुद्यावर बोलले असतील तर त्यास पाठिंबा देण्यासाठी भाषणे झाली व ती करु देण्यात आली. सभागृहात हे काय सुरु आहे, सभागृह नियमानुसार चालणार आहे काय ? सन्माननीय सदस्य कोणत्या नियमाने बोलले व त्यास कोणत्या नियमाने पाठिंबा देण्यात आला, ते जे काही बोलले ते नियमाने नसेल तर त्यावर इतर सन्माननीय सदस्य बोलले ते सर्व कामकाजातून काढून टाकण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांना माहितीचा मुद्दा उपस्थित करता येतो व त्या विषयावर दोन्ही सन्माननीय सदस्यांना समान बोलता येत नाही, असे नाही. परंतु त्यांना अधिक बोलू द्यावयाचे की नाही, हे ठरविता येते. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.मंगल प्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन है कि आपने जो कुछ हुआ....वह औचित्य के मुद्दे पर नहीं हुआ....उसके ऊपर श्री विनोद तावडे जी ने भी कहा. मेरा पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन यह है कि आपने इस सीट से निर्देश दिया कि महाराष्ट्र सरकार इसके ऊपर ध्यान दे. मैं यह जानना चाहता हूं कि क्या यह विषय महाराष्ट्र सरकार का है ? महाराष्ट्र सरकार का इस विषय से क्या लेना-देना है. अध्यक्ष महोदय,....(व्यवधान)

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. हा विषय जरी राज्य सरकारचा नसला तरी सराफांचा संप राज्यात सुरु आहे. त्यामुळे राज्य सरकारची जबाबदारी आहे की, अशा प्रकारचे विषय समजून घेऊन त्यासंबंधी विचार करावा. मी टॅक्स कमी करावे, असे सांगितले नाही. परंतु हा संप राज्यात सुरु असल्याने त्यांच्याशी विचारविनिमय करणे, हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सर्व शाळा व खाजगी क्लासेसमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत धोरणात्मक निर्णय करणे

**मु.शी.** : सर्व शाळा व खाजगी क्लासेसमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत धोरणात्मक निर्णय करणे यासंबंधी सर्वश्री **अमीत साटम, संजय पोतनीस, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे,** वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अमीत साटम ( अंधेरी-पश्चिम ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई उपनगरातील मालाड पश्चिम येथील श्री ट्युटोरीयल्स या खाजगी क्लासेसच्या शिक्षिकेने दोन विद्यार्थ्यांना कपडे काढून बाहेर रस्त्यावर उभे केले असल्याचे दिनांक १२ मार्च, २०१६ रोजी निदर्शनास आले असणे, तसेच सायन येथील शाळेमध्ये इयत्ता ४थी व ५वी च्या ४ विद्यार्थीनींवर त्यांच्या शिक्षकाने लैंगिक अत्याचार केलेले निष्पन्न झाले असणे, याबाबत पालकांनी सदर शाळेच्या मुख्याध्यापकाकडे तक्रार केली असता त्याकडे त्यांनी केलेले दुर्लक्ष, पोलिसांनी याबाबत सदर शिक्षकाविरुद्ध गुन्हा नोंदविला असणे, माहे जानेवारी, २०१६ मध्ये दादर येथील शाळेच्या आवारामध्ये एका क्लिनरने ९ वर्षांच्या विद्यार्थीनींवर लैंगिक अत्याचार केला असणे, तसेच माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये अंधेरी येथील राजहंस विद्यालयामध्ये इयत्ता पहिलीमध्ये शिकणाऱ्या ६ वर्षाच्या मुलीवर एका खाजगी वाहनचालकाने केलेला बलात्कार, याबाबतीत सदर वाहनचालकाला केलेली अटक, सदर मुलीने झालेल्या बलात्काराबद्दल शाळेतील शिक्षिकेला सांगितले असता त्यांनी केलेले दुर्लक्ष, सदर प्रकार शाळेतील आवारामध्ये घडल्यामुळे शाळेतील सुरक्षाव्यवस्था तसेच शाळेच्या आवारामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे नसल्याचे उघडकीस येणे, खाजगी गाडीचा वाहनचालक शाळेच्या आवारामध्ये घुसून शाळेतील विद्यार्थीनीवर बलात्कार करणे, यावरुन सदर शाळेची सुरक्षाव्यवस्था ढिसाळ असल्याचे निष्पन्न होणे, शाळा व खाजगी क्लासेसमध्ये

.....3



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमीत साटम....

विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत कायद्यामध्ये तरतूदींचा अभाव असणे, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी तसेच या संदर्भात राज्यातील सर्व शाळा व खाजगी क्लासेसमधील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या सुरक्षा व्यवस्थेच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विनोद तावडे ( शालेय शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमीत साटम : अध्यक्ष महोदय, अंधेरी येथील विद्यार्थीनीवरील अत्याचार प्रकरणी वृत्तपत्रामध्ये बातम्या छापून आल्या होत्या. तसेच, याप्रकरणी मला माहिती प्राप्त झालेली आहे. अंधेरी येथील राजहंस विद्यालयातील अत्याचारग्रस्त विद्यार्थीनीच्या पालकांशी मी बोलल्यानंतर असे निष्पन्न झाले आहे की, सदर विषयाबाबत शाळेमध्ये तक्रार झाल्यानंतरही सदरहू शाळेने पोलिसांकडे जाऊन तक्रार नोंदविली नाही. याप्रकरणी लक्षवेधीच्या उत्तरामध्येम्हटले आहे की, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षणाचा अधिनियम, 2012 मधील कलम 19 व 21 नुसार शाळेच्या ट्रस्टवर किंवा मुख्याध्यापिकेवर गुन्हा दाखल करता येतो. त्यानुसार सायन व अंधेरी पश्चिम येथील राजहंस विद्यालयाच्या ट्रस्टी किंवा मुख्याध्यापिकेवर शासन गुन्हा नोंदवणार का ?

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने विद्यार्थ्यांना शालेय वाहतूक व्यवस्था उपलब्ध करुन देण्याकरिता प्रत्येक शाळेमध्ये शाळा परिवहन समितीची स्थापना केली आहे. मागील दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये शाळा किंवा कोचिंग क्लासेसच्या परिसरामध्ये विद्यार्थ्यांवरील लैंगिक अत्याच्याराच्या घटनेत वाढ झाली आहे. त्यामुळे राज्यात असणाऱ्या सर्व शाळा, कॉलेज, कोचिंग क्लासेस, एज्यूकेशन व इन्स्टीट्युशन यांच्याकरिता ज्याप्रमाणे बिल्डींग प्रोसिजर कोड असतो त्याप्रमाणे सेफ्टी प्रोसिजर कोड स्थापन करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अंधेरी येथील घटनेतील विद्यार्थीनीच्या पालकांनी त्यांना दिलेली माहिती सांगितली. सदरहू प्रकरणी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये पालकांनी तक्रार नोंदविल्यानंतर जे काही जाब-जवाब घेण्यात आले आहेत. त्यामध्ये शाळेच्या हलगर्जीपणाचा मुद्दा समाविष्ट असेल तर संबंधितावर कलम 19 प्रमाणे तपासून कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या दुसऱ्या मुद्याबाबत मी सांगू इच्छितो की, क्लासेसची जागा किती असावी, फी किती आकारावी, याबाबत रेग्यूलेशन नाही. या विषयी यापूर्वी सदनामध्ये चर्चा झाली होती. कोचिंग क्लासेस परिसरामध्ये होणाऱ्या घटनेमध्ये वाढ होत असल्याने त्याप्रकरणी कोड ऑफ कन्डक्ट तयार करण्यासंदर्भात शासनस्तरावर विचार करण्यात येत आहे.

श्री.अमीत देशमुख : अध्यक्ष महोदय, कोचिंग क्लासेसेच्या परिसरात वाढत चाललेल्या अत्याचाराच्या घटनांवर नियंत्रण आणण्याकरिता नियमावली तयार करण्यात येईल काय, कोचिंग क्लासेसेकडून अमाप फी आकारणी करण्यात येते त्यावर नियंत्रण आणण्याकरिता शासन काही

...6



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमीत देशमुख.....

कायदा करणार आहे काय, पहाटे 4 पासून रात्री 2 वाजेपर्यंत कोचिंग क्लासेस चालतात त्यामुळे गुन्हेगारी वाढण्याची चिन्हे दिसून येत असल्याने सदरहू वेळापत्रकावर शासनाकडून बंधन आणण्यात येईल काय ?

यानंतर K-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, मागे सुध्दा या सभागृहामध्ये चर्चा करताना आपण असे सांगितले होते की, या क्लासेसवर बंधन कोणत्या पध्दतीने आणू शकतो, हे मूळामध्ये तपासणे आवश्यक आहे. अन्यथा आमचे फंडामेंटल राईट्स आहेत की, आम्हाला जाऊन शिकायचे आहे. तर शासन त्यावर बंधन कसे आणणार, पण यामध्ये सुरू असलेले गैरप्रकार आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ज्या गोष्टी आपल्याला कायद्याच्या चौकटीत बसवून करता येतील त्या गोष्टी आपण करीत आहोत.

**अध्यक्ष :** क्लासेसच्या वेळापत्रकांच्या बाबतीत खुलासा व्हावा.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांना सांगू इच्छितो की, खासगी शालेय फी आहे, इंजिनिअरींग कॉलेज, मेडिकल कॉलेजेस यांची फी आहे, यांना आपण आपण शुल्क नियंत्रण कायद्या लागू करु शकतो. पण प्रायव्हेट कोचिंग हे शिक्षणामध्ये कम्प्लसरी नाही. त्यामुळे कायद्याने आपण त्यांच्या फी बाबतीत बंधन आणू शकतो की, नाही यासंबंधी कायदेशीरदृष्ट्या वेगवेगळी मते आहेत. त्यामुळे या सर्व बाबी आम्ही तपासणी करीत आहोत.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, अतिशय गंभीर विषयाकडे सन्माननीय सदस्य श्री.अमित साटम यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे. चार वेगवेगळे विषय त्यांनी सांगितले आहेत. एका ठिकाणी प्रायव्हेट कोचिंग क्लासेसमध्ये ट्यूटरने ही घटना केली आहे. दुसऱ्या ठिकाणी शिक्षकाने केली आहे आणि तिसरे म्हणजे जनरल एज्यूकेशन सोसायटीमध्ये कॅन्टीनच्या ठेकेदाराने केल्याची घटना आहे आणि एका ठिकाणी अंधेरी पश्चिम येथील राजहंस या कंपनीचे खासगी वाहन चालक अशा ह्या घटना आहेत.

अध्यक्ष महोदय, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण हा अधिनियम 2012 मध्ये झाला. पण तरीही या घटना कधी कॅन्टीनवाला, कधी ड्रायव्हर, कधी शिक्षक किंवा आणखी स्टाफ यातील बालकांचे लैंगिक शोषण या घटना काही कमी होतांना दिसत नाहीत. या ठिकाणी कायदा करुन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील असे सांगण्यात आले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सरकार सर्व शाळांमध्ये मधल्या आवारामध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही लागलेच

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. आशिष शेलार........

पाहिजेत, अशा पध्दतीचे निर्देश देणार आहे काय, आणि दुसरा प्रश्न असा आहे की, अशा पध्दतीच्या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारी स्तरावर एक मॉनिटेरिंग कमिटी नेमणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सीसीटीव्ही कॅमेरे बसविले पाहिजेत यासंबंधी न्यायालयाने सुध्दा आदेश दिलेले आहेत आणि आम्ही सुध्दा त्यानुसार सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार बऱ्याचशा शाळांनी त्याप्रमाणे केलेले आहे. या सर्व प्रकारामध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपेक्षा जनरल सेंसेटायझेशन करण्याची गरज आहे. यामध्ये या वयातील मुलींवर होणारे अत्याचार आणि अन्याय लक्षात घेऊन त्या शाळेतील कर्मचारी किंवा शिक्षक असतील यांनी कशा पध्दतीने सेन्सीटीव्ह आणि जागरुक राहिले पाहिजे यासाठीचा अवेअरनेस कॅम्पेनसुध्दा महत्वाचा आहे असे मला वाटते आणि त्याचा देखील आम्ही या बरोबरीने विचार करीत आहोत. हे मॉनिटेरिंग करण्यासाठीच्या कमिटीसंबंधी त्या त्या शाळांची जी पीटीए आहे त्यांच्या माध्यमातून करण्यासंबंधी आपण आवर्जून सूचना करीत आहोत.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी संदर्भात एक तर ट्युटोरियलचा प्रश्न आहे. त्याचबरोबर जे खासगी विद्यालये चालतात त्यामध्ये प्री स्कूल पासून संपूर्ण व्यवस्था केलेली आहे. एक तर इन्फ्रास्ट्रक्चर कमी आहे. अतिशय क्रॉम्प्ट अशा स्थितीत त्या शाळा चालविल्या जातात. त्यामध्ये त्यांचे वेळापत्रक बसत नाही म्हणून त्या शाळा शिफ्टवाईज चालतात. त्यामुळे प्री प्रायमरी स्कूल, त्यामध्ये येणारे विद्यार्थी आणि त्यात ट्युटोरियल्स अशा प्रक्रिया काही ठिकाणी घडतात. ज्या ठिकाणी ट्युटोरियल्स चालू शकत नाहीत त्या ठिकाणी ते चालविले जातात अशी अवस्था आहे. म्हणून माझे तीन प्रश्न आहेत. एका बाजूला आपण आठवीपर्यंत परीक्षा नको, दहावीपर्यंत परीक्षा नको असे म्हणता तर या ट्युटोरियल्ससंबंधी काही मार्गदर्शक तत्वे शासन तयार करणार आहे काय, कोणत्या इयत्तेपर्यंत हे ट्युटोरियल्स घेतले पाहिजेत, यासंबंधी आपण काही निश्चित धोरण करणार आहात काय, हा पहिला मुद्दा आहे. दुसरे म्हणजे हे ट्युटोरियल्स सुरू करण्यासाठी आज नियमावली नाही हे मान्य आहे. मागे एकदा चाटे क्लासेस आणि अन्य क्लासेसचे पेव फुटले होते. ज्या पध्दतीने या सीईटीच्या नावाखाली लूट सुरू होती आणि या

3......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.........

संदर्भात मागे आम्ही सभागृहातही सांगितले होते की, सीईटी कशाकरिता पाहिजे. कारण तामिळनाडूनेही सीईटी रद्द केलेली आहे. आपणही खासगी लोकांशी यापूर्वी संगनमत करुन हा धंदा सुरू राहिला आहे. म्हणून हे ट्युटोरियल्स घेण्यासंबंधी शासनाने काही निश्चित धोरण ताबडतोब आणले पाहिजे. या संदर्भात आपण सकारात्मक भूमिका घेत असाल तर आम्ही आपल्याला यामध्ये सहकार्य करु. परंतु हा धंदा थांबविण्याची गरज आहे. म्हणून यासंबंधी आपण निश्चितपणे धोरण आणणार आहात काय, तिसरे सर्वात महत्वाचे असे की, यामध्ये प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्च्युअल ऑफेन्स ॲक्ट याची अंमलबजावणी अतिशय काटेकोरपणे करण्यामध्ये तेथील पोलीस यंत्रणा अतिशय आखडता हात घेते तर यासंबंधी केव्हा तरी या ॲक्टचा एकदा वापर करुन 18 वर्षे कमी वय असलेल्या मुलांच्या बाबतीत त्यांना लैंगिक अत्याचारामधून संरक्षण मिळण्यासाठी हा कायदा केलेला आहे. पण या संदर्भात ज्यावेळी गुन्हा दाखल केला जातो त्यावेळी त्यासंबंधी कलमे लावली जात नाहीत. या बाबतीत आपण विशेष पुढाकार घेऊन या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्यासाठी आपण कार्यवाही करणार आहात काय ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कोचिंग क्लासेस, ट्युटोरीयल क्लासेस यांच्या संबंधातील असून त्यांचे म्हणणे अतिशय खरे आहे. मी मघाशी म्हटले त्यानुसार या सर्व बाबींसाठी कायद्याच्या चौकटीत बसवून पुढे गेले पाहिजे. अन्यथा आपण काही तरी कायदा करायचा आणि मग कोर्टात जाऊन रद्द झाला तर त्यांना कायमची सूट मिळेल. आपण कायद्याच्या चौकटीत राहून हे कसे थांबवू शकतो, त्यामध्ये मग शॉप इस्टॅब्लिशमेंट ॲक्टनुसार इन्फ्रास्ट्रक्चरसंबंधी काही म्हणून शकतो काय, वेळापत्रकाचा मुद्दा आहे, या सर्व बाबींचा एकत्रितपणे आपण विचार करु. दुसरा त्यातील मुद्दा आहे तो म्हणजे बालकांचे लैगिंक शोषणासंबंधी 2012 चा जो कायदा आहे, या विषयामध्ये अशी कोणतीही घटना घडली तर शिक्षणाधिकारी त्या ठिकाणी जाऊन पालकांना भेटतो आणि यामध्ये शाळेचा आणि अन्य कोणाचा यामध्ये हलगर्जीपणा आहे याची नीट तपासण्ी करुन तसे काही आढळल्यास शिक्षण विभाग यामध्ये नक्की पुढाकार घेते आणि त्याबाबतीत आमचा असा आग्रह असतो की, काही झाले असेल तर त्याची चौकशी पोलीस खात्यामार्फत झाली पाहिजे. त्यामुळे आम्ही ले लागू करु.

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. मंगलप्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मैंने ट्युशन क्लास और कोचिंग क्लास के बारे में मेरी भी एक लक्षवेधी थी. मेरा प्रश्न यह है कि हर स्कूल के अंदर, मुंबई की 50 प्रतिशत से अधिक स्कूलों में टिचर लोग ट्युशन के लिए बच्चों को मजबूर करते है. उनको जबरदस्ती से ट्युशन में पढ़ाते है. उनके पास जो ट्युशन के लिए आते है उनको पेपर लीक करते है और जो ट्युशन जो ट्युशन के लिए नहीं आते उनके साथ अत्याचार करते है. शिक्षा मंत्री जी से मेरा निवेदन है कि यह पीटीए पर डालने से कुछ होने वाला नहीं है. पीटीए की कोई भी नहीं सुनता है. पीटीए की एक शिकायत पर कमिटी का निर्णय नहीं हुआ है. सरकार इस बारे में स्टुडंट के खिलाफ, जबरदस्ती ट्युशन, जबरदस्ती कोचिंग, कोचिंग का इतना बड़ा रॅकेट है, पाच बार इस बारे में विधानसभा में चर्चा हुई है. कोचिंग के बारे में सरकार यदि यह कहें कि इस बारे में कोई कानून नहीं बन सकता है तो मेरा सरकार से निवेदन है कि कोचिंग के बारे में कहीं न कहीं प्रतिबंध लगाने के लिए सरकार को सोचना पड़ेगा. जबरदस्ती से ट्युशन लगाने के लिए कहा जाता है. इस बारे में सरकार को सोचना पड़ेगा. क्या सरकार इन प्रश्नों को ध्यान में रखते हुए एक समिति का गठन किया जाएगा ? जो अगले सेशन से पहले इस बारे में वे अपनी रिपोर्ट सदन को पेश करे.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सभागृहात कोचिंग क्लासेस आणि संबंधित विषयामध्ये वारंवार मागणी होत आहे. त्यामुळे काही संबंधित शिक्षण तज्ज्ञ आणि काही सभागृहातील सन्माननीय सदस्य यांची समिती आपण नेमू आणि पुढच्या अधिवेशनापर्यंत या विषयामध्ये कोणती ठोस कार्यवाही किंवा कायदा करता येईल याबाबतचा निर्णय नक्की घेऊ.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

PPD/ MMP/ AKN/ 11:40

**पृ.शी.** : पेसा कायद्यांतर्गत शासनाने प्रसिध्द केलेल्या सुधारित यादीमध्ये धुळे जिल्ह्यातील 27 ग्रामपंचायतीचा समावेश नसल्यामुळे ही गावे या योजनेपासून वंचित असणे

**मु.शी.** : पेसा कायद्यांतर्गत शासनाने प्रसिध्द केलेल्या सुधारित यादीमध्ये धुळे जिल्ह्यातील 27 ग्रामपंचायतीचा समावेश नसल्यामुळे ही गावे या योजनेपासून वंचित असणे यासंबंधी श्री. डी. एस. अहिरे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. डी. एस. अहिरे ( साक्री ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सन ***१९८५ मध्ये लागू झालेल्या पेसा कायद्याअंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायती तसेच महसूल गावाचे कालांतराने विभाजन होऊन*** त्या मूळ ग्रामपंचायत किंवा महसूल गावापासून ***स्वतंत्र महसूल गाव किंवा स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण झालेल्या गावांचा पेसा कायद्यामध्ये समावेश*** असल्याबाबत ***सुधारित यादी शासनाने प्रसिध्द न केल्याने त्या गावांना*** शासनामार्फत ***मिळणाऱ्या ५% निधीचा लाभ न मिळणे,*** धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील ***दहिवेल मुळ ग्रामपंचायत पैकी खरडबारी, मालणगाव, रोहण*** मूळ ग्रामपंचायत पैकी ***झंझाळे*** तसेच ***चोरवड*** या मूळ ग्रामपंचायत पैकी ***पिंपळगाव*** (खु.) ***इत्यादी २७ ग्रामपंचायत*** याच कारणांमुळे ***या योजनेपासून वंचित राहणे,*** परिणामी ***संबंधित गावांच्या नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही*** व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. विष्णू सवरा ( आदिवासी विकासमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

6....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. डी. एस. अहिरे : अध्यक्ष महोदय, 1985 मध्ये पेसा कायदा लागू झाल्यानंतर तो 1996 पर्यंत सुधारीत झाला आहे. 1985 मध्ये पेसा कायद्याचे जे नोटिफिकेशन निघाले आणि त्यावेळी महाराष्ट्रातून जेवढी गावे होती तेवढीच गावे आहेत. त्यानंतर शंभरटक्के आदिवासी लोकसंख्या असलेली गावांची यादी समाविष्ट करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाला अहवालरुपाने सादर केलेली नाहीत. सन 1985 ते 1996 या कालावधी सुधारीत अहवाल झालेला आहे. पण त्यानंतर 1996 पासून ते 2016 पर्यंत म्हणजे या 20 वर्षातही तो अहवाल सादर झालेला नाही. कारण त्यावेळी जी गावे होती किंवा ज्या ग्रामपंचायती होत्या, अथवा

L-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.डी.एस.अहिरे...........

जी गावे पेसाच्या नोटीफिकेशनमध्ये आहेत त्यामध्ये बरीच तफावत झालेली आहे. ग्रामपंचायतीचे विभाजन झालेले आहे किंवा महसूल गावांचे विभाजन झालेले आहे. अशा 27 ग्रामपंचायती माझ्या तालुक्यातील आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील जवळपास 150 ग्रामपंचायती आहेत. महाराष्ट्र सरकारने आदिवासी विभागाला 5 टक्के विशेष अनुदान दिलेले आहे त्यापासून वंचित राहावे लागते. म्हणून माझा प्रश्न आहे की, महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत पेसाच्या लिस्टमध्ये 100 टक्के आदिवासी लोकसंख्या असलेली गावे आहेत त्यांची नावे का सादर केली नाहीत. नसतील तर आता कधी सादर करणार आहेत. ज्या ग्रामपंचायती राहून गेलेल्या आहेत किंवा जी गावे राहून गेलेली आहेत त्यांना हे 5 टक्के अनुदान देणार का?

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.डी.एस.अहिरे यांनी ही लक्षवेधी मांडलेली आहे. आता पेसाअंतर्गत ज्या काही ग्रामपंचायतींना लाभ देत आहोत त्यामध्ये 13 जिल्ह्यातील 60 तालुक्यांना याचा लाभ होत आहे. यात 2 हजार 872 ग्रामपंचायती आहेत आणि 5 हजार 979 गावे आहेत. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, अशा ठिकाणी ज्या ग्रामपंचायतीचे विभाजन झाले आणि विभाजन झाल्यानंतर याचा लाभ त्या ग्रामपंचायतींना मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा प्रकारच्या ज्या ग्रामपंचायती सुटलेल्या आहेत त्या घेण्यात आलेल्या आहेत आणि हा लाभ आपण अनुसूचित क्षेत्राला देतो त्यामध्ये पेसा हा आहे. परंतु अशाप्रकारच्या ज्या ग्रामपंचायती सुटलेल्या आहेत यासंबंधी टीआरडीआय संस्थेमार्फत संपूर्ण सर्वे चालू आहे. अशा प्रकारच्या ग्रामपंचायतीचा सर्वे झाल्यानंतर आराखडा बनवून केंद्र सरकारला पाठविण्यात येईल. पेसा हा कायदा मुळात सन 1996 मध्ये आलेला आहे. परंतु अशा प्रकारच्या सूचना टीआडीआयला दिलेल्या आहेत. साधारणपणे 3-4 महिन्यात हा अहवाल शासनाकडे येईल आणि त्यानंतर केंद्र सरकारच्या मान्यतेने त्याचा समावेश करण्यात येईल.

डॉ.देवराव होळी : अध्यक्ष महोदय, पेसा कायद्यांतर्गत गावाला पैसे द्यायला पाहिजे होते. परंतु सरकार थेट ग्रामपंचायतीला निधी देत आहेत. हे पेसा कायद्याचे उल्लंघन आहे. हा निधी

........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.देवराव होळी......

गावाला देण्यात आला पाहिजे. पैसा असूनही चुकीचे नियोजन झाले तर आदिवासींचा विकास कधीच होणार नाही. पेसा कायदा 1996 नुसार प्रत्येक गावाचा विकास झाला पाहिजे. ग्रामपंचायतीला निधी दिला हे चुकीचे आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये 50 टक्के गैर आदिवासी लोक आहेत आणि हे गाव सुध्दा पेसामध्ये आहे. अशी अनेक गावे आदिवासी असूनही या पेसा कायद्यातून सुटलेली आहेत ती पेसा अंतर्गत घेण्यात येणार काय? हा पैसा गडचिरोली जिल्ह्याला देणार काय? इतर मागासवर्गीयांची गावांमध्ये 50 टक्के लोकसंख्या आहे त्यांना पेसामधून वगळण्यात येणार काय?

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, ज्या ग्रामपंचायती किंवा गावे पेसामध्ये आलेली नाहीत. त्यांचा समावेश करण्याचा विषय आहे. गडचिरोली जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींनी सांगितले की, आमची गावे पेसामधून वगळण्यात यावीत. 9 ग्रामपंचायतींनी सांगितले की आम्हाला पेसामध्ये राहायचे नाही. अशाप्रकारचा प्रस्ताव आल्यानंतर केंद्र सरकारला पाठविण्यात येईल. पेसा कायद्यामध्ये 5 टक्के निधी देण्याचा कायदा केलेला आहे यात ग्रामपंचायतीला अधिकार दिलेला नसून ग्रामसभेला अधिकार दिलेला आहे. ग्रामसभेने निकष ठरवून दिलेले आहेत की हा पैसा गावाच्या विकासासाठी खर्च करायचा आहे. ग्रामपंचायतीच्या विकासासाठी करायचा आहे. त्याप्रमाणे कारवाई चालू आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, पंचायत अनुसूचित क्षेत्र विस्तार अधिनियम 1996 पेसा हा कायदा दिनांक 24 डिसेंबर, 1996 रोजी अनुसूचित झालेला आहे. याच्या अंतर्गत महाराष्ट्रातील ज्या भागामध्ये आदिवासींची लोकसंख्या आहे त्या भागासाठी हा कायदा लागू होतो. या कायद्याच्या अंर्तगत केंद्र सरकारने जी तत्वे घालून दिलेली आहेत किंवा जे डायरेक्शन घालून दिलेले आहे त्याप्रमाणे आजपर्यंत अनेक गोष्टी या माध्यामातून पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत. जे सुत्र माननीय राष्ट्रपतींनी ठरवून दिलेले आहे तो 5 टक्क्यांचा निधी मेन बजेटमध्ये प्रोव्हीजन करण्याऐवजी पुरवणी मागण्यांमधून प्रोव्हीजन करतो आणि यामध्ये अनेक अडचणी निर्माण होतात. महाराष्ट्रातील आदिवासींच्या दृष्टीने हा विषय अतिशय महत्वाचा आहे. माझी आपणास विनंती आहे की, या संपूर्ण विषयाच्या संदर्भात आदिवासी कल्याण विभागाने एक प्रेझेंटेशन आपल्या

........3

डॉ.देवराव होळी ........

कार्यालयामध्ये आपल्या समक्ष द्यावे. काही सन्माननीय सदस्यांना याठिकाणी बोलावून घ्यावे आणि यामध्ये ज्या काही अडचणी आहेत, ग्राऊंउ रिआलिटीज आहेत. या सगळ्याची चर्चा सभागृहामध्ये होऊ शकत नाही. कारण विषय अतिशय डेलिकेट आणि कॉम्प्लीकेटेड आहे की, ग्राऊंड रिआलिटीज माहिती नाहीत. म्हणून आपण मंत्री महोदयांना सांगून एक प्रेझेंटेशन वितरीत करावे आणि त्यानंतर एक बैठक घेण्यात यावी. कॉँक्रीट सुधारणा जेवढ्या येतील तेवढ्या सरकारने स्विकारुन त्यानंतर केंद्र सरकारकडे गावे पाठवायची किंवा काय करायचे तर त्यातून मार्ग निघू शकतो अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**अध्यक्ष** : आदिवासी विभागातील सर्व आमदार आणि काही गटनेते यांच्या समक्ष एक बैठक घेण्यात यावी.

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, होय, बैठक घेण्यात येईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, याचे विभाजन होऊन नवीन गावे किंवा ग्रामपंचायती झालेल्या आहेत. त्या भागामध्ये पेसा होता पण विभाजन झालेले आहे. पेसाअंतर्गत ज्या गावांना निधी मिळतो आहे. विभाजन झालेल्या गावांना हा निधी देणार काय? विभाजन झाल्यामुळे एका गावाला निधी मिळतो आणि दुसऱ्या गावाला निधी मिळत नाही. म्हणून पेसा योजना त्याठिकाणच्या गावांना आणि पाड्यांना लागू करणार काय?

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, जोपर्यंत नवीन गावांची पूर्णतः मान्यता येत नाही. नवीन ज्या काही ग्रामपंचायती किंवा झाले असतील, त्यांना दर्जा कसा दिलेला आहे. त्यामुळे केंद्र शासनाची परवानगी आल्यानंतर त्यांना सुध्दा पेसाअंतर्गत निधी देता येईल. आता ग्रामपंचायतीला देतच आहोत.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मुद्दा असा आहे की, एका गावाचे विभाजन झाल्यामुळे ग्रामपंचायतीला पेसाअंतर्गत योजनेचा लाभ होणार, हे केवळ लोकसंख्येमुळे गावाचे विभाजन झाले. गावामध्ये फक्त एखादा रस्ता मध्ये करण्यात येणार, पाड्याच्या बाबतीत सुध्दा तेच होणार आहे. याची बैठक कधी होणार आणि निर्णय कधी होणार. विषमता कशी कमी करणार आणि हा निधी त्या पाड्यांना कसा मिळेल यासंबंधी मंत्री महोदय काही उपाययोजना करणार आहात काय?

M-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : गावाचे विभाजन झाले असेल तर पैशाचे विभाजन करा.

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, अनुसूचित क्षेत्रामध्ये असलेल्या गावापुरता किंवा ग्रामपंचायती पुरता हा मर्यादित विषय आहे. ते जर गाव ग्रामपंचायत अनुसूचित क्षेत्रामध्ये असेल तर त्याचा निश्चितपणे लाभ मिळेल.

.........

....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन**

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनिल गोटे साहेब आपण जागेवर बसावे. माझे बोलणे झाल्यानंतर आपण बोलावे, माझ्या बोलण्याला तुमची काही हरकत आहे का ? ज्यावेळेला सुवर्णकाराच्या विषयाच्या संदर्भात चर्चा या सभागृहात सुरु होती त्यावेळेला सन्माननीय गट नेते श्री.जयंत पाटील यांनी किंवा अन्य सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्याच्यानंतर सत्तारुढ पक्षाचे सदस्य हे आक्रामक झाले आणि त्यांनी काही वाक्ये वगळयाच्या संदर्भात मागणी केली. बऱ्याच वेळेला सभागृहामध्ये त्या बाजूने किंवा या बाजूने सदस्यांनी व्यक्त केलेली मत आपल्याला जर पटत नसतील तर ती वगळयाच्या संदर्भात मागणी केली जाते. माझी धारणा अशी आहे की, ज्या वेळेला एखादे स्टेटमेंट डेरोग्रेट्री असेल, बदनामिकारक असेल, कोणाचा अवमान करणारा असेल, आणखीन काही असेल, तर तेच त्या ठिकाणी वगळले गेले पाहिजे. मला एकदा नव्याने हे माहिती करुन घ्यायची आहे, कारण तालिका सभापतींनी हे सर्व वगळून टाकतो असे सांगितले. मी जे ऐकले त्याच्यामध्ये काही डेरोग्रेट्री नव्हते, काढून टाकण्यासारखे नव्हते. तपासून काढून टाकणे मी समजू शकतो, जर त्याच्यामध्ये काही दोष असेल तर. सभागृहाच्या माहितीसाठी आपण रुलींग देऊन यामध्ये आम्हाला सांगा की, या गोष्टी वगळल्या जातील, या गोष्टी नाही वगळल्या जाणार. म्हणजे प्रत्येक वेळेला सदस्य अशा प्रकारचा आग्रह धरणार नाही. आम्हाला नक्की कसे वागायचे त्याचे मार्गदर्शन होईल.

**अध्यक्ष :** मी माघाशी सांगितले आहे की, अवमानकारक, काही हेत्वारोप, असे काही असेल तर आपण तो काढतो. त्याच्यामध्ये सदस्यांची नावे घ्यायला कुठलीही हरकत नाही, परंतु जर दोष लावून नाव घ्यायचे असेल किंवा नाव घेतला असेल तर ते साधारणतः वगळतो. म्हणून आपण जे मघाशी सांगितले ते तपासून आम्ही निर्णय घेतो.

श्री.दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, मग ते रेकॉर्डवर आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटलांनी बोलेले सर्व रेकॉर्डवरुन काढून टाकतो असा जो तालिका अध्यक्षांनी निर्णय दिलेला आहे. त्याचे पुनर्विलोकन करा.

**अध्यक्ष :** तपासून निर्णय करतो.

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ प्रोसिजर**

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आणि पॉईंट ऑफ मार्गदर्शन आहे. अध्यक्ष महोदय आपण या सभागृहाचे सार्वभौम आहात. आपला निर्णय आम्हाला क्षीरसावंत आहे. मी आपल्याला एक साधा प्रश्न विचारतो. बसून बोलणा-यावर तुम्ही काही कारवाई करणार नसाल तर मला उठून कारवाई करावी लागेल.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.अनिल गोटे यांनी त्यांच्याकडे लक्ष देऊ नये. आपला मुद्दा लवकर संपवा.

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर असा आहे की, सभागृहाच्या बाहेर निवडणुकीच्या प्रचारात एखाद्या नेत्याने केलेले भाषण हा विषय या सभागृहात चर्चेचा होऊ शकतो का ? याच्यावर मला तुमचे मार्गदर्शन पाहिजे.

**अध्यक्ष :** त्याच्यावर चर्चा झालेली नाही. असा संदर्भ अनेकवेळा दिला जातो. परंतु त्याच्यामध्ये हेत्वारोप असेल, चुकीचे असेल, काही अवमानकारक असेल तर ते आपण काढू. मघाशी एक निर्णय द्यायचा राहिला आहे. स्थगन प्रस्तावाच्या संदर्भात मला निर्णय करायचा आहे.

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांचे नाव कुठल्या सन्मानासाठी घेतले होते. याचा खुलासा केला तर बरे होईल.

श्री इम्तियाज जलिल : अध्यक्ष महोदय, सम्माननीय विपक्ष के नेता श्री राधाकृष्ण विखे-पाटील जी ने जो बात पेश की है, उसी ताल्लुक से मैं यह बात आगे बढ़ाना चाहता हूं. यह बहुत सौभाग्य की बात होती है कि करोड़ों की जनता के बीच में से इतने सारे लोग यहां पर चुनकर आते है. हरेक को एकदूसरे का सम्मान करना चाहिए. यह लोगों को बताने की जरूरत नहीं है. लेकिन सवाल यह है कि कौन, किसको और किससे किस लहजे में बात करनी है ? इस सदन में जो घटना घटी है, हमारे कुछ वैचारिक मतभेद हो सकते है, आपस में चर्चा कर सकते है. लेकिन उसी दिन एक सदस्य यहाँ पर इस तरह से संबोधित करता है कि कुत्तो इस देश में रहना है....हम उस दिन चाह रहे थे कि........ आप इन्साफ की कुर्सी पर बैठे हैं, आपकी जिम्मेदारी थी कि आपने उसके खिलाफ कार्रवाई करनी चाहिए थी.

**अध्यक्ष** : ते शब्द कामकाजातून काढून टाकले आहेत.

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल......

माफी मांगने से, यदि मैं किसी को इस तरह का शब्द इस्तेमाल करुंगा,...यह कहा जाएगा कि माफी मांग लो और मामला खत्म हो जाएगा, तो यह बहुत गलत परम्परा सदन में रहेगी. थोड़ी बहुत कार्रवाई तो जरूर की जानी चाहिए. कोई गालीगलौच से इस सदन में बात करेंगे और आप खामोशी से यह कहेंगे कि ......

**अध्यक्ष** : मी निर्णय देतो आहे. मी मघाशी बोललो होतो की, माननीय गट नेत्यांना बोलावतो परंतु ते येऊ शकले नाही. फक्त सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील आले. त्याच वेळेला मी माननीय मुख्यमंत्र्यांना बोलावून घेतले होते. इकडे सभागृह चालू असल्यामुळे आपल्याला येता आले नाही. आता त्याच्यावर निर्णय झाला. त्यावर सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटलांचा निर्णय आहे. त्यामुळे तो आपण मानावा. निर्णय असा झाला की, आज गृह विभागावरच्या मागण्या आहेत. जे काही त्या स्थगन प्रस्तावावर बोलायचे होते. ते त्यांनी गृह खात्यावर मांडावे, त्याला गृहमंत्री उत्तर देणार आहेत. शक्यतो असे स्थगन प्रस्ताव ब-याच वेळेला स्वीकारतो आणि स्वीकारलेले सुध्दा आहेत. आजच दोन्ही विषय सभागृहामध्ये असल्यामुळे तो विषय मी मांडला. त्यांनी मान्य केले की, हया गृह खात्याच्या मागण्यांवर त्याची चर्चा उपस्थित करतो. मला असे वाटते अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा सुरु करावी.

....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: अनुदानाकरिता मागण्या.

**मु.शी.**: सन 2016-2017 च्या अनुदानाकरिता मागण्या :

1) सामान्य प्रशासन विभाग

2) गृह विभाग

3) नगरविकास विभाग

4) विधी व न्याय विभाग

5) गृहनिर्माण विभाग

**अध्यक्ष** : आता सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग,नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक. ए-1,ए-2, ए-3, ए-4, ए-5, ए-6, ए-7, ए-9, बी-1, बी-2, बी-3, बी-4, बी-5, बी-6, बी-7, बी-8, बी-9, बी-10, बी-11, बी-12, एफ-2, एफ-3, एफ-4, एफ-5, एफ-7, एफ-8, जे-1, जे-2, जे-3, जे-4, जे-5, क्यू-2, क्यू-3, क्यू-4 चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

( **प्रेस** : सोबत जोडलेले मागण्यांसंबंधीचे जोडपत्र छापावे.)

........

....6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : आता सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला सुरुवात होईल. चर्चेला तीन तासांची वेळ आहे. आता माझ्याकडे बरीच नावे आलेली आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपली मते थोडक्यात मांडली तर अधिक जणांना बोलता येईल.

......7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलताना मी सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभागावरील मागण्यांना विरोध करण्याकरिता व माझे मत मांडण्यासाठी उभा आहे. गृहनिर्माण विभागावरील चर्चा आहे. गृहनिर्माण विभागाचे राज्यमंत्री महोदय उपस्थित नाहीत, मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

N-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करताना संबंधित खात्याचे कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्री यांच्यापैकी एक जण तरी या सभागृहात उपस्थित राहिला पाहिजे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांच्या वेळी कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्री यांच्यापैकी एक जण तरी या सभागृहात हजर राहिला पाहिजे. कॅबिनेट मंत्री वरच्या सभागृहात असतील तर राज्यमंत्र्यांनी खालच्या सभागृहात बसले पाहिजे.

**अध्यक्ष** : संबंधित मंत्री येईपर्यत सन्माननीय सदस्यांना बाकीच्या विभागावर बोलता येईल.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, असे करता येत नाही.

**अध्यक्ष** : ठीक आहे, मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 11 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली)

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमिन पटेल ( मुंबादेवी ) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आपने दस मिनट के लिए सदन स्थगित किया. फिर भी गृहनिर्माण विभाग के मंत्री महोदय सदन में उपस्थित नहीं हैं. माननीय मुख्यमंत्री जी यहाँ पर उपस्थित हैं. पूरा कॅबिनेट यहाँ उपस्थित है, ऐसा समझकर मैं अपनी बात कहने की शुरुवात करता हूं.

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण विभाग के बारे में कहना चाहता हूं कि मुंबई में 16 हजार से ज्यादा इमारतें जर्जर हालत में है. यहाँ पर बार बार कहा जाता है कि आपने 15 साल में क्या किया ? हमने क्या किया, क्या नहीं किया, यह बात छोड़कर, सरकार इस बारे में क्या करने वाली है इस ओर ध्यान देना चाहिए. हम भी उस बाजू में बैठते थे तो मंत्री महोदय का बचाव किया करते थे. पिछले पांच सालों में जो निर्णय हुए वह ऐतिहासिक निर्णय हुए. सेस बिल्डिंग को, ए,बी,सी. बिल्डिंग को मर्ज करके, 1969 के बाद से अभी तक की सभी बिल्डिंग को, 30 साल पुरानी बिल्डिंगों के रिडेवलपमेंट का काम, उस समय के मुख्यमंत्री आदरणीय श्री पृथ्वीराज चव्हाण जी ने ऐतिहासिक निर्णय लिया. अब यहाँ पर श्री वायकर जी भी आए हैं. पिछली सरकार ने सबसे बड़ा निर्णय लिया था. सेस बिल्डिंग के लिए जो 100 करोड़ रुपया दिया जाता था, उसको 200 करोड़ रुपये देने का काम आदरणीय श्री पृथ्वीराज चव्हाण जी ने किया था. 100 करोड़ रुपये सेस बिल्डिंग की रिपेअर के लिए दिये जाते थे, 40 करोड़ रुपये सेस से आता था, 40 करोड़ रुपये सरकार देती थी. 10 करोड़ रुपया म्हाडा देती थी, 10 करोड़ रुपये बीएमसी देती थी, 100 करोड़ का फंड आता था. जो पुरानी इमारते हैं, मुंबई आयलैंड सिटी में जो धोकादायक इमारतें हैं, उनको रिपेअर करने का काम होता था. पिछले पांच सालों में हमारी सरकार के खिलाफ, हमारे चीफ मिनिस्टर रहते हुए, हमने मुंबई के लोगों के लिए आवाज उठायी है. श्री वायकर जी को मैं एक शेर सुनाना चाहता हूं. मुंबई के लोगों का आपसे कहना है कि

"हमने बख्शी जिन पत्थरों को धड़कन, जब बोलने लगे तो हम पर ही बरस पड़े."

.....2.

श्री अमिन पटेल.......

अध्यक्ष महोदय, आपके हाथ में सत्ता थी. श्री राज पुरोहित कुलाबा से चुनकर आए. श्री सुनील शिंदे जी भी जीत कर आए. आपने म्हाडा के माध्यम से लोगों को मारने का काम किया है. सिर्फ 88 करोड़ रुपये का बजट पुरानी बिल्डिंग के रिकन्स्ट्रक्शन के लिए आपने दिया है. जब कि 200 करोड़ रुपये की घोषणा श्री पृथ्वीराज चव्हाण जी ने उस समय की थी. आपने 88 करोड़ रुपये कब दिए. जब पूरा साल खत्म होने के लिए आया तब आपने पैसा दिया. श्री वायकर जी आप स्टॅण्डींग कमिटी के चेअरमन थे. मेरा निवेदन है कि दक्षिण मुंबई में,कुलाबा, मुंबादेवी, शिवडी, वर्ली की पुरानी बिल्डिंग को आप आकर देखिए. वहां पर लोग मौत के साये में रहते हैं. 200 करोड़ रुपये का जो बजट था, उसको बढ़ाने के बजाय 88 करोड़ रुपये का बजट बनाकर रख दिया. आज 88 करोड़ रुपये में कौनसी, कितनी बिल्डिंग रिपेअर होगी ? पिछले दिनों एक बिल्डिंग में आग लग गई.

.....3.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत**

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना कपात सूचना मांडण्याकरिता परवानगी दिली जाणार आहे का ? आपण मागण्यांवरील चर्चा सुरु होतांना तसे सांगितले नाही. म्हणून खात्री करुन घेण्याकरिता मी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

**अध्यक्ष :** पॉईंट ऑफ ऑर्डरमुळे माझे त्यासंदर्भात सांगायचे राहू गेले. कपात सूचना मांडण्याकरिता अनुमती आपण आता देत नाही, असे मागील निर्णय आहेत. सन 2010 पासून कपात सूचना न मांडण्यासंदर्भात परंपरा पडलेली आहे. त्यामुळे आता कपात सूचना मांडण्याकरिता अनुमती दिली जाणार नाही, हे गृहितच धरण्यात येते.

......4.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : अनुदानाकरिता मागण्या

मु.शी. : सन 2016-2017 च्या अनुदानाकरिता मागण्या

(1) सामान्य प्रशासन विभाग (2) गृह विभाग (3) नगर विकास विभाग (4) विधी व न्याय विभाग (5) गृहनिर्माण विभाग.

.......चर्चा पुढे सुरु.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, 200 करोड़ रुपये तो नहीं दिए गए. श्री वायकर साहब, 30 करोड़ रुपये जो सेस वसूल करके सरकार के पास आए थे, वह पैसा भी आपने पिछले साल म्हाडा को नहीं दिए. पिछले दिनों एक बिल्डिंग में आग लग गई. पूरा मीटर बॉक्स और सीढ़ियां जल गई. आपने बहुत अच्छा किया कि 3 लाख रुपये तक का टेंडर का सिस्टम रखा है. मैं सरकार से कहना चाहता हूं कि इमरजेन्सी में किसी बिल्डिंग की सीढ़ी जल जाती है, मीटर बॉक्स जल जाता है, तो कुछ पैसे के लिए सीईओ म्हाडा को अधिकार देना चाहिए ताकि उस बिल्डिंग की सीढ़ी और मीटर बॉक्स का काम वे कर सके, ऐसा प्रोविजन करने की बहुत जरूरत है. आज मुंबई में कई बिल्डिंगों को डिमॉलिश कर दिया गया है. वे लोग ट्रान्जिट कॅम्प में रह रहे हैं. मेरे इलाके में पिछले 40 साल से जो लोग ट्रान्जिट कॅम्प में गए, वे वापस नहीं आए. श्रीमती वर्षा गायकवाड और श्री राज पुरोहित जी के यहाँ भी ऐसी स्थिति है. ट्रान्जिट कॅम्प को रिपेअर करने के लिए म्हाडा के पास कोई फंड नहीं है. आज ट्रान्जिट कॅम्प बनने चाहिए. पुराने ट्रान्जिट कॅम्प रिपेअर नहीं हो रहे है. इसके लिए पैसा दिया जाना चाहिए. म्हाडा ने अपने बजट में 50 करोड़ रुपये ट्रान्जिट कॅम्प, रिडेवलपमेंट और पुरानी बिल्डिंगों के लिए रखा है. 50 करोड़ रुपये में कितनी बिल्डिंग रिपेअर होगी ? कितने ट्रान्जिट कॅम्प बनेंगे ? मेरा निवेदन है कि इस बजट में ट्रान्जिट कॅम्प की रिपेअर, पुरानी बिल्डिंग के रिकन्स्ट्रक्शन के लिए कम से कम 100 करोड़ रुपये का अलग से बजट देना चाहिए.

अध्यक्ष महोदय, म्हाडा को ताकत देना जरूरी है. ताकत तब मिलेगी जब उनके यहाँ स्टाफ और पैसा होगा. उनके पास न स्टाफ है और न पैसा है. नहीं तो आप निश्चित कर लीजिए कि सेस बिल्डिंग के लोगों को हम ऐसा ही छोड़ देते है. म्हाडा का दूसरा ड्रॉपबॅक है

....5

श्री अमिन पटेल..........

कि सेस बिल्डिंग का ध्यान तो म्हाडा रखती है, लेकिन मुंबई की 16 हजार बिल्डिंगों के साथ साथ पांच हजार बिल्डिंग नॉनसेस बिल्डिंग है. उसका मालिक कोई नहीं है. आप, मैं और श्री गोपाल शेट्टी जी नगरसेवक थे. श्री गोपाल शेट्टी बार बार खड़े होकर कहते थे कि मुंबई का वाली कौन ? श्री वायकर जी आज आप जैसा मुस्कुरा रहे है वैसे ही हम सब मुस्कुरा रहे थे. आज इस मुंबई की 5 हजार सेस बिल्डिंग में जो टेनन्ट रहते है उनका वाली कौन है ? इनके बारे में सरकार सोचेगी या नहीं सोचेगी ? उनको कुछ रियायत देगी या नहीं ? आपके माध्यम से इस बजट में, पिछले डेढ़ सालों से मुंबई शहर में रहने वाले, डिलॅपिडेटेड बिल्डिंग में रहने वाले, चाहे वे कालबादेवी में रहने वाले हों, भेंडी बाजार के लोग हों, नागपाड़ा, गिरगांव, ऑपेराहाऊस, मदनपुरा के लोग हों या कुलाबा के लोग हों, इनको न्याय और इन्साफ देने का काम करना होगा. पिछली सरकार ने म्हाडा को 200 करोड़ रुपये देने का निर्णय लिया था. मुख्यमंत्री जी ने आश्वासन देना चाहिए कि 200 करोड़ रुपये देने का जो वादा था, उस पर वे अमल करेंगे.

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभाग के बारे में कहना चाहता हूं कि उस समय के मुख्यमंत्री श्री पृथ्वीराज चव्हाण जी को धन्यवाद देना चाहता हूं. मुंबई में बिल्डिंगों की बहुत बड़ी समस्या है. यहाँ पर खेती तो नहीं है. यहाँ पर इंडस्ट्री, मिल्स सब बंद हो गई है. आज पुरानी बिल्डिंग और रिडेवलपमेंट का मसला है. उस समय के मुख्यमंत्री श्री पृथ्वीराज चव्हाण जी ने बहुत अच्छा फैसला लिया. दिनांक 9.9.2014 को एक जी.आर.आया. नियम 33(9) में जो प्रॉब्लम्स है उसको हल करने की पूरी कोशिश की है. जब नई सरकार आयी, 6 महीने में मुख्यमंत्री जी ने क्या क्या निर्णय लिये यह देखने के लिए फाईल मंगायी. जब उन्होंने ये फाईल देखी तो एक दिन में उस फाईल को वापस कर दिया. कहा कि यह बहुत अच्छा निर्णय है. मुंबई में क्लस्टर का रिडेवलपमेंट होना चाहिए. पहले जो जो कठिनाईयाँ थी, जैसे कि टेनेन्ट का 100 प्रतिशत कन्सेन्ट चाहिए थी, ये पॉसिबल ही नहीं था, एक एकड़ जगह है, दो एकड़ जगह है, चार एकड़ जगह है, उसमें 100 प्रतिशत कन्सेन्ट होनी चाहिए, यह पॉसिबल नहीं था. उस वक्त निर्णय लिया गया कि लैंडलॉर्ड को 70 प्रतिशत कन्सेन्ट मिलती है, टेनेन्ट का 70 प्रतिशत कन्सर्न मिलता है तो वह स्कीम हो जाएगी. अच्छा निर्णय था. मेरे मतदार क्षेत्र

.......6.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल........

में काम हो रहे हैं. उसका बड़ा फायदा हो गया. काम शुरु हो गया. मेरे मतदार क्षेत्र में बीआईटी चॉल का, 33(7) का रिडेवलपमेंट का प्रपोजल है. उसके अंदर एक हजार टेनेन्ट है. करीब करीब 5 हजार लोग होते हैं. 33(7) से 33(9) कन्वर्ट करने का उस स्कीम में जब प्रोविजन आया तो हाईपॉवर कमिटी के पास वह प्रपोजल गया. मुझे यह कहते हुए बड़ी खुश्ी होती है कि डिपार्टमेंट में आज भी इतने अच्छे ऑफिसर है. श्री अजय महेता साहब ने 8 मिनट के अंदर उस प्रपोजल को संमती दे दी. कहा गया कि यह अच्छा प्रपोजल है. सरकार को बहुत फायदा होगा. 30 हजार वर्ग फूट का वहां हॉस्पिटल बनेगा. एक बहुत बड़ी लाईब्रेरी बनेगी. 33(9) में उस स्कीम को कन्वर्ट कर दिया गया. वह प्रपोजल युडी के पास आया. श्री नितीन करीर बहुत अच्छे अधिकारी है. उन्होंने कहा कि यह प्रपोजल बहुत अच्छा है, यह करना चाहिए. उसमें एक ऐसा लॅक्युना निकलकर आया कि उस पॉलिसी के अंदर यह लिखा है कि अगर 33(7) से 33(9) कन्वर्ट हो, लैंड किसी गव्हर्नमेंट इन्स्टीटयुट से बिलॉंग करती है तो उसकी संमती होनी चाहिए. उस प्रपोजल को मैंने श्री नितीन करीर जी के सामने रखा. क्लस्टर पॉलिसी के संबंध में यह बात है. लेकिन हाईपॉवर कमिटी के चेअरमन श्री अजय महेता साहब है. बीएमसी के कमिश्नर श्री अजय महेता साहब है. जब उन्होंने इस प्रपोजल को पास करके युडी के पास भेजा है, तो युडी ने प्रिन्सिपली उस प्रपोजल को पास करना चाहिए. हम इसको मंजूर करते है, आप इम्प्रूवमेंट कमिटी से पास करा कर लाईए. पॉलिसी में लिखा होता है. ऑफिसर के हाथ बंधे हुए थे. मुख्यमंत्री जी से मेरा निवेदन है कि जो चीज प्रोसेस को रुकाती है,उसको स्ट्रीमलाईन करना बहुत जरुरी है. अगर 33(7) से 33(9) का कन्वर्जन है और कार्पोरेशन की लैंड है, कार्पोरेशन की इम्प्रूवमेंट कमिटी ने एक बार पास करके भेजा है, तो 33(9) में अब भी ऐसी कोई रुकावटे हैं तो उनको दूर करना चाहिए. मैं मुख्यमंत्री जी की बातों से सहमत हूं कि सब को घर मिलना चाहिए. लेकिन पिछले डेढ़ साल में एक भी पॉलिसी 33(7) से 33(9) कन्वर्ट नहीं हुई है, तो उसके लिए जरुर कहीं न कहीं रुकावटे है उनको दूर करने का काम करना चाहिए. वरना कहना, सिर्फ कहना बनकर रह जाएगा. पांच साल ऐसे ही निकल जाएंगे. पांच साल जाने के लिए देर नहीं लगती है. हमारे 15 साल निकल गए. उसी तरह ये 5 साल भी निकल जाएंगे. अब केवल साढ़े तीन साल ही बाकी है.

.....7.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल..........

अब अगले बजट से पहले, अगले अधिवेशन से पहले,.... मैं नम्रतापूर्वक आपसे बात कह रहा हूं. क्योंकि मैं जानता हूं कि आपकी ध्यान में वह बात आएगी तो मुंबई के लोगों को न्याय नहीं मिलेगा. आप दोनों के रहते हुए भी मुंबई के लोगों को न्याय मिला, तो फिर न्याय मिलेगा ही नहीं, ऐसा मानना पड़ेगा.

अध्यक्ष महोदय, गृह विभाग के बारे में कहना चाहता हूं कि जब हमारी सरकार थी, तब भी मैने यही कहा था कि मुंबई की पुलिस बहुत सक्षम है. इसमें कोई दो राय नहीं है.

.....पी-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : आज आपल्याला वेळेत कामकाज संपवायचे असल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी मला कामकाज करताना सहकार्य करावे, अशी विनंती आहे. आज आठवड्याचा शेवटचा दिवस आह. मी सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांना सांगू इच्छितो की, आपल्या पक्षाला 39 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. त्यानुसार वेळेचे बंधन ठेऊन त्यांनी त्यांचे भाषण करावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मुंबई पर जब टेररिस्ट का हमला हुआ उस समय ये ही मुंबई पुलिस थी जो उनके साथ लड़े. कमांडो बाद में आए. आज मुंबई की पुलिस को सक्षम करने के लिए उनको और ताकत देने की जरूरत है. आज मुंबई के पुलिस की हाऊसिंग का मसला है. उनके हेल्थ और बच्चों के एज्युकेशन का मसला है. हम देखते हैं कि आज पुलिस वाला सुसाईड कर रहा है. कहीं पर तनाव से उसकी मृत्यू हो रही है. इनके घर की समस्या हल करना बहुत जरूरी है. मुख्यमंत्री जी आपने ऐतिहासिक निर्णय लेना चाहिए. जो भी पुलिसवाला है, जिस घर में वह रहता है, रिटायर्डमेंट के बाद वह घर उसका होना चाहिए. जिंदगी भर वह पुलिस विभाग में अपनी सेवा देता है. रिटायर्ड होने के बाद में उसको मुंबई में दस बाय दस का मकान भी नहीं मिलता है. उसको ओनरशीप के मकान देने चाहिए. उसके लिए जो भी करने की जरूरत है उसकी तरतूद की जानी चाहिए. उनके बच्चों के एज्युकेशन और उनके हेल्थ की ओर भी ध्यान दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मेरे इलाके में पुलिस हॉस्पिटल है. आज उस हॉस्पिटल की हालत क्या है ? उस हॉस्पिटल को सक्षम बनाना चाहिए. हॉस्पिटल में सुविधाए दी जानी चाहिए. मुंबई पुलिस की जो सॅलरी है वह इंटरनॅशनल पुलिस के लेवल पर लानी चाहिए. आज करप्शन होता है. मैं यह नहीं कहता कि पूरा पुलिस फौर्स करप्ट है. मैं यह नहीं कहता कि ज्यादातर पुलिस वाले करप्ट है. हम उनको ज्यादा वेतन देंगे, उनके बच्चों के एज्युकेशन की ओर ध्यान देंगे, हम उनके हेल्थ का ख्याल रखेंगे, तो मुझे विश्वास है कि स्कॉटलैंड के आगे मुंबई पुलिस जा सकती है. मैंने जो बातें यहां बतायी है, मुख्यमंत्री जी स्वयं सदन में बैठे है. गृहनिर्माण विभाग, नगरविकास विभाग और गृह विभाग के बारे में मैंने जो बातें पेश की हैं, उन पर ध्यान दिया जाना चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

-----------

....2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अतुल भातखळकर ( कांदिवली पूर्व ) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभाग अनुदानाच्या मागण्यांना समर्थन देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे गृह विभाग अतिशय महत्वाचे आहे. गृह विभागाच्या नियंत्रणाखली पोलीस दल असते. परंतु, गेल्या काही वर्षापासून राज्यातील पोलीस दलाचा अनेक राजकीय कारणाकरिता वापर केला जात आहे. आज पोलीस दलातील कामकाजाकडे मोठ्या प्रमणावर दुर्लक्ष झालेले आहे आणि ती वस्तुस्थिती आहे. याची अनेक उदाहरणे मी देऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने गेल्या दोन वर्षामध्ये पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिलेला आहे. परंतु, यापूर्वीच्या सरकारने मॅचिंग ग्रॅन्ट न दिल्यामुळे आधुनिकीकरणाचा निधी परत द्यावा लागला होता. सन 2008 ते सन 2014 मधील कालखंडात गृह विभागाला रिव्हाईज एस्टीमेट निधी दिला होता. परंतु, गेल्या 5 वर्षाच्या कालावधीत सदर निधी उपलब्ध झालेला नाही. यासंदर्भातील फक्त डाटा उपलब्ध आहे. गेल्या वर्ष दीड वर्षामध्ये मुख्यमंत्री महोदयांनी गृह विभागाची जबाबदारी स्वत:कडे घेतलेली आहे. त्यामुळे गृह विभागात अनेक सकारात्मक बदल झाल्याचे सर्वांना दिसू लागले आहे. मुख्यमंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांच्या बदल्याचे विकेंद्रीकरण केलेले आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना बदल्यांचे अधिकार दिले आहेत. आज मंत्रालयातून अनेक नियुक्त्या होत आहेत, त्यामध्ये पारदर्शकता आणलेली आहे. एक प्रकारचा प्रोफेशनेलिझम आणलेला आहे. त्यामुळे आज बदल्यांबाबतची वशिलीबाजी संपलेली आहे. याबद्दल मी मुख्यमंत्री महोदयांचे मनापासून अभिनंदन करीत आहे. आज पोलीस दलामध्ये आधुनिकीकरण करण्याची आवश्यकता आहे. गेल्या दीड वर्षापासून पोलीस दलामध्ये आधुनिकीकरण होऊ लागले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतुल भातखळकर...

अनेक पोलीस स्टेशनमध्ये महिलांच्या सुरक्षेकरिता वेगवेगळी ॲप्लिकेशन्स दिली गेली आहेत. मोबालवरील एक बटन दाबले की, डिस्पेले कॉलचा मेसेज जातो आणि काही वेळातच पोलीस महिलांसाठी किंवा नागरिकांच्या मदतीसाठी धावून जातात. याचाच भाग म्हणून मुंबई शहरामध्ये प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस उपलब्ध असेल, महिलांच्या कॉलला उत्तर देणारी, त्या ठिकाणी धाऊन जाणारी, एक गाडी मुंबईतील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. ही माझ्यादृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. बऱ्याच वेळेला पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल करुन घेण्यासाठी सुध्दा बरेच प्रयत्न करावे लागतात. या राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी मागील अधिवेशनात असे सांगितले होते की, लोकांकडून एफआयआरची मागणी केल्यानंतर एफआयआर दाखल केलाच पाहिजे. एफआयआर दाखल केला म्हणजे समोरच्या माणसावर आरोपपत्र दाखल करावेच लागेल असा त्याचा अर्थ नाही. परंतु जेव्हा एफआयआर दाखल करायचा नाही येथपासून सुरुवात होते, तेव्हा कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात. सर्वसामान्य माणसाला असे वाटते की, आपल्याला पोलीस स्टेशनमध्ये कोठल्याही प्रकारची किंमत नाही. म्हणून या सरकारने एफआयआर दाखल करुन घेण्याचा निर्णय घेतला. त्या प्रकरणाची योग्य ती सूसंगत चौकशी करावी आणि तपासणी अधिकाऱ्याला असे वाटले की, या एफआयआर मध्ये काही अर्थ नाही तर त्या माणसावर कारवाई करण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय पोलीस घेऊ शकतात. पारदर्शी पध्दतीने काम करण्याचा हा स्तूत्य असा निर्णय या राज्यात घेण्यात आला आहे.

अध्यक्ष महाराज, मुंबई शहरातील भीषण हल्ल्यानंतर सरकारने राम प्रधान समिती नेमली होती. या समितीने अनेक सूचना आपल्या अहवालात केल्या होत्या. परंतु दुर्दैवाने तो अहवाल महाराष्ट्राच्या जनतेसमोर ठेवला गेला नव्हता. त्या अहवालातील एक अत्यंत महत्वपूर्ण सूचना अशी होती की, मुंबई शहरात आणि महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये सीसीटीव्हीचे जाळे निर्माण करण्याची आवश्यकता आहे. याचा दुहेरी फायदा असा होणार आहे की, यामुळे पोलिसांवरील ताण कमी होईल. त्याचवेळेला गुन्हेगारांना शोधण्यासाठी सीसीटीव्हीमुळे पोलिसांना लवकर यश मिळू शकेल. परंतु दुर्दैवाने त्यानंतर पाच वर्षाच्या कालावाधीत सीसीटीव्हीचे जाळे या मुंबई

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतुल भातखळकर...

शहरात पसरविले गेले नाही. परंतु हे सरकार सत्तेवर आल्यानंतर यासंदर्भातील निर्णय घेतला. पुणे शहर हे सीसीटीव्हीयुक्त झाले त्याचप्रमाणे मुंबई शहरातील दक्षिण मुंबई शहर जिल्हा 100 टक्के सीसीटीव्हीनी व्यापला गेला आहे. येत्या ऑक्टोबरपर्यंत मुंबई शहर आणि उपनगरात सीसीटीव्ही बसविण्याचे काम सुरु झाले आहे. मुंबई शहरात सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण झाले, याबद्दल मी या सरकारचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महाराज, कोस्टल पोलीस स्टेशनची सुध्दा अत्यंत वाईट अवस्था होती, परंतु आता कोस्टल सिक्युरिटी चांगली केली गेली. समुद्रामध्ये मासेमारीचे काम करणाऱ्या कोळ्यांना बायोमॅट्रीक कॉर्ड देण्याचे काम पूर्ण झाले आहे. सन 2015-2016 यावर्षी 14 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त नियतव्यय गृह विभागासाठी दिला गेला. त्यामुळे या राज्यामधील तसेच मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था चांगली राहण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे. पोलीस दलामध्ये कर्मचाऱ्यांचे प्रमाण फार कमी आहे, ही सर्वांचीची तक्रार आहे. मी मुंबई शहरात काम करीत असताना ही उणिव मला नेहमी जाणवते. सन 2003 साली यासंदर्भात तत्कालीन सरकारने सराफ समिती नेमली होती. या समितीच्या शिफारसींचा शासनाने स्वीकार करावा, त्याप्रमाणे पोलीस कर्मचाऱ्यांची भरती पुरेशा संख्येने झाली पाहिजे. पोलीस विभागात खालच्या स्तरावर काम करीत असताना लोकांना व्हिजिलिंग पोलिसिंगची आवश्यकता असते. चेन्स स्नॅचर, गर्दूल्ले, यांचा मोकळ्या जागेच्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात त्रास होत असतो. पोलीस स्टेशनमध्ये यासंदर्भात तक्रार घेऊन गेल्यानंतर तेथे पोलीस कॉन्स्टेबल्स तसेच रायटर यांचीही संख्या खूप मोठ्या प्रमाणात कमी असते. मी या अनुषंगाने माननीय गृह मंत्र्यांना सूचना करु इच्छितो की, कॉन्स्टेबलची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढविण्याची आवश्यकता आहे. व्हिजिलन्स पोलिसिंग होण्याकरिता काही प्रमाणात पोलिसांची आवश्यकता आहे. मुंबई शहरामध्ये अनेक पोलीस स्टेशनमध्ये पोलिसांची क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे. मी माझ्या मतदारसंघातील वानगीदाखल एक उदाहरण समता नगरमधील पोलीस स्टेशनचे देतो. या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अनेक झोपडपट्ट्या येतात. दामु नगर झोपडपट्टीमधील आगीची आपण गेल्या अधिवेशनात चर्चा केली होती. दामू नगर येथिल पोलीस स्टेशनची क्षमता वाढविण्याकरिता बऱ्याच वर्षापासून मागणी केली जात आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतुल भातखळकर...

मुख्यमंत्री महोदयांनी गेल्या अधिवेशनात यावर सकारात्मक उत्तर दिले होते की, यावर कार्यवाही चालू आहे. या समता नगर पोलीस स्टेशनमध्ये अधिकचा कर्मचारी वर्ग देण्याची मागणी लवकरात लवकर पूर्ण करावी.

अध्यक्ष महाराज, पोलीस दलामध्ये महिलांचे प्रमाण अतिशय कमी आहे. देशातील अनेक राज्यांनी असा निर्णय घेतला की, पोलीस दलामध्ये महिलांचे प्रमाण 33 टक्के असले पाहिजे. आपल्या राज्यामध्ये माझ्या माहितीनुसार महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे एकूण 12.62 टक्के प्रमाण आहे. म्हणून पोलीस दलामध्ये महिलांचे प्रमाण वाढविण्याची आवश्यकता आहे. आजच्या या चर्चेच्या माध्यमातून मी आपले एका अत्यंत महत्वाच्या गोष्टींकडे लक्ष वेधू इच्छितो. गेल्या सरकारच्या कालावधीत वर्तमानपत्रातून इशरत जहॉ या प्रकरणाविषयी आपण बरेच काही वाचले आहे. इशरत जहॉ ही तीन पाकिस्तानी अतिरेक्यांच्या बरोबर अहमदाबाद येथे गेली होती. यावर खूप चर्चा झाली. तत्कालीन गृह सचिवांनी जाहिरपणे सांगितले की, इशरत जहॉ ही लष्कर-ए-तोयबाची एजेंट होती. त्यावेळेस एनएसएचे प्रमुख श्री.नारायणन होते. त्यानंतर ते एका प्रांताचे गव्हर्नर होते. त्यांनी सुध्दा हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर दोन चार महिन्यांनी जाहिरपणे सांगितले होते की, इशरत जहॉ ही लष्कर-ए-तोयबाची एक एजेंट म्हणून काम करीत होती, असे देशाचे एनएसए यांची माहिती होती. .. (अडथळा)... आपण कृपया बसून बोलू नका. तिच्या नावाने ॲम्ब्यूलन्स चालविण्याचे काम आपण करीत आहात, त्यावर बंदी घालण्याची मागणी मी करणार आहे....(अडथळा)... आपण पुढे काय उद्योग केले ते बघा. या इशरत जहॉचा वापर करुन देशाच्या सिक्युटिशी कॉम्परमाईज करुन, त्यावेळचे गुजरात राज्याचे मुख्यमंत्री यांना त्यामध्ये गुंतविण्याचा प्रयत्न केला गेला, अशा प्रकारचे आरोप माजी गृह सचिवांनी केलेले आहे. मला सांगण्यास अत्यंत वाईट वाटते की, एक मिनी इशरत जहॉ प्रकरण आपल्या राज्यात सुध्दा सन 2008 ते 2014 या कालावधीत घडले. सन 2006 ते 2008 मध्ये मालेगाव येथे बॉम्बस्फोट झाला, त्याचे राजकारण खूप झाले. त्याचेही खूप खोटे नाटे आरोप केले गेले. देशाच्या संसदेमध्ये प्रथमच "हिंदू दहशतवाद" अशा प्रकारचा एक शब्दप्रयोग वापरला गेला. त्यावेळच्या गृह मंत्र्यांनी अशा प्रकारची घोषणा केली होती की, भारतीय जनता पक्ष तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या शिबिरामध्ये दहशतवादाचे प्रशिक्षण दिले जाते. त्यानंतर त्यांनी माफी मागितली. परंतु अशा प्रकारचे विधान

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतुल भातखळकर...

त्यावेळच्या गृहमंत्र्यांनी केले. सन 2008 मध्ये मालेगावमध्ये जो बॉम्बस्फोट घडला, त्या प्रकरणामध्येही आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न केला गेला. या देशामधील हिंदुत्ववादी संघटना या बॉम्बस्फोटाच्या मागे आहेत, अशा प्रकारचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला, त्याचे पुरावे आज माझ्या हातामध्ये आहेत. सन 2008 मध्ये बॉम्बस्फोटाच्या केसमध्ये मध्यप्रदेश राज्यामधील कालसंग्राम या आरोपीचा मुंबई एटीएसचे पोलीस शोध घेत होते. त्या आरोपिला पकडण्याच्या नावाखाली मुंबईचे एटीएसचे पोलीस अधिकारी इंदूरला पोहोचले. त्या आरोपिच्या घरी राहणारा साधा इलेक्ट्रिशियन ज्याचा या प्रकरणाशी काहीएक संबंध नव्हता.

यानंतर R-1 ...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अतुल भातखळकर ...

त्या इलेक्ट्रिशियनला मुंबई एटीएसच्या काही अधिकाऱ्यांनी इंदूरच्या पोलीस स्टेशन मधील अधिकाऱ्यांना सांगून उचलले. मी याच्या रिर्पोट बाबत नंतर सांगणार आहे. सन 2008 मध्ये या पाटीदाराला उचलल्यानंतर त्याला मुंबईला आणण्यात आले. 6 दिवस तो एटीएसच्या कस्टडीमध्ये होता असे सांगितले गेले. परंतु, आजतागायत या पाटीदाराचा कुठलाही पत्ता महाराष्ट्र राज्याला, मध्य प्रदेश सरकारला किंवा त्याच्या कुटुंबीयांनाही लागलेला नाही. त्याचे कुटुंबीय मध्य प्रदेश उच्च न्यायालयात गेले. इंदूरच्या उच्च न्यायालयाच्या बेंचमध्ये त्यांनी मध्यप्रदेश Habeaus corpus कॉर्पसचा अर्ज दाखल केला. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने सीबीआयला या प्रकरणाची इन्क्वायरी करायला दिली. सीबीआयने मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या देखरेखी या सर्व प्रकरणाची इन्क्वायरी केली. सीबीआयने या प्रकरणाचा पूर्ण अहवाल मध्य प्रदेश उच्च न्यायालयाकडे सादर केला. त्या अहवालात सीबीआयने असे म्हटले की, या पाटीदाराला मुंबई एटीएसच्या काही अधिकाऱ्यांनी जे उचलले, ते पूर्णपणे रॉंगफूल कन्फाईनमेंटमध्ये उचलले. निषेधाची बाब अशी आहे की, उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली झालेला तपास, सीबीआयने केलेला तपास आणि सीबीआयने त्यावेळेच्या राज्य सरकारकडे अशी मागणी केली की, त्यावेळेचे जे एटीएसचे अधिकारी होते त्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. कारण या माणसाचा पत्ता लागत नाही. Habeaus corpus च्या अर्जामध्ये त्या माणसाला समोर हजर करण्याची आवश्यकता असते हा नियम आहे. कुठलेही पुरावे नव्हते परंतु, त्यावेळेच्या सरकारने ही चौकशी करण्यास आणि त्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यास परवानगी नाकारली. याचे एकमेव कारण हे होते की, त्यावेळेच्या अधिकाऱ्यांनी त्या पाटीदाराला खूप मारलेले आहे. त्याच्याकडे कन्फेशन मागितले जात होते की, तू ज्या माणसाच्या भाड्याच्या घरात राहत आहेस, तो त्या बॉम्बब्लास्टमध्ये ॲक्यूज आहे. त्याच्या मिटिंग झाल्या अशाप्रकारचे कन्फेशन तू दिले पाहिजेस, अशाप्रकारचा दबाव त्या पाटीदारावर आणण्याचा प्रयत्न केला गेला. या दबावामुळे तो पाटीदार मेला, अशाप्रकारचा संशय त्याच्या घरच्यांना आहे.

हा सीबीआयचा रिपोर्ट आहे. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली ही चौकशी केलेली आहे. Habeaus corpus च्या अर्जावरची ही चौकशी आहे. या रिपोर्ट मधील केवळ 1-2 गोष्टी मी तुम्हाला वाचून दाखवितो. अख्खा रिपोर्ट मी सदनापुढे सादर करीन, पटलावर ठेवीन.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अतुल भातखळकर ....

त्यामध्ये असे नमूद केले आहे की, "On 12-11-2008, Shri Deelip Patidar was examined by Police Inspector Rajendra Sopanrao Ghule and he recorded his further statement which was reflected in the station diary of ATS Kala Chowki vide entry no.... dated 2008" या सगळया 6 दिवसाच्या कालावधीत त्याच्या घरच्यांशी संपर्क झाला हे सर्व सीबीआय ने प्रुव्ह केले आहे. यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "Shri Deelip Patidar on his mobile no..... during conversation which lasted for about 1 minute, Shri Deelip Patidar told him that he was in the custody of ATS Mumbai. This call has been corroborated with CDR records of Mobile no..... and statement of Shri Ramswarup Patidar." त्याच्या भावाबरोबर. त्यांनी पुढच्या स्टेटमेंटमध्ये म्हटले आहे की, साहेब मेरे पर सरकार की गवाह बनने का प्रयास चल रहा है. Thereafter the phone disconnected. The statement of Shri Devisingh Patidar and CDR of Mobile no..... has corroborated this fact." सीबीआयने पुढे आपल्या रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, "It clearly shows that the statement of Shri Deelip Patidar under section 164 of the Criminal Procedure Code was required by ATS which could disclose.... or meeting of accused person which absconding accused shri Ram Kalsangram." मी यातले अनेक पुरावे देऊ शकतो. एक मोठा पुरावा तयार केला. "Investigation has disclosed that, " म्हणजे सीबीआयने केलेले इन्व्हेस्टिगेशन, "Investigation has disclosed that P.I. Rajendra Sopan Ghule alias Rajan Ghule allowed Shri Deelip Patidar to go on each occasion from 11-11-2008 to 13-11-2008 but deliberately no address of his stay was recorded by Police Station. " त्याला येथे चौकशीला आणले 4-4 दिवस ठेवले आणि रेकॉर्ड तयार केला गेला की, त्याला आम्ही घरी त्याच्या मित्राकडे जाऊ देतोय. त्याचा मित्र कोण त्याचा पत्ता नाही, त्याचा काही फोन नंबर नाही. पुढे सीबीआयने आपल्या चौकशीत म्हटले आहे की, "Patidar was being examined by Rajendra Sopanrao Ghule by keeping him under wrongful confinement at other place secretly to



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अतुल भातखळकर ....

extort confession from him in that case." पाटीदारचा गुन्हा एवढाच होता की, त्याने पोलिसांच्या दबावाला बळी पडण्यास नकार दिला आणि त्याने हे कन्फेशन दिले नाही की, सन 2008 च्या मालेगाव बॉम्बस्फोटमध्ये काही हिंदूत्ववादी लोकांचा हात आहे. त्याने अशाप्रकारचे कन्फेशन देण्यास नकार दिला, त्यामुळे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

अध्यक्ष महोदय, दुर्दैवाची आणि संतापाची बाब पुढची आहे. सीबाआयने त्यावेळी राज्य सरकारकडे वारंवार अर्ज केला की, आम्हाला या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यास परमिशन द्यावी. परंतु, त्यावेळेच्या राज्य सरकारचे चार ओळींचे पत्र पाठवून सीबीआयच्या मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली तयार केलेल्या रिपोर्टनंतर या पोलीस अधिकाऱ्यांच्या चौकशीला नकार दिला. नकार देण्याचे कारण काय आहे, पोलीस दलाचे राजकारण यांनी कुठच्या स्तरावर नेऊन ठेवले होते हे सांगावयाचे झाले तर, त्या रिपोर्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, "There are no other incriminating circumstances against two police officer from the entire enquiry conducted by CBI." म्हणजे सीबीआयच्या चौकशीमध्ये इन्क्रिमिनेटिंग डॉक्युमेंटस आहेत. परंतु, अजून कोणते नाहीत त्यामुळे आम्ही यांची चौकशी करण्यास परमिशन देत नाही.

अध्यक्ष महोदय, माझा आरोप आहे की, सर्व कालखंडामध्ये राजकारण झाले. खून यांच्या कालखंडात झाले, हत्या यांच्या कालखंडात झाल्या. परंतु, त्याचा निशाणा आमच्यावर साधण्याचा प्रयत्न केला. हे लोक आता सुप्रीम कोर्टात गेले आहेत, याकरिता आपल्या माध्यमातून माझी मुख्यमंत्री महोदयांना एवढीच विनंती आहे की, आपण या चौकशीची माहिती द्यावी. त्याच बरोबर यात केवळ पोलीस अधिकाऱ्यांचा बळी देऊन चालणार नाही. या पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी करण्यास परवानगी देता कामा नये, अशाप्रकारचा राजकीय दबाव त्यावेळी कोणी आणला होता, त्यांचीपण चौकशी करण्याची आवश्यकता आहे. देशाच्या, राज्याच्या सुरक्षेशी कॉम्प्रमाईज करुन स्वत:ची राजकीय पोळी भाजण्याचा जो प्रयत्न केला गेला होता, त्याचा सुध्दा पर्दाफाश करण्याची आवश्यकता आहे, ही मागणी करुन मी माझे दोन शब्द समाप्त करतो.

...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील बोलतील. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याकडे 5 नावे प्राप्त झाली आहेत व 38 मिनिटे इतका वेळ आहे, त्यामुळे आपण वेळ वाटून घ्यावा.

श्री. जयंत पाटील (इस्लामपूर) : अध्यक्ष महोदय, मी थोडक्यात बोलतो, जास्त बोलत नाही. आता जे आठवणार नाही ते नंतर पटलावर ठेवण्याची मला परवानगी असावी.

अध्यक्ष महोदय, सामान्य प्रशासन विभागाचा विषय गेल्या दोन दिवसांपासून फार मोठ्या प्रमाणात चर्चिला जात आहे. मंत्रालयातील उप सचिवांच्या बाबतीत काय चर्चा सुरु आहे, याचा पुन्हा उल्लेख करुन मी आपला वेळ घेणार नाही.

अध्यक्ष महोदय, या विभागामार्फत सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना सरकारी निवासस्थानांचे वाटप केले जाते. क्लार्क, सहाय्यक वर्गातील कर्मचारी अशी यासाठी फार मोठी प्रतिक्षा यादी आहे. 50 टक्के कर्मचाऱ्यांना जागा नाही म्हणून शेवटी ते मुंबईच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करतात. 5-5, 7-7 वर्षे कर्मचाऱ्यांना घरे मिळत नाहीत.

अध्यक्ष महोदय, एका बाजूला अशी प्रतिक्षा यादी वाढत असताना घाटकोपर येथे जवळपास 1100 हक्काची सरकारी निवासस्थाने उपलब्ध होणार होती, ती मागील एक वर्षापासून महानगरपालिका व संबंधित विकासक यांच्या वादामुळे उपलब्ध होऊ शकली नाहीत. 14 मजल्यांना मंजुरी घेऊन त्या विकासकाने 21 मजल्यांचे बांधकाम केले. आता 14 च्या वरचे मजले पाडायचे की, त्यांना स्टॅबिलिटी आहे, याबाबतचा निर्णय घ्यावा, विकासकांना दंड करा, आपल्याला वरचे सर्व मजले मिळाले असे गृहीत धरा, काही करा परंतु, सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या निवासस्थानाकरिता मुंबई महानगरपालिकेने लवकर ओ.सी. देणे महत्त्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास व सामान्य प्रशासन हे दोन्ही विभाग मुख्यमंत्री महोदयांकडे आहेत. त्यांनी थोडासा वेळ दिला तर हा प्रश्न सुटेल. त्यांची सर्वात मोठी अडचण हीच आहे की, महानगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात आहे. त्यामुळे त्यांना बोलावूनच आपल्याला यातून मार्ग काढावा लागेल असे दिसत आहे. मला खात्री आहे की, आयुक्तांना आपण बोलवाल. त्यांच्यामार्फत शिवसेनेला योग्य ती दिशा दाखविण्याचे जे कार्य आपण गेले काही महिने करीत आहात, ते पुढे कायम करुन मुख्यमंत्री महोदय हा प्रश्न नक्की सोडवतील असे मला वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

S-1/....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याची बदली मुंबईत झाल्यास त्यांच्यासाठी एखादे हॉस्टेल उघडावे, अशी त्यांची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्रालयात 5,527 मंजूर पदांपैकी 1,117 पदे रिक्त आहेत. जवळपास 20 टक्के रिक्त पदे आहेत. आपण सरकारी कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन विचारले तर ते सांगतील की, आम्हाला कामाचा खूप ताण आहे. ही 20 टक्के रिक्त पदे भरण्याचे काम सरकारने केले पाहीजे.

अध्यक्ष महोदय, जुलै 2015 मध्ये पाणी पुरवठा विभागातील कै. नंदु तडवी नावाच्या अवर सचिवाचे अशाच प्रकारच्या ताण तणावामुळे निधन झाले होते. त्यांच्या कुटुंबाला मदत करण्याची गरज होती. परंतु सरकारी कर्मचाऱ्यांकडे सरकार फारसे लक्ष देत नसल्यामुळे त्यांच्या प्रश्नांकडे आणि या कुटुंबाला मदत देण्याच्या भावनेकडे आपले दुर्लक्ष झाले असेल.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांचे कार्यालय असेल किंवा अन्य मंत्री महोदयांची कार्यालये असतील. तेथे आपल्याला कर्मचारी घ्यायचे असतील तर रितसर रेग्युलर कर्मचारी घ्यावेत. परंतु लोन बेसीसवर किती कर्मचारी घेतले आहेत. मुख्यमंत्री महोदय आपण आपल्याच कार्यालयातील संख्या बघितली तर लोन बेसिसवर एवढे कर्मचारी आहेत की, त्यांना कार्यालयात बसण्यासाठी जागा कमी पडत आहे. आपल्या कार्यालयात आम्ही फारसे आलेलो नाही. परंतु आपण थोडासा फेरफटका मारला तर कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी जागा अपुरी असल्याचे दिसून येईल. माननीय मुख्यमंत्र्यांचे कार्यालय सक्षम असले पाहीजे, याबद्दल आमचा आक्षेप नाही. पण घेतलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची निदान बसण्याची चांगली व्यवस्था असावी. ही मागणी माझी नसून त्यांची आहे. काही लोकांनी मला भेटून सांगितले की, आपल्या भाषणामध्ये हा मुद्दा घालावा. म्हणूनच मी या बाबीचा उल्लेख करीत आहे. अन्यथा माझा आपल्या कार्यालयाबाबत फारसा आक्षेप नाही.

अध्यक्ष महोदय, आता आयएएस अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. बऱ्याच अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. मेक इन इंडियासाठी देशात कौशल्य विकास हे खाते सर्वात महत्वाचे आहे. कौशल्य विकासाचे एवढे महत्त्व आहे की, त्यांचे नाव घ्यायचे नाही, असे मघाशी ठरलेले आहे. याबाबत मुख्यमंत्री महोदयांना माहीत आहे की, नाही हे मला माहीत नाही.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी साहेबांचे सभागृहामध्ये नाव घेतले तर चालत नाही. वेगळे दिवस आलेले आहेत. त्यांचेच अच्छे दीन कमी व्हायला लागलेले आहे, असे वाटते. त्यामुळे मला त्यांची बाजू घेण्याचे काम या बाजूने करावे लागत आहे. देशाचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्रजी मोदी यांनी कौशल्य विकासात मोठा रस घेतलेला आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी देखील यामध्ये फार मोठा इंटरेस्ट घेऊन कौशल्य विकासाला जास्त महत्त्व दिले. आपण एखादा जोर हातात घेतला, मनात एखादा प्रोजेक्ट आला, एखादे कार्य हातात घेण्याचे ठरले की, त्या कार्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींची काळजी स्वतः प्रमुखाने घेणे आवश्यक आहे. यामध्ये अनुभव काय, कौशल्य विकासाचे श्री. संधु हे सचिव होते. त्यांची सहकार खात्यामध्ये बदली केली. सुरुवातीला ते कौशल्य विकासात रमत नव्हते, काही दिवसांनी त्यांनी त्यामध्ये इंटरेस्ट घेतला. कसे प्लॅनिंग करायचे यासंदर्भात ते बघायला लागले. परंतु त्यांची सहकार खात्यामध्ये बदली करण्यात आली. आता माननीय सहकार मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकार खात्याचे काम चालू आहे. सन्मानीय सदस्य ॲड. आशिष शेलार साहेब कौशल्य विकास हा कार्यक्रम माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेबांचा प्रमुख कार्यक्रम आहे. त्या कौशल्य विकासाला आता सरकारने अडगळीत टाकले. त्या सहकार सचिवांकडे याचा ॲडीशनल भार दिलेला आहे. ॲडीशनल भार म्हणजे, निग्लीजन्स. म्हणजे प्रथम सहकार खात्याचे काम बघायचे आणि जमले तर, जाता जाता अर्धा, पाऊन तास हे काम बघायचे किंवा कधी माननीय मुख्यमंत्र्यांनी मीटींग बोलविली तर मिटींग करुन यायचे. यापेक्षा ॲडीशनल बाबीला माझ्या दृष्टीने फारसा अर्थ नाही.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारकडून आपल्याला आयएएस अधिकाऱ्यांची संख्या कमी येत असेल. सरळ सेवा भरती आणि पदोन्नतीचे सहासष्ठ, तेहतीस प्रमाण असते. सद्या पदोन्नतीमध्ये 85 टक्के महसूल अधिकारी आणि 15 टक्के इतर विभागातील अधिकारी असे प्रमाण आहे. आता हे बदलून सरळ सेवा आणि पदोन्नतीचे प्रमाण जर केंद्राकडून आयएएस अधिकारी येत नसतील तर पन्नास, पन्नास टक्के करावे. पन्नास टक्क्यामध्ये राज्यातील सर्व विभागातील अधिकाऱ्यांना त्यांच्या संवर्ग संख्येच्या प्रमाणात संधी द्यावी. असे केल्यास राज्याच्या प्रश्नांची आणि विविध भागात

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....
काम केल्याचा अनुभव असणाऱ्या आयएएस अधिकाऱ्यांची संख्या वाढण्यात देखील नक्की फायदा होईल, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, सामान्य प्रशासन हे फार महत्त्वाचे खाते आहे. हे खाते नेहमीच मुख्यमंत्र्यांकडे राहिलेले आहे. हे पूर्वीच्या इतिहास पाहिला तर दिसून येईल. त्यामुळे या विभागाला थोडीशी चांगली चालना देण्याची व संगणकीकरण करण्याची आवश्यकता आहे. फाईल्स सामान्य प्रशासनामध्ये कशा येणार नाहीत आणि ऑटोमॅटीक म्हणजे सर्व आमदार महोदयांना अनुभव आहे की, एखाद्या खात्यात नवीन पद भरायचे असेल किंवा पदोन्नतीची फाईल असेल तर बिंदु नामावली प्रमाणे सद्याची अवस्था काय आहे, हे काढण्यासाठी सहा ते आठ वर्षे, दीड, दीड वर्ष निघून जाते. माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण त्यात बदल करावा. या रोश्टर पद्धती फॉर्म्युल्या प्रमाणे असतात. मी हा प्रयत्न केलेला होता. टाटा कन्सलटंसी सर्व्हीसेसला बोलावून ही पद्धत सिस्टीमाईज करणे आणि फाईल वर्क न करता ऑटोमॅटीकली चार माणसे कमी झाली, दोन माणसे निवृत्त झाली तर लगेच रोश्टर पद्धतीने बॅकलॉग निघाला पाहीजे आणि त्याप्रमाणे प्रमोशन आणि भरती झाली पाहीजे. त्या फाईलवर केवळ चढवण करण्यात आपले सामान्य प्रशासन विभाग फार काळ घेते. आपल्या प्रशासनाच्या काळात हा दुरुस्तीचा मुद्दा आपण लक्षात घेतल्यास फार मोठ्या प्रमाणात राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना आपला जीव अधांतरीत ठेवून काम करण्याची बाब कमी होईल.

अध्यक्ष महोदय, सर्वांसाठी घरे ही सरकारने घोषणा केलेली आहे. राज्य सरकारने 2022 पर्यंत सर्वांसाठी घरे हे धोरण स्वीकारलेले आहे. या बाबतीत 2019 हे वर्षे नाही. पुढील सहा वर्षामध्ये प्रति वर्षे किती घरे दिली जाणार आहे. 2022 पर्यंत सर्वांसाठी घरे अशी घोषणा केली असल्यामुळे आपण म्हाडा, सिडको, एमएमआरडीए किती घरे बांधणार याबाबत काहीतरी जबाबदारी निश्चित केली असेल. मागेल त्याला शेततळे देणार आहात, तसेच सर्वांसाठी घरे, ही घोषणा त्याच मुडमध्ये केली असेल तर आमचे काही ऑब्जेक्शन नाही. हा गुणात्मक बदल झालेला आहे की, 2019 ऐवजी 2022 पर्यंत सर्वांसाठी घरे देण्याची घोषणा करण्यात आली. ठीक आहे. आपण 2019 पर्यंत किती घरे बांधणार आहात, याची आजच्या उत्तराच्या भाषणामध्ये आकडेवारी

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

जाहीर केल्यास आम्हाला 2019 च्या निवडणुकीमध्ये आपण बांधलेली घरे, म्हणजेच आपण चांगले काम केले असेल तर त्यावेळी आम्हाला कौतुक करण्याची संधी मिळेल.

अध्यक्ष महोदय, आपण लॅण्ड बँक निर्माण करणार असे म्हटले होते. यासंदर्भात दोन वर्षात म्हाडाने काय कार्यवाही केली. किती जमीन ताब्यात आली. नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर करण्याचे ठरले होते. ते धोरण आपण जाहीर करु शकलो नाही. मुंबईतील मोडकळीस आलेल्या जमिनी पुनर्विकासासाठी आपण अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकापोटी देणार आणि सदनिका म्हाडाला हस्तांतरित करण्याची अट या पूर्वी करण्यात आली होती. त्याचा प्रमुख उद्देश संक्रमण शिबिरातील रहिवाशांना घरे उपलब्ध करुन देणे हा होता. हौसिंग स्टॉक निर्माण करणे हा होता. आता सरकारने त्या धोरणाला तिलांजली दिली आणि सदनिकांच्या ऐवजी प्रिमियम स्वीकारण्याचे धोरण आपण स्वीकारलेले आहे. यासंदर्भात एमएचए कायद्याच्या अंतर्गत अभिप्रेत असलेला रेग्युलेटर तत्काळ स्थापन करावा म्हणून मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी केली. त्यांनी सांगितले की, तीन महिन्यात रेग्युलेटर नेमण्यात येईल. या ठिकाणी माननीय मंत्री श्री. प्रकाश महेता साहेब आहेत. त्यांनी सांगितले की, एक महिन्यात नेमण्यात येईल...(अडथळा)...ठीक आहे. तीन महिन्यात नव्हेतर सहा महिन्यात केले तरी चांगली बाब आहे, त्यास माझी हरकत नाही. मी ऑब्जेक्शन घेण्यासाठी उभाच नाही. मी केवळ सरकारला आठवणी करुन देत आहे की, आपण हे बोललेले आहात, त्यामुळे ते लवकर करावे. कारण जनता आपल्या सर्व आश्वासनांकडे फार उत्सुकतेने बघत आहे.

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण अधिनियमांतर्गत असलेल्या डीम्ड कन्व्हेन्सची तरतूद आता केंद्र शासनाच्या रिअल इस्टेट विधेयकातून काढून टाकण्यात आलेली आहे. महाराष्ट्राच्या डीम्ड कन्व्हेन्सच्या धोरणामुळे राज्यातील 45 हजार गृहनिर्माण संस्थेतील सभासदांना त्यांच्या सदनिकांना असलेल्या जमिनी या विकासकाकडून तसेच जमीन मालकाकडून सोसायटीच्या नावे अभिहस्तांतर करुन घेण्याचा फार मोठा अधिकार हा आमच्या आघाडीच्या शासनाने या विधेयकाद्वारे सर्वसामान्य जनतेला मिळवून दिलेला होता. एवढेच नव्हेतर विकासकाच्या फायद्यासाठी केंद्राच्या अधिनियमातून ही तरतूद आता वगळून त्या सोबतची ही तरतूद असलेला महाराष्ट्राचा कायदा देखील

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

केंद्र शासनाने रद्द केलेला आहे. केंद्र शासनाचे हे धोरण राज्यातील 45 हजार सोसायट्यांमध्ये रहाणाऱ्या सदनिका धारकांच्या हिताविरुद्ध आणि तेथील विकासकांच्या हितासाठी स्वीकारण्यात आलेल आहे, असे आम्हाला आणि महाराष्ट्रातील जनतेला वाटत आहे.

...T/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

सर्वसामान्यांच्या हिताचे रक्षण करण्याची तरतूद कायम ठेवण्यचा प्रयत्न करणे, हे या राज्य व केंद्र सरकारला कसे आवश्यक वाटले नाही, याबाबत आम्हाला शंका आहे. राज्याच्या मूळ कायद्यातील सर्व तरतूदी बदलून बिल्डर व विकासकांना अनुकूल करुन त्या बदलण्याचा प्रयत्न होत आहे. सरकारच्या घोषणा मोठ्या आहेत परंतु कायद्यातील दुरुस्त्या बिल्डर व विकासकांना सोयीच्या आहेत की काय, अशी शंका हळूहळू निर्माण होत आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील ताडदेव येथील एम.पी.मील कंम्पाऊंड मधील पोलिसांच्या 9,500 स्क्वेअर मीटर मालकीच्या भूखंडापोटी 3,025 चौ.मी. बांधीव क्षेत्र हस्तांतरीत करण्याचे एस.आर.ए. व एस.डी.कॉर्पोरेशनच्या विकासकांनी प्रस्तावित केले आहे. अतिरिक्त महासंचालक श्री.अरुण पटनाईक व काही लोकांनी वेळोवेळी पोलीस हाऊसिंग कॉर्पोरेशनच्यावतीने पोलीस आयुक्त, मुंबई यांना पत्र लिहून यासर्व प्रकरणाची चौकशी करण्याची विनंती केली आहे. आजच्या नियमावलीनुसार सदर ठिकाणी पोलिसांसाठी 550 घरे उपलब्ध होत असताना केवळ 67 घरे देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. म्हणून अतिरिक्त पोलीस महासंचालकांनी दिनांक 15 मे, 2015 रोजी पत्राद्वारे केलेल्या मागणीप्रमाणे तत्काळ चौकशी करण्यात यावी. ज्या पोलिसांना सदनिका मिळणार आहेत त्यांच्याकरिता 500 सदनिका देण्याचा प्रयत्न सरकारने करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारच्या अनेक प्रकल्पापैकी मेट्रो-3 हा एक प्रकल्प आहे. महानगरपालिकेचे 17 भूखंड कायमस्वरुपी रेल्वे प्रकल्पाकरिता देण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये चर्चा झाली. या प्रकल्पासाठी सदरहू 17 भूखंडावरील हुतात्मा चौक या भागातील व गिरगाव येथील अनेक लोक बेघर होतील, अशी शंका आहे. तसेच, आरे कॉलनीतील कारशेड अंतर्गत झाडाच्या कत्तली करण्यासाठी आक्षेप आहे. मेट्रो-3 करिता 17 भूखंड देण्याचा प्रस्ताव समितीच्या बैठकीमध्ये मागच्या वेळी मंजूरीसाठी आणला होता. त्यावेळी हे सर्व मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. त्या ठिकाणी शिवसेनेचा अधिकार आहे. या प्रश्नांची उकल न झाल्याने हा प्रस्ताव बाजूला ठेवण्याचा प्रयत्न होत आहे. माननीय मंत्री श्री.महेता यांना सांगू इच्छितो की याप्रकरणी मला अशी चिंता आहे की, आपल्याला पुढील काही काळात हे प्रकल्प पूर्ण

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

करावयाचे आहेत. मी प्रकल्प पूर्णत्वाचे साल पुन्हा पुन्हा सांगणार नाही. परंतु काही काळात हे सर्व प्रकल्प आपल्याला पूर्ण करावयाचे आहेत. कोस्टल रोडच्या विरोधात कोळी बांधव एकवटू लागले आहेत, त्यांच्या मनातील शंका दूर करण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, आपण अनेक वेळा घरांच्या संदर्भात चर्चा करतो. बिल्डरांना झोपडपट्टीतील नागरिकांच्या पर्यायी व्यवस्थेसाठी म्हाडाच्या इमारत दुरुस्ती पुनर्ररचना मंडळाने संक्रमण शिबीरे भाड्याने दिलेली आहेत. ही शिबीरे भाडे तत्वावर घेऊन 35 बिल्डरांनी 74 कोटी रुपये थकविले आहेत. त्यांच्यावर सरकारने काही कारवाई केली नाही. अधिकाऱ्यांना बिल्डर घाबरतात व बिल्डरांना अधिकारी घाबरतात, असे वेगळे वातावरण तयार होत आहे. शासनाचे 74 कोटी रुपये थकविणाऱ्या बिल्डरांची बैठक बोलविली असता 35 पैकी केवळ 15 बिल्डर बैठकीस येतात. उर्वरित बिल्डरना कॉन्फिडन्स आहे की, आपले चांगले संबंध आहेत, वशिला आहे, त्यामुळे बैठकीला जाण्याची गरज नाही. या माणसांची मानसिकता काय आहे, हे आपण पहावे.

अध्यक्ष महोदय, बीडीडी चाळी संदर्भातील प्रश्न आहे व त्याबाबत सरकारने घोषणा केली आहे. बीडीडी चाळीमध्ये पोलीसही राहतात त्यांच्या नावाने घरे करुन देऊ अशी घोषणा सरकारने केली आहे, त्यासंदर्भातील निर्णय कधी घेण्यात येणार ? घेण्यात आला असेल तर तो सभागृहाला सांगावा. याविषयी आम्हाला आनंद आहे. पोलिसांना घरे देण्याची घोषणा सरकारने सभागृहाच्या बाहेर केली ती त्यांच्या मालकीची कधी करणार, याबाबत सभागृहाला माहिती द्यावी. बीडीडी चाळीमधील 340 चौ.फुटाऐवजी 550-600 चौ.फुटांचे घर देण्यात यावे, अशी तेथील लोकांची मागणी आहे. अशी मागणी करताना अशी तुलना करतात की, एसआरए मधील लोकांना अमूक एवढ्या चौरस फुटाचे घर मिळते परंतु आम्ही अनेक वर्षापासून रितसर राहत आहोत. तरी देखील आम्हाला कमी क्षेत्रफळ देण्यात येत आहे. सरकारने बीडीडी चाळीतील सर्व प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. उत्तराच्या भाषणामध्ये याबाबत माहिती देण्यात येईल असा मला विश्वास आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्यांच्या कामाचे कंत्राट देण्यात आले असून त्याची चौकशी करावी, अशी भावना आयुक्त श्री.अजय मेहता यांची आहे. मला वाटते याप्रकरणी चौकशी सुरु असेल.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

अध्यक्ष महोदय, माननीय पर्यावरण मंत्री यांनी काल सभागृहात सांगितले की, आम्ही देवनार डम्पींग ग्राऊंड येथील आग पाहण्यासाठी गेलो. त्याबाबत आम्ही पोलिसांची चौकशी मागितली आहे. याप्रकरणी भ्रष्टाचार झाला आहे, अशी आमची शंका आहे. डम्पींग ग्राऊंडला आग लावण्याचे काम जाणीवपूर्वक होत आहे, असे श्री.रामदास भाई कदम यांचे म्हणणे आहे. ज्यावेळी राज्याचे मंत्री महोदय असे म्हणत असतील त्यावेळी याप्रकरणाची सखोल चौकशी केली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी ते मुख्यमंत्री असताना देवनार आगारच्या कॉन्ट्रॅक्ट देण्यासंदर्भात एसआयटी चौकशी करावी, असे सांगितले होते. सदरहू कॉन्ट्रॅक्ट कशा प्रकारे दिले, किती लोकांनी विड्रॉ केले, यासंदर्भात थोडीशी शंका आहे. पूर्वीच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या मनात जी शंका आली होती ती नवीन मुख्यमंत्री महोदयांच्या मनात असेल तर तसे त्यांनी जाहीर बोलणे आवश्यक आहे. मागील मुख्यमंत्र्यांच्या काळापासून ही चौकशीची प्रोसेस कन्टिन्यूअस सुरु असून चौकशीचा निष्कर्ष अद्याप बाहेर आलेला नाही.

अध्यक्ष महोदय, मी अलिकडील काळात बघतो की, देवनारचा विषय असो किंवा इतर कोणता विषय असो, मुख्यमंत्री महोदयांनी इकडच्या बाजूकडे पाहून जरा डोळे वटारले की इकडची बाजू पाक विड्रॉ होऊन जाते. मी त्यांना दोष देत नाही, कारण असे की परिस्थितीप्रमाणे माणसे बदलत असतात. परिस्थिती बदलेल तसा माणसांमध्ये बदल होत असतो. त्यामुळे हा त्यांच्या स्वभावातील बदल .... कुत्र्याचे ..... काहीही झाले तरी स्वभाव बदलत नाही. त्यामुळे मराठीमध्ये एक म्हण आहे "नळीमध्ये शेपूट घातले तरी ते बाहेर काढल्यानंतर तसेच असते". स्वभावाला औषध नसते. मी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करेन की त्यांनी या बाजूच्या स्वभावावर गुणात्मक व गुणकारी औषध शोधलेले आहे. हे औषध एवढे गुणकारी आहे की आमची तलवार म्यान झालेली आहे. महानगरपालिकेमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची कितीही चौकशी करा, देवनार आगाराचे कॉन्ट्रॅक्ट कसे दिले ? श्री.महेता साहेबांनी रस्त्याची चौकशी सुरु केली आहे, त्या चौकशीचा निष्कर्ष काढला पाहिजे. सरकार महाराष्ट्रातील उर्वरित चौकशीमध्ये फार गुंतलेले आहे. पण मुंबई महानगरपालिकेची चौकशी केली तर फार मोठे घबाड सापडेल, चौकशी यंत्रणेलाही भरपूर काम

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

मिळेल, अशी मला खात्री आहे. माझा मुंबई महानगरपालिकेवर आरोप नाही. यासंदर्भात तुमच्या मनात शंका आहेत. महानगरपालिका निवडणुकीपूर्वी सर्व शंका सिध्द करण्याची जबाबदारी नैतिकदृष्ट्या अप्रत्यक्षरित्या पक्ष नेतृत्वावर असते. जे बोलले ते खरे करुन दाखविल्याशिवाय .... "करुन दाखविले" अशी त्यांची घोषणा आहे.

अध्यक्ष महोदय, अनधिकृत बांधकामे मुंबई व मुंबईच्या बाहेर फोफावत आहेत. या राज्याचे श्री.मनोहर जोशी हे सन 1995 साली मुख्यमंत्री होते. वॉर्ड आफिसरवर अनधिकृत बांकामाची जबाबदारी टाकू, असे त्यावेळी त्यांनी सांगितले होते. आमच्या काळात काय झाले, काय झाले नाही, या इतिहासाकडे न पाहता आता भविष्याकडे पहावे. आम्ही विरोधी बाकावरुन काही बोललो की सत्ताधारी इतिहासात जातात. इतिहासाकडून बोध घ्यावा व भविष्याकडे पहावे. परंतु आपण इतिहासाकडून बोध घेऊन इतिहासाकडेच पहात बसला आहात. त्यामुळे राज्यासमोरील प्रश्न वाढू लागले आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री यांनी कल्याण-डोंबिवली संदर्भात घोषणा केली होती. जनतेला त्रास होऊ नये. सन्माननीय सदस्य श्री.राम कदम यांना सांगू इच्छितो की, ज्या वॉर्ड ऑफिसरने अनधिकृत बांधकामाकडे डोळे झाक केली त्यांना शोधले पाहिजे, त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. असे मी नव्हे तर सन 1995 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी सांगितले होते. कुठे ही घर बांधा ते कायम होणार आहे, अशी महाराष्ट्रात भावना निर्माण होऊ नये. आम्ही सन 2002 पर्यंतच्या झोपडपट्ट्या कायम केल्या. आता महानगरपालिकेची निवडणूक लक्षात घेऊन तुम्ही सन 2017 पर्यंत किंवा 2019 पर्यंतच्या झोपड्या कायम करण्यासंबंधात चुकून घोषणा करु शकाल.

यानंतर U-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.......

आम्ही 2019 पर्यंत जे झोपड्या बांधतील त्या आम्ही नियमित करु. पण याचा काही ना काही निर्णय घ्या. यासंबंधी आपण 2000, 2002, 2011, 2015 पर्यंत की आमच्या सन्माननीय मंत्री श्री.प्रकाश महेता यांच्या मतदार संघातील जनतेने मागणी केली म्हणून जानेवारी 2016 पर्यंतच्या झोपड्यांसाठी निर्णय घेणार आहोत. याचा कुठे तरी चॉईस निश्चित झाला पाहिजे. आपण कोठपर्यंतच्या झोपड्यांना नियमित करणार याचे धोरण किंवा घोषणा आपल्या उत्तरातून व्हावी अशी अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो. धारावीच हौसिंग संदर्भात अनेकवेळा मोठमोठ्या घोषणा झाल्या आहेत. सन्माननीय अशोक चव्हाण साहेब असताना याचा प्रयत्न झाला. त्यानंतर माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांच्या काळातही याचा जोदार प्रयत्न झाला आहे. त्या प्रयत्नातून सेक्टर 5 मध्ये एक अतिशय चांगली इमारत उभी राहिली आहे. ही एक इमारत असली तरी सुरूवात झाली आहे आणि सुरूवात फार महत्वाची असते. माननीय मुख्यमंत्री महोदय हे आमचे चांगले मित्र आहे मी त्यांना हे सांगणे बरोबर नाही. पण मागचा इतिहास काढून..., सर्वांना माहिती आहे, सर्वांनी त्याबद्दलचा निष्कर्ष काढलेला आहे आणि आपण त्यातून पलिकडे गेलो आहोत. माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी अतिशय अवघड कामाची सुरूवात केली आहे त्यामुळे त्याला ऑब्जेक्शन कसे असणार. त्यांनी वेळ देऊन ही इमारत फार व्यवस्थित केली आहे. आता पुढच्या इमारती बांधणे फार अवघड नाही. म्हणून मला हे सांगावयाचे आहे की, जी एक इमारत झाली आहे, त्याचे बेनिफिशरी ठरविण्याचा निर्णय आपल्याला गेल्या 5-10 महिन्यामध्ये घेता आलेला नाही. आम्ही एक इमारत बांधली असताना त्यामध्ये कोण राहणार हे आपण अद्यापी ठरविलेले नाही. आपल्या बी.जी.शिर्के यांनी तेथे एक इमारत बांधली आहे आणि आणखी 2-3 इमारती बांधणार आहेत.

अध्यक्ष महोदय, आता कॅश क्रॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर आता डेव्हपमेंट करायचे, अशी काही तरी कल्पना आपण काढली आहे. तेथील कॉटेज इंडस्ट्रीचे काय होणार, कारण धारावी हे फक्त झोपडपट्टी नाही तर तेथे कॉटेज इंडस्ट्री आहे, लेदर इंडस्ट्री आहे, दुनियेत ज्या सर्व इंडस्ट्री असतील त्या सर्व प्रकारच्या इंडस्ट्री त्या ठिकाणी आहेत. त्यामुळे त्यांचे ॲकोमोडेशन आपल्या या नव्या योजनेमध्ये कसे होणार, हे जाहीर करण्याची गरज आहे. त्यामुळे मुंबईच्या विकासामध्ये जसा

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.......

बीडीडी चाळ विकास हा महत्वाचा आहे तसाच धारावीचा विकास हा देखील विषय तितकाच महत्वाचा आहे. सन्माननीय पर्यावरण मंत्री श्री. रामदास कदम यांनी मध्यंतरी मिठी नदीची पाहणी केली आणि त्यांनी त्या ठिकाणी त्यांच्या स्वभावानुसार व शिवसेना स्टाईलप्रमाणे सांगितले की, ज्यांनी ज्यांनी या ठिकाणी अनधिकृतपणे बांधकामे केली असतील आणि जे कोणी घाण किंवा सांडपाणी तेथे सोडत आहेत त्या सर्व कारखान्यांचा बंदोबस्त करु त्या ठिकाणी प्रदुषण करण्यास जे जबाबदार लोक आहेत त्यांना जरब बसेल असे त्यांनी विधान केले. परवा माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात उत्तर देताना सांगितले की, या मिठी नदीमध्ये आपण बोटिंगची व्यवस्था करु.

अध्यक्ष महोदय, मिठी नदीमध्ये सन्माननीय श्री. किरीट सोमैय्या यांना पाठविण्याचे षडयंत्र ज्यांनी रचले असेल त्यांची चौकशी केली पाहिजे. कारण यामधून सन्माननीय श्री. किरीट सोमैय्या यांच्या जीवाला धोका आहे असे त्यातून दिसते. कारण कोणीही त्या ठिकाणी गेले तर ती एवढी पोल्युटेड आहे की, त्या ठिकाणी पाठविण्याचे काम सन्माननीय मंत्री महेता साहेब आपल्या पक्षाच्या अंतर्गत स्पर्धेमुळे आपण करीत असाल तर हे योग्य नाही. सन्माननीय श्री. किरीट सोमैय्या यांना मागच्या निवडणुकीत पाडायचा प्रयत्न केला असला तरी ते कसेबसे निवडून आले आहेत. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण एकदा आम्हा सर्वांना घेऊन त्या मिठी नदीच्या काठावरुन चालून पाहू तर आपल्या लक्षात येईल की, त्या ठिकाणी किती मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचे प्रदुषण होत आहे, त्याचा या देशातील उत्तम नमुना म्हणजे मिठी नदी आहे. मी टीका करीत नाही, पण माझी विनंती आहे की, त्याचे शुध्दीकरण कसे करणार आहात, त्याचे परिणाम होणार नाहीत यासाठी काही सिस्टीमॅटीक ॲप्रोच करणार आहात काय, असा कार्यक्रम आधी केला पाहिजे. जर ती स्वच्छ झाली तर आपण त्या ठिकाणी बोटिंगला जाऊ. आपण मला बऱ्याच ठिकाणी नेणार असल्यामुळे वन मोअर हे एक ॲडीशन त्यात नवीन करा. पण हे स्वच्छ करण्यासाठी जे प्रदुषण करणारे घटक आहेत त्यांना जरब बसविण्यासाठी तातडीने काही पावले उचलावीत. आपण त्यासाठी एक स्कीम केलेली आहे. पण ही स्कीम करताना त्या ठिकाणी भिंती बांधावयाचा, असे जर केले तर आपले हजारो कोटी रुपये खर्च होतील पण ही नदी स्वच्छ होणार नाही. त्यामुळे ही नदी

3.....

श्री. जयंत पाटील.......

स्वच्छ होण्यासंबंधीची धोरणे आपण त्यात समाविष्ट करावीत आणि सन्माननीय पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांना योग्य ती माहिती, समज किंवा जे शब्द योग्य वाटतील त्याप्रमाणे सांगण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, दुसरा एक महत्वाचा प्रश्न आहे की, या मुंबई शहराच्या सुधारणेसाठी बॉम्बे पोर्ट ट्रस्ट या ठिकाणी केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी घोषणा केली की, तरंगते हॉटेल उभारणार. चांगली घोषणा आहे. त्यांच्या एवढा उत्साही माणूस या देशामध्ये दुसरा कोणीच नाही. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेबांनाही प्रॉब्लेम आहे की, हे फार उत्साही आहेत तर यांचे काय करायचे. तरंगत्या हॉटेलची त्यांनी घोषणा केली आहे. बॉम्बे पोर्ट ट्रस्ट बद्दल त्यांची फार वेगळी मते आहे. मुंबईचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी काही गोष्टी होऊ शकतात आणि ते करण्याची उमेद देखील त्यांना आहे. अशा स्वरुपाचे हॉटेल्स करणे किंवा त्यांनी सांगितले की, मुंबईत एकही ऑब्झर्व्हेटरी नाही. आता आपण उत्तराच्या भाषणात म्हणाल की, आपण 50 वर्षे होतात, त्यामुळे या काळात आपण एकही ऑब्झर्व्हेटरी केली नाही. असे नाही तर आता आपल्याला 18 महिने झाले आहेत. आपण यासाठी काही प्रयोजन केले आहे का, केंद्र सरकार यासाठी काही निधी देणार आहे काय, याची माहिती सभागृहाला होणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, आता तर आपण समुद्रमार्गे गाळ ट्रान्सपोर्ट होणार असे परवाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे. जेथे जेथे भरावाची गरज आहे त्या ठिकाणी समुद्रमार्गे करण्यात गाळाची वाहतू करण्यात येईल. या बाबतीत मला खात्री आहे की, इंजिनिअर्स आपल्याला योग्य तो सल्ला देतील. परंतु माझ्यासारख्या सदस्याला वाटते की, हे काम फार चांगल्या पध्दतीने आपल्या शहरामध्ये करण्याची गरज आहे. मुंबईचा चेहरा मोहरा बदलावा. यामध्ये दिल्लीची साथ असेल तर मुंबईचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी फार चांगले होईल. मला आठवते की, तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग साहेबांनी कै. विलासराव देशमुख साहेबांपासून पृथ्वीराज चव्हाण साहेबांपर्यंत शेकडो आणि हजारो कोटी रुपये या मुंबईसाठी दिले आहेत.

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.......

अध्यक्ष महोदय, साथीबद्दल सभागृहाचा मौल्यवान वेळ घेणे बरोबर नाही. या ठिकाणी मला एवढेच सांगावयाचे आहे की, या मुंबईचा चेहरा मोहरा फार मोठ्या प्रमाणात बदलण्याची गरज आहे. आता मी एक महत्वाचा मुद्दा मांडतो की, माननीय मुख्यमंत्र्यांचा हा दावा आहे की, 42 टक्क्यांपर्यंत कन्व्हीक्शनचा रेट गेलेला आहे. आपण ही माहिती लेखी उत्तरात दिलेली आहे आणि एका ठिकाणी आपण बोललेला देखील आहात. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, ट्राफिकमधील कन्व्हीक्शन किती, किरकोळ मुद्दे आहेत त्यामधील कन्व्हीक्शन किती, रेपमधले किती, मर्डरमधील किती, अटेम्प्ट टू मर्डरमधील किती, डकैती, लूट, चिटींग वगैरे याचे एकदा सभागृहाच्या पटलावर ठेवावे आणि याचे बायफरकेशन एकदा महाराष्ट्राला कळू द्यावे.

V-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..........

माझी माहिती अशी आहे की, वर्तमानपत्रातही आले की बलात्कार, विनयभंग यात 21 टक्क्यांपर्यंत वाढ झालेली आहे. क्राईम रेट वाढतो आहे असे आम्ही सांगत आहोत. नागपूर शहरामध्ये एका दिवसात 24 लोकांवर मोक्का लावावा लागला. एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांना मोक्का लावण्याची गरज भासायला लागलेली आहे. काल मी गणेश पांडेचा विषय काढला, आपण चिडला, रागवलात, पण मी काही तक्रार करीत नाही. हे गणेश पांडे कोण यांना अजूनही अटक झालेली नाही. मी काही तुमच्या पक्षाला दोष देत नाही. एवढा मोठा पक्ष झाल्यानंतर दोन चार जण असे निघाले म्हणून सर्वच तसे आहेत असे म्हणायला दिसायला बरे दिसत नाही आणि बोललो तर सगळेजण उभे राहतात.

अध्यक्ष महोदय सकाळी माननीय श्री.नरेंद्र मोदीसाहेबांचे नाव घेतले तर इथपर्यंत सर्वजण आले. त्यांनी सन 2012 मध्ये चांगले भाषण केले असे सांगत होतो तर सर्व चिडले. सर्व देशाने त्यांना मतदान केलेले आहे. देशाचे प्रधानमंत्री आहेत. आपल्या पक्षामध्ये गणेश पांडेंचा मोठा किस्सा आहे. मुख्यमंत्री महोदय त्याला लवकर अटक करा. टीव्ही बघितला तर ती पिडीत महिला म्हणते माझा देवेंद्र दादावर विश्वास आहे आणि पांडेही म्हणतात की, नार्को टेस्ट व्हावी. सदर महिलेचे पत्र माझ्याकडे आहे ते वाचणे बरोबर नाही. एखाद्या सामान्य माणसाला लाज वाटावी एवढे घृणास्पद वाक्ये या गणेश पांडेने वापरलेली आहेत. मराठी महिलेबद्दल अशी वाक्ये वापरणाऱ्या माणसाला अजूनही अटक झालेली नाही. सदर महिलेने आता एफआयआर दाखल केलेला आहे. चौकशी करणे, वेळ घालवणे, कशाला टाईमपास करीत आहात एकदा अटक करुन टाका त्याने तुमची प्रतिमा उजाळेल. पण त्याला अटक न केल्यामुळे जेवढे तास वाढत आहेत. तेवढी सामान्य माणसांची खात्री व्हायला लागलेली आहे की, आपले ते जवळचे कुणीतरी असावेत आणि त्यामुळे त्यांना अटक होत नाही. माझे तसे म्हणणे नाही, पण लोकांमध्ये तशी कुजबूज सुरु झालेली आहे. विरोधी पक्षाला मुख्यमंत्री महोदयांच्या कानावर घालायची दुसरी कोणती संधी नाही आहे.

अध्यक्ष महोदय, भारतीय युवा मोर्चाचे नागपूर शहराचे अध्यक्ष सुमित ठाकूर याने प्रा.म्हस्के यांना मारहाण केली, त्यांची गाडी जाळली, प्रा.म्हस्के यांना प्रोटेक्शन देण्याची पाळी सरकारवर

......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..........

आली. नंतर त्याला मोक्का लागला पण तो भारतीय जनता पक्षाचा छायेखाली काम करणारा एक माणूस आहे. या देशाला साधनसूचितेबद्दल आदर्श वागणूक देण्याबद्दल, चांगले विचार नागपूर शहरातून देशात दिले जातात असे म्हटले जाते. दिव्याखाली अंधार म्हणतात तसे नागपूरमध्ये हळूहळू व्हायला लागलेले आहे. रेशीम बागेच्या हाकेच्या अंतरावर माणसे अशी गुन्हे करायला लागली तर आपल्या प्रतिमेबद्दल आम्हाला चिंता आहे. शेवटी नेमणूक करताना एनओसी त्यांची लागते असे आम्ही ऐकत आहोत. त्यामुळे आपली चिंता घेऊन मी हे सर्व मुद्दे मांडीत आहे. याच्या पलीकडे मला दुसरा कोणता विषय मांडायचा नाही. फरग्युसन कॉलेजचा विषय पुन्हा पुन्हा काढून मी वेळ घेणार नाही.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील गृह विभागाने या सर्वच विषयात लक्ष घालून महाराष्ट्रातील जनमानस विस्कळीत होणार नाही. विकासाच्या मुद्दयावरुन लोकांचे लक्ष या सर्व भावनिक मुद्दयाकडे जाणार नाही आणि विकासाचा वेग जसा तुम्ही क्लेम करता की, 8 टक्क्यांपर्यंत गेलेला आहे. हा विकासाचा वेग वाढण्यासाठी सर्वात महत्वाचे जर काही असेल तर समाजाचे एकत्रित लक्ष विकासाकडे लागणे हे आहे. विकास जमला नाही की अशा बाहेरच्या छोट्या छोट्या गोष्टी घडतात. त्यामुळे लोकांचे लक्ष तिकडे जाते आणि माननीय मुख्यमंत्री विकासाचा कितीही प्रयत्न करीत असले तरी समाजमन हे दुसरीकडे लक्ष देते. म्हणून या मागणीवर मी सभागृहाला एवढेच सांगेन की, या मागण्यांना विरोध यासाठी आहे. अलीकडच्या काळात आलेले अनुभव फारसे बरोबर नाहीत. आम्ही जे मुद्दे मांडले त्या मुद्दयांचे समाधान झाले तर मी नक्की याठिकाणी मान्यता देईल.

अध्यक्ष महोदय, शेवटचा मुद्दा आहे की, मी याठिकाणी कपात सूचना मांडली. मी एक रुपयाचा कपात सूचना मांडलेली होती याठिकाणी 100 रुपयांची कपात सूचना आलेली आहे. माझी कपात सूचना अशी होती की, माननीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाला शासनाने अद्याप निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. त्यामुळे जनतेमध्ये पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दर्लक्ष, त्वरित निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता ही एक रुपयाची कपात सूचना मांडलेली होती. या कपात सूचनेची प्रशासकीय चौकशी

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..........

करा. एक रुपयाची कपात सूचना का मांडलेली होती तर माननीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक पूर्ण करण्याविषयी शासनाकडून विलंब होत आहे. यावर एक रुपयाची कपात सूचना म्हणजे हा फार गंभीर मुद्दा आहे. ही एक रुपयाची सूचना कुणी 100 रुपयाची केली याची माहिती प्रशासनाने, विधीमंडळ कार्यालयाने मला द्यावी. मी एक रुपया लिहिला, मला बोलावून सांगितले असते एक रुपयाचे 100 रुपये करा मी केले असते. पण मी एक रुपयाची दिली असताना 100 रुपयांची कोणी केली याची चौकशी झाली पाहिजे. अनेक स्मारके करायची आहेत. पण माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाला जास्त महत्व द्या. राज्य टिकवायचे असेल तर या स्मारकाशिवाय दुसऱ्या स्मारकाला महत्व देता येणार नाही. मी हितचिंतक म्हणूनच या सर्व सूचना करीत आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. शेवटी दोन शेर सुनवतो.

"सीने में जलन, आंखों में तूफान सा क्यूं है,
इस शहर में हर शख्स परेशान सा क्यूं है."

"दहशत में खून के मंजर नहीं देखे जाते,
हमसे नफरत के ये तेवर नहीं देखे जाते."

-----------

.......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वित्तीय पुनर्रचनेचा आराखडा अंतिम करणे

**मु.शी. :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वित्तीय पुनर्रचनेचा आराखडा अंतिम करणे संबंधी माननीय ऊर्जा मंत्र्यांचे निवेदन

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभा नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

............

W-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : अनुदानाकरिता मागण्या.

**मृ.शी.** : सन 2016-2017 च्या अनुदानाकरिता मागण्या :

(1) सामान्य प्रशासन विभाग

(2) गृह विभाग

(3) नगर विकास विभाग

(4) विधी व न्याय विभाग

(5) गृह निर्माण विभाग

(....... चर्चा पुढे सुरु )

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.शंभुराज देसाई, राष्ट्रवादी पक्षाला 38 मिनिटे होती. त्यांची तीन चार नावे फक्त आलेली आहेत. आपल्या पक्षाला तब्बल 29 मिनिटे आहेत. तब्बल 11 नावे गट नेत्याकडून आलेली आहेत. कृपया बोलत असताना याची जाणीव ठेवावी.

श्री.शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, भाषणास सुरुवात करण्यापूर्वी कोणत्या पक्षाला किती मिनिटे वेळ दिला होता, ते किती मिनिटे जादा बोलले ? ते सांगितले तर बरे होईल.

**तालिका सभाध्यक्ष** : आपल्याही पक्षाला तेवढा जास्त वेळ मिळेल. अजून 11 वक्त्यांना बोलावयाचे आहे. याची जाणीव ठेवावी.

श्री.शंभुराज देसाई : आमचे जेवढे वक्ते असतील त्याच्यामध्ये आम्ही नियोजन करु. पावने दोन तास चर्चा झाली. यामध्ये फक्त तीन वक्ते बोलले. या सभागृहामध्ये आल्यापासून सांगतो आहे की, पहिल्या एक, दोन वक्त्यांना एवढा वेळ देता, माझ्या पक्षाचा मी पहिला वक्ता आहे. मी पहिला वक्ता उभा राहताना आम्हाला तुम्ही सूचना केल्या. आपल्या सूचनांचा आदर बाळगतो. पण त्यांना जसा वाढीव वेळ दिला तसा इकडे वाढीव वेळ द्यावा.

**तालिका सभाध्यक्ष** : तुम्हाला वेळ मिळेल काळजी करु नका.

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई (पाटण) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग आणि गृहनिर्माण विभागावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी माझ्या पक्षाच्या वतीने मी या ठिकाणी उभा आहे. या अनुदानाच्या मागण्यांना पाठींबा देण्यासाठी मी आपल्या अनुमतीने माझे विचार व्यक्त करतो.

माननीय अध्यक्ष महोदय, मी दुसऱ्या टर्मला या सदनाचा सदस्य झालो, गेल्या 2004-2009 या पंचवार्षिकमध्ये या सभागृहाचा सदस्य होतो. विरोधी बाकावर त्यावेळी आम्ही बसायचो. आता मी पाहतो आहे की, आज शुक्रवार असल्यामुळे सदस्यांची उपस्थिती कमी आहे. गृह विभागाचे दोन्ही राज्यमंत्री येथे नाहीत. नगरविकास विभागाचे राज्यमंत्री येथे नाहीत. सभागृहात फक्त गृहनिर्माण विभागाचे राज्यमंत्री उपस्थित आहेत. आम्ही विचार मांडायचे त्याची नोंद घेण्यासाठी मंत्री महोदय नाहीत. आम्ही हया नोंदी बाबत सांगतो की, आम्हाला नेहमी मंत्री महोदय कागद दाखवतात.

**तालिका सभाध्यक्ष** : ही त्यांची सामूहीक जबाबदारी आहे.

श्री.शंभुराज देसाई : ही सामूहीक जबाबदारी आहे हे मान्य आहे. जसे ज्येष्ठ सदस्य सुरुवातीला बोलताना सगळे मंत्री महोदय हजर राहतात. सभागृहातील सन्माननीय सदस्य बोलत असताना असा मंत्र्यांकडून दुजाभाव होत असेल, मी सुध्दा सत्ताधारी घटक पक्षाचा सदस्य आहे, याबाबत आपण त्याची थोडीशी तरी दखल घ्यावी.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाच्या मागण्यांवर बोलताना मी सांगू इच्छितो की, गृह विभाग हा राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांकडे आहे. निश्चितपणाने गेली 16 महिने या राज्यामधील गृह विभागावर शिस्त आणण्याचे जे प्रयत्न मुख्यमंत्री महोदयांनी आणि त्यांच्या समवेत काम करणा-या दोन्ही राज्यमंत्र्यांनी सुरु केलेले आहे, ते निश्चितपणाने चांगले आहे. त्याचे कौतुक केले पाहिजे, प्रोत्साहन दिले पाहिजे या मताचा मी आहे. परंतु काही महत्वाचे निर्णय किंवा विषय या गृह विभागाच्या संदर्भामध्ये अनेक वेळा मांडून सुध्दा त्याची दखल, या गृह विभागाकडून घेतली गेलेली नाही, हे सुध्दा तेवढयाच तीव्रतेने सांगावे लागते आहे.

......3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई ......

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राला 2000 मेगावॅट वीज देणारे कोयनेचे पहिले धरण आहे. या धरणाकडे महाराष्ट्राची भाग्य लक्ष्मी म्हणून पाहिले जाते. माझ्या मतदार संघामध्ये ते कोयना धरण आहे. 105 टी.एम.सी. पाणीसाठा असणारे हे धरण आहे. गेल्या तीन चार वर्षापुर्वी देशामधल्या आणि राज्यामधल्या ज्या काही प्रमुख ठिकानांना अतिरेक्यांच्या पासून धोका आहे, या पध्दतीच्या वर्तमान पत्रातून बातम्या आल्या किंवा शासनाकडे जे इनपुट आले, त्याच्यामध्ये कोयना धरणाचा उल्लेख होता. कोयना धरणाला अतिरेक्यांपासून धोका संभवतो. त्यावेळी सुध्दा मी सभागृहामध्ये कोयना धरणाच्या सुरक्षिततेचा विषय मांडला. तेवढयापुरते सभागृहामध्ये चर्चा झाली. इथला मेसेज खाली गेला, तेवढयापुरता तेथे बंदोबस्त वाढविला गेला. हा महत्वाचा विषय आपल्या माध्यमातून गृह विभागाच्या मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यायचा आहे.

अध्यक्ष महोदय, कोयना धरणाचे सर्वक्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र आहे. जेवढा कोयना धरणाचा जलाशयातला साठा आहे, ते जलाशयाचे अंतर पूर्ण प्रतिबंधित क्षेत्र म्हणून जाहीर झालेले आहे. त्या परिसरात बेकायदेशीर नौका विहार, बोटींग काही राजकीय पक्षाची मंडळी जाणीवपूर्वक करतात आणि तिथल्या प्रशासनाचे बेकायदेशीर बोटींगकडे दुर्लक्ष आहे. दुसरी महत्वाची गोष्ट त्याच जलाशयामध्ये आतमधल्या बाजूला अवसरी नावाचे एक सेंटर आहे. तेथे पूर्वी वरती पुनर्वसित गाव होते. एका खाजगी मालकाने कोयना जलाशयाच्या बरोबरमध्ये आयलँड झाल्यासारखे त्याचे स्वतःचे क्षेत्र अजूनही तिथे ठेवलेले आहे. धरण झाल्या झाल्या हे सर्व जमिन आणि त्या जमिनीवर पाणी साठले ते अधिगृहण झालेले आहे, संपादित झालेले आहे. दांडगाव्याने तो माणूस तिथे खाजगी रिसॉर्ट चालवितो आणि गुंड प्रवृत्तीचे लोक शनिवारी, रविवारी संध्याकाळच्या वेळी त्या ठिकाणी जातात. त्यांच्याकडे कोणी पाहत नाही, त्यांना कोणी प्रतिबंधकरित नाही. अनेक वेळा स्थानिक प्रशासनला या गोष्टी सांगितल्या. दुर्देवाने हया लोकांचे तिथे अनेक वर्षापासून बस्थान बसलेले आहे. त्या मंडळीने अजूनही त्या पध्दतीने त्या गोष्टी चालू ठेवल्या आहेत. या धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई.....

अध्यक्ष महोदय, मला गृह विभागाच्या संदर्भामध्ये आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करायची आहे. 1998 साली जवळपास गेली 17 ते 18 वर्षे झाली माझ्या मतदार संघातील म्हल्लारपेठ आऊट पोस्टचे पोलीस स्टेशनमध्ये अपग्रेडेशन करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. मागच्या टर्मला मी आमदार असताना हा प्रश्न सभागृहामध्ये आला, स्व.आर.आर. पाटील त्यावेळी राज्याचे गृहमंत्री होते. त्यांनी असे उत्तर दिले की, जेव्हा शासन पोलीस स्टेशन नवीन करण्याचा निर्णय घेईल, त्यात प्राधान्याने हया म्हल्लारपेठचा समावेश असेल, असे लेखी उत्तर आहे. त्यानंतर राज्यात काही नवीन पोलीस स्टेशन सुरु झाली. अद्याप म्हल्लारपेठच्या पोलीस स्टेशनचे अपग्रेडेशन करायचे आहे. सुदैवाने आज म्हल्लारपेठ सारखे आऊट पोस्ट आहे. पोलीस स्टेशन येथे तिथल्या अधिका-यांची क्वॉटर्स व इमारत होण्याएवढी जागा उपलब्ध आहे. तिथे पोलीस स्टेशनची गरज आहे असा गृह विभागाचा शासनाकडे रिपोर्ट देखील आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना आपल्यामार्फत विनंती आहे की, म्हल्लारपेठच्या आऊट पोस्टचे अपग्रेडेशन करुन तातडीने तिथे नवीन पोलीस स्टेशनच्या प्रस्तावाला शासनाने मान्यता द्यावी.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये सामान्य प्रशासन विभागावरच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सन्माननीय सदस्य श्री.बच्चू कडू यांच्याबाबत सांगितले.

X-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई .....

या विषयावर दोन दिवस चर्चा चालली होती. सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू यांच्याबाबतीत घडलेल्या प्रकरणाचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या बैठकाविषयीच्या परिपत्रकाबाबत चर्चा झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आता येथे उपस्थित नाहीत. मुळात असे परिपत्रक काढले आहे की, अधिकाऱ्यांनी आमदारांच्या बैठकांना जाऊ नये. विरोधी पक्ष नेत्यांना मंत्र्यांचा दर्जा आहे, पण जिल्हाधिकारी यांनी विरोधी पक्ष नेत्यास भेटण्याकरिता जाऊ नये. हे परिपत्रक कोणी व कोणाच्या काळात काढले होते. आम्ही विरोधी बाकावर असताना व तुम्ही सत्तेमध्ये असताना हे परिपत्रक काढलेले होते. तुम्हाला विरोधी बाकावर जाऊन आता वर्ष, सव्वा वर्ष झाले तर तुम्हाला अस्वस्थ वाटायला लागले आहे. 15 वर्षे आम्ही विरोधी पक्षात होतो. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी काल बोलताना सांगितले की, विरोधी पक्षात असताना अधिकारी आम्हाला भेटतसुध्दा नव्हते. आता 15 महिन्यात तुम्हाला वाटते की, आपले अधिकार कसे आहेत. त्यावेळी असे परिपत्रक काढताना तुमच्या सरकारने हा विचार करायला पाहिजे होता की या सभागृहातील सर्व सदस्यांना समान अधिकार आहे.

अध्यक्ष महोदय, या परिपत्रकामध्ये माननीय मुख्यमंत्री व माननीय महसूलमंत्री यांनी बदल करण्याचा निर्णय घेतलेला आहे व लवकरच नवीन परिपत्रक सरकार काढणार आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री येथे उपस्थित आहेत. या सभागृहातील सदस्यांना मान सन्मान व प्रोटोकॉलचा विषय आहे. वरिष्ठ अधिकारी प्रोटोकॉल पाळतात पण गृह विभागातील कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याकडून सन्माननीय सदस्यांचा मानसन्मान राखला जात नाही. कनिष्ठ अधिकाऱ्यांची वर्तणूक आमच्याशी वागताना योग्य पध्दतीची नसते. याकरिता कनिष्ठ अधिकाऱ्यांना कडक शब्दात सूचना देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभागावर बोलताना सांगतो की, तालुक्याचे ठिकाण असणाऱ्या मोठया गावातील ग्रामपंचायतींचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. माझ्या मतदारसंघातील पाटण हे गाव तालुक्याचे ठिकाण आहे. पाटण येथे नगरपंचायत करण्याचा प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडून नगरविकास विभागाकडे सादर झालेला आहे. नगरविकास विभागाच्या सचिवांकडे हा प्रस्ताव प्रलंबित आहे. माझ्या सातारा जिल्हयातील काही

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई .....

अशा प्रस्तावांना मान्यता मिळून तेथे ग्रामपंचायतीच्या नगरपंचायती झालेल्या आहेत. पाटणचा प्रस्ताव मागे का राहिला याकरिता मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे. हा प्रस्ताव मंजूर करुन पाटण येथे नगरपंचायत मंजूर करावी.

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण विभागाबाबत विनंती करतो की, गिरणी कामगारांना घरे देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. अनेक वर्ष प्रलंबित असणाऱ्या या निर्णयाला गती देऊन लवकरात लवकर घरे मिळण्याकरिता गृहनिर्माण मंत्री व गृहनिर्माण राज्यमंत्री यांनी प्रयत्न केला आहे. पण बरेच गिरणी कामगार पाटण तालुका व सातारा जिल्हयातूनही आलेले होते पण त्यांना अद्याप घरे न मिळाल्यामुळे त्यांची अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. या लोकांची डिपॉझीट म्हाडाने भरुन घेतलेली आहेत. डोंगरी, दुर्गम भागातील या गिरणी कामगारांची गैरसोय होत आहे, यांनी डिपॉझीट भरल्यामुळे पात्र लोकांच्या यादीत त्यांची नावे आलेली आहेत. त्यांना लवकर घरे देण्याचा प्रयत्न माननीय गृहनिर्माण मंत्री यांनी करावा.

अध्यक्ष महोदय, सामान्य प्रशासन विभागाना जी.आर. आहे की, 1 मे रोजी आमदारांच्या हस्ते झेंडावंदन करावे. 1 रोजी रोजी आमदारांच्या हस्ते झेंडावंदन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे म्हणून मी शासनाचे अभिनंदन करतो. पण आमदारांच्या हस्ते 15 ऑगस्ट व 26 जानेवारी रोजी झेंडावंदन करण्याचा निर्णय अजूनही झालेला नाही. मला मंत्री महोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे, प्रत्येक मंत्री कोणत्या तरी जिल्हयाचे पालकमंत्री आहेत व ते 15 ऑगस्ट, 26 जानेवारी व 1 मे रोजी जिल्हयाच्या मुख्यालयी झेंडावंदन करतात. आमदार 1 मे रोजी झेंडावंदन करतात, पण 15 ऑगस्ट व 26 जानेवारीला त्याला खाली उभे राहावे लागते. अशा प्रकारे पालकमंत्र्यांनी 1 मे रोजी झेंडावंदन करायचे व 15 ऑगस्ट व 26 जानेवारीला जिल्हाधिकारी यांनी झेंडावंदन करायचे व पालकमंत्र्यांनी खाली उभे राहायचे, असे झाले तर ते दिसण्यास योग्य होणार नाही. त्यामुळे जसे जिल्हयाच्या मुख्यालयी पालकमंत्री झेंडावंदन करतात, तसेच 15 ऑगस्ट व 26 जानेवारीला आमदारांच्या हस्ते झेंडावंदन करण्याचा निर्णय याच अधिवेशनात राज्य सरकारने निश्चितपणे घ्यावा.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई .....

अध्यक्ष महोदय, गृह विभागावर बोलताना सांगतो की, पाटण तालुका व सातारा तालुक्यातील पोलीस वसाहतीची अवस्था अतिशय बिकट आहे. ढेभेवाडी पोलीस वसाहत, पाटण पोलीस वसाहत आहे. मल्हारपेठला पोलीस वसाहत नाही पण पोलिसांच्या इमारतीजवळ काही पोलिसांची राहण्याची व्यवस्था केलेली आहे. देभेवाडी येथे पोलीस वसाहतीच्या ब्रिटीशकालीन जुन्या इमारती आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या इमारती किरकोळ स्वरुपात निधी देऊन दुरुस्त केल्या आहेत. परंतु तरीही देभेवाडी व पाटण येथील पोलीस वसाहतीच्या इमारती वापरण्यायोग्य नाही. पाटण पोलीस वसाहती इमारतीबाबत मागील वेळी मी प्रश्न उपस्थित केला होता, तेव्हा शासनाने निधी दिला होता. परंतु तो निधी बांधकाम खात्याकडे जाण्यास व त्यांनी प्रस्ताव तयार करण्यास गती द्यावी. याकरिता जागा कमी असल्याने 1+1 किंवा 1+2 मजल्याच्या इमारती बांधल्यातर तेथील जागेचाही प्रश्न सुटणार आहे. विशेष बाब म्हणून पाटण पोलीस वसाहतीकरिता निधी दिलेला आहे, तसा ढेबेवाडी येथील पोलीस वसाहतीकरिताही निधी गृह विभागाने द्यावा अशी विनंती करतो. पाटण व सातारा जिल्हयातर्गत येणाऱ्या इतर सर्वच इमारतींची अवस्था वाईट आहे. पाटण तहसील कार्यालयामध्येच पोलीस कार्यालयास इमारत उपलब्ध करुन दिलेली आहे. उपविभागीय अधिकाऱ्याचे नवीन पद पाटणला निर्माण झाले पण त्याच्या कार्यालयाची सोय समाजमंदिरात बांधलेल्या लहान जागेमध्ये केलेली आहे. या इमारतींचा प्रश्नही आपण सोडवावा.

अध्यक्ष महोदय, वरिष्ठ पोलीस अधिकारी आमदारांचा प्रोटोकॉल पाळतात. पण विशेषतः वाहतुक पोलीस, वाहतूक पोलीस अधिकारी यांची मग्रुरी व अरेरावीपणा विशेषतः सातारा शहरात मोठया प्रमाणात पहावयास मिळतो. कानुगडे नावाचा ट्रॅफीक इन्स्पेक्टर सातारा या जिल्हयाच्या ठिकाणी अनेक वर्षापासून काम करीत आहे. त्यांच्याबाबत प्रचंड तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे लोकप्रतिनिधींकडून आलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई.......

जुन्या सरकारने काय केले, ते महत्त्वाचे नाही. जुन्या सरकारचा तो अधिकारी लाडका असेल म्हणून त्याला वर्षानुवर्षे त्याच पदावर कायम ठेवले असेलही, मला त्याबाबत मला माहिती नाही. परंतु आता युती सरकार आल्याने नोकरशाही व इतर लोकांना कामाची शिस्त लावून पारदर्शी कारभार करण्यास सुरुवात झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावरील मागण्यांवर चर्चा करीत असतांना जे काही मुद्दे मांडलेले आहेत, त्याचा सकारात्मक विचार शासनाने करावा.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी माझा संदर्भ घेऊन काही वक्तव्य केलेले आहे. मी त्याबाबत काही सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील म्हणाले की, लोकनेते कै.बाळासाहेब देसाई यांचा नातू यांचे नाव मी कसे घेईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे वडील कै.राजारामबापू पाटील आणि माझे आजोबा लोकनेते कै.बाळासाहेब देसाई यांनी एका मंत्रिमंडळामध्ये काम केलेले आहे. ते म्हटले की, "आता तुम्ही आमचे मित्र नाही, कारण तुम्ही तिकडे बसतात." सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे जर बाजू बघून मैत्री करीत असतील तर त्यांना मी एवढेच सांगू इच्छितो की, राजकारणामध्ये बाजू बघून मैत्री करीत नसतात. शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे आणि माननीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेबांची अनेक वर्षांची मैत्री देशाने व राज्याने पाहिलेली आहे. त्या मंडळींनी कधी अशी बाजू बघून मैत्री केली नाही. कोण सत्ताधारी व कोण विरोधी पक्षाचा आहे, असे बघून मैत्री केलेली नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी कपात सूचना मांडत असताना माझे नाव घेतले व स्व. शिवसेनाप्रमुखांच्या स्मारकाचा विषय मांडलेला आहे. याबाबत मला त्यांना एक सांगायचे आहे. स्व.शिवसेनाप्रमुख यांचे स्मारक हे युती सरकार तर जरूर उभारेल. पत्रकार परिषदेमध्ये माननीय मुख्यमंत्री आणि पक्षप्रमुख माननीय श्री.उध्दव ठाकरे यांनी एकत्रितपणे स्मारकाची घोषणा केलेली आहे. आम्ही सरकारचे सहकारी पक्ष आहोत. स्मारकाबाबत आमचा दोहोंचा आग्रह आहे. मला सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना एवढेच सांगावयाचे आहे की, शिवसेनाप्रमुखांचे हिंदुस्थानातील लाखो कोटयवधी लोकांच्या हृदयात जे स्थान आहे, ते महत्त्वाचे आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई......

जनमाणसाच्या हृदयात स्थान असणे, यापेक्षा मोठे स्मारक कुठेच असू शकत नाही. आज देशा-परदेशातील कोणीही माणूस सांगेल की, जिवंतपणी एखादा मोठा माणूस मुंबई शहर बंद करु शकेल परंतु स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे हे एकमेव उदाहरण असे आहे की, त्यांच्या दुर्दैवी निधनामुळे ही मुंबई अर्ध्या सेकंदात बंद झालेली आहे. एवढा आदर व प्रेम माणसांच्या हृदयामध्ये शिवसेनाप्रमुखांबद्दल आहे. हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी राज्यातील आणि देशातील जनतेच्या हृदयामध्ये स्थान निर्माण केलेले आहे, तेच आम्हाला जास्त महत्त्वाचे आहे. युती सरकार हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक त्यांच्या नावाला, लौकिकाला, दर्जाला व मोठेपणाला साजेल असे निश्चितपणे उभारेल, असा मला विश्वास आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर):अध्यक्ष महोदय, मैं सन 2016-2017 की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, एमएमआरडीए ने मानखुर्द-शिवाजीनगर में नटवर कम्पाऊंड, 60 बिल्डिंग बनायी, एक बिल्डिंग में 96 फ्लैट है. यह 8-10 साल पहले बना है. आज 12 बिल्डिंग खाली है. 1152 फ्लैट खाली पड़े है. दरवाजे, ईलेक्ट्रीक का सामान, शौचालय का सामान, सब सामान लोग चोरी करके ले गए है. लोग वहां पर बदतमिजी करते हैं, नशा करते हैं, बैड एलिमेंट्स रहते है, कोई सुनने के लिए तैयार नहीं है. अंधेर नगरी चौपट राजा. लोग सड़क पर रहते है. 1152 फ्लैट खाली पड़े है, सड़ रहे है. वॉटर टैंक लिकेज है. एक स्लम को हटाकर नया स्लम पैदा हो गया है. मेरी विनती है कि इसका सर्वे किया जाना चाहिए. अंदरुनी सड़क नहीं है, लिकेज है, बच्चों के लिए गार्डन नहीं है. नमाज पढ़ने के लिए कोई सुविधा नहीं है. पूजा करने के लिए जगह नहीं है, शादी-ब्याह के लिए कोई जगह नहीं है. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, गृह विभाग के बारे में कहना चाहता हूं कि यह देश सेक्युलर देश है. सरकार किसी की भी हो, किसी का कोई भी धर्म हो, सब के साथ इन्साफ होना चाहिए. पिछले दिनों कल्याण में शिवजयंती के मौके पर कुछ लड़के मोटरसायकील पर तलवार लेकर मुस्लिम इलाके में गए. लोगों ने उनको पकड़ा, पुलिस के पास उनको दिया. वे तलवार लेकर क्यों गए थे ? कानून व्यवस्था की इस तरह की स्थिति क्यों हो रही है ? जलगांव में बीजेपी के एक मेम्बर.... 100 तलवार पकड़ी गई. बहुत सारे लोगों ने धर्म के नाम पर गलत भाषण किया. मारो, मारने का भाषण किया. पुलिस ने उनको गिरफ्तार किया. ये मालूम नहीं हुआ कि तलवार कहां लेकर जा रहे थे.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये, याकरिता मी बोलत आहे. ही चोपडयाची घटना आहे. शिवजयंतीच्या उत्सवासाठी सजावटीकरिता राजस्थानवरुन या तलवारी आणल्या गेल्या होत्या. असे पोलीस खात्याच्या चौकशीअंती निष्पन्न झालेले आहे.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री.राहुल बोंद्रे ):** ठीक आहे. याची माहिती घेण्यात येईल.

......4.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी : अध्यक्ष महोदय, नांदेड में एक गोडाऊन में बम फटा. कह दिया गया कि वहां ऐसी कोई ॲक्टीविटी नहीं थी. बंबारेनगर में 2006 में बम फटा था तो कहा गया कि ऐसी कोई ॲक्टिविटी नहीं है. जहां कहीं भी मुसलमान होता है, कहीं कोई वाकया होता है, उसको सीधा आईएसआई से जोड़ दिया जाता है. 26 जनवरी के पहले देश में आईएसआई के नाम पर 14 लड़के पकड़े गए. उन्होंने कहीं पर वेबसाईट पर विजिट कर दी. लाईक-डिस्काईक कर दिया. इस पर उनको पकड़ लिया गया. एक रिपोर्ट आयी है. इस मुल्क में भारतवर्ष की सात कंपनियां ऐसी है जो आईएसआई को एक्सपोर्ट कर रही हैं. ऐसी रिपोर्ट है कि बम बनाने का सामान, जिलेटीन, अमोनियम नाईट्रेट, केमिकल, ईलेक्ट्री सर्किट, सब भेजा जा रहा है. सेंट्रल की सरकार चुपचाप बैठी है. उसमें कोई मुसलमान नहीं है. राज्य सरकार भी चुपचाप बैठी है. इसकी इन्क्वायरी नहीं कर रहे है. मालाड में एक लड़का पकड़ लिया गया. मदरसिह नाम का एक लड़का पकड़ लिया गया. मुंब्रा में आईएसआई के नाम पर लड़का पकड़ा गया. दो महीने हो गए. आज तक चार्जशीट नहीं गई. जेल में बंद है. जो लोग इस देश में गुन्हेगार हैं उन्हें सजा दी जाए, लेकिन शक की बुनियाद पर, किसी के पास कुछ मिला भी नहीं, उसको आईएसआई के नाम पर जेल में डाल दिया गया, यह बिल्कुल ठीक नहीं है.

अध्यक्ष महोदय, प्रधानमंत्री 15 कलमी कार्यक्रम के तहत मायनॉरिटी वेलफेअर के लिए आबादी के लिहाज से पुलिस की भर्ती होनी चाहिए. उसको मॉनिटर करने के लिए ऑफिसर होना चाहिए. दो प्रतिशत से ज्यादा मुसलमानों की पुलिस में भर्ती नहीं हो रही है. यु.के. में, लंडन में, वहां की सरकार ने कहा कि जहां मुस्लिम बस्ती है, वहां उस कास्ट के लोगों को तैनात करना चाहिए. केवल दो प्रतिशत मुस्लिम की पुलिस में भर्ती की जा रही है. अब इस देश में पोटा कानून खत्म हो गया. अब देश में पोटा कानून नहीं है. टाडा कानून खत्म हो गया. क्यों खत्म हुआ ? कानून का मिसयुज हुआ, गलत लॉ है, ये खत्म हो गया. लेकिन अभी जो सजा हो रही है, पोटा के तहत सजा हो रही है. कोई आदमी पकड़ा जाए, उसको लटकाकर, मार मारकर, जो चाहे बयान ले लो. उसी स्टेटमेंट को एविडेन्स बनाकर सजा दी जा रही है. अभी मकोका लागू है. मकोका के तहत जो लोग पकड़े गए हैं, साधू प्रज्ञा सिंग, पुरोहित पांडे, सरकारी वकील कह रहे है कि इन पर से मकोका हटेगा. मकोका लागू है. मकोका हटाने की बात चल रही है.

.....5.



श्री अबु आजमी........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पोटा खत्म हो चुका है. लेकिन पोटा के तहत सजा दी जा रही है. इस तरह से देश में क्यों चल रहा है? इसका यह हरगिज मतलब नहीं है कि किसी भी आतंकवादी को छोड़ा जाए. बिल्कुल नहीं.आतंकवादियों को सजा होनी ही चाहिए. "जहां रहना महाफिज बनकर रहना गुलिस्ता के, ये अपना दिल कहता है यही इमान कहता है, तभी तो जान देने के लिए हम तैयार रहते हैं, वतन पर जान देने के लिए कुरान कहता है." हम लोगों ने आज तक किसी आतंकवादीयों को बचाने के लिए बात नहीं की, लेकिन श्रीमती रोहिनी सालियन कहती हैं, उनका स्टेटमेंट है. मुझे एनआरआई के बड़े अफसर से दबाव आया कि हिंदुत्ववादी लोग जो जेल में बंद है, उनके साथ बहुत ही सॉफ्ट जाना, चिल्लाचिल्लाकर कहा कि मुझे काम नहीं करने दिया जा रहा है. मुझे उनको छोड़ने के लिए कहा जा रहा है. उसकी प्रॉसिक्युटर वह है. इसकी इन्क्वायरी की जाए कि किसने कहा था, इस पर कार्रवाई क्यों नहीं होती है ?

अध्यक्ष महोदय, अभी यहां पर एक सदस्य ने इशरत जहां के बारे में बात कहीं. मैंने एम्बुलेन्स भेजी थी. उसकी डेथ बॉडी लाने के लिए मैंने एम्बुलन्स भेजी थी. मैं उसके घर गया था. मैंने उसकी कंडिशन देखी है. आज तक हिंदुस्तान की किस एजेन्सी ने...दो बार गुजरात की कमिटी ने इन्क्वायरी की. हाई कोर्ट की मॉनिटरींग में इन्क्वायरी हुई. कहीं पर भी टेररिस्ट ग्रूप से नहीं जोड़ा गया. दिल्ली से सीबीआई ने इन्कवायरी की. उसने भी कहा कि टेररिस्ट ग्रुप से कहीं भी संबंध नहीं आता है. एक हेडली जो अमेरिका में बैठा है, हेडली एक बयान देता है, उससे पूछा कि...कोई बात कर रहा था. उसके बाद कौन बनेगा करोड़पति. श्री अमिताभ बच्चन नाम देते है. इसी तरह हमारे प्रॉसिक्युटर ने तीन नाम दिए. ये औरत थी क्या ? ये लेडी थी क्या ? एक नाम पर उसने हाँ कह दिया. जब कोई गवाह होता है, तो कोर्ट में उसकी जिरह होती है. वह गवाह सही है या गलत है यह मालूम होता है.

झेड-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. अब्रु आझमी भाषण करीत असताना भाषणामध्ये काही अपशब्दांचा वापर केलेला आहे. त्यांनी सांगितले की, मानखुर्दमध्ये 1100 इमारती तयार आहेत. सन्माननीय सदस्यांनी टँकच्या जागी पॅन्ट फाटली असा शब्द प्रयोग केलेला आहे. तसेच त्यांनी एमकेपी आणि हेडलीच्या संदर्भात वक्तव्ये केलेली आहेत. हेडलीची न्यायायलीन चौकशी सुरु आहे. हेडलीचे प्रकरण हे न्यायप्रविष्ठ आहे. त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य भाषण करीत असताना ते त्या गोष्टींचा उहापोह करु शकत नाही. न्यायालयीन प्रक्रिया सुरु असून, त्यावर कोणीही आक्षेप घेऊ शकत नाही, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री अबु आझमी : अध्यक्ष महोदय, मेरा कहना यह है कि आज तक इशरत जहां का कोई लिंक टेररिस्ट ग्रूप से है, आज तक तीन तीन एजेन्सियों ने इन्क्वायरी की. किसी ने नहीं कहा. हेडली ने दुबारा कहा कि...(व्यवधान)....किसी ने नहीं कहा. सीबीआई ने भी कहा है. उसे उठाकर, पकड़कर, उसको मारा गया. एन्काऊंटर नहीं हुआ है. उसका मर्डर हुआ है....

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अबु आझमी हे रेकॉर्डवर चुकीची माहिती आणत आहेत. इशरत जहॉ ही लष्कर ए तोयबाची एजंट होती, अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र तत्कालीन युपीए सरकारने माननीय न्यायालयात सादर केलेले होते. त्यानंतर तत्कालीन गृहमंत्री श्री. पी. चिदंबरम यांनी स्वतःच्या अधिकारात ते प्रतिज्ञापत्र बदलले होते. हे प्रतिज्ञापत्र आयबीने बदलले नाही. हे ऑन रेकॉर्ड आहे.

अध्यक्ष महोदय, हेडलीबरोबर श्री. एम.के.नारायणन् हे युपीए सरकारच्या काळात एनएसए होते. त्यानंतर ते पश्चिम बंगालचे गर्व्हनर होते. त्यावेळी त्यांनी सांगितले होते आणि परवा या प्रकरणाची चर्चा झाल्यानंतर त्यांनी सांगितले आहे की, इशरत जहॉ ही नॅशनल सिक्युरिटी ॲडव्हायजर म्हणून...(अडथळा)... त्यांच्याकडे ही माहिती उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांनी जी आक्षेपार्ह वक्तव्ये केलेली आहेत, ती रेकॉर्डवर काढून टाकण्यात यावीत, अशी माझी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांना विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. राहुल बोंद्रे )** : ठीक आहे. रेकॉर्डवर चुकीचे असेल तर ते तपासून घेण्यात येईल.

.....2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आझमी : अध्यक्ष महोदय, हेडली ने दुबारा कहा कि मैं इशरत जहां को जानता भी नहीं हुं. यह रेकॉर्ड पर है. उसकोस पकड़कर मारा गया है. मर्डर किया गया है. उसका एन्काऊंटर नहीं हुआ है. यदि वह लष्कर-ए-तोयबा की थी, टेररिस्ट ग्रूप की थी तो उसको पकड़कर मुकदमा चलाना चाहिए था. फांसी के फंदे पर चढ़ाना चाहिए था. यह कोई कानून नहीं कहता कि किसी को उठाकर मार दो. जबरदस्ती कत्ल किया गया है. गलत जानकारी सदन को नहीं दी जानी चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

----------

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांनी अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करावी.

.....3.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

श्री. अमित देशमुख ( लातूर शहर ) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभाग अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत सहभागी होण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी सभागृहात दुसरा अर्थसंकल्प सादर केलेला आहे.

श्री. हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. अबु आझमी यांनी इशरत जहॉच्या संदर्भातील वक्तव्ये केलेली आहेत. इशरत जहॉ टेररिस्ट होती, त्याची चौकशी सुरु आहे, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे, वगैरे सन्माननीय सदस्यांनी रेकॉर्डवर आणलेले आहे. ते चुकीचे आहे. ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे. इशरत जहॉ टेररिस्ट होती, त्याची चौकशी सुरु आहे. हेडलीने कबुलीजबाबात धक्कादायक माहिती दिलेली आहे. या प्रकरणातील केंद्रीय गृहमंत्रालयाने त्या प्रकरणाच्यासंदर्भात रिपोर्ट बदलून टाकलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अबु आझमी हे चुकीची माहिती देत असून, ती रेकॉडवरॅन काढून टाकण्यात यावी, अशी माझी माननीय अध्यक्षांकडे विनंती आहे.

श्री. विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अबु आझमी यांनी डिटेलमध्ये इशरत जहॉच्या प्रकरणासंदर्भात प्रतिज्ञापत्र कोणी बदलले, कसे बदलले वगैरे माहिती दिलेली आहे. तसेच त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची डिटेल माहिती दिलेली आहे. डेव्हीड हेडली हे माफिचे साक्षीदार असून, त्यांनी जाहीररित्या रेकॉर्डवर...(अडथळा)....आप अभी सुन लीजिए. गलत बात इस सभागृह में नहीं चलेगी. आपको जैसा चाहिए वैसा नहीं होगा. सन्माननीय सदस्य श्री. अबु आझमी यांनी यासंदर्भात जी वक्तव्ये केलेली आहेत, ती वक्तव्ये रेकॉर्डवर काढून टाकण्यात यावी, अशी माझी माननीय अध्यक्षांकडे विनंती आहे.

**अध्यक्ष** : मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यापूर्वी सुध्दा त्याचा उल्लेख झालेला होता. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्यासंदर्भातील उल्लेख केलेला असावा असे मला वाटत आहे. यामध्ये जर काही गैर असेल तर ते तपासून घेऊन काढून टाकण्यात येईल.

.....4.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष.......**

मला सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा दुपारी 2.30 वाजता थांबविली जाणार आहे. त्यानंतर संबंधित विभागाचे मंत्री उत्तराच्या भाषणास सुरु करणार आहेत. त्यामुळे मला सर्व सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करावे, ही विनंती.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, अतिशय महत्वाच्या विभागांवर सभागृहात चर्चा सुरु आहे. माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत.

अध्यक्ष महोदय, मी नगरविकास विभागाशी संबंधित असलेल्या एक महत्वाच्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. मुख्यमंत्री महोदयांनी राज्याच्या कारभाराची सुत्रे आपल्या हातात घेतल्यानंतर 20 महिन्यांमध्ये कोस्टल रोड पूर्ण करणार अशी घोषणा केलेली होती. सन 2015 मध्ये मुंबईतील कोस्टल रोडचे काम सुरु होणार असे मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले होते. परंतु, सद्य:स्थितीत....(अडथळा)....

श्री. अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर बोलणार आहे. पुरवणी मागण्या सुरु करण्यापूर्वी चर्चेची वेळ निश्चित करण्यात आली होती. काँग्रेस पक्षाला 1 तासाचा वेळ आणि उर्वरित वेळ दुसऱ्या पक्षाला दिला जाईल असे सांगण्यात आले होते.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. अस्लम शेख यांना सांगू इच्छितो की, काँग्रेस पक्षाला एकूण 40 मिनिटांचा वेळ दिलेला आहे.

श्री. अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, या 40 मिनिटामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांनी भाषण पूर्ण करण्यासाठी 10 मिनिटांचा वेळ घेतलेला आहे. आम्हाला वेळ वाढवून द्यावा अशी आमची विनंती आहे.

**अध्यक्ष** : ठीक आहे. आतापर्यंत किती वेळ झालेला आहे, तो मी तपासून घेतो.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, सन 2015 मध्ये मुंबईतील कोस्टल रोडचे काम सुरु होणार असे मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले होते. अजूनही मुंबई शहरात कोस्टल रोडचे काम सुरु झाल्याचे दिसून येत नाही. कोस्टल रोडचे काम केव्हा सुरु होणार यासंदर्भात महाराष्ट्र

.....5.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित देशमुख........

शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी माझी महत्वपूर्ण सूचना आहे. कोस्टल रोडसाठी समुद्रामध्ये भराव टाकला जाणार आहे. यासंदर्भात देखील शासनाची भूमिका आम्हाला कळली पाहिजे. कोस्टल रोड करण्यासाठी सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत काय यासंदर्भात देखील शासनाची भूमिका आम्हाला कळली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, शासनाने एलबीटी रद्द केलेली आहे. एलबीटी रद्द केल्यानंतर महानगरपालिकांना अपेक्षित असलेले अनुदान मिळाले नाही. एलबीटीचे अनुदान महानगरपालिकांना वेळेवर मिळत नाही. यामध्ये नागपूर, औरंगाबाद, लातूर, सोलापूर, पुणे, नाशिक आणि नांदेड महानगरपालिकांना आपल्या कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी पैसा नाही. या गोष्टीकडे मी शासनाचे आवर्जून लक्ष वेधीत आहे.

AA-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख...

लातूर महानगरपालिकेने शासनाकडे 60 कोटी रुपयांची मागणी केली आहे, परंतु शासनाने केवळ 10 कोटी रुपये लातूर महानगरपालिकेला दिले आहेत. या दहा कोटी रुपयांमध्ये लातूर महानगरपालकेतील कर्मचाऱ्यांचा पगार देणे शक्य होणार नाही. एवढेच नव्हे तर विकासाची इतर कोठलीही कामे करता येणार नाहीत. शहरात पाणीपुरवठा, रस्ते, गटारे, इतर सर्व सोई सुविधांसाठी या तूटपुंजा निधीमधून कसलीही कामे होणार नाहीत. लातूर महानगरपालिका, तसेच नागपूर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होत नाहीत. काही दिवसापूर्वी महाराष्ट्र सरकारने शाळा, कॉलेज, हॉस्पिटल्स, इंडस्ट्रीज इ. साठी चार एफएसआर, पाच एफएस हा माफक दराने उपलब्ध करुन दिला होता, परंतु शासनाने आता एक परिपत्रक काढलेले आहे की, या एफएसआयवर 10 टक्के, 20 टक्के, 50 टक्के प्रिमियम आकारला जाईल. रेडी रेकनरचे दर दरवर्षी वाढत चालले आहेत. अनेक ठिकाणी मार्केट रेटपेक्षा रेडी रेकनरचे रेट जास्त आहेत. म्हणून शासनाने या परिपत्रकाचा पुनर्विचार करावा आणि हे मागे घ्यावा. जेणेकरुन शाळा, कॉलेजेस, हॉस्पिटल्स यांना ही सेवा उपलब्ध करुन देता येणार नाही. या परिपत्रकामुळे अनेक अडचणी उद्‌भवतात, हे मला आपल्या लक्षात आणून द्यावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, नवी मुंबई मध्ये "CIDCO slabs notice on 60 Social Service plots for misuse." नवी मुंबई मध्ये काही संस्था शिक्षण, आरोग्याची सेवा पुरवित आहेत. त्यांना सिडकोने नोटिसेस पाठविलेल्या आहेत. एखाद्या संस्थेने कॉलेज सुरु करण्याऐवजी शाळा सुरु केली किंवा एखाद्या संस्थेने शाळा सुरु करण्याऐवजी कॉलेज सुरु केले म्हणून त्यांना नोटिसेस पाठविल्या आहेत. त्यांना पेनॉल्टी लावली आहे. शासनाने अनधिकृत बांधकामासंबंधी एक सर्क्यूलर काढले आहे. यामध्ये काहीही अनधिकृत नाही. ते शिक्षणाचाच प्रसार करतात. मुख्यमंत्री महोदयांनी या महत्वाच्या बाबींमध्ये लक्ष घालावे आणि शासनाची भूमिका स्पष्ट करावी. सन्माननीय गृह निर्माण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मला आठवते की, सन 2008 मध्ये टीडीआरचा दर दोन ते तीन हजार रुपये प्रति चौ.फूट होता, परंतु तो आता सहा हाजर रुपये प्रति चौ.फुटा पर्यंत पोहोचला आहे. वर्तमानपत्रामध्ये हे नमूद केलेले आहे. या टीडीआर वर प्रिमियम आकारण्याची

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख...

पध्दत या शासनाने सुरु केलेली आहे. ही झळ सर्वसामान्य माणसाला बसत आहे. सर्वसामान्य माणसांसाठी मुंबई मध्ये परवडणारी घरे उपलब्ध होत नाहीत. सरकारने असे सांगितले की, प्रत्येकाला घर उपलब्ध करुन देऊ. लाखो घरे या राज्यामध्ये उभी करावयाची आहेत. मुंबई मध्ये आजही 40 हजार घरे विकली जात नाहीत. ही घरे परवडणारी नाहीत म्हणून या घरांच्या किंमतींवर राज्य सरकार काही प्रतिबंध आणणार आहे काय, यासंदर्भात शासनाने आपली भूमिका विशद करावी.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय उद्योगपती श्री.रतन टाटा या सभागृहात काल उपस्थित होते. त्यांनी शासनाला अनेक चांगल्या सूचना केलेल्या आहेत. श्री.रतन टाटा यांनी लाखाची नॅनो या देशाला उपलब्ध करुन दिलेली आहे. याप्रमाणे श्री.रतन टाटा यांच्या सल्ल्यावरुन पाच लाख रुपयांमध्ये घर महाराष्ट्र शासनाला उपलब्ध करुन देता आले तर सर्वसामान्य माणसाला घर मिळेल. सर्वसामान्य माणसांना घर मिळत नाही, याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महाराज, मुंबईमध्ये रेसकोर्स येथे शिवसेना पक्षाचे पालकमंत्री यांनी थिम पार्क उभारण्याची भूमिका मांडली आहे, याबद्दल शासनाची काय भूमिका आहे? मुंबईमध्ये लोकांसाठी चांगले बाग बगिचे उपलब्ध नाहीत. पब्लिक पॉर्क उपलब्ध नाहीत, अशा स्थितीत शिवसेना पक्षाने जो विचार मांडला आहे, त्याबाबत मुख्यमंत्री महोदयांची काय भूमिका आहे? कचरा, वीज, पाणी, नगरविकास विभागातंर्गत ग्रीन बिल्डिंग्ज यांसदर्भात राज्य सरकार काही नवीन धोरण आणणार आहे काय? सोलर पॉवर, रेन वॉटर हार्वेस्टिंग इत्यादी कामे करावयाची आहेत. झिरो वेस्ट अशा इमारती आपणाला तयार करावयाच्या आहेत. केवळ मुंबई पुरतेच नाही तर महाराष्ट्रातील अनेक शहरांच्या बाबतीत राज्याचे धोरण काय आहे, यासंबंधी आम्ही वाट पाहत आहोत. इमारत बांधकामाची परवानगी किती दिवसात मिळाली पाहिजे? एक वर्ष, दोन वर्षे परवानगी मिळत नाही, यासंदर्भात नगरविकास विभागाने ठोस अशी पावले उचलण्याची गरज आहे.

अध्यक्ष महाराज, कोस्टल रोड, मेट्रो, मोनो रेल, वॉटर, ट्रॅान्सपोर्ट इत्यादी संदर्भात वाहतुकीची कोंडी कशी कमी करता येईल, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. कुलाबा-दादर, मलबार हिल वरुन माहिम, जुहू वर्सोवा, शिवडी अशा ठिकाणी समुद्रातून बोटीने प्रवाशांना प्रवास



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख...

करता आला तर वेळेची बचत होईल, परंतु यासंदर्भात शासन पाऊल उचलताना दिसत नाही. मुंबई शहरामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणावे तसे शौचालये दिसत नाहीत. आपण एकीकडे स्वच्छ भारत अभियानाच्या घोषणा करतो, परंतु या अभियानातंर्गत मुंबईमध्ये शौचालये उभे राहिलेले दिसत नाहीत. त्यालाच स्वच्छ भारत अभियानाचे फलक लावून पुन्हा उद्‌घाटन केले जात आहे. 250 लोकसंख्ये मागे एक शौचालये असावे, असा निकष आहे.

अध्यक्ष महाराज, वृक्ष लागवड आपल्याला मोठ्या प्रमाणात करावी लागेल. मुंबई महापालिकेने पे ॲण्ड पॉर्क संदर्भात जे धोरण स्वीकारलेले आहे, त्याचे स्वागत आहे. शॉपींग मॉल्स, थिएटर्स, मल्टिप्लेक्स, एअरपोर्टस अशा ठिकाणी गाड्या लावल्या तर सर्वसामान्य माणसांकडून त्यांचे चार्ज घेतले जातात. एखाद्या मल्टिप्लेक्समध्ये आपण तीन तास गाडी लावली तर त्याचे 100 रुपये आकारणी केली जाते. चित्रपटाचे तिकीट 100 रुपये आणि पार्किंगचे तिकीट 100 रुपये अशी परिस्थिती आहे. आपण एअरपोर्ट येथे गाडी घेऊन उतरला तरी आपल्याला पैसे द्यावे लागतात. जेव्हा एअरपोर्ट विकसित केले जाते त्या विकासकाची पार्किंगची सुविधा करण्याची जबाबदारी नाही का? कोठल्याही रिटेल सेक्टरमध्ये आपण जा, तेथेही तुम्हाला पे ॲण्ड पॉर्कचे पैसे द्यावे लागतात.

अध्यक्ष महाराज, विधि व न्याय विभागाच्या संदर्भात मी बोलणार आहे. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये अनेक न्यायालये मंजूर झाली, परंतु या न्यायालयांना इमारतीसाठी जागा उपलब्ध नाही. महाराष्ट्र शासनाचे मी या बाबींकडे लक्ष वेधू इच्छितो. या मंजूर झालेल्या न्यायालयांना इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने काही ठोस पावले उचलावीत. या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांना मी विरोध करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------------

यानंतर BB-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

डॉ. भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, माझ्या वर्सोवा मतदारसंघामध्ये सेंट कॅथरिन होम या अनाथाश्रमामध्ये होमचे 3 मेट्रन 3 बालिकांवर सेक्शुअल हॅरेसमेंट, मानसिक अत्याचार करीत आहेत. काल रात्री त्यांच्या विरुध्द त्यांनी आंबोली पोलीस स्टेटशनमध्ये कलम 509, 323, 506 अन्वये एफआयआर दाखल केला आहे. याबाबत चिल्ड्रन वेल्फेअर कमिटीकडे तक्रार केली असता, त्या कमिटीचे लोक त्या 3 मुलींना भेटण्यास आले असता, त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. सेक्शुअल हॅरेसमेंट करणे ही नॉर्मल गोष्ट आहे, अशाप्रकारे त्याकडे दुर्लक्ष केले. आज त्या 3 मुलींना आता त्या अनाथाश्रमातून बाहेर काढायला बघत आहेत.

अध्यक्ष महोदय, ही गंभीर बाब आहे. विनंती आहे की, ती कमिटी तातडीने रद्द करण्यात यावी आणि तेथे प्रशासक नेमण्यात यावे असे आपण कृपया आदेश द्यावेत.

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाचा विषय उपस्थित केलेला आहे.

**अध्यक्ष :** सर्व पोलीस स्टेशनमध्ये खूप गुन्हे नोंदविले जात असतात, त्या सर्व नोंदविलेल्या गुन्ह्यांची चर्चा आपण येथे कशी उपस्थित करणार ? शासनाने यावर निवेदन करावे.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय होय.

.........

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: अनुदानाकरिता मागण्या

**मु.शी.**: सन 2016-2017 च्या अनदानाकरिता मागण्या
मागण्या :
1) सामान्य प्रशासन विभाग
2) गृह विभाग
3) नगरविकास विभाग
4) विधी व न्याय विभाग
5) गृहनिर्माण विभाग

( चर्चा पुढे सुरु.....

ॲड. आशिष शेलार ( वांद्रे पश्चिम) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी फार जास्त वेळ बोलणार नाही. स्वाभाविकत: ज्यावेळेस हा अर्थसंकल्प आपल्या सर्वांसमोर मांडला, त्यावेळेस या राज्याला एका अर्थाने नवीन दिशा देण्यासाठी संपूर्णपूणे सर्व प्रयत्न करण्याची भूमिका राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातून आपल्या सर्वांसमोर दिसत आहे. या राज्यातील तशा अर्थाने सर्व वर्गाला काही ना काही समाधान मिळावे आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या ध्येयधोरणांचा पाठपुरावा या सर्व अर्थसंकल्पातून आपल्या सर्वांसमोर दिसत आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास खात्यातील एका महत्त्वाच्या विषयाकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. पुरवणी मागण्या मान्य करतानाही ही भूमिका समोर आली होती आणि आज या आर्थिक तरतुदीच्या मागणीवर जी पुस्तिका आपल्या सर्वांना दिली आहे, त्यामध्ये सरकारने असे म्हटले आहे की, नागरी फेरीवाल्यांच्या उपजिविकेच्या समस्या सोडवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आणि त्याबरोबर फेरीवाल्यांना सहाय्य, सपोर्ट टू अर्बन स्ट्रीट व्हेंडर्स. राज्य सरकारचे नगर विकास खाते असे म्हणत आहे की, आपण सर्वांनी सपोर्ट टू अर्बन स्ट्रीट व्हेंडर्स आणि त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे मुंबई शहरात सर्वात मोठी समस्या पार्किंगची असली तरी, पार्किंग बरोबर फेरीवाल्यांची समस्याही मुंबई शहरात खूप मोठी आहे. अनधिकृत फेरीवाले कुठल्याच सोसायटी किंवा इमारतीतील लोकांना आपल्या समोर नको आहेत. ते अनधिकृत आहेत ते गेलेच पाहिजेत. उच्च न्यायालयाचे, सर्वोच्च

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. आशिष शेलार ...

न्यायालयाचे तसे आदेश आहेत. परंतु, अनधिकृत फेरीवाले काढण्यासंबंधीची कायमस्वरूपी प्रक्रिया मुंबई महानगरपालिका कशी करणार ? सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार कायमस्वरूपी अनधिकृत फेरीवाले आपापल्या गल्ल्यांतून गेले पाहिजेत यासाठी राज्य सरकार काय उपाययोजना करणार हे मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगणे अभिप्रेत आहे.

अध्यक्ष महोदय, त्या बरोबर असेही म्हटले आहे की, सपोर्ट टू अर्बन स्ट्रीट व्हेंडर्स याचा अर्थ फेरीवाले ही सामाजिक समस्याही आहे. मुंबई शहरात आज 1 करोड 40 लाखांच्या दरम्यान लोकसंख्या आहे, तर जवळजवळ 20 लाख परिवार हे फेरीवाल्यांच्या व्यवसायावरही अवलंबून आहेत. त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी स्ट्रीट व्हेंडर पॉलिसी कोर्टासमोर मांडली मात्र ती प्रत्यक्षात एक्झेक्युट झाली नाही.

अध्यक्ष महोदय, मिठीबाई कॉलेजच्या जवळील फेरीवाल्यांना काढण्यासाठी मिठीबाई कॉलेजचे प्रशासन कोर्टामध्ये गेले. कोर्टामध्ये दावे, प्रतिदावे झाल्यानंतर अंतिम आदेश असे आले की, सन 2005 पर्यंतच्या फेरीवाल्यांना संरक्षित करा. मी ते जजमेंट वाचले आहे. सन 2005 पर्यंतच्या फेरीवाल्यांना मुंबई महापालिका संरक्षित कशी करणार, त्यांच्या सेन्सस कसा होणार, त्यांचे कोणते डॉक्युमेंटस खरे मानणार, त्यांच्या पोटावर, उपजिविकेवर गदा येऊ नये याकरिता काही धोरण करणार काय ?

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागाच्या माध्यमातून उच्च न्यायालयाने सन 2005 पर्यंतच्या फेरीवाल्यांना संरक्षित केले असेल, तर त्यांना संरक्षण देण्यासाठीचे धोरण आणि सर्वोच्च न्यायालयाने ज्या फेरीवाल्यांना अनधिकृत केले असेल त्यांना काढण्यासाठीचे धोरण याबाबतचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाचे मंत्री महोदय या विषयावर अतिशय सचोटीने काम करीत आहेत, याबाबतचा सर्व लेखाजोखा सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर यांनीही दिला आहे. ट्रान्सफर मधील वशिलेबाजी गेली, पर्टिक्युलर अधिकाऱ्याला सेम पध्दतीचे पोलीस स्टेशन मिळेल हे संपले. रोटेशनमध्ये सर्वांना संधी मिळेल अशा पध्दतीची व्यवस्था आली. आपण सर्वांनी पाहिले असेल सागरी पोलिसांपासून ते सायबर क्राईम पर्यंत सर्व गोष्टींमध्ये आपण 1-1 पाऊल पुढे जात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. राहूल बोंद्रे )**

ॲड. आशिष शेलार ...

आहोत. माझी छोटीशी विनंती आहे की, माझ्या मतदारसंघात वांद्रे विभागात एस.व्ही. रोडवर लकी रेस्टॉरंटच्या समोर एक मोठा भूखंड गृह विभागाला आरक्षित आहे. मी सातत्याने पाठपुरावा केला. वांद्रे येथील त्या भूखंडावर सायबर क्राईम डिटेक्शन सेंटर लॅब आणि ट्रेनिंग सेंटर विकसित करण्याची आवश्यकता आहे असा प्रस्तावसुध्दा मी दिला.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये आयटी रिलेटेड क्राईम आणि सायबर क्राईम यांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. वॉटसअप, इमेल, ट्विटर, फेसबुक एवढ्यावरच नाही तर आता ई-ट्रान्झॅक्शन वाढायला लागल्यामुळे केवळ मोबाईलच्या माध्यमातून लाखो रुपयांची खरेदी होऊ लागली आणि या माध्यमातून लोक आपल्याला लागणारी औषधेही खरेदी करु लागली. जोपर्यंत त्याला आवश्यक असणारी पूरक सायबर क्राईम डिटेक्शनची व्यवस्था आणि लॅब आपण डेव्हलप करणार नाही तोपर्यंत अजून गतीमानता येण्याची शक्यता कमी आहे.

अध्यक्ष महोदय, आजची व्यवस्था कदाचित आजपुरती पुरेशी असेल परंतु, आपल्याला पुढच्या 25 वर्षांचा विचार करावयाचा आहे. त्याबाबतचा प्रस्ताव मी गृह खात्याकडे दिला. तेथे डीसीपी ऑफिस, मुंबई शहरासाठीची सायबर लॅब, राहणाऱ्या अधिकाऱ्यांसाठीची घरे आणि एक ट्रेनिंग सेंटर असा एक प्रस्ताव मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार ॲडिशन चीफ सेक्रेटरींपर्यंत आल्यानंतर जेथे सायबर क्राईम डिटेक्शन सेंटर व्हायचे होते, तेथे अचानक काही अधिकाऱ्यांनी घरे प्रपोज केली. मुंबई शहराचे त्यामुळे नुकसान होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. आशिष शेलार.....

अध्यक्ष महोदय, माझी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे की, माझे म्हणणे ऐकून घ्यावे. अध्यक्ष महोदय मंत्री महोदयांनी आमच्याकडे लक्ष द्यावे, असे आपण मंत्री महोदयांना सूचना करावयात, ही माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, बांद्रा येथील सदर भूखंडावर हे डिटेक्शन सेंटर परत सुरु करण्याचे निर्देश माननीय मुख्यमंत्र्यांनी देऊन सुद्धा तेथे घराच्या निर्मितीचा प्रस्ताव आला असेल तर त्याबद्दलचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी करावे.

अध्यक्ष महोदय, मी केवळ माहितीसाठी सांगतो. श्री. पीटर मुखर्जीची केस खार पोलीस स्टेशन येथे डिटेक्ट झाली. या पोलीस स्टेशनची वास्तू अतिशय अपुरी आहे. सद्या पोलीस स्टेशन असलेली जागा जनावरांच्या दवाखान्यासाठी आरक्षीत आहे. जागा कमी आहे, आरक्षण नाही, पोलीस स्टेशन वाढविण्यास व्यवस्था नाही. मी विधान परिषदेचा सदस्य असल्यापासून याबाबत मागणी करीत आहे. खार येथे नव्याने पोलीस स्टेशन विकसित करणे आवश्यक आहे. याबाबत देखील मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये स्पष्टीकरण द्यावे.

अध्यक्ष महोदय, सदरहू पुस्तकातील क्र. 5 मध्ये अतिशय महत्त्वाची बाब समोर आलेली आहे. ही बाब मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. राज्य गुन्हे अन्वेषण विभागात 91 युनिट्स आहेत. प्रत्येक श्वानाला सांभाळण्यासाठी एक पोलीस उप निरीक्षक म्हणजेच डॉग मास्टर व एक पोलीस हवालदार तसेच एक पोलीस शिपाई डॉग हँडलर आहेत. याचा अर्थ गुन्हे शाखेकडे 91 युनीट्स असून राज्यात 242 श्वान असल्याचे येथे लिहिलेले आहे.

**अध्यक्ष :** तेवढे श्वान प्रशिक्षित आहेत. इतर श्वानांची संख्या जास्त आहे.

ॲड. आशिष शेलार : होय, अध्यक्ष महोदय. मी गुन्हे शाखेकडे असल्याचे म्हणत आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे. आपल्याकडे असलेले श्वान 242 आहेत. परंतु डॉग हँडलर एक पोलीस शिपाई आहे तर एक पोलीस उप निरीक्षक डॉग मास्टर आहे. 242 श्वानांना एक डॉग मास्टर आणि एक डॉग हँडलर कसे कंट्रोल करु शकेल. माझी विनंती आहे की, त्या श्वानांनाही न्याय देण्यात यावा आणि गुन्हे अन्वेषण शाखेलाही न्याय देण्यात यावा. ही संख्या वाढली पाहीजे. या पुस्तकात माहिती दिली नसेल तर ती सुधारली पाहीजे आणि ज्याने योग्य माहिती दिली नाही, त्याच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. आशिष शेलार.....

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघातील सांताक्रुझ मध्ये विदीन द स्टेट वायरलेस नेटवर्कवर कम्युनिकेशन करण्यासाठीची एसीपी ऑफीसची एक इमारत बांधून तयार आहे. त्याच कंम्पाऊंडमध्ये इंटरस्टेट म्हणजेच राज्याराज्यातील ज्या पद्धतीचे वायरलेस कम्युनिकेशन आवश्यक आहे, त्याचेही ऑफीस तयार आहे. या दोन्ही कार्यालयाचे उद्‌घाटन आपल्या काळात होणे, म्हणजेच ज्या प्रकारे निर्माण झाले तसे उद्‌घाटनही आपल्या काळात होणे आवश्यक आहे. याबाबतही मंत्री महोदयांनी स्पष्टता द्यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझी माननीय मंत्री श्री. प्रकाश महेता यांना विनंती आहे की, आपण देखील या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. राज्याचे गृहनिर्माण धोरण कधी येणार एवढाच माझा प्रश्न आहे. नवीन गृहनिर्माण धोरण येणार असेल तर सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल म्हणाले की, संक्रमण शिबीरात रहाणाऱ्या लोकांची अवस्था अतिशय गंभीर आहे. संक्रमण शिबिराचा पुनर्विकास तेथेच होऊन संक्रमण शिबिरात रहाणाऱ्या लोकांना त्याच ठिकाणी कायमची परमनंट घरे मिळणे हे सुद्धा आपण मुंबई गृहनिर्माण धोरणामध्ये न्यायरुपाने मुंबईकर जनतेला द्यावी किंवा त्या बद्दलच्या धोरणाची स्पष्टता करावी. मी मांडलेल्या बाबींवर मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये स्पष्टीकरण करावे, अशी विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. वीजय भांबळे (जिंतूर) : अध्यक्ष महोदय, 2016-2017 च्या पुरवणी मांगण्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील जनता पोलीस विभागाकडे 20 वर्षापूर्वी वेगळ्या नरजेने पहात होती. सर्वसामान्य नागरिक आपली स्वतःची तक्रार घेऊन पोलीस स्टेशनमध्ये जात होता. त्यावेळी सर्वसामान्य मानसाला न्याय मिळत होता. परंतु आज महाराष्ट्राची विशेष करुन मराठवाड्यामधील परभणी, जालना, औरंगाबाद जिल्ह्याची परिस्थिती वेगळी आहे. आपण दररोज वर्तमान पेपर वाचतो. बलात्कार, खून, रोड रॉबरी, मुलींची छेडछाड असे अनेक प्रकार मराठवाड्यात घडत असल्याचे आपण सर्वांनी पाहिलेले आहे. सर्वसामान्य माणूस आपली फिर्याद घेऊन पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर त्याची फिर्याद घेण्याचा विषय सोडाच, परंतु काही पोलीस स्टेशनमध्ये त्या फिर्यादीकडे पैशाची मागणी करण्याचे काम ठाणे अंमलदाराकडून केले जाते.

अध्यक्ष महोदय, मी माझ्या मतदार संघातील अत्यंत महत्त्वाची घटना येथे सांगणार आहे. दिनांक 1 मार्च 2016 रोजी माझ्या मतदार संघामध्ये ब्राम्हण गाव आहे. या गावामध्ये जुन्या कारणामुळे भांडण झाले. रामभाऊ सोनाजी वावळे हा सर्वसामान्य शेतकरी होता. जुन्या कारणामुळे या शेतकऱ्याचा भर दिवसा दुपारी 4.00 वाजता खून करण्यात आला. त्याच्या भावाचा देखील खून केला. त्याची पत्नी देखील तेथे होती. ही सर्व घटना 16 वर्षाच्या एका मुलाने बघितली. ब्राम्हण गावचे आणि पोलीस स्टेशनचे अंतर केवळ 2 किलोमिटर आहे. तो मुलगा घटना घडल्यानंतर पोलीस स्टेशनला फिर्याद घेऊन गेला. परंतु दुर्दैवाने 302 चा गुन्हा दाखल करण्यासाठी 16 तास लागला. त्या ठिकाणी दुघांचा मृत्यु झाला. 8 लोकांची नावे दिली असताना 16 तासानंतर केवळ 4 लोकांवर गुन्हा दाखल झाला. मयत वावळे यांची पत्नी रुग्णालयामध्ये ॲडमीट होती. तिचा देखील दुसऱ्या दिवशी मृत्यु झाला. तिच्या पोटामध्ये असलेल्या 7 महिन्याच्या मुलाचा देखील मृत्यु झाला. एका घटनेमध्ये 4 जणांची हत्त्या केली जाते आणि पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल होत नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. खरे पाहिले तर या घटना का घडत आहेत, हे मी सभागृहाला सांगणार आहे. आमच्या परभणी जिल्ह्यामध्ये अवैध धंदे जोरात सुरु आहेत.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, हा ग्रामीण भागातील मुद्दा आहे. माननीय गृहराज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. विधी व न्याय विभागाचे राज्यमंत्री देखील बाहेर गेले आहेत.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** विधी व न्याय विभागाचे राज्यमंत्री बऱ्याच वेळापासून सभागृहामध्ये उपस्थित आहेत.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, मी या विषयासंदर्भातील माहिती घेण्यासाठीच बाहेर गेलो होतो.

श्री. विजय भांबळे : अध्यक्ष महोदय, ही घटना घडणार आहे, हे पोलीस खात्याला माहीत होते. ब्राम्हण गावातील बीट जमादार श्री. देवकर आहे. ही घटना घडणार आहे, हे श्री. देवकर याना माहीत होते. माझी सभागृहाला विनंती आहे. ही घटना घडल्याच्या दरम्यान, तेथे असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचे संभाषण आरोपी सोबत होत होते. हे संभाषण तपासण्यात यावे व अशा कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्यात यावे, अशी मी यानिमित्ताने मागणी करतो. परभणी जिल्ह्यामध्ये अशा घटना सातत्याने घडण्याचे काय कारण आहे. आमच्या परभणी जिल्ह्यामध्ये अवैध धंदे जोमाने सुरु आहेत. मटका, क्लब, रेतीचा अवैध धंदा, रेशनिंगचा अवैध धंदा, गांजा इत्यादी सर्व अवैध धंदे परभणी जिल्ह्यात सुरु आहेत. हे सर्व धंदे पोलीस खात्याच्या मेहरबानीमुळे सुरु आहेत. हे सर्व धंदे पोलीस खात्याच्या मेहरबानीने सुरु असल्याचे परभणी जिल्ह्यातील सर्वसामान्य माणूस देखील म्हणत आहे. हे अवैध धंदे बंद झाले, तर घरफोड्या, खून इत्यादीला 100 टक्के आळा बसल्याशिवाय रहाणार नाही.

...DD/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय भांबळे.....

परभरणी जिल्ह्यातील पोलीस अधिकक्षक व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने सुरु असलेले अवैध धंदे थांबविण्यासाठी मंत्री महोदयांनी लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या सेलू मतदार संघातील पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दारु पिऊन पोलीस स्टेशनमध्ये येतात. हा पोलीस इन्चार्ज दारु पिऊन खुर्चीत बसतो तो फिर्याद नोंदवण्याचे कामाकाज करु शकेल काय ? सदर पोलीस निरीक्षकास तात्काळ निलंबीत करावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आभारी आहे. धन्यवाद !

---------------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील गृह व नगर विकास विभागाच्या अनुदानाच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मागील अनेक वर्षांच्या इतिहासापासून आजपर्यंत विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना अनेक लोक अनेक मागण्यांसाठी आंदोलन करीत असतात. आतापर्यंतच्या विधिमंडळाच्या अधिवेशन सत्र काळात आझाद मैदान येथे पोलीस कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय प्रथमच आंदोलन करण्यासाठी बसले आहेत. याबाबत मी माहितीचा मुद्दा सदनामध्ये उपस्थित केला होता. त्यावेळी अध्यक्ष महोदयांनी प्रशासनाने याप्रकरणी त्वरीत लक्ष घालावे, अशी सूचना केली होती. या सूचनेस अनुसरुन गृहराज्य मंत्री महोदय या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियास आझाद मैदान येथे भेटून आले होते. त्यांच्या मागण्यातील काही बाबी धोरणात्मक आहेत व काही बाबी अतिशय महत्वाच्या आहेत. माझ्या मतदार संघातील मरोळ पोलीस कॅम्प मधील पोलीस वसाहतींच्या इमारतींची अतिशय दुरवस्था झालेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदरहू इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी गृह विभागाकडे साडे सात कोटी रुपयांची मागणी केली आहे. याबाबीचा उल्लेख मी मागील वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यावर बोलताना सभागृहामध्ये केला होता. साडेसात कोटी रुपये दुरुस्तीवर खर्च करण्याऐवजी मरोळ पोलीस वसाहतीच्या बाजूस असलेल्या रिकाम्या जागेवर 300 चौ.मीटरच्या 100 खोल्यांची नवीन इमारत बांधणे शक्य आहे. त्यासंदर्भात मुख्यमंत्री महोदय व गृह विभाग पुढाकार घेईल काय, अशी विचारणा त्यावेळी मी केली होती. यावर्षी सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पामध्ये मरोळ पोलीस कॅम्पसाठी साडेसात कोटी रुपये तरतूद करणे आवश्यक होते परंतु त्याकरिता एकही रुपया उपलब्ध करुन देण्यात आला नाही. गृह विभागाच्या अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेद्वारे मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करणार आहे. मरोळ पोलीस कॅम्प येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या माता-भगिनी आझाद मैदान येथे उपोषणासाठी बसलेल्या आहेत. त्यांच्या हातातील पोस्टरवर छताच्या सळ्या बाहेर आलेले, छत कोसलेले, खिडक्या उद्ध्वस्त झालेले चित्र असून अशी दुरवस्था असलेल्या इमारतीमध्ये ते राहत आहेत. याप्रकरणी सरकार धोरणात्मक बाबी संदर्भात कारवाई करु शकत नसले तरी त्यांच्या इमारतीच्या दुरुस्तीकडे लक्ष देण्यात यावे व या पोलीसांकरिता नव्याने घरे बांधून देण्यात यावीत, अशी माझी विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..3

श्री.रमेश लटके.....

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभागाच्या अनुदानाच्या मागण्यावर मी बोलणार आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी फेरीवाल्यांचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला होता. नगरविकास विभागाने फेरीवाला उप विधी, सन 2009 मध्ये तयार केला होता. यासंदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने सन 2003 मध्ये निर्देश दिले होते. या उप विधीची अंमलबजावणी सन 2009 मध्ये करीत असताना विभागाने असे ठरविले होते की, ज्याठिकाणी महानगरपालिका असतील तेथे महापौरांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करुन वॉर्ड स्तरावर प्रभाग समिती अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली समिती गठीत करण्यात यावी. सन 2009 पासून सन 2016 पर्यंत याप्रकरणी मुंबई महानगरपालिकेने कोणतीही अंमलबजावणी केली नाही. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी उल्लेख केला होता की, माहे ऑक्टोबर, 2015 मध्ये माननीय मुंबई उच्च न्यायालयाने एक निर्णय दिला होता. त्यानुसार 1 मे, 2014 पर्यंतचे खाण्या-पिण्याचे पदार्थ विकणारे फेरीवाले वगळून जे पात्र फेरीवाले आहेत त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये. आज ही वेळ का आली ? सन 2009 साली नगरविकास विभागाने महानगरपालिकेला निर्देश दिल्यानंतर पात्र फेरीवाल्यांचा शोध घेऊन त्यांना फेरीवाल्या विभागामध्ये स्थलांतरीत करण्यास सांगितले होते. त्यांनी हे काम मागील 7-8 वर्षात केले असते तर आज कारवाई करण्याची गरज भासली नसती.

अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेमध्ये आलेल्या नवीन आयुक्तांनी पदपथ मोकळे करण्याचे आदेश काढले आहेत. स्टेशन व शाळेच्या परिसरातील 100 ते 150 मीटर क्षेत्रातील हॉकर्स दुसऱ्या फेरीवाल्या विभागास स्थलांतरीत करण्याचे अशाच प्रकारचे निर्देश माननीय सर्वोच्च न्यायालय व माननीय उच्च न्यायालयानेही दिलेले आहेत. मी ज्या विभागाचे प्रतिनिधीत्व करतो त्या विभागाचे सहायक आयुक्त श्री.देवेंद्र कुमार जैन आहेत. त्यांनी अंधेरी स्टेशनमधील 17 स्टॉल बाहेरील फुटपाथवर आणून लावले आहेत. हे स्टॉल टॉग्लर किंवा हॉकर्स स्टॉल नाहीत. हे पीएफपी ॲनेक्श्चर असलेले स्टॉल अंधेरी स्टेशनच्या बाहेर फुटपाथवर आणून लावण्यात आले आहेत. अशा प्रकारचे काम सहायक आयुक्तामार्फत करण्यात येत आहे. आपण स्वच्छ भारत अभियान राबवित आहोत. या सहायक आयुक्तांनी एक सुलभ शौचालय तोडून त्याजागेवर होर्डिंग

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रमेश लटके.....

उभे केले आहे. स्वच्छ भारत अभियानाची सहायक आयुक्त अशा प्रकारे काळजी घेत आहेत. या सहायक आयुक्तांना केळीवाला किंवा फळभाजीवाला हॉकर दिसला तर ते गाडीतून उतरून हॉकरची पाटी फेकून देतात. अशा प्रकारच्या राजेशाही पध्दत व बादशाही पध्दतीने ते वागतात. फेरीवाला या धंद्यातून आपली उपजिविका भागवत असतो. त्याला स्थलांतरीत करावयाचे असेल तर शासनाने त्यांची कायमस्वरुपी व्यवस्था करावी. माननीय सर्वोच्च न्यायालय, राज्य व केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या डायरेक्शनचे पालन मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येत नाही.

अध्यक्ष महोदय, देवनार डम्पींग ग्राऊंड संदर्भात सदनामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. महानगरपालिकेचे दोन अतिरिक्त आयुक्त सदनातील अदृश्य मानल्या जाणाऱ्या गॅलरीमध्ये बसलेले आहेत. त्यांचे काम अतिशय चांगले आहे. आज आपण घन कचरा व्यवस्थापनावर कोट्यावधी रुपये खर्च करतो. सुका कचरा व ओला कचरा टाकण्यासाठी स्टीलच्या कचरापेट्या मुंबई शहरामध्ये सर्वत्र लावण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भात माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांना सांगू इच्छितो की, मुंबई शहरातील सुका कचरा व ओला कचरा वाहून नेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली नाही. हैद्राबाद पॅटर्न व दत्तक वस्ती योजनावाले सुका कचरा व ओला कचरा घेऊन जातात व एकाच ठिकाणच्या डब्यामध्ये टाकतात. त्यानंतर तो एकत्रितरित्या डम्पींग ग्राऊंडवर टाकण्यात येतो. यास कोणताही पक्ष जबाबदार नसून प्रशासन जबाबदार आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये दरवेळी कोणाची सत्ता आहे यावर ज्यावेळी टिका होते त्यावेळी मला दु:ख होते. कारण ज्या प्रशासनाने सदर जबाबदारी पार पाडली पाहिजे त्यास जबाबदार धरण्यापेक्षा आपण आपआपसात एकमेकांना जबाबदार धरतो. प्रशासन प्रस्ताव तयार करुन आणते व त्यास स्थायी समिती व सभागृहाकडून मान्यता देण्यात येते. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर त्याच्यावर देखरेख ठेवणे, त्याची बिले तयार करणे, अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. सत्ताधारी कोण आहे व कोण नाही यावर टिका करुन नये. सर्व आमदार व लोकप्रतिनिधी यांनी प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याकरिता एकत्र आले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील ओ.सी.च्या मुद्यावर बोलले. ओ.सी.देण्याचे काम नगरसेवक व आमदार करीत

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रमेश लटके......

नाहीत. याप्रकरणी सत्ताधारी पक्षाचा प्रश्न कुठे येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील मुंबई शहराचे पालक मंत्री होते. त्यावेळी त्यांनी या गोष्टी करुन घेतल्या असत्या तर आज हे सर्व बोलण्याची वेळ आली नसती. सत्तेवर न जाता लोकप्रतिनिधींनी प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याकरिता एकत्र येण्याची आवश्यकता आहे.

EE-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रमेश लटके....

शेवटचा मुद्दा सामान्य प्रशासन विभागाचा सांगतो. विधीमंडळ सदस्यांसाठी आणि संसद सदस्यांसाठी सामान्य प्रशासन विभागाने अनेक वेळा जी.आर. काढले आहेत. त्या जी.आर.चा उल्लेख सतत होत असतो. त्या जी.आर.प्रमाणे आमदार, खासदारांनी पत्र व्यवहार केल्यानंतर ज्याप्रकारे सामान्य प्रशासन विभागाने गाईडलाईन्स दिलेल्या आहेत, त्या प्रकारची कार्यवाही करुन जर उत्तर प्राप्त झाले तर सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू यांच्यासारखा संताप व्यक्त करण्याची वेळ येणार नाही. समजा त्यांनी उत्तर दिले नाही किंवा कार्यवाही केली नाही तर त्याच्याविरुध्द कशी कारवाई करायची हे त्या जी.आर.मध्ये लिहिलेले आहे. महाराष्ट्र शासनातील सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आजपर्यंत आमदारांनी मागणी केल्यानंतर अशी शिस्तभंगाची कोणती कार्यवाही केली आहे काय आणि त्याची नोंद त्या संबंधिताच्या सेवापुस्तकात नोंद केली आहे काय, म्हणून माझी अशी मागणी आहे की, शिस्तभंगाची कारवाई कशी करायची हे वरिष्ठ अधिकाऱ्यांना शिकविण्यात यावे, मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार व्यक्त करतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

2......

श्री. धैर्यशील पाटील (पेण) : आदरणीय अध्यक्ष महोदय, गृह विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे. 25 ऑगस्ट 2003 रोजी मुंबईमध्ये बॉम्ब ब्लास्ट झाल्यामुळे संपूर्ण मुंबई हादरली होती. साधारणतः 56 लोकांचे जीव त्या ठिकाणी गेले आहेत. आंतरराष्ट्रीय पडसाद या घटनेचे उमटले आहेत. मुंबई पोलिसांचा तपासातील लौकिक पाहून चांगले गृह खाते म्हणून या ठिकाणी कामी आला आणि केवळ 5 दिवसामध्ये आरोपी पकडले गेले. त्यांच्याकडून जिलेटीन आणि इतर स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस खात्यातील या मंडळींनी जी चांगली कामगिरी केली त्याचे कौतुक म्हणून त्यांना एक्सीलिरेटेड प्रमोशन जाहीर केले. यामध्ये पी.आय.वाणकोटी, पी.आय.कांदळकर, नारायण पाटील, प्रमोद शिंदे अशा पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. शासनाने हा प्रस्ताव सादर केला असता क वर्गातील हा प्रस्ताव असल्यामुळे त्यांना प्रमोशन देण्याची प्रक्रिया डी.जी.महाराष्ट्र यांनी करावयाची होती. शासनाने त्यांना या संदर्भात डी.ओ.लेटर पाठविले होते. परंतु माशी कुठे शिंगली हे कळाले नाही. 2003 साली ज्या मंडळींनी आपले कौशल्य पणाला लावले, ज्यांनी आपले कर्तव्य व्यवस्थितरित्या पार पाडले आणि ते कार्य पार पाडले म्हणून त्यांनी शासनाकडे काही मागितले नव्हते तर शासनाने कौतुकाने त्यांच्या धाडसाला उत्तेजन म्हणून 2003 साली प्रमोशन देण्याचे जाहीर केले होते. आता सत्तेमध्ये असलेल्या मंत्री महोदयांनी मधल्या काळामध्ये ही भूमिका मांडली. यांच्यासाठी मागणीकर्ते आता सत्तेमध्ये आहेत आणि 2003 साली ज्यांनी शौर्य गाजविले, आपले काम चोख बजाविले आणि त्या घटनेनंतर 15 दिवसांनी मुंबईतील गणेशोत्सवाचा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी कौशल्य गाजविले त्यांना 2003 साली शासनाने स्वतःहून या ठिकाणी त्यांचे प्रमोशन जाहीर केले. पण आता 13 वर्षे झाल्यानंतरही त्यांच्या पदरामध्ये काहीही पडले नाही.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी गृह विभागाचे राज्यमंत्री बसले आहेत, त्यांना मी विनंती करेन की, जर उद्या एखाद्याने त्याचे कर्तव्य व्यवस्थितरित्या पार पाडले असेल तर ते त्याच्या इज्जतीला आणि इभ्रतीला शोभेल असे करावे. आपण बक्षिस जाहीर करायचे आणि ते त्याला द्यायचे नाही तर हा त्याने केलेल्या कर्तव्य पूर्ततेचा अपमान आहे. म्हणून मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणातून अशी अपेक्षा व्यक्त करील की, यामध्ये ते योग्य भूमिका घेतील आणि 13 वर्षानंतर का होईना त्यांना त्यांचा मान मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धैर्यशील पाटील......

अध्यक्ष महोदय, नगरविकास या विभागावर बोलताना रायगड जिल्ह्यातील पेण येथील शेतकऱ्यांच्या जमिनी एमएमआरडीए या संस्थेने कुटीर उद्योगासाठी घेतलेल्या आहेत. 32 वर्षे झाले तरी शेतीचे संपादन झालेले नाही. शेतकऱ्यांना मोबदला मिळालेला नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी घ्यावयाच्या असतील तर त्यांना योग्य तो मोबदला द्यावा आणि घ्यावयाच्या नसतील तर त्यावरील आरक्षणे उठविण्यात यावीत, ही भूमिका मी या ठिकाणी मांडतो. या भूमिकेला योग्य ते उत्तर मंत्री महोदयांकडून मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

-------

4.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री आसिफ शेख (मालेगांव मध्य) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभाग पर मुझे बोलना है. मालेगांव महानगरपालिका का एमआरटीपी ॲक्ट की नियमावली महासभा में मंजूर करके महाराष्ट्र शासन को नगरविकास विभाग में भेजा है. दो साल हो जाने के बाद भी उसको अभी तक मान्यता नहीं मिली है. शासन ने ऐसा निर्णय लिया कि पूरे महाराष्ट्र की महानगरपालिका का एमआरटीपी ॲक्ट मॉडेल रूल बनाने के लिए शासन ने निर्णय लिया. दो साल से अभी तक निर्णय नहीं लिया गया. विकास में सबसे बड़ी कोई रूकावट होती है तो वह एमआरटीपी ॲक्ट के अंतर्गत जितनी परमिशन हमको लेनी चाहिए, उसके लिए परमिशन नहीं मिलती है. सरकार से विनती है कि एमआरटीपी ॲक्ट का जो मॉडल शासन के पास पेंडिंग है, उसको जल्द से जल्द लागू करके महाराष्ट्र की जनता को और शहरी भाग के लोगों को न्याय देने का काम सरकार ने करना चाहिए. नगरविकास विभाग में दो दिन पहले ही मालेगांव महानगरपालिका का एक प्रस्ताव... महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान के अंतर्गत 27 करोड़ का प्रस्ताव...महानगरपालिका ने यह हमी भरी है. उनके हिस्से का खर्चा महानगरपालिका देने के लिए तैयार है. दो दिन पहले ही नगरविकास विभाग को प्रस्ताव पेश किया है. सरकार से विनती है फ्लायओव्हर ब्रिज का जो प्रस्ताव दिया है, आग्रा रोड मालेगांव में दिया है. वहां पर हर महीने अपघात होते है. 35 हजार स्कूल के बच्चों की रोड क्रॉस करने के समय मृत्यू होती है. सरकार वन टाईम में पैसा नहीं दे सकती है तो मुझे कुछ बोलना नहीं है. लेकिन कम से कम तीन साल में वह पैसा मिलता है तो मालेगांव की बहुत बड़ी समस्या हल हो सकती है.

अध्यक्ष महोदय, गृह विभाग के बारे में कहना चाहूंगा कि आज महाराष्ट्र में किस तरह की परिस्थित है. ये सरकार आने के बाद कानून व्यवस्था की स्थिति खराब हो रही है, मुझे दुख के साथ कहना पड़ रहा है कि पुलिस हमारी और महाराष्ट्र की जनता की सुरक्षा करते है. लातूर में एक घटना हुई. वहां पर पुलिस विभाग के अधिकारियों के साथ मामला खराब करने की कोशिश की. मारहाण करने का काम किया. इस तरह की महाराष्ट्र की कानून व्यवस्था की स्थिति है. नंदूरबार में हर दो-तीन महीने में, एक साल में चार फसाद हुए. मैंने वहाँ का दौरा किया. वहां पर छोटे छोटे बच्चों को भी मारा गया. पुलिस ने महिलाओं को भी मारा. 65 साल के बुजुर्ग को

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री आसिफ शेख.......

भी पुलिस ने मारा. वहां पर कई लोगों के घर जलाए गए. कई लोगों का सामान लूट लिया गया. ऐसी घटना वहां होने के बाद भी, वहां इससे पहले भी चार दंगल होने के बाद भी वहां का प्रशासन इस बात को क्यों नहीं समझता है कि ऐसी घटना क्यों बार बार हो रही है. इसके पीछे कौनसी संगठना, कौनसे लोग काम कर रहे है, इस बारे में पुलिस प्रशासन क्यों ध्यान नहीं देता है. वहां पर जो जिले का एस.पी. है मैं उनसे दंगल के समय जाकर मिला. मैंने उनसे निवेदन किया कि यहाँ पर ऐसी स्थिति हो रही है, वे मीटिंग लेते है लेकिन अवाम की नहीं सुनते है, कहते है कि मेरा जो हुक्म रहेगा वह सुनना पड़ेगा. जब तक हर धर्म, हर समाज के लोगों को साथ में नहीं लिया जाएगा, उनकी बात नहीं सुनी जाएगी तब तक शांति कायम नहीं हो सकती. कानून व्यवस्था की स्थिति सुधरनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र में पुलिस के 15 हजार पद रिक्त है. यहां पर श्री खडसे साहब उपस्थित है. मैं उनसे विनती करना चाहता हूं कि मायनॉरिटी के जो नौजवान युवक है, उन्होंने अच्छी शिक्षा लेने के बाद भी पुलिस विभाग में नौकरी के लिए अर्ज करते है तो उनको न्याय नहीं मिलता है. मुस्लिमों का आरक्षण मिलना चाहिए इसके लिए आप ओपिनियन ले रहे है. मेरी सरकार से विनती है कि पुलिस विभाग में जब आप भर्ति करेंगे तो वहां पर आरक्षण दिया जाएगा तो एक अच्छा संदेश इस सरकार की तरफ से जाएगा. ऐसे समाज को एक न्याय मिलेगा. मेरी विनती है कि इस बारे में विचार किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण विभाग के बारे में कहना चाहता हूं कि मालेगांव शहर में घरकुल योजना के अंतर्गत 16 हजार मकान एचएसडीपी योजना के माध्यम से बनकर तैयार है. वहां पर पानी पहुंच रहा है, सड़के बन रही है. वहां पर सर्वे हुआ है. वहां पर अतिक्रमण हटाकर 11 हजार लोग जाने वाले है. महानगरपालिका ने एक ठराव पारित किया. यशवंतराव चव्हाण ओपन युनिवर्सिटी से जिन लोगों ने डिप्लोमा प्राप्त किया, जो यंत्रमाग के कामगार है, मुकादम है, साईजर है, इस तरह के जो कामगार वर्ग के लोग है, उनके बारे में ठराव पारित किया है कि उन लोगों को वहां पर घरकुल मिलना चाहिए. मैं मंत्री महोदय को निवेदन दे चुका हूं. वे एक अच्छी भूमिका निभा रहे है. मेरी विनती है कि उन लोगों को भी न्याय देने का काम सरकार के



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री आसिफ शेख....

माध्यम से होगा, ऐसी मैं अपील और विनती करता हूं. मैंने जो मांगे यहां पर पेश की है, मुझे विश्वास है कि सरकार इस बारे में अच्छा निर्णय लेगी. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

-----------

....एफएफ-2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** शासकीय जमीन आणि नझूल जमीन यांची विक्री किंवा हस्तांतरण करणे

**मु.शी. :** शासकीय जमीन आणि नझूल जमीन यांच्या विक्री किंवा हस्तांतरण करणे संबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभा नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

............

.......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे की, प्रशासकीय कामाकाजाची गतिमानता वाढविणे आणि व्यवसाय सुगमता या धोरणाचा भाग म्हणून प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीमधील सदनिका अथवा इमारतीच्या कोणत्याही निवासी, वाणिज्यिक किंवा औद्योगिक परिवस्तूच्या विक्री अथवा हस्तांतरण, अनुषंगिक अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. यापूर्वी या सर्व सदनिका हस्तांतरित करणे, रुपांतरीत करणे, विक्री करणे, बदल करणे, अन्य संस्था यांची विक्री करीत असताना सरकारची परवानगी लागत होती. यापुढे असे प्रस्ताव मंत्रालयामध्ये येण्याची आवश्यकता नाही. जिल्हाधिकारी स्तरावर यासंदर्भातील कागदपत्रे तपासून निर्णय घेण्याचे अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

------------

.......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** अनुदानाकरिता मागण्या

**मु.शी :** सन 2016 -2017 च्या अनुदानाकरिता मागण्या :

1) सामान्य प्रशासन विभाग

2) गृह विभाग

3) नगरविकास विभाग

4) विधी व न्याय विभाग

5) गृहनिर्माण विभाग

(....चर्चा पुढे सुरु

डॉ.मिलिंद माने (नागपूर-उत्तर) : अध्यक्ष महोदय, मी आज अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभा आहे. विशेषत: मी नागपूर शहराशी संबंधित आहे. नागपूर शहरामध्ये गृह विभागाच्या संदर्भाने अनेक चांगल्या बाबी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत काही वक्तव्ये या ठिकाणी केली. नागपूर शहरातील आमच्या पक्षाचे काही पदाधिकारी गुन्हेगारी कारवाईमध्ये गुंतलेले आहेत आणि त्यांच्यावर कारवाई होत नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना या माध्यमातून सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री आमच्या नागपूर शहराचे असल्यामुळे असे बोलले जाते. पण आमच्या शहरामध्ये टाचणी पडली तरी आवाज होतो अशी एकंदरीत परिस्थिती आहे. माननीय मुख्यमंत्री आमच्या शहरावर चांगले लक्ष ठेवून आहेत. पक्षातील असोत वा पक्षाबाहेरील असोत किंवा गुन्हेगारी क्षेत्रामध्ये वावरणारे कोणीही असो. त्यांच्यावर वचक ठेवण्याचे काम नागपूर शहरामध्ये झालेले आहे. अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना मोक्काखाली अटक करण्यात आलेली आहे आणि अनेकांना अटक करण्याचे सत्र सुरु आहे. कायदा आणि सुव्यवस्था नागपूर शहरामध्ये अगदी चांगली आहे.

अध्यक्ष महोदय, शहराचा वाढता व्याप लक्षात घेता मी माननीय गृहमंत्री यांना विनंती करतो की, मी ज्या विधानसभा क्षेत्रामध्ये आहे जरीपटका पोलीस स्टेशनाचा व्याप फार मोठा आहे. नागपूर शहरामध्ये गुन्ह्याचे सर्वात जास्त प्रमाण जरीपटका या हद्दीमध्ये आहे. जर या

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.मिलिंद माने.......

पोलीस स्टेशनचे दोन विभाग करण्यात आले आणि नारी पोलीस स्टेशन नव्याने गठीत झाले तर कायदा व सुव्यवस्था पाळण्यासाठी चांगली मदत होणार आहे. मागील अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री महोदयांचे शहर म्हणून नागपूर शहराला बदनाम करण्याचा प्रयत्न केला गेला. नागपूर शहरातील गुन्हेगारीचे प्रमाण आता फार कमी झालेले आहे. छोटे मोठे जे गुन्हे घडतात ते सर्व महाराष्ट्रात कमी अधिक फरकाने घडतच असतात. यावर पोलीसांचा चांगला वचक आहे. गृहनिर्माण विभागाला एक विनंती करु इच्छितो की, माझ्या विधानसभा मतदारसंघ मागासलेला असून याठिकाणी झ ोपडपट्टी जास्त असल्याने गरीबांची संख्या 80 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्र शासनाच्यावतीने गरीबांना घरे मिळाली पाहिजेत अशी माझी मागणी आहे. गरीबांसाठी असलेल्या घरांची योजना आमच्या शहरामध्ये कार्यान्वित झालेली नाही. ती लवकरात लवकर कार्यान्वित व्हावी अशी माझी गृहनिर्माण खात्याला विनंती आहे.

GG-1...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. मिलिंद माने .........

सर्वात महत्वाचा आमच्या शहरामध्ये एक विषय आहे तो म्हणजे नाग नदी, पिवळी नदी आणि पोहरा नदी, अशा तीन नदया नागपूर शहरातून वाहत जाऊन कन्हान नदीला मिळतात. कन्हान नदी पैनगंगा नदीला मिळते आणि ते नदयांचे पाणी या गोसीखुर्द धरणामध्ये जमा होते व त्या धरणातील पाणी अत्यंत प्रदुषित झालेले आहे. त्यामुळे नागपूर शहरामध्ये सिवरेज ट्रीमेंट प्लँटची अत्यंत आवश्यकता आहे. नाग नदी, पिवळी नदी आणि पोहरा नदी या तिन्ही नदयांचे शुध्दीकरण करुन सिवरेज ट्रीटमेट प्लॅट होणे गरजेचे आहे. गोसीखुर्द धरणातले पाणी दुषित झाल्याने मासे मरण पावतात, जनावरे मरण पवतात, अनेक लोकांना सुध्दा इन्फेक्शन झाल्या कारणानाने लोकांच्याही स्वास्थाचा प्रश्न ऐरणीवर आहे. पाणी गोसीखुर्द धरणातून जाऊन संपूर्ण विदर्भामध्ये जाणार त्याची काळजी घ्यावी, अशी माझी विनंती आहे. मागच्या पावसाळयामध्ये नागपूर शहरामध्ये पूराची परिस्थिती निर्माण झाली होती. त्या पुरामध्ये 5 लोकांचा मृत्यू झाला. अनेक लोकांच्या घरामध्ये पाणी घुसले, नागपूर शहरातील नाल्याच्या काटावर राहणारे लोक आहेत. त्यांचे पुनःस्थापन झाले पाहिजे. त्यांना घरे मिळाली पाहिजेत. नाल्यांचे रुंदीकरण, खोलीकरण झाले पाहिजे. आमच्या शहरातील त्या परिसरातील या नाग नदी, पिवळी नदी आणि छोटे मोठे त्या नाल्यांना संरक्षक भिंत घातली पाहिजे, अशी एक माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, उत्तर नागपूर शहरामध्ये विशेषतः जागा खूप मोठी आहे. जर त्या जागेमध्ये प्रशासकीय इमारती झाल्या तर ते माझ्या मतदार संघासाठी अत्यंत वैभवाची बाब होईल. या माझ्या सूचना आपण मला मांडू दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

..........

......2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संदीप नाईक ( ऐरोली ) : अध्यक्ष महोदय, मी सन 2016-17 च्या नगर विकास व गृह विभागाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, पृष्ठ क्रमांक 17 मागणी क्र. एफ-2. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून देशातील 100 शहरांचा विकास होत असताना पहिल्या टप्यामध्ये महाराष्ट्राच्या दोन शहरांचा म्हणजे सोलापूर आणि पुणेचा समावेश करण्यात आलेला आहे. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून शहरांचा विकास होत असताना एस.पी.व्ही.ची भूमिका काय असेल, याबद्दल स्पष्टता नसताना महानगरपालिकेने आपल्या सूचना त्या प्रस्तावामध्ये मांडल्या. परंतु अद्याप त्याच्यामध्ये स्थानिक लोक स्वराज्य संस्था, लोकप्रतिनिधी यांचे हक्क अबाधित आहेत का ? याच्याबद्दलची स्पष्टता अजून आलेली नाही. त्यामुळे जर व्हायब्लीटी गॅप भरला नाही तर वाढविण्यात येणारा कर, किंबहूना त्यामध्ये लागणारा निधी हा देखील महानगरपालिकेच्या माध्यमातून घेतला जाईल. त्यामुळे मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये याबाबतचा खुलासा करावा.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाच्या माध्यमातून स्मार्ट सिटी होत असताना मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून नवी मुंबई येथे सिडको ब्राऊन फिल्ड, सात शहरांचा विकास करण्याचे नियोजन झाले. नवी मुंबई येथे साऊथ नवी मुंबई आणि एअर पोर्ट हे फक्त सिडकोच्या माध्यमातून प्राधान्याचे ठरलेले आहे. ज्या शेतक-यांच्या जमिनी सिडकोने घेतल्या त्यातून सिडकोची निर्मिती झाली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्राचा सिडकोला संपूर्णपणे विसर पडलेला आहे. एखादे महिलांचे सक्षमिकरणाचे केंद्र, एखादे हॉस्पिटल, एखादे पोलीस स्टेशन, ब्रिज, रस्ता असेल, किंबहूना साडेबारा टक्क्यांच्या भूखंडाचे वाटप हा प्रकल्पग्रस्तांचा हक्क आहे, तेथे देखिल प्राधान्य फक्त साऊथ नवी मुंबईला दिले जाते. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, सिडकोने ज्या पध्दतीने साऊथ नवी मुंबईला प्राधान्य दिले आहे. त्याच

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर )**

श्री.संदीप नाईक ........

प्रकारचे नवी मुंबई महानगरपालिकेच्या सिडको क्षेत्रामध्ये जे नागरीकांचे, प्रकल्पग्रस्तांचे अधिकार आहेत. त्याबाबतच्या सूचना सिडकोला द्याव्यात. तेथे एअरपोर्टची निश्चित निर्मिती होईल. एअरपोर्टची निर्मिती झाल्यानंतर एअर ट्राफिक कमी होईल. परंतु त्याच्या माध्यमातून सुरुवातीला नवी मुंबई सारख्या शहरामध्ये गाडयांची रहदारी वाढणार आहे. त्यामुळे नवी मुंबई, ऐरोली आणि मुंबई यांना जोडणारा कोस्टल रोड होणे गरजेचे आहे. त्याचा समावेश करावा अशी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, पूर्व विभागावर बोलत असताना मी सांगू इच्छितो की, नवी मुंबई शहर रोज वाढते आहे. जे.एन.पी.टी., ए.पी.एम.सी. आणि एम.आय.डी.सी. या परिसरामध्ये अतिरिक्त पोलीस दलाची आवश्यकता आहे. त्याकरिता लागणारे साधन, गाडया, किंबहुना पोलीस दलाची संख्या वाढविली पाहिजे. आज आपण कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर जेव्हा प्रवेश करतो त्यावेळेस ते पोलीस स्टेशन आहे की, डंम्पींग यार्ड आहे हा प्रश्न आम्हाला पडतो. कारण पकडलेल्या गाडया, सामान, हे त्या पोलीस स्टेशनमध्ये ठेवले जाते. तेथे गेल्यानंतर तक्रार नोंदवायला, गाऱ्हाणे सांगायला, तशा प्रकारचे वातावरण तिकडे नसते. स्मार्ट सिटीचे नियोजन करत असताना नवी मुंबई सारख्या तालुक्याच्या ठिकाणी, प्रत्येक राज्यामध्ये प्रत्येक ठिकाणी हस्तगत केलेले सामान सुरक्षित रहावे, ज्यांचे आहे त्यांना सुरक्षित प्रकारे त्यांना डिलिव्हरी मिळावी, याकरिता सेंट्रलाईझ नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. गृह विभागाच्या माध्यमातून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे हे प्रत्येक शहरामध्ये लावले गेले पाहिजे. काही शहरांनी तो खर्च स्वत: उचलेला आहे. त्यामध्ये नवी मुंबई शहराने खर्च उचलला आहे. तरी देखिल तेथे काही ब्लॅंक स्पॉट आहेत, त्याकरिता शासनाकडून महानगरपालिकेला अर्थ सहाय्य मिळणे अत्यंत गरजेचे आहे. अशा प्रकारचे अर्थसहाय्य शासनाच्या माध्यमातून त्या शहरांना द्यावे अशा प्रकारची मागणी करतो. मी उपस्थित केलेल्या मुद्यांबद्दल मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये तसा उल्लेख करावा अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

........

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : आता सायंकाळी 4.00 वाजता रिप्लाय सुरु करायचा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी फक्त सूचना कराव्यात.

श्री.राजेश क्षिरसागर ( कोल्हापूर उत्तर ) : अध्यक्ष महोदय, मी गृहनिर्माण, नगर विकास विभागांच्या अनुदान मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभा आहे. अलिकडे नाशिक जिल्हयामध्ये स्वतंत्र विदर्भाची भाषा करणाऱ्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा व भाजपाच्या नेत्या श्रीमती विजया राटकर यांनी नाशिक येथे महिला मेळावा घेतला होता. त्या मेळाव्यामध्ये तेथील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करुन त्याला विरोध केला. या आंदोलनाला विरोध म्हणून तिथल्या कार्यकर्त्यांवर कलम 395 म्हणजे दरोडे टाकल्याचे गुन्हे दाखल केले. हा काय प्रकार आहे ? एखाद्या गोष्टीला विरोध करत असताना त्या ठिकाणी शिवसैनिकांवर अशा प्रकारचे गुन्हे दाखल केले असतील तर ते अत्यंत चूकीचे आहे. आज 7 तारखेपर्यंत कार्यकर्त्यांना पोलीस कोठडी मिळालेली आहे. मला प्रश्न पडलेला आहे की, आम्ही विरोधात असताना आंदोलने केली, मागच्या सत्तेने आमच्यावर विनयभंगासारखे गुन्हे दाखल केले. त्याबद्दल आम्हाला फिकीर नाही. आज सत्तेमध्ये असताना एखाद्या गोष्टीला विरोधकरित असताना शिवसैनिकांवर अशा प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल करणे हे अत्यंत चूकीचे आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, याकडे तातडीने लक्षवेधणे गरजेचे आहे. अशा प्रकारे परत कुठली घटना घडू नये, याबाबत निश्चितपणाने प्रयत्न कराल, अशी माझी भावना आहे. सन 2013 च्या सावर्जनिक गणेशोत्सव विसर्जनाच्या मिरवणूकीमध्ये तत्कालीन ॲडीशनल एस. पी. ज्योती प्रयासिंग यांनी माझ्यावर आणि माझ्या कार्यकर्त्यांवर विनाकारण लाठी चार्ज केला. काही जणांवर विनयभंगाचे गुन्हे दाखल केले. मी अनेकवेळा, माझी अध्यक्ष असतील, राज्याचे मंत्री महोदय असतील यांच्याकडे या गोष्टीची विचारणा केली.

HH-1..........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेश क्षिरसागर .....

याकरिता मी हक्कभंग दाखल केला होता तसेच लक्षवेधी सूचनाही दाखल केली होती. लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना माननीय मुख्यमंत्री यांनी सांगितले होते की, आयएसएस, आयपीएस अधिकाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. एक महिन्यामध्ये कारवाई करण्यात येईल असे जुलै 2015 च्या पावसाळी अधिवेशनात उत्तर दिलेले आहे. श्रीमती ज्योतीप्रिया सिंग यांची कारकिर्द अत्यंत वादग्रस्त आहे. त्या प्रोबेशनवर अहमदनगरमध्ये असताना त्यांचे अनेक प्रताप उघडकीस आले आहेत. जालन्यामध्ये एका तरुणीवर बलात्कार झाला, श्रीमती ज्योतीप्रिया सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली तेथे तपास सुरु असताना ज्याने बलात्कार केला त्याचा फोन आला, त्या मुलीचा मोबाईल तेथे राहिला होता. श्रीमती ज्योतीप्रिया सिंग यांनी या तरुणीचा वापर पुन्हा त्या आरोपीला पकडण्यासाठी केला. त्या मुलीला सांगण्यात आले की, पुन्हा तेथे मोबाईल घेण्यास जा. पण आरोपीने त्या तरुणीला पकडून पुन्हा बलात्कार केला. अशा चुकीच्या पध्दतीने तपास करणाऱ्या श्रीमती ज्योतीप्रिया सिंग यांच्यावर बडतर्फीची कारवाई व्हावी अशी मी सदनामध्ये मागणी केलेली आहे. श्रीमती ज्योतीप्रिया सिंग हया जेव्हा हैद्राबादमध्ये ट्रेनिंग पिरेडमध्ये होत्या तेव्हा त्यांनी दारु पिऊन धिंगाणा घातला होता, याच्या क्लिप आज देखील आपण पाहू शकता. त्यावेळी तेलगू चॅनलवर या क्लिप दाखविण्यात आल्या होत्या. असे अधिकारी महाराष्ट्राची बदनामी करीत असतील तर निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री यांनी एक महिन्यात कारवाई करण्याचे आश्वासन मला दिलेले असताना अजूनही या सदनातील सदस्याना न्याय मिळत नाही. मी अनेकवेळा हा मुद्दा मांडलेला आहे. माझी विनंती आहे की, तातडीने त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, कोल्हापूरमध्ये पोलिसांच्या घरांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. यामध्ये देखील शासनाने लक्ष घालणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, म्हाडाच्या घरांची लॉटरीची जाहिरात एप्रिल 2011 मध्ये आली होती. याची सोडत दिनांक 31 मे 2011 रोजी झालेली आहे. उच्च उत्पन्न गटाच्या घरांची किंमत जाहिरातीमध्ये 35 लाख रुपयांच्या आसपास दाखविण्यात आली हाती. जाहिरातीची व सोडतीची

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेश क्षिरसागर .....

प्रक्रिया पूर्ण झाली. पण या गाळयाचा ताबा घेण्याच्यावेळी म्हाडाने 50 लाख रुपये किंमत केली. हे कसे शक्य आहे ? सर्वसामान्य माणूस घर विकत घेत असताना 35 लाख रुपये जमा करताना कुटूंबातील दागिणे, कर्ज व उत्पन्नाची ताळमेळ घालून घराची रक्कम पूर्ण करीत असतो. कोणतेही कारण न दाखविता शासनाने अचानक 15 लाख रुपये वाढविले गेले तर माणसाने कसे जगायचे, माणसाने निर्णय कसे घ्यायचे ? म्हणून तातडीने शासनाने याबाबत लक्ष घालणे गरजेचे आहे. किंमत वाढू शकते असे जाहिरातीमध्ये नमूद केलेले असले तरी 5-10 टक्के किंमत वाढू शकते. पण शासनाने या गाळयांची 48 टक्के किंमत वाढविली आहे. मंत्री महोदयांनी याबाबत लक्ष घालणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचा विषय महत्वाचा व गंभीर आहे. माननीय मुख्यमंत्री येथे आलेले आहेत. 1975 साली कोल्हापूर नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाले. तेव्हापासून आजतागायत या शहराची हद्दवाढ झालेली नाही. मी माननीय नगरविकास मंत्री यांना पत्र दिले की, या शहराच्या विकासासाठी कोल्हापूर शहर विकास प्राधिकरण काढण्यात यावे. त्यांचे उत्तर आले की, प्राधिकरण करण्याकरिता शहराची लोकसंख्या 10 लाख असली पाहिजे. शहराची हद्दवाढ होणार नसेल तर लोकसंख्या कशी वाढेल ? 1975 पासून आज 41 वर्षे झालेली आहेत पण शहराची हद्दवाढ झालेली नाही यामुळे या शहराचा विकास होणे शक्य नाही. त्यामुळे शासनाने यामध्ये लक्ष घालण्याची गरज आहे. कोल्हापूर शहरातील सोयीसुविधांकरिता शासनाने मोठया प्रमाणावर निधी द्यावा अशी विनंती करतो व थांबतो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल (ओरंगाबाद मध्य) : अध्यक्ष महोदय, पुलिस विभाग का जितना कौतुक किया जाए उतना कम है. अमन-शांति बरकरार रखने के लिए ये हमेशा कोशिश करते रहते हैं. इनकी ना ईद होती है और न दशहरा, न दिवाली, न गणपति का त्यौहार होता है. यह सही बात है कि हर पुलिस वाला ऐसा नहीं है, कुछ पुलिस वालों की वजह से पुलिस विभाग की छवि खराब होती है यह भी एक सत्य है.

अध्यक्ष महोदय, मैं गृह विभाग के ताल्लुक से दो मुद्दों पर बोलना चाहूंगा. एन्टी करप्शन ब्युरो विभाग में किस तरह से धांधली होती है, इसके बारे में मैं बताना चाहूंगा. आपने यह कहा थ्ा कि महाराष्ट्र के अंदर कन्विक्शन रेट बढ़ रहा है. यह सही है. लेकिन आज महाराष्ट्र में देखा जाए तो करीब 3 लाख पेन्डिग केसेस है. आपने 12 जजेस की नियुक्ति की है. क्या इससे पेन्डेन्सी रेट जिरो प्रतिशत पर आ जाएगी ? यह बताना जरुरी है. पुलिस विभाग की छवि तब खराब होती है जब कस्टोडियन किलिंग होती है, जब आप झूठे केसेस बनाते है. मालेगांव का केस यदि हम देखेंगे, 9 लोगों को गिरफ्तार किया जाता है. महाराष्ट्र की एटीएस कहती है कि ये लड़के इसके लिए जिम्मेदार है. वहीं पर नॅशनल इन्वेस्टिगेशन एजेन्सी आती है और यह कहती है कि ये लड़के जिम्मेदार नहीं है, ये लोग जिम्मेदार है. जब इन्वेस्टिकेशन एज्न्सीज में ही अगर तालमेल नहीं रहेगा, तो जनता के बीच में कैसा मॅसेज जाएगा ? यह देखिए. 9 नौजवान लड़कों को यदि पांच साल तक जेल में रखा जाता है और उन्हें छोड़ा जाता है, हो सकता है कि पुलिस विभाग से गलती हुई हो, लेकिन जब बार बार गलती होती है तो इसके लिए प्रशासन को, सरकार को सोचने की जरूरत है. ये नौजवान लड़के पांच साल के लिए जेल में जाते हैं, अदालत उन्हें बेकसूर बताता है, तो कम से कम उस इन्वेस्टिगेशन ऑफिसर को पांच महीने के लिए आप जेल में भेजिए. वरना क्या वजह है कि आप मनगढ़ंत कहानी बनाते हैं, किसी को भी पकड़कर लाते हैं, जेल में भेज देते हैं और इन्वेस्टिगेशन ऑफिसर पर कोई कार्रवाई नहीं होती है. कोई भी हों, मालेगांव के मुस्लिम नौजवान लड़के हों, कर्नल पुरोहित हों, साध्वी प्रज्ञा सिंग हों, जो भी इन्वेस्टिगेशन ऑफिसर झूठे केसेस बनाता है, उसके ऊपर कार्रवाई होनी ही चाहिए. शक की बुनियाद पर किसी की जिंदगी बर्बाद नहीं कर सकते. इशरत जहां का मामला जब भी आता है,

......4.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल.....

तो न जाने ऐसे कितने श्री इम्तियाज जलिल को कटघरे में खड़ा किया जाता है. हमसे बारबार वफादारी का सबूत मांगा जाता है. हम एक बात साफ कहना चाहते हैं कि इस मुल्क से वफादारी करना हमारा मजहब हमें सिखाता है. ये मुल्क हमारा अपना है. जितना आपका है उतना हमारा है. लेकिन क्यों ऐसा होता है कि जब भी किसी एक इशरत जहां को पकड़ा जाता है तो श्री इत्मियाज जलिल से भी सवाल किए जाते है ?

अध्यक्ष महोदय, दूसरा मुद्दा बहुत ही अहम है. यहां पर माननीय मुख्यमंत्री उपस्थित हैं. एक एन्टीकरप्शन ब्यूरो विभाग है. आप एन्टीकरप्शन ब्यूरो का रेकॉर्ड देखेंगे, तो कोई तलाठी दो हजार रुपये लेते हुए पकड़ा जाता है. 200-500 रुपये लेते हुए कोई कॉन्स्टेबल पकड़ा जाता है. ऐसे जो छोटे लोग होते है, उन्हें गिरफ्तार किया जाता है. क्या वजह हे कि एन्टीकरप्शन ब्यूरो विभाग डिकॉईज तैयार नहीं करता है, जिस तरह विदेशों में होता है. ये डिकॉईज लोग जाते हैं, कानून को तोड़ते हैं. पैसे का लालच देते हैं, कोई अधिकारी या कर्मचारी पैसे लेता है तो उसको ट्रॅप में लिया जाता है. हम इंतजार करते हैं कि एन्टीकरप्शन विभाग में कोई शिकायत लेकर आएगा, तो हम कार्रवाई करेंगे. आप कार्रवाई नहीं कर रहे हैं इसलिए नागपुर बेंच ऑफ बॉम्बे हाईकोर्ट को यह कहना पड़ रहा है कि लोगों को अब टैक्स देना बंद करना पड़ेगा.

अध्यक्ष महोदय, मैं एक महत्वपूर्ण केस के बारे में बताना चाहता हूं. श्री सतिश शेट्टी नाम के एक आरटीआई एक्टीविस्ट की हत्या कर दी गई थी. क्यों कर दी गई थी ? उसने पुणे के ग्रामीण पुलिस को लिखकर दिया था कि मेरी जान को खतरा है. आज वही नौबत पुणे के एक और आरटीआई एक्टिविस्ट श्री विजय कुंभार पर आ रही है. श्री विजय कुंभार ने शक जताया है, यह दर्द जताया है कि मेरी जान को भी खतरा हो सकता है. क्यों खतरा हो सकता है ? मैं आपको यह बताना चाहूंगा कि एन्टीकरप्शन ब्यूरो विभाग........एक टॉप आईएएस अधिकारी जो पुणे में कलेक्टर की नौकरी करता था, उसी शहर में कमिश्नर बन कर गया. उसके खिलाफ ओपन इन्क्वायरी करने के लिए एन्टीकरप्शन ब्यूरो विभाग की लिस्ट होती है कि सरकार से हमें परमिशन चाहिए. ओपन इन्क्वायरी कब होती है ? जब एन्टीकरप्शन ब्यूरो विभाग के पास कोई

.....5.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल.......

शिकायत आती है, उस कम्पलेन्ट की डिस्ट्रीक्ट इन्क्वायरी एन्टीकरप्शन विभाग करता है. उसमें यदि तथ्य निकलते हैं, तो सरकार से वे अनुमति मांगते हैं कि हमें परमिशन दीजिए, इसके खिलाफ इन्क्वायरी करनी है. दिनांक 9.5.2014 को एन्टीकरप्शन ब्यूरो की वेबसाईट में उस आईएएस ऑफिसर का नाम आता है. सरकार से परमिशन मांगी जाती है. 2014 को किसकी सरकार थी ? इन्क्वायरी नहीं होती है. सरकार परमिशन नहीं देती है. दो-तीन महीने के बाद वेबसाईट से ये नाम गायब हो जाता है. ये कैसे गायब होता है, कौन लोग होते हैं? आईएएस ऑफिसर का नाम अगर आप वेबसाईट पर डालते हैं तो ऐसे ही नाम नहीं डालते हैं. आपको यह अच्छी तरह से मालूम होगा कि ये कौन है ? इसके बारे में पुख्ता सबूत हैं. इसीलिए आप उनका नाम डालते है. नाम डालने के बाद एक दिन अचानक ये नाम निकल जाता है. जब हम उनसे पूछते हैं कि ये नाम कैसे निकाला गया ? तो एन्टीकरप्शन विभाग के उस समय के डी.जी. जो आज महाराष्ट्र के डी.जी. हैं, वे कहते है कि उस आईएएस अधिकारी ने संतोषजनक रिप्लाय हमें दिया है. संतोषजनक रिप्लाय नहीं होता है. इन्कवायरी करनी होगी, उसकी रिपोर्ट क्या आयी यह पब्लिक को बताना पड़ेगा. आप दो-पांच हजार लोगों को पकड़ लेते है. मैं आपको बताना चाहता हूं, मुख्यमंत्री साहब, उस आईएएस ऑफिसर और आईपीएस ऑफिसर के 200-300 करोड़ रुपये की प्रॉपर्टीज है. क्या आप यह नहीं जानते है ? सरकार जानती है. यदि आप नहीं जानते हैं तो मैं डॉक्यूमेंट्स के साथ आपको जानकारी देता हूं. आप दावा करते है कि हमारी पार्टी अलग है, तो आपको कार्रवाई करनी होगी, आपको बताना पड़ेगा, इसकी जांच करनी पड़ेगी. वरना जो श्री सतिश शेट्टी मरा है, वह श्री सतिश शेट्टी अकेले नहीं मरा है. आप सच्चाई की आवाज बंद करने की कोशिश कर रहे हैं. श्री सतिश शेट्टी के बाद श्री विजय कुंभार कह रहा है कि मेरी जान को खतरा है, उसने मुझसे फोन करके कहा है कि श्री इम्तियाज भाई मैं कब तक जिंदा रहूंगा मुझे पता नहीं है क्योंकि कुछ लोग मेरे पीछे है. यह सरकार की जिम्मेदारी है. उस आरटीआई एक्टिविस्ट को बुलाईए, उससे पूछिए कि उसे किससे खतरा है. आज सच्चाई का गला दबाने की कोशिश हो रही है.

.....6.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

01-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) HH-6

PNG/ AKN/ MMP/ 15:30

श्री इम्तियाज जलिल.......

अध्यक्ष महोदय, हम जानते हैं कि इस बारे में भी कुछ नहीं होगा क्योंकि आप सब की कोशिश यही है कि छोटे-मोटे जितने भी कर्मचारी है उन्हें पकड़ लिया जाए. भ्रष्टाचार तो वे ही करते हैं. 200-300 करोड़ रुपये का भ्रष्टाचार होता है. आईएएस ऑफिसर ने 300 एकड़ जमीन पुना में एक बिल्डर के साथ खरीदी थी. वह सरकारी जमीन थी. जिसके ऊपर यह लिखा हुआ था कि ये पुनर्वसन की जमीन है. उसके पी.आर. कार्ड पर लिखा था कि "ही जमीन हस्तांतरीत करता येत नाही." कलेक्टर की हैसियत से वह जमीन खरीद लेता है और ऑर्डर पास कर देता है कि अब इसकी प्लॉटिंग कर दी जाए. ये काम बिल्डर के साथ मिलकर करते है. जब मैं पत्रकार था, तो ये खबर छापने से रोकने के लिए मुझे पुणे के बड़े बड़े बिल्डर्स, जिसमें श्री अतुल चोरडिया जैसे बिल्डर्स थे, उन्होंने कोशिश की थी कि ये खबर हमने दिखानी नहीं चाहिए. हमें डराया गया था. हमें खरीदने की कोशिश की गई थी. आज ये अधिकारी आपके विभाग में, मंत्रालय में सेक्रेटरी के पद पर नौकरी कर रहे है. जब वे मुझे देखते होंगे तो मुस्कुराकर ये सोचते होंगे कि तुने क्या कर लिया है, पैसे में बहुत ताकत है. मैं जब उसे देखता हूं तो मैं ये सोचता हूं कि यकीनन पैसे में बहुत ताकत है. मैं नहीं समझता हूं कि यहाँ पर जो भी सदस्य हैं वे उनका नाम नहीं जानते हैं.

अध्यक्ष महोदय, दूसरी सच्चाई यह है कि वे पुणे के कलेक्टर बनते है. कुछ फैसले ऐसे लेते हैं कि जब अपील में जाते हैं तो वही अधिकारी उसी शहर में डिविजनल कमिश्नर बनकर आ जाता है. जो कलेक्टर कुछ गलत फैसले कलेक्टर की हैसियत से लेता है, वह डिविजनल कमिश्नर बनकर उस बारे में फैसला करता है कि नहीं, मैंने यह सही फैसला किया था. इतना अंधाधुंध कारोबार आप करेंगे और आप उम्मीद करेंगे हम खामोश बैठेंगे, हम आपसे उम्मीद करते हैं कि आप हमें कम से कम इन्साफ दिलाएंगे.

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभाग के बारे में मैं यह कहना चाहता हूं कि आपने औरंगाबाद शहर में रोड बनाने के लिए 25 करोड़ रुपये दिए है. यह मामला अदालत में गया. हमारा ही एक कार्पोरेटर यह मामला अदालत में लेकर गया. किस तरह से गोरखधंधा किया गया,

.....7.



श्री इम्तियाज जलिल.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सिर्फ एक टेंडर बुलाया गया. वह इसलिए बुलाया गया कि वहां के अधिकारी, उस कॉन्ट्रेक्टर को ये टेंडर देना चाह रहे थे. आखिर में जब हम अदालत में गए, तो पूरे अधिकारियों ने अदालत में एफिडेविट दिया है, मुंबई् हाईकोर्ट की औरंगाबाद बेंच में एफिडेविट दिया है. यह माना गया है कि हमसे गलती हुई है. हमने रूल्स को ब्रेक किया है. लेकिन क्या हुआ है ? कुछ नहीं हुआ है. कुछ भी नहीं होने वाला है. यह इसलिए नहीं होने वाला है कि ये टेंडर देने से पहले कितने अधिकारियों को, कितने नेताओं को पैसों के पॅकेट बांटे गए थे. इसी के कारण कोई मुंह खोलने के लिए तैयार नहीं है. आपने 25 करोड़ रुपये दिए थे. एक कमिटी बनायी थी. जिसमें डिविजनल कमिश्नर, डिस्ट्रीक्ट कलेक्टर, म्युनिसिपल कमिश्नर से कहा गया था कि 25 करोड़ रुपये हम तुम्हें दे रहे हैं, अब इसकी जिम्मेदारी आपकी रहेगी. लेकिन कलेक्टर, कमिश्नर, म्युनिसिपल कमिश्नर को कुछ भी पता नहीं है. इस बारे में ध्यान दिया जाना चाहिए. समय के अभाव में इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं.

-----------

यानंतर II-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कालिदास कोळंबकर ( वडाळा ): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये पार्किंग आणि ट्रॅफिक हे दोन प्रश्न अतिशय महत्त्वाचे आहेत. मुंबईचा डीपी प्लान आता येणार आहे. यामध्ये कोठेही मुंबईच्या या सर्वात जास्त महत्त्वाच्या पार्किंग व ट्रॅफिकच्या प्रश्नाविषयी काही उल्लेख नाही. काही दिवसांपूर्वी माटुंगा येथील वॉर्ड ऑफिसमध्ये बीएमसीचे अधिकारी आले होते. त्यांनी मुंबईच्या डीपी प्लानचे एक चित्र आमच्यासमोर उभे केले होते. या चित्रामध्ये कुठेही वाहतूक समस्या व वाहनतळाच्या समस्येबाबत उल्लेख केला नव्हता.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये मोठमोठी मैदाने आहेत. मुंबईमध्ये अंडरग्राऊंड पार्किंगकरिता परवानगी दिली तर हा पार्किंगचा प्रश्न सुटू शकेल. दिल्ली येथे ज्याप्रमाणे फेरीवाल्यांना अंडरग्राऊंडमध्ये जागा दिलेली आहे, त्याच धर्तीवर मुंबई येथील फेरीवाल्यांनाही अंडरग्राऊंडमध्ये व्यवसायाकरिता जागा व परवानगी दिली पाहिजे. यामुळे फेरीवाल्यांचाही त्रास कमी होईल.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये पावसाळा आला की, पाणी तुंबते. हिंदमाता येथे 110 कोटी रुपयांच्या प्रस्तावाचे काम चालू आहे. हिंदमाता या भागामध्ये 6 फुट पाणी पावसाळयात तुंबते. येणा-या पावसाळयाआधी हे काम पूर्ण झाले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, शिवसेना प्रमुख असताना हुतात्मा स्मारकाजवळ शिवसेनाप्रमुखांनी ज्योत प्रज्वलित केली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त दादर येथील चैत्यभुमीजवळ भीमज्योत प्रज्वलित करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, स्प्रिंग मिलच्या जागेपैकी 45 एकर जमिनीवर विकासाचे काम चालू आहे. त्या जागेमध्ये 648 कुटुंबांचा स्मशानभूमी जवळ विकास करुन दिला जाणार होता. त्याकरिता मी सख्त विरोध केला होता. तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सर्व्हे नंबर 120 येथे त्यांचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रयत्न केला होता.

अध्यक्ष महोदय, शासनाने गिरणी कामगारांना फंजीबल एफएसआय दिलेला आहे, याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. 648 लोकांना फंजीबल पास करुन देत असताना मुंबईतील 5000 गिरणी कामगारांनाही फंजीबल पास करुन दिलेले आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कालिदास कोळंबकर....

सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांच्या मतदारसंघामध्ये याचा फायदा मिळालेला आहे. फंजीबल पास झाल्यानंतर याबाबत निर्णय घेत असताना गिरणी मालक सजेशन ऑब्जेक्शनमध्ये 405 गिरणी कामगार कुटुंबांना कार्पेट एरिया फंजीबलनुसार देण्याकरिता प्रोत्साहन भत्ता आम्हाला देण्यात यावा, असे म्हणालेले आहे. शासनाने या गिरणी मालकांना फंजीबल एफएसआयनुसार कामगारांना कार्पेट एरिया देण्याकरिता प्रोत्साहन भत्ता द्यावा, एवढी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मुंबईसंदर्भातील प्रस्तावाच्या वेळी मी पोलीस हाऊसिंग व बीडीडी चाळीसंदर्भातील महत्त्वाचे प्रश्न मांडणार आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

....जेजे-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सरदार तारा सिंह : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 की अनुदानों की मांगों पर अपने विचार व्यक्त करना चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, मेरे लिए यह खुशी की बात है कि माननीय मुख्यमंत्री सदन में उपस्थित है. मेरा निवेदन इतना ही है कि नांदेड में विमान सेवा शुरु होनी चाहिए थी. आपने भी पत्र दिया. श्री गडकरी साहब ने भी पत्र दिया. श्री मुनगंटीवार साहब ने भी पत्र दिया. गुरुद्वारा से 50 पत्र मैंने भेजे है. लेकिन आज एक साल हो गया. वहां पर विमान सेवा शुरु नहीं हुई. आज 5 से 10 हजार लोग दर्शन करने के लिए वहां आते है. मेरा निवेदन है कि वहां पर हवाईजहाज की सेवा शुरु की जाए.

अध्यक्ष महोदय, विधी एवं न्याय विभाग के बारे में कहना चाहता हूं कि मुलुंड में 50-60 सालों से दो कोर्ट में काम चलता है. एक मुलुंड के लिए और एक भांडूप के लिए. वहां पर जगह है, इमारत बन सकती है. प्रशासकीय इमारत बन सकती है. लेकिन पैसा नहीं होने के कारण काम रुका है. मेरा निवेदन है कि वहां पर पैसा दिया जाए. कोर्ट भी बनेगा और प्रशासकीय इमारत भी बनेगी. आज कुर्ला, खार और बांद्रा में लोगों को जाना पड़ता है. यहां पर 15-16 लाख लोग रहते है. मुलुंड में कोई भी प्रशासकीय इमारत नहीं है. मेरा निवेदन है कि वहां पर प्रशासकीय इमारत बनायी जाए.

अध्यक्ष महोदय, मुंबई को स्मार्ट सिटी बनाने का फैसला माननीय मुख्यमंत्री जी ने लिया है. म्युनिसिपालटी के लोग दीवारों पर लिखते है. यहाँ कचरा नहीं डाले. सफाई रखी जाए. इससे स्मार्ट सिटी नहीं बनती है. मेरा निवेदन है कि म्युनिसिपालटी के जो कमिश्नर है उनको आदेश दिया जाए, पूरी मुंबई को साफ रखना उनका काम है. केवल दीवारों पर लिखने से काम नहीं होगा.

अध्यक्ष महोदय, देवनार के डम्पींग ग्राऊंड का प्रश्न है. इसको बंद करने के लिए रोज बात की जाती है. मैं मुख्यमंत्री जी का आभारी हूं कि उन्होंने फैसला किया है. इसी के साथ हरिओम नगर मेरा एरिया है. वहां पर 7-8 टन कचरा आता है. देवनार का डम्पींग ग्राऊंड बंद किया जाएगा उसी तरह हरिओम नगर, थाना का डम्पींग ग्राऊंड भी बंद किया जाना चाहिए. इतना ही मेरा निवेदन है, धन्यवाद.

------------------

....2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राहुल मोटे ( परंडा ) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभाग अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत सहभागी होण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील भुम तालुक्यात प्रशासनाने आणि संबंधित जिल्हाधिकारी यांनी एकूण 20 शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल केला होता. आज माझ्या मतदारसंघात दुष्काळी परिस्थिती आहे. काही शेतकरी छावणी मिळावी म्हणून जिल्हाधिकारी यांना भेटण्यासाठी गेले होते. जिल्हाधिकारी भुम तालुक्यात छावणीची पाहणी करण्यासाठी आले होते. त्यावेळी संबंधित 20 शेतकरी आमची छावणी बघायला चला म्हणून जिल्हाधिकारी यांना विनंती करीत होते. संबंधित शेतकरी दोन ते अडीच महिन्यांपासून छावणी चालवितआहेत. अशा छावणीला परवानगी मिळावी म्हणून संबंधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांची गाडी थांबवून हात जोडून विनंती केली होती. त्यावेळी खरे पहता जिल्हाधिकारी यांनी संबंधित शेतकऱ्यांबरोबर चर्चा करणे अपेक्षित होते. परंतु, संबंधित जिल्हाधिकारी यांनी सरकारी कामात अडथळा आणला म्हणून 20 शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल केले होते. महसूल विभागातील संबंधित तलाठ्याने अशा प्रकारची घटना घडलीच नाही म्हणून गुन्हा दाखल करण्यास विरोध केलेला होता. नंतर संबंधित तलाठ्याला दुसरे कारण दाखवून निलंबित केले होते. प्रशासनाने मंडल अधिकाऱ्यांना गुन्हा दाखल करण्याबाबत सूचना केल्यानंतर गुन्हा दाखल झाला होता. या सर्व प्रकणाची वाशी तालुक्यातील पोलीस निरीक्षक श्री. ठोंबरे यांनी चौकशी केलेली आहे. चौकशीमध्ये असा प्रकार झालाच नाही, अशा प्रकारचा अहवाल वर्तमानपत्रात छापून आला होता. यासंदर्भात पोलीस निरीक्षक श्री. ठोंबरे यांनी जिल्हाधिकारी यांची बाजू ऐकूण घेण्यासाठी दोन ते तीन वेळा प्रयत्न केलेला होता. परंतु, जिल्हाधिकारी मी दौऱ्यावर आहे, मला काम आहे असे कारण सांगून पोलीस निरीक्षक श्री. ठोंबरे यांना वेळ देत नव्हते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ठोंबरे यांनी नियमानुसार जिल्हाधिकारी यांना 160 कलमान्वये साक्षीदार म्हणून हजर राहण्याबात समन्स बजाविले होते. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी मला कोर्टाचे अधिकार आहेत, तुम्ही माननीय न्यायालयाचा अवमान करीत आहात, असे सांगून कलम 17 अन्वये पोलीस निरीक्षक श्री. ठोंबरे यांना नोटीस पाठविली होती. कायदा सर्वांना

......3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राहुल मोटे.........

समान आहे. वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांनी कायद्याचे पालन करणे अपेक्षित असताना त्यांनी पोलिसांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही दिवसानंतर पोलीस निरीक्षक श्री. ठोंबरे यांनी माननीय उच्च न्यायालयात धाव घेऊन नोटीसला स्थगिती मिळवून घेतली होती. कोर्टामध्ये पुढे जे होणार आहे, त्याच्याशी आम्हाला देणेघेणे नाही. परंतु, माझ्या मतदारसंघातील संबंधित 20 शेतकऱ्यांवर जे गुन्हे दाखल केले आहेत, ते पहिल्या प्रथम मागे घ्यावे अशी माझी मुख्यमंत्री महोदयांकडे विनंती आहे. मुख्यमंत्री महोदयांनी या सर्व घटनेची चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करावी, अशी मी त्यांना विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या जिल्ह्यातील संबंधित सरपंचाच्या विरोधात जिल्हा हद्दपारीची नोटीस बजाविण्यात आली होती. त्यानंतर संबंधित सरपंचाला जिल्हा हद्दपार करण्यात आले होते. या विषयाच्या अनुषंगाने मी गृह विभागाला एक लेखी पत्र दिलेले आहे. सदर पत्रात ज्या लोकांवर अधिक आणि जास्तीच्या गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे, अशा गुन्हेगारांवर कारवाई न करता एका राजकीय माणसाला हद्दपार केलेले असून, ते चुकचे आहे वगैरे बाबी मी नमूद केलेल्या होत्या. या प्रकरणाची चौकशी करावी तसेच ज्या लोकांवर अधिक आणि जास्तीच्या गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे, अशा गुन्हेगारांवर कारवाई करावी एवढीच विनंती मी चर्चेच्या माध्यमातून करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहुल कुल ( दौंड ) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभाग अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत सहभागी होण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी गृह विभागाच्या संदर्भात सूचना करणार आहे. आपण सर्वजण पोलिसांकडून अनेक वेळा कर्तव्याची अपेक्षा करीत असतो. अशा वेळी पोलिसांना सुविधा देण्याच्या बाबतीत शासन कोठे तरी कमी पडतो असे माझे मत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात एसआरपीची 1400 एकर जागा आहे. एमसआरपीमधील कर्मचाऱ्यांची दुरावस्था पहता भविष्यात त्यांच्या निवासासाठी आणि कार्यालयासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाकडे देखील खूप मोठ्या जागा आहेत. या सर्व जागा बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करुन त्या विकसित करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मी सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भात बोलणार आहे. शासनाने कर्मचाऱ्यांच्या बदलीच्या संदर्भातील कायदा केलेला आहे. या कायद्याच्या माध्यमातून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळाले आहे. आज अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तक्रारी आहेत. अशा दोषी अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणे अवघड होऊन बसले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी कर्मचाऱ्यांच्या बदलीच्या संदर्भातील कायद्यामध्ये लवचिकता आणावी अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, मी नगरविकास विभागाच्या संदर्भात बोलणार आहे. अनेक ठिकाणची आरक्षणे ही गेल्या 30 वषापूर्वी टाकून ठेवण्यात आलेली आहेत. काही नगरपालिकांची आर्थिक क्षमता नाही. त्यांना जागा ॲक्विजेशन करणे शक्य होत नाही. नगरपालिकांना शासनाकडून निधी मिळत नाही. त्यामुळे अशा प्रकारची आरक्षणे विकसित करावीत किंवा त्या जागा मूळ मालकांना परत देण्याबाबत निर्णय घ्यावा अशा प्रकारची सूचना करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील दौंड शहराचा झपाट्याने विकास होत चालला आहे. त्या ठिकाणच्या जमिनीवर म्हाडाचे आरक्षण कित्येक वर्षापासून आहे. शासनाने त्या जमिनी

......5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहुल कुल.........

विकसित करण्यासंदर्भातील निर्णय घेतला तर लोकांना त्याचा फायदा होणार आहे. परिणामी लोकांना स्वस्त दरामध्ये घरे मिळण्यास मदत होणार आहे. पुणे शहरापासून जवळ असणारे दौंड हे भविष्यात उपनगर होणार आहे. त्या ठिकाणच्या लोकांना स्वस्त दरामध्ये घरे मिळण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक नगरपालिकांना स्वत:चा निधी मिळत नाही, अशी वाईट परिस्थिती आहे. वैशिष्टपूर्ण काम आणि रस्ता अनुदान, नगरोत्थानाच्या माध्यमातून मिळणारा निधी खूपच कमी आहे. या माध्यमातून दौंड नगरपालिकेला भरघोस निधी उपलब्ध करुन द्यावा अशा प्रकारची सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवित आहे.

------

KK-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी फक्त दोन तीन सूचना मांडाव्यात.

श्री.बच्चू कडू (अचलपूर) : अध्यक्ष महाराज, काल मला एकाने प्रश्न विचारला की, तुम्ही सभागृहात का बोलत नाहीत, असा माझ्या मतदारसंघातील लोकांचा माझ्यावर आरोप आहे. बाहेर बोलल्यापेक्षा सभागृहात आपण बोला. अध्यक्ष महाराज, आपण सांगत आहात की, फक्त सूचना करा. आम्ही काय करावे ते आपण सांगा...(अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष :** बोला आणि सूचना करा या दोघांचाही अर्थ एकच आहे.

श्री.बच्चू कडू (अचलपूर) : अध्यक्ष महाराज, माझ्यावरील अन्याय दूर होण्यासाठी मी येथे आलेला आहे. अध्यक्ष महाराज, आपण माझ्यावर अन्याय करणार असाल तर मग काय अर्थ आहे? ठराविक सन्माननीय सदस्य दोन दोन तास बोलणार, मी सभासद नाही का? मी अपक्ष म्हणून निवडून आलो आहे, आपण चिन्हावर निवडून आला आहात. ... ... (अडथळा)... अध्यक्ष महाराज, हे बरोबर नाही. सूचना करणारा एवढा मोठा मी थोडाच आहे. आम्ही मते मांडत आहोत. अब्राहम लिंकन म्हणत होते की, दोन तास भाषण करायचे असेल तर त्यासाठी अभ्यास करण्याची गरज नाही, परंतु दोन मिनिटे बोलयचे असेल तर त्यासाठी अभ्यास करावा लागतो.

अध्यक्ष महाराज, महात्मा ज्योतिबा फुलेंचा फोटो पाहिला. त्यांनी एक शब्द वापरला होता कलम कसाई. तलवारीपेक्षा लोक जास्त कलमाने मेली. बंदुकीच्या गोळीने कमी मेले. बाम्बस्फोटाने कमी मेले. कलम विचित्र वापरले आणि त्याचा दुरपयोग केला तर त्यामुळे जास्त लोक मेले. कांद्याची निर्यातबंदी केल्यामुळे लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. एक धोरण, एक कलम, एक लाईन बदलली तर हजारो लोकांची कत्तल होते.

अध्यक्ष महाराज, सामान्य प्रशासन विभागाचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची मालमत्ता जाहीर करणे, हे काम आहे. या सर्व अधिकाऱ्यांची वार्षिक मालमत्ता जाहिर झाली पाहिजे. लोक अधिकाऱ्यांना विचारत नाही तर आमदारांना विचारतात. काय करतात तुम्ही तेथे जाऊनख कशासाठी पाठविले आम्ही तुम्हाला? असे जेव्हा जेव्हा आम्हाला विचारले जाते, तेव्हा आम्हाला संताप येतो. कालची जी घटना घडली ती सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित आहे. एक महिला हृदयाने आजारी असते, ती रडते. आम्ही तिच्यासोबत मंत्रालयात जाऊन अधिकाऱ्यांना विचारले तर तो अधिकारी उडवाउडविची उत्तरे आम्हाला देतो. तुम्ही माझ्याकडे येऊ नका, मुख्यमंत्री महोदयांकडे जा. असे म्हटल्यानंतर राग येणार नाही का?

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बच्चू कडू....

अध्यक्ष महाराज, प्रकरणांचा निपटारा लवकर होण्यासाठी आपण सेवा हमी कायदा, दप्तर दिरंगाई कायदा आणला. या कायद्यातील कलम 167 असे सांगते की, लोकसेवकाने नुकसान पोहोचविण्याकरिता चुकीचा दस्तऐवज तयार केला असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. एक तलाठी फेरफार बदलवितो त्यासाठी आम्हाला हाय कोर्टात जावे लागते. कुठे नॉलेज आहे शेतकऱ्याकडे? एक तलाठी जेव्हा फेरफार करतो तेव्हा न्यायालयाने त्या तलाठ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले नाही तर फक्त फेरफारचे आदेश दिले. एका तलाठ्याने चुकीचे दस्तऐवज, चुकीचे फेरफार केले असेल तर आपल्याला न्यायालयाकडून हे चुकीचे का केले, असे अपेक्षित आहे, परंतु असे होत नाही. आम्ही रक्तदान करणारी मंडळी आहे. आम्ही 80 वेळा रक्तदान केलेले आहे. आम्ही खून करणारी मंडळी नाही. आम्ही मारणाऱ्यापेक्षा जगविणाऱ्याला वीर समजतो. या निमित्ताने माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, या अधिकाऱ्यांची मालमत्ता जाहिर झाली पाहिजे, ती सभागृहाच्या पटलावर आली पाहिजे. आमचीही आली पाहिजे आणि अधिकाऱ्यांचीही आली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, नस्तीची पुनर्बांधणी करण्याची गरज आहे. मंत्रालयात गेल्यानंतर घरे घाट वाटतो. जनावरे ठेवल्यासारखे वाटते. अधिकारी, कर्मचारी बसलेले असतात. तेथे नस्ती, आडव्या, तिडव्या ठेवलेल्या असतात. आमदाराला फाईलसाठी टेबल टू टेबल फिरावे लागते. एका नस्तीवर मुख्यमंत्री महोदयांचा शेरा असताना सुध्दा चार चार महिने उत्तर येत नाही. माझे पत्र आहे. माननीय मंत्री श्री.गिरीष बापट यांचे पत्र आहे. त्यावर मुख्यमंत्री महोदयांचा शेरा आहे तरी अजूनही उत्तर नाही. सात दिवसात उत्तर दिले पाहिजे, असा शासन निर्णय आहे. कोठे गेला तो शासन निर्णय?

अध्यक्ष महाराज, मंत्रालयात सामान्य माणसाला जावयाचे असेल दोन दोन तास रांगेत उभे रहावे लागते. दोन तासानंतर त्याला मंत्रालयात प्रवेश मिळतो. चंद्रपूरचा एखादा शेतकरी आला तर तेथे अधिकारी उपस्थित नसतो. दोन तास रांगेत उभे राहून अधिकारी भेटले नाही म्हणून तो परत जातो. माझी या निमित्ताने अशी सूचना आहे की, पंधरा ते वीस मिनिटे रांगेत उभे राहिल्यानंतर त्याला मंत्रालयात प्रवेश मिळाला पाहिजे. ज्याने तुम्हाला निवडून दिले त्याला 2.00 नंतर मंत्रालयात प्रवेश मिळतो. हा कोठला कायदा आहे, हे कोठले प्रशासन आहे? आम्ही

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बच्चू कडू...

लोकसेवक आहोत, हे आमचे नोकर आहेत. आम्ही यांचे मालक आहोत त्यामुळे यांच्या पाट्या काढून टाका. 3.00 नंतर भेटा, 4.00 नंतर भेटा असे चालणार नाही. तुम्ही आमचे नोकर आहेत ना. मालकांनाच सांगायचे 4.00 नंतर भेटा म्हणून. एखाद्या स्वयंपाक करणाऱ्या बाईने जर म्हटले की, मी 4.00 वाजता येणार नाही, मी 2.00 वाजता येते. आमच्या करांमधून तुमचे पगार मिळतात. या तुमच्या पाट्या कोठून आणल्या, हा कोठला प्रकार आहे? आम्ही प्रजाकसत्ताक दीन साजरा करतो. प्रजा आहे तर राजा आहे. हे प्रजेचे राज्य निर्माण झाले पाहिजे, माझी मुख्यमंत्री महोदयांकडून अपेक्षा आहे की, हे प्रजेचे राज्य निर्माण होणे गरजेचे आहे. लोकसेवक मारहाण का करतात, त्याचा मागचा संदर्भ शोधला पाहिजे. मला सामान्य प्रशासन विभागातील त्या अधिकाऱ्यांचे नाव माहित नव्हते. पण ॲट्रासिटी दाखल करा म्हणून सांगत आहेत. मंत्रालयात आम्ही दोन आमदारांनी आंदोलन केले होते, तेव्हा कलम 353 लावले होते. हजारो कर्मचारी मंत्रालयात आंदोलन करतात. तुमच्यासाठी आझाद मैदान आहे. आपण मंत्रालयात आंदोलन कसे केले? यांना कोणी परवानगी दिली, कोण तपासणार आहे हे? म्हणजे तुमचे तुम्ही काहीही करायचे. या प्रकरणी माझ्यावर कारवाई झाली. मला अटक झाली.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) :** मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, आपण स्पष्टीकरणाच्या निवदेनात या गोष्टी सांगितल्या आहेत. आज परत तो विषय येथे येत आहे. आपण स्पष्टीकरणात्मक निवेदन दिले, त्यावेळेस आपण या सर्व गोष्टी बोलल्या होत्या.

श्री.बच्चू कडू : अध्यक्ष महाराज, मंत्रालयात आंदोलन कसे केले, कोणी केले, कोणाची परवानगी घेतली, याचा तपास झाला पाहिजे आणि त्यांचेवर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्यावर कारवाई झाली नाही तर मी सुध्दा 21 तारखेला 50 लोक, 200 लोक घेऊन मंत्रालयात आंदोलन करणार आहे. माझ्यावर कारवाई झाली. जे जे सन्माननीय आमदार सोबत येतील त्यांना घेऊन जाईन. मी चुकलो हे मला मान्य आहे. राज्यातील सामान्य माणसाला मंत्रालयात जाण्यासाठी 15 मिनिटे रांग लावल्यानंतर त्याला मंत्रालयात प्रवेश मिळाला पाहिजे. सभागृहात जे कामकाज चालते त्यातील 75 टक्के काम हे अधिकारी, कर्मचाऱ्यांवर होते. तारांकित प्रश्न कर्मचाऱ्यांवर, त्याने केलेला भ्रष्टाचार, त्याचे झालेले निलंबन, आमच्या सभागृहाचे 75 टक्के काम कारवाई होत नाही म्हणून त्यावर चालते. अर्ध्या अधिक न्यायालयातील प्रकरण्ांची तपासणी केली तर

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बच्चू कडू...

अधिकाऱ्यांनी केलेला कामचुकारपणा यासंबंधीचे प्रकरणे असतात. शासनाने सेवा हमी कायदा, दप्तर दिरंगाई कायदा आणून देखील आतापर्यंत किती लोकांवर गुन्हे दाखल केले, किती लोकांवर कारवाई झाली? या बाबी सभागृहाच्या पटलावर ठेवल्या पाहिजेत. सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून हे अपेक्षित आहे. जर असे असेल तर तसे करावे, तसे नसेल तर काहीच करु नये. असे शासन निर्णय असतात. यांची भाषा यांनाच समजत नाही. दहा लोकांवर विचारावे लागते त्यानंतर तो सांगतो की, यावर स्पष्टीकरण मागा. जिल्हाधिकारी म्हणतात की, त्या शासन निर्णयावर स्पष्टीकरण मागतो. कसे प्रशासन चालणार, कसा कारभार चालणार. आम्ही रागावले तर आमचा राग दिसतो. मारणे म्हणजे कायदा तोडणे आणि नस्ती प्रलंबित ठेवणे म्हणजे कायदा पाळणे असा त्याचा अर्थ आहे काय? सन 1995 चा कायदा आहे, परंतु एकाही कायद्याची अंमलजावणी झालेली नाही. नगरविकास विभागाच्या सचिवांनी एक मार्गदर्शक तत्वे काढली, परंतु एकाही नगरपालिकेने त्याची अंमलबजावणी केली नाही. त्या नगरपालिकांनी रक्कम खर्चच केली नाही. ज्याला हाता, पय, डोळे नाहीत, त्यांच्यासाठी तुमचे डोळे उघडत नसतील तर काय तुमच्याकडे आम्ही चांगले पहावे. माझ्या मतदारसंघात अचलपूर असे आधुनिक शहर आहे. त्या शहरासाठी काही निधी मुख्यमंत्री महोदयांनी दिला पाहिजे. माझ्या मतदारसंघात एक बाजार पंचायत समितीचा सभापती आहे. अतिशय प्रामाणिक कार्यकर्ता आहे. त्याने 40 वेळा रक्तदान केले. तो ग्रामपंचायतीमध्ये दोन वेळा बिनविरोध निवडून आला. गावात, तालुक्यात एक दारुचे दुकान आहे. त्या दुकानावरुन दारुची सब दुकाने तयार झालीत. लोक मोटार सायकलवर गावा गावात दारु घेऊन जातात. अवैध दारु विकली जाते, त्याचा तालुका प्रमुख, त्याचा जिल्हा प्रमुख आहे. जशी पक्षाची बांधणी आहे तशी अवैध दारु प्रमुखांची बांधणी झालेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर LL-1...

श्री. बच्चू कडू ....

दारुच्या दुकानावरुन एखादा दारुवाला गावात दारु पोहोचवितो, गावातील 10-15 लोक देशी दारुचे खोके घेऊन जातात, ते विकतात त्याविरुध्द आंदोलन केले. आमचा एस.पी. गौतम आहे. तो म्हणतो पुलिस सबसे बड़ा गुंडा है. पुलिस के सिवाय दूसरा गुंडा हो ही नहीं सकता. आज नेता गुंडा नहीं है. हम से ज्यादा बड़ा गुंडा है. असे सांगून त्याच्यावर डायरेक्ट तडीपारचे वॉरंट काढले. असे होऊ लागले, सामाजिक कार्यकर्त्यावर अशाप्रकारच्या कारवाया होऊ लागल्या तर हे अत्यंत चुकीचे आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे श्रीमती अश्विनी जोशी, श्री. अनील सोनटक्के ही नावे आहेत. श्रीमती अश्विनी जोशी या जिल्हाधिकारी आहेत, त्यांच्याकडे 3 लाख रुपये इतकी थकबाकी आहे. श्री. अनील सोनटक्के हे न्यायाधीश आहेत. त्यांच्याकडे शासकीय वसाहतीचे 1 लाख 11 हजार रुपये थकीत आहेत. श्री. प्रकाश राठोड, श्री.पंकज शहा, श्री. प्रेमकुमार जैन, गृह विभागाचे निवृत्त प्रधान सचिव ही नावे आपण पहावीत. माझे भांडण का आहे तर, आयपीएस अधिकाऱ्यांची 2-2 निवासस्थाने असतात, ते सोसायटीमध्ये व शासकीय निवासस्थानातही राहतात. परंतु, ज्या बाईचे हार्टचे ऑपरेशन आहे, तिला तुम्ही मुदतवाढ दिली नाही. मग ही थकीत वसुली तुम्ही कधी करणार ? मी ही यादी आपल्याकडे देतो, आपल्याकडून अपेक्षा आहे की, याची तातडीने वसुली व्हावी. श्री. अशोक जाधववर कारवाई होत आहे. तो न्याय मागायला आला होता, त्याचे निलंबन होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...........

श्री. नितनवरे...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री गोपालदास अग्रवाल (गोंदिया) : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय सदन में उपस्थित है. गृह विभाग की मागों पर चर्चा करते हुए विनती करना चाहता हूं कि गोंदिया मतदार क्षेत्र में, गोंदिया शहर में दो पुलिस थाने निर्माण करने के लिए प्रशासकीय मान्यता नहीं दी गई है, प्रशासकीय मान्यता दी जानी चाहिए. रावणवाडी पुलिस थाने का निर्माण दस साल पहले हुआ. वहां का भी कामकाज भाड़े के बिल्डिंग में चल रहा है. इसके बांधकाम के लिए भी निधि का नियोजन मंत्री महोदय करेंगे, ऐसी आशा करता हूं.

अध्यक्ष महोदय, गोंदिया में पुलिस कॉलोनी पचास साल पुरानी बनी है. यह कालबाह्य हो गई है. उसका पुनर्निर्माण करने के संबंध में अनेक बार गृह मंत्री जी के स्तर पर बैठके हुई. लेकिन अभी तक उसका काम शुरु नहीं हुआ. इस बारे में कार्यवाही की जानी चाहिए. गोंदिया शहर में सीसीटीवी के अंतर्गत नाविण्यपूर्ण योजना के लिए डेढ़ करोड़ रुपये राज्य सरकार के डीपीडीसी के माध्यम से दिया है. लेकिन वह पैसा लैप्स हो रहा है. एक ओर एसपी पैसा वापस नहीं करता है और दूसरी तरफ सीसीटीवी कॅमेरे गोंदिया शहर में लगाने का काम भी शुरु नहीं हो रहा है. इस बारे में आवश्यक कार्यवाही करनी चाहिए. जरूरत हो तो नियोजन विभाग के माध्यम से जो निधि उपलब्ध है उसको खर्च करने की परमिशन देने के लिए मुख्यमंत्री महोदय हस्तक्षेप करेंगे, ऐसी आशा करता हूं.

अध्यक्ष महोदय, पीएसी में 3-के योजना के बारे में चर्चा हुई. गृहनिर्माण विभाग में जो 3-के योजना है यह बहुत बड़ा ब्लंडर है. बहुत बड़े क्लस्टर के अंदर डेवलपमेंट करने के नाम पर एकाधिकार करने की जो प्रवृत्ति है, हजारों झोपड़पट्टीवासियों को समय पर न्याय नहीं मिलता इसलिए 3-के योजना को रद्द करने का निर्णय राज्य सरकार ने लेना चाहिए, ऐसी मेरी मांग है. राजीव गांधी ग्रामीण निवारा टप्पा-1 योजना के अंतर्गत 2013 में गोंदिया जिले में 3482 घर मंजूर हुए है, उन सब का काम चालू हो गया है. काम शुरु होने के बाद, एक साल के बाद उनका कोटा कम कर दिया गया है. इस तरह का काम पिछले समय में हुआा है. 3482 घरों का काम जब पूरा हो गया तो उसको 95 हजार प्रति घरकुल के हिसाब से मिलना चाहिए. लेकिन आज 3482 लोगों को सिर्फ 68500 रुपये मिल रहे है. बाकी के डिफरन्स का 26500 रुपये देने के

.....3.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री गोपालदास अग्रवाल.....

लिए सरकार ने कार्यवाही करना अत्यंत आवश्यक है. युआईडीएसएसएमटी के अंतर्गत गोंदिया की भूमिगत गटार योजना को महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण योजना के माध्यम से शुरु करने का आपने निर्णय लिया. उस योजना का पैसा तीन साल से नगरपालिका के पास पड़ा है. उस पैसे की अफरातफरी चालू है. उस योजना का केंद्र और राज्य सरकार का 60 करोड़ मिला. इस बारे में मुख्याधिकारी को सस्पेंड करने की हम लोगों ने मांग की. मुख्यमंत्री महोदय ने इस बारे में कोई निर्णय नहीं लिया. लेकिन हाईकोर्ट ने आज ही इलेक्शन कमिश्नर के माध्यम से उस मुख्याधिकारी को सस्पेंड करने का जाहीर निर्णय दिया. जो अफरातफरी हुई उसकी जांच करने का निर्णय आप जरुर लेंगे, ऐसी मैं विनती करता हूं. अंडरग्राऊंड ड्रेनेज स्कीम का काम जल्द से जल्द शुरु हो ऐसा मेरा निवेदन है. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

---------

.....4.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील ( आंबेगाव ) : अध्यक्ष महोदय, सकाळी मी जो स्थगन प्रस्तावाचा विषय उपस्थित केला होता, त्यावरील चर्चा या विभागीय मागण्यांवरील चर्चेमध्ये करण्याचे ठरले होते. मी मुख्यमंत्री महोदयांसमोर 2 मिनिटांत तो विषय मांडतो.

अध्यक्ष महोदय, आज गृह विभाग व इतर विभागांच्या मागण्यांवरील चर्चा आहे. खरेतर गृह विभागाबाबत बोलण्यासारखे बरेच आहे. माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण एक फुलटाईम गृहमंत्री दिले पाहिजेत, आपल्यावर कामाचा खूप ताण येत आहे.

अध्यक्ष महोदय, मी आज सकाळी अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथील पोलीस ठाण्यामध्ये एका कैद्याच्या झालेल्या मृत्यूबाबत एक स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती. सकाळी अध्यक्ष महोदयांनी असे सूचित केले होते की, आपण स्थगन प्रस्तावावरील चर्चेचा आग्रह न धरता गृह विभागाच्या मागण्यांवरील चर्चेच्या वेळेस आपले काही म्हणणे मांडावयाचे असल्यास मांडावे. मी तेवढ्यापुरतेच बोलणार आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहाची प्रथा व परंपरा आहे की, अधिवेशन सुरु असताना एखाद्या कैद्याचा पोलीस कस्टडीमध्ये मृत्यू झाला तर, स्थगन प्रस्ताव स्वीकारला गेलेला आहे. त्यावर चर्चाही झालेली आहे. आज काही आम्ही आग्रह धरलेला नाही. मुख्यमंत्री महोदयांकडे पाहून आम्ही चर्चा केलेली नाही.

अध्यक्ष महोदय, शिर्डी येथील पोलीस ठाण्यात पाकिटमारीच्या संशयावरुन पोलिसांच्या ताब्यात असलेल्या 18 वर्षाच्या युवकाचा काल दिनांक 31 मार्च, 2016 रोजी पोलीस कोठडीत मृत्यू झाला. हा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळे झाला असल्याचा संशय मृताच्या नातेवाईकांनी व्यक्त केलेला आहे. नातेवाईकांनी तेथे रास्तारोको आंदोलनही केलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे मयत युवकावर यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल नसताना केवळ संशयावरुन त्याला पोलीस कोठडीत ठेवण्यात आले. मृत्यूनंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली नाही, अटक रजिस्टरला युवकाच्या अटकेची नोंद घेण्यात आलेली नव्हती. मयताच्या अंगावरील कोणतीही वस्तू जमा करुन रजिस्टरमध्ये त्याची नोंद घेण्यात आलेली नाही. अटकेनंतर युवकाच्या नातेवाईकांना कळविण्यात आलेले नाही. पोलिसांच्या म्हणण्यानुसार पोलीस कोठडीच्या गजाला अडकून गळफास घेऊन त्याने

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

आत्महत्या केली. मात्र ही वस्तुस्थिती खरी नाही. पोलीस कोठडीच्या गजाला गळफास कसा घेता येऊ शकतो, याबाबत शंका निर्माण झालेली आहे. पोलिसांच्या मारहाणीमुळे मृत्यू झाल्यामुळे शिर्डी येथे तणाव व भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. शिर्डीसारख्या धार्मिक स्थळी लाखो लोक येतात.

मुख्यमंत्री महोदय आपण फक्त याची माहिती घ्यावी. माननीय विरोधी पक्ष नेते त्याच मतदारसंघातील आहेत. त्या ठिकाणी अवैध धंद्याची खूप मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्याचा परिणाम तेथे येणाऱ्या भक्तांवर तसेच स्थानिक नागरिकांवर होत आहे. स्थानिक पोलिसांचा तेथील कायदा व सुव्यवस्थेवर कोणत्याही प्रकारचा वचक राहिलेला नाही.

MM-1/....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, या घटनेची सखोल चौकशी झाली पाहीजे. दोषींवर कारवाई झाली पाहीजे. एक प्रातिनिधिक म्हणून आपण हे उदाहरण घ्यावे. परंतु अशा प्रकारच्या अनेक घटना महाराष्ट्रामध्ये घडत आहेत. आपण या सभागृहामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून एफिसिएंटली काम केलेले आहे. गृह विभागाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यांचे परसेंटेज वाढलेले आहे. देशाच्या सर्व्हे प्रमाणे महाराष्ट्राचा वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्हेगारीमधील नंबर दुसरा, तिसरा, पहिला असाच आहे. ते कमी करण्याच्या दृष्टीने आपण काय उपाययोजना करणार आहात. खुनाच्या गुन्ह्यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार या राज्याच्या बरोबरीने महाराष्ट्राचा एक नंबर आहे. दरोड्यामध्ये देखील पहिला नंबर आहे. जबरी चोरीमध्ये 9,466 गुन्हे दाखल झालेले आहेत. चोरी, घरफोडी, दंगा, अन्यायाने विश्वास घात, ठकबाजी, दुखापत, स्त्रीयांवरील अत्याचार, बलात्कार, हुंडाबळी, विनयभंग, लैंगिक छळ, पती-पत्नीच्या नातेवाईकांकडून छळ, अनैतिक व्यापार इत्यादी अनेक बाबींचे प्रमाण वाढले आहे. अनुसूचित जातीच्या सदस्यांवर किंवा नागरिकांवर देखील मोठ्या प्रमाणात गुन्हे होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. बालकांवरील अत्याचार होण्याचे प्रमाणात वाढ झाली आहे. अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा सुधारित अंदाज जास्त झाले, परंतु जो खर्च व्हायला पाहीजे होता, तो कमी झाला. निदान गृहविभागाचा खर्च 100 टक्के होणे आवश्यक आहे. गरज पडली तर याकरिता अधिक पैसे वाढवून घेतले पाहीजे आणि त्यातून अधिक सवलती द्यायला पाहीजे. गृहविभागाच्या निधीतून लवकरात लवकर या विभागामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्या, अशी विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन**

श्री. हेमंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. गेल्या पाच दिवसापासून अनुकंपाधारकांच्या वतीने आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषण चालू आहे. त्यातील काही मुले सिरियस झालेली आहेत. आजतागायत महाराष्ट्रामध्ये 10,500 अनुकंपाधारक आहेत. शासनाकडे 'क' व 'ड' संवर्गातील 91,296 पदे रिक्त आहेत. मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात समिती माननीय मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार, माननीय मंत्री श्री. विनोद तावडे, माननीय मंत्री श्री. गिरीष बापट, माननीय मंत्री डॉ. दीपक सावंत आणि अपर मुख्य सचिव यांची समिती नेमलेली आहे. परंतु कार्यबाहुल्ल्यामुळे या समितीला दिनांक 20 जून 2015 पासून आतापर्यंत बैठक घेण्यास वेळ मिळालेला नाही. माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे. आमच्या सारखे रिकामे आमदार खूप असून आमची अशा समितीवर काम करण्याची इच्छा आहे. यासंदर्भात तत्काळ दखल घेण्यात यावी. या आमरण उपोषणामध्ये सिरियस झालेल्या मुलांची गांभीर्याने देखल घेण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसलेल्या अनुकंपाधारकांची दखल घेण्यात येत आहे.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: अनुदानाकरिता मागण्या.

**मु.शी.**: सन 2016-2017 च्या अनदानाकरिता मागण्या :

1) सामान्य प्रशासन विभाग

2) गृह विभाग

3) नगरविकास विभाग

4) विधी व न्याय विभाग

5) गृहनिर्माण विभाग

( पुढे सुरु.....)

श्री. प्रकाश महेता (गृहनिर्माण) : अध्यक्ष महोदय, आजच्या गृहनिर्माण विभागावरील अर्थसंकल्पीय मागण्यांमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री. अमिन पटेल, अतूळ भातखळकर, जयंत पाटील, शंभुराज देसाई, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विजय भांबळे, रमेश लटके, डॉ. माने, श्री. क्षीरसागर, सर्वश्री. कालीदास कोळंबकर, गोपालदास अग्रवाल इत्यादी सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांनी शेष बिल्डींगला देण्यात येत असलेला निधी फार कमी आहे असे म्हटले आहे. याकरिता आपल्या काळामध्ये 200 कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली होती. परंतु मी या विषयामध्ये डीफरन्स करीत नाही. यावर माझे असे मत झाले की, ती घोषणा निवडणूक जवळ आल्यामुळे केली होती. मी यासंदर्भातील मागील 5 वर्षांचे आकडे बघितले. 2011-2012 मध्ये 76.10 लाख रुपये, 2012-2013 मध्ये 116.37 लाख रुपये, 2013-2014 मध्ये 88 कोटी रुपये, 2014-2015 मध्ये 80.50 लाख रुपये आणि आम्ही 2015-2016 मध्ये 129.56 कोटी रुपये म्हणजे सर्वात जास्त निधी दिलेला आहे. शेष बिल्डींग संदर्भात नागपूर येथे चर्चा झाली होती. त्यावेळी सन्माननीय सदस्य सर्वश्री. अमिन पटेल, राज पुरोहित, सुनील शिंदे, मंगलप्रभात लोढा या सर्व शहरांच्या आमदारांनी तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. मुंबई शहरातील मूळ भुभागाच्या इमारतींसंबंधी उदार धोरण करुन हा निधी वाढवावा, असे त्यांनी सांगितले होते. त्यावेळी हा निधी 200 कोटी रुपयापर्यंत मंजूर करण्यात येईल, असे मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये आश्वासन दिले होते. आज मला

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता.....

सांगताना आनंद होत आहे. मुंबई शहरातील गोरगरीब लोकांसाठी, जुन्या इमारतींसाठी 200 कोटी रुपयांचा निधी मंडळाकडून दिला जाणार आहे. त्यामुळे मला वाटते की, केवळ बोलणे आणि करुन दाखविणे यामध्ये फरक असतो. आमचे सरकार न बोलता काम करुन दाखविणारे आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील पूर्वी मुंबई शहराचे पालकमंत्री होते. आपण अभ्यासपूर्ण मुद्दे मांडले आहेत. सर्वांसाठी घरे यानुसार आपण कोणकोणत्या वर्षामध्ये किती घरे कोणत्या ठिकाणी बांधणार आहात यासंदर्भात प्रश्न विचारला होता. म्हाडा प्राधिकरण, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पिंपरी-चिंचवड पुणे, बीएसयुपी, आयएचएसडीपी सर्वांसाठी घरे, महाराष्ट्र प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण आणि सिडको यांच्या माध्यमातून 2015-2016 मध्ये 56,215 घरे उपलब्ध करुन देण्याच्या प्रोसिजरमध्ये आम्ही आहोत. 2016-2017 मध्ये या सहा एजन्सीच्या माध्यमातून 1,57,777 घरांची योजना केलेली आहे. 2017-2018 मध्ये 1,10,821 व 2018-2019 मध्ये 1,10,079 आणि 2019-2020 मध्ये 1,32,572 असे 6,58,435 घरे बांधण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. तसेच त्यांनी या सर्व घरांसाठी किती जागा ॲक्वायर केली जाणार आहे, असा दुसरा प्रश्न विचारला होता. एमएमआरडीए मुंबई व इतरत्र महाराष्ट्रात एकूण 438 हेक्टर्स जमीन या पंतप्रधान आवास योजनेसाठी ॲक्वायर करण्याची प्रोसेस सर्व्हे नंबरसह पूर्ण केली आहे. ती बाब आता माननीय महसूल मंत्र्यांकडे आहे. ती बाब येत्या महिन्याभराच्या आत मंत्रिमंडळाच्या पुढे येईल. पंतप्रधान आवास योजनेसाठी 438 हेक्टर्स जमीन या योजनेंतर्गत ॲक्वायर करण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे.

...NN/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता......

सन्माननीय सदस्यांनी हाऊसिंग स्टॉक बाबत विचारणा केली त्याबाबत मी सांगू इच्छितो की, त्यावेळी शासनाला जे काही फिडबॅक होते त्यामध्ये गफलत झाली होती. त्यासंदर्भात सन 2007 मध्ये व सन 2008 मध्ये एक परिपत्रक काढले होते. त्यावेळी म्हाडा वसाहतीला 2.5 एफएसआय देऊन एनओसी दिली होती. लोकांनी इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकासकाला घरे रिकामे करुन दिली. परंतु त्यानंतर विकासकाने प्रत्यक्षात इमारतीचे काम सुरु केले नाही म्हणून त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नव्हती. सन 2013 मध्ये एक परिपत्रक काढण्यात आले. त्यानुसार 33 टक्के हाऊसिंग स्टॉक मागविण्यात आला. एका बिल्डींगमध्ये 33 टक्के आरक्षण हा न परवडणारा प्रयोग होता. त्यामुळे सन 2013 च्या शासन निर्णयानुसार केवळ 20 विकासकांनी इच्छुकता दर्शविली होती, परंतु त्यांच्या पैकी आजपर्यंत कोणीच पुढे आले नाही. सन 2013 मध्ये हाऊसिंग स्टॉक निर्माण करण्याची शासनाची इच्छा होती. पर्यावरण, हाईट रिस्ट्रक्शन्स, पूर्वी करण्यात आलेले करार व त्यामधील कमिटमेंट, यामुळे या इमारतीचे बांधकाम करणे विकासकाला परवडारे नव्हते. म्हणून सन 2013 च्या शासन निर्णयान्वये विकासकाने इच्छुकता दाखविली नाही. यामुळे सन 2008 ते 2015 पर्यंत याप्रकरणी कसलीही अंमलबजावणी झाली नाही. याप्रकरणी शासनाने जबाबदारी घेऊन प्रोरेटाचा एफएसआयसंबंधी हाऊसिंग स्टॉक आणि इतर रखडलेली कामे सुरु करण्यासाठी अभ्यास करुन प्रोरेटा संबंधी सूट जाहीर केली आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2013 च्या शासन निर्णयानुसार जवळपास 67 हजार हाऊसिंग स्टॉक निर्माण होणार होता, परंतु आता एकत्रित योजना करण्यात आली आहे. मुंबई शहरातील म्हाडाच्या जागेवरील 56 वसाहतीमध्ये किंवा म्हाडाच्या इतर ठिकाणच्या जागेवर किमान 2 लाख व एसआरएच्या माध्यमातून 1 लाख इतका परवडणाऱ्या घरांचा हाऊसिंग स्टॉक निर्माण होणार आहे. अशा प्रकारे परवडणाऱ्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने जे रेग्यूलेटरी बिल आणले आहे त्यामध्ये डीम्ड कन्व्हीयन्स संबंधीचे कलम वगळण्यात आले आहे, असे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता......

आहे. केंद्र शासनाच्या रेग्यूलेटरी बिलाचा ड्राफ्ट आता प्राप्त झाला असून मुंबई व महाराष्ट्राकरिता डीम्ड कन्व्हीयन्स संबंधीची शासनाची भूमिका आग्रही आहे. केंद्र शासनाच्या कायद्यामुळे आपल्या राज्याला बाधा येणार नाही त्याकरिता विधि व न्याय विभागाचे मत घेऊन राज्याचे धोरण तत्काळ निश्चित करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, संक्रमण शिबीराचे पैसे काही विकासकांनी थकविले आहेत, हे खरे आहे. विकास नियंत्रण नियमावलीतील नियम 33(7) व 33(10) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी संक्रमण शिबीरे विकासकांना भाड्याने देण्यात येतात त्याबाबतची थकीत येणी रक्कम 80.50 कोटी रुपये आहे. खंबाटी डेव्हलपर्स 3 कोटी 4 लक्ष रुपये, जानकी डेव्हलपर्स 4 कोटी 27 लक्ष, डीजे डेव्हलपर्स 2 कोटी 71 लक्ष, जैनम डेव्हलपर्स 1 कोटी 87 लक्ष व प्रोग्रेसीव्ह डेव्हलपर्स 2.7 कोटी रुपये या विकासकाकडून संक्रमण शिबीरांची थकीत रक्कम येणी आहे. सदरहू रक्कम वसूल करण्याकरिता कार्यवाही करण्यात आली असून काही प्रकरणी खटलेही दाखल केले आहेत. यासर्व थकबाकीदारांकडून थकीत रक्कम वसूल करण्यासाठी एक विशेष मोहीम तत्काळ राबविण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, बीडीडी चाळीसंबंधीची संपूर्ण योजना पूर्ण झालेली आहे. यामध्ये काही पोलिसांचे क्वार्टर्स असून ते 3-4 पिढ्यांपासून तेथे रहात आहेत. या पोलिसांना मालकी हक्काचे घर देण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे. याप्रकरणी एक वाद न्यायालयामध्ये सुरु आहे. याप्रकरणी शासनाची भूमिका स्पष्ट असून संबंधित पोलिसांना मालकी तत्वावर घरे उपलब्ध करुन देण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण विभागाकडे बीडीडी चाळीचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता. सदरचा प्रश्न सोडविण्याची या सरकारची इच्छाशक्ती असल्यामुळे त्याबाबतचे काम पूर्ण केले असून त्यास सुरुवात करावयाची आहे. अशाच प्रकारे धारावी झोपडपट्टी पुनर्विकासाचा प्रश्न सोडविण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले होते की, धारावीतील 5 व्या सेक्टरचे काम म्हाडामार्फत करण्यात येत आहे. यासंदर्भात थोडीशी अडचण असून एक इमारत

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता......

उभी केली आहे व त्यामध्ये 55 लोकांना घर देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, इतर दोन इमारतींचे काम सुरु आहे. धारावीतील 4 सेक्टरमधील लोकांना संक्रमण शिबीर देऊन त्याच ठिकाणी त्यांचा विकास करण्यात येणार आहे. धारावी पुनर्वसन प्रकल्पातील 4 सेक्टरर्सना अंतिम स्वरुप दिले असून त्याचे ई-टेंडरींग केले आहे. सदरहू टेंडरसाठी नामवंत विकासक व विदेशी कंपन्यांनी इच्छुकता दर्शविली आहे. धारावी पुनर्वसन प्रकल्पास आवश्यक त्या सर्व अंतिम मंजूऱ्या शासनाने दिल्या आहेत. तसेच, धारावी पुनर्वसन प्रकल्प योजनेचा प्रारंभ करण्यासंदर्भात शासनाकडून प्रत्येक आठवड्यात मॉनेटरींग करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, धारावी पुनर्वसन प्रकल्पामध्ये लघु उद्योजकांसाठी कोणता निर्णय घेण्यात येणार आहे, असा मुद्दा एका सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला होता. धारावी पुनर्वसन प्रकल्पातील प्रत्येक सेक्टरमधील परंपरागत उद्योग करणाऱ्या सर्व उद्योजकांना त्यांचा उद्योग व व्यवसाय करता यावा, याचे प्रयोजन करण्यात आले आहे. धारावी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत एकाही उद्योगाला बाहेर जाऊ दिले जाणार नाही, त्याबाबतची पूर्ण व्यवस्था धारावी नवीन पुनर्वसन प्रकल्प योजनेत करण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, गिरणी कामगारांसाठी माहे एप्रिल किंवा मे महिन्यामध्ये 2500 ते 2600 घरांची तसेच, माहे जून व जुलै मध्ये 3000 घरांची लॉटरी काढण्यात येणार आहे. त्याबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. गिरणी कामगारांच्या कृती समितीने मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली होती. त्यावेळी 15 दिवसामध्ये गिरणी कामगारांच्या घराचे पूर्ण धोरण व टप्प्यटप्प्याने कशा प्रकारे घरांचे वाटप करण्यात येणार आहे यासंदर्भात चर्चेसाठी गिरणी कामगारांच्या कृती समितीस बोलावण्यात आले आहे. सदरहू कृती समितीसोबत चर्चा करुन घरांचे दर व इतर घरांच्या संदर्भातील भूमिका याबाबत पुढील 3-4 दिवससात बैठक घेण्यात येईल. त्यावेळी मुख्यमंत्री महोदय त्यांच्या समवेत बैठकीमध्ये निर्णय घेतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार साहेबांनी सांगितले की, बीडीडी, धारावी झोपडपट्टी संदर्भात मुंबई उपनगरामध्ये डिलिब्रेट कंडीशनसंदर्भात शासनाने अफजलपुरकर

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

समितीची नियुक्ती केली होती. सदरहू समितीचा अहवाल सन 2000 मध्ये सादर करण्यात आला, त्यास जवळपास 15 वर्षे होऊन गेली आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांनी सन 2005 मध्ये त्या अहवालास तत्वतः मान्यता दिली होती. सन 2009-2010 पर्यंत तत्कालीन सरकारने या विषयाच्या अनुषंगाने 4 ते 5 शासन निर्णय निर्गमित केले, परंतु त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. एलआयजी आणि इडब्ल्यूएस या दोन इमारतींमध्ये 500 ते 600 मिटरचे अंतर असून या इमारतींना जवळपास 40 वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. त्यासंदर्भात मुंबई शहर व उपनगरातील या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत नियम 33(7) नुसार कार्यवाही करण्यासाठीची बाब आम्ही तपासून घेत आहोत.

यानंतर OO-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष :** मुंबई उपनगरासाठी ॲज इट इज करावे. ज्याप्रमाणे सिटीला आहे तसेच सबर्बला देण्यात यावे.

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, आमची त्याच मुद्दावर अंतिम चर्चा चालू आहे. माननीय अध्यक्षांच्या मनाप्रमाणे आम्ही करु. त्यामुळे पीएमजीपीच्या इमारती आणि खास करुन मुंबई शहरामध्ये पूर्वी आपण पुनर्वसित केलेल्या इमारती आता पुन्हा 40 वर्षांनी पुनर्वसन करण्याची वेळ आली आहे. त्यासंबंधी सुध्दा सरकार सकारात्मक भूमिकेत आहे. मला माहिती आहे की, आपण सांगत होतात की, आम्ही फार प्रयत्न केले पण आम्ही हे काम करु शकलो नाही. आपण जे करु शकला नाहीत ते आम्ही करु, त्याबद्दल आपण चिंता करु नका. सन्माननीय सदस्य श्री. कालिदास कोळंबकर हे माझे चांगले मित्र आहेत आणि त्यांनी एक चांगली सूचना केलेली आहे. जवळपास 300 ते 400 इमारतींचा प्रश्न आहे. ज्या पध्दतीने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला आपण गती दिलेली आहे आणि मालेगावच्या यंत्रमाग कामगारांसाठी घरे देणे यासंबंधी आम्ही झोपडपट्टी क्षेत्राच्या आत असलेल्या सर्वांना लाभ अनुज्ञेय आहे. झोपडपट्टीच्या बाहेरचे लोक असतील तर त्यांचे प्रस्ताव बघून प्रस्तावవाईज त्यावर निश्चितपणे आपण चर्चा करु. त्यामध्ये आपल्याला कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही.

अध्यक्ष महाराज, हौसिंगच्या दृष्टीने बरेचसे विषय या सभागृहामध्ये मांडलेले आहेत आणि म्हणून मी आपल्या माध्यमातून सन 2016-17 या वर्षाकरिता गृहनिर्माण विभागाची मागणी क्रमांक क्यू-3 अंतर्गत प्रस्तावित योजनांतर्गत योजनेकरिता रुपये 217 कोटी 50 लक्ष व योजनेतर योजनेकरिता रुपये 151 कोटी 71 लक्ष 53 हजार असे एकूण 369 कोटी 21 लक्ष 53 हजार इतक्या रकमेच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

-------

2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, नगरविकास, गृह, सामान्य प्रशासन, विधी व न्याय या विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल, सन्माननीय सदस्य श्री. अतूल भातखळकर, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई, सन्माननीय सदस्य श्री. अबू आझमी, सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. आशिष शेलार, सन्माननीय सदस्य श्री. विजय भांबळे, सन्माननीय सदस्य श्री. रमेश लटके सन्माननीय सदस्य श्री. धैर्यशिल पाटील, सन्माननीय सदस्य श्री. शेख आसिफ, सन्माननीय सदस्य डॉ. मिलिंद माने, सन्माननीय सदस्य श्री. संदिप नाईक, सन्माननीय सदस्य श्री. संदिप नाईक, सन्माननीय सदस्य श्री. राजेश क्षीरसागर, सन्माननीय सदस्य श्री. इम्तियाज जलील, सन्माननीय सदस्य श्री. कालिदास कोळंबकर, सन्माननीय सदस्य श्री. सरदार तारा सिंह, सन्माननीय सदस्य श्री. राहूल मोटे, सन्माननीय सदस्य श्री. राहूल कूल, सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू, सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल, सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. विरेंद्र जगताप या सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले मत या ठिकाणी व्यक्त केले. काही विधायक सूचना देखील दिलेल्या आहेत. आपले राज्य हे देशातील नागरीकरण झालेल्या राज्यांपैकी एक राज्य आहे. आता जवळ जवळ 48 ते 50 टक्के लोकसंख्या ही नागरी भागामध्ये राहते आहे. ज्या प्रमाणात नागरी भागाचा विस्तार झाला त्या प्रमाणात नागरी भागामध्ये आपण सोयी सुविधा तयार करु शकलो नाही. त्यामुळे नागरी भागाची परिस्थिती अशी आहे की, पिण्याचा पाण्याचा प्रश्न असेल, घनकचऱ्याचे व्यवस्थापन असेल, सांडपाण्याचे शुध्दीकरण असेल, या सर्व बाबींसंबंधी फार मोठा बॅकलॉग तयार झाला आहे. त्यामुळे पर्यावरणपुरक शहरे म्हणजे सस्टेनेबल सिटीज आपण फारशा तयार करु शकलो नाही. त्यामुळे राज्याचा नगरविकास विभाग गेली एक-दीड वर्षे काम करीत असताना आमचा सातत्याने असा प्रयत्न आहे की, वेगवेगळ्या योजनांचा कव्हर्जन्स करुन मूलभूत सोयी म्हणजे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सांडपाण्याची व्यवस्था, घनकचऱ्याचे व्यवस्थापन, हगणदारी मुक्त शहर, या चार-पाच मूलभूत बाबींसाठी अधिकचा निधी कसा देता येईल अशा प्रकारचा प्रयत्न आपण सुरु केला आहे. या संदर्भात केंद्र सरकारने सुरु केलेले अमृत अभियान अत्यंत महत्वाचे आहे. या अभियानांतर्गत राज्यातील 43 शहरे आली असून

3….

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस...

साधारणपणे राज्याच्या 76 टक्के म्हणजे नागरी भागातील लोकसंख्येला या अमृत योजनेचा लाभ आपण देत आहोत. या योजनेंतर्गत आपल्या राज्याने केंद्र सरकारकडून जो आराखडा मंजूर करुन घेतला. त्यामध्ये बीड पाणी पुरवठा योजनेला 126 कोटी, पनवेल पाणी पुरवठा 150 कोटी, उस्मानाबाद पाणी पुरवठा 45 कोटी, वर्धा पाणी पुरवठा 35 कोटी, हिंगणघाट पाणी पुरवठा 58 कोटी, अचरपूर पाणी पुरवठा 15 कोटी, यवतमाळ पाणी पुरवठा 55 कोटी, अंबरनाथ पाणी पुरवठा 13 कोटी, बदलापूर पाणी पुरवठा 33, सातारा पाणी पुरवठा 5 कोटी, वसई विरार पाणी पुरवठा 130 कोटी, पिंपरी चिंचवड पाणी पुरवठा 120 कोटी, सोलापूर पाणी पुरवठा 66 कोटी, जळगांव पाणी पुरवठा 124 कोटी, मालेगांव पाणी पुरवठा 49 कोटी, अहमदनगर पाणी पुरवठा 149 कोटी, लातूर पाणी पुरवठा 60 कोटी, अमरावती पाणी पुरवठा 85 कोटी, अकोला पाणी पुरवठा 91 कोटी, नागपूर पाणी पुरवठा 223, चंद्रपूर पाणी पुरवठा 100 कोटी, उल्हासनगर भुयारी गटारी योजना 223 कोटी, त्याचबरोबर सौर ऊर्जेचे जवळपास 286 कोटींचे प्रकल्प, ग्रीन स्पेसिअसचे 42 कोटींचे प्रकल्प असे जवळ जवळ 2020 कोटींच्या आसपास अमृत योजनेंतर्गत प्रकल्प मंजूर करुन घेतले आहेत. या प्रमुख शहरांमधील पिण्याच्या पाण्याचे नियोजन योग्य व्हावे अशा प्रकारचा प्रयत्न आपण करीत आहोत. आपण जर पाहिले तर नगरविकास विभागाचा भर हा प्रामुख्याने सात-आठ महानगरपालिकांच्या पलिकडे जात नाही. कारण या महानगरपालिकांमध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे किंवा राज्यावर त्यांचे डॉमिनन्स जास्त आहे. त्यामुळे आम्ही आता असा प्रयत्न केला आहे की, नगरपालिका क्षेत्रामध्ये प्रामुख्याने ही जी कामे करावयाची आहेत ती त्या नगरपालिका स्वतःच्या निधीमधून करु शकणार नाहीत. अशा प्रकारची कामे केली पाहिजेत आणि ती कामे आपण निश्चित पणे घेतलेली आहेत. यामध्ये आपण काही धोरणात्मक प्रयत्न करीत आहोत की, आपल्याला सांडपाण्याचा पुनर्वापर कसा करता येईल, मोठ्या शहरांच्या बाहेरील नदी किंवा नाले जे आहेत ते संपूर्ण प्रदुषित झाले आहेत. शहरांच्या बाहेर घाण आहे. ग्रामीण भागामध्ये ती घाण जात आहे. आसपासच्या गावांमधील सारख्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे आपण राज्य सरकारच्या वतीने नवीन पॉलिसी आपण तयार करीत आहोत. त्या पॉलिसीमध्ये संपूर्ण सांडपाण्यावर प्रक्रिया करणे आणि त्यावर टर्सरी ट्रीट करणे आणि त्या माध्यमातून राज्यातील वीज प्रकल्प असतील,

4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस....

राज्यातील एमआयडीसी असतील जे उद्योग असतील, त्यांच्यावर हे बंधन टाकणे की, त्यांनी ट्रीटेड पाणीच घेतले पाहिजे. मुंबईचा एमएमआर रिजनचा विचार केला तर मुंबईला पाण्याचा प्रॉब्लेम आहे. मिरा भाईंदरला पाण्याचा प्रॉब्लेम निर्माण झालेला आहे. उल्हासनगरला खूप मोठा प्रमाणात पाण्याचा प्रॉब्लेम निर्माण झालेला आहे. पण त्याचवेळी जर ठाणे, वसई विरार किंवा ठाण्याच्या बाजूला कल्याण डोंबिवली असेल, मिरा भाईंदर असेल, अशा महानगरपालिकाच्या सांडपाण्यावर आपण प्रक्रिया केली आणि ते प्रक्रिया केलेले पाणी आपण एमआयडीसीला दिले तर सध्या एमआयडीसी जे फ्रेश पाणी घेत आहे ते पाणी आपल्याला या महानगरपालिकांना देता येईल. आज एमआयडीसीचे पाणी आम्हाला मिळाले पाहिजे, पण ते मिळत नाही, असा वाद निर्माण होऊन अडचणी निर्माण झाल्या आहेत. दुसरीकडे उद्योग असे म्हणतात की,

PP-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस..........

उद्योगाकरिता पैसे देऊन ही धरणे बांधली. हे सर्व पाणी देऊन टाकले तर आमचे उद्योग बंद होतील. त्यामुळे धोरणात्मक निर्णय करुन एकीकडे बल्क युजर मिळाल्यामुळे त्यावर प्रक्रिया करणे महानगरपालिका व नगरपालिकांना सोपे जाईल आणि दुसरे असे की फ्रेश पाणी वाचवू शकू. याबाबत धोरणात्मक निर्णय घेत आहोत. पीपीपी आणि गॅप फन्डिंगच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात लिक्वीड वेस्ट मॅनेजमेंट कसे करता येईल यासाठी निश्चितपणे प्रयत्न सुरु केलेला आहे. वेगवेगळ्या महानगरपालिकांमधील मुलभूत सोयींकरिता तरतूद केलेली आहे. वैशिष्ट्यपूर्ण योजनांसाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वात महत्वाचे म्हणजे स्वच्छ भारत अभियानांतर्गत ग्रामीण भागामध्ये हागणदारी मुक्त महाराष्ट्र हे फार चांगले अभियान चालविलेले आहे. आता स्वच्छ भारत अभियान राबवित आहोत. पण शहरामध्ये हे अभियान राबविण्यात आले नाही. आपले एकही शहर हगणदारीमुक्त नव्हते. पण आमचे सरकार आल्यानंतर प्रयत्न करुन सर्व शहरे निर्मल व्हावीत याकरिता स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरु केले आणि याचे दोन टप्पे ठेवलेले आहेत. पहिल्या टप्प्यात शहर हागणदारीमुक्त करणे आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये शहर स्वच्छ करणे. स्वच्छ शहर म्हणजे जे हागणदारीमुक्त आहे आणि त्याठिकाणी घन कचऱ्याचे व्यवस्थापन केले जाते. केवळ कलेक्शन होत नाही तर त्याचे व्यवस्थापन केले जाते. अशा शहरांना स्वच्छ शहराचा दर्जा देत आहोत. दिनांक 31 जानेवारी, 2016 पर्यंत 52 शहरे हागणदारीमुक्त करु शकलो आणि दिनांक 30 एप्रिल, 2016 पर्यंत अजून 50 शहरे हागणदारीमुक्त होत आहेत. एकूण 300-350 शहरांपैकी 100 शहरे हागणदारीमुक्त करु शकलो ही एक अत्यंत महत्वाची कामगिरी नगरविकास विभागाने केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, काही शहरे स्वच्छ करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये हागणदारीमुक्त आणि घनकचरा व्यवस्थापन यामध्ये चांगला गुणात्मक बदल घडवू शकलो आणि राज्यातील 50 शहरे स्वच्छ शहरे म्हणून घोषित करु शकलो. ही घोषणा करताना याचे तीन मोड ठेवलेले आहेत. पहिले सेल्फ सर्टिफिकेशन, त्यानंतर जिल्हा विभाग पातळीवरचे इव्हॅल्युएशन त्यानंतर त्याचे थर्ड

श्री.देवेंद्र फडणवीस..........

पार्टी स्टेट लेव्हल इव्हॅल्युएशन आहे. अशा प्रकारच्या इव्हॅल्युएशनमध्ये जे शहर स्वच्छ आणि हागणदारीमुक्त असेल त्यालाच तो दर्जा देतो. पण अनेक वेळा लोक झाला असे सांगतात पण अनेक वेळा ते झालेलेच नसते. म्हणून याचे तीन टप्प्यामध्ये मुल्यांकन करीत आहोत. अशी ज्या शहरांनी घोषणा केली आहे अशा शहरांना अ-वर्ग शहर असेल तर त्यांना दोन कोटी रुपयांचा पुरस्कार दिला. ब-वर्ग असेल त्यांना दीड कोटी रुपयांचा पुरस्कार दिलेला आहे आणि क-वर्ग वर्गाला एक कोटी रुपये दिलेले आहेत. हे देत असताना सांगितले की, 20 टक्के पैसे घोषणा झाल्यावर आणि सर्टिफिकेट मिळेल तेव्हा आणि 80 टक्के 6 महिन्यांनंतर हीच परिस्थिती कायम असेल तर देण्यात येतात. त्यामुळे 6 महिन्यांनी पुन्हा त्याठिकाणी जाऊन इव्हॅल्युएशन घेतो की, जी काही हागणदारीमुक्ती झाली आहे ती कायम आहे किंवा नाही. जे काही स्वच्छता आहे ती कायम आहे की नाही. या माध्यमातून हे काम करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, मला खरोखर महानगरपालिका आणि नगरपालिकांचे अभिनंदन करायचे आहे की, त्यांच्याकडून खूप चांगला सहकार्य मिळत आहे. ज्याठिकाणी कचरा पॉईंट असे नाव होते. कारण तेथे कचरा टाकला जायचा तो सर्व भाग आता स्वच्छ झालेला आहे. अशा पाचगणीसारख्या ठिकाणी कुठलाही कचरा नाही. अशाप्रकारे तुलानात्मकदृष्ट्या या माध्यमातून सर्व महानगरपालिकांमध्ये प्लॅन तयार केलेला आहे. यानिमित्ताने चांगल्या प्रकारचे काम चालू आहे. स्मार्ट सिटीबाबत काही विषय याठिकाणी सांगण्यात आले. स्मार्ट सिटीबाबत बरेच बोलून झालेले आहे. सोलापूर आणि पुणे या दोन शहरांचे एसपीव्ही तयार केलेले आहेत. यामध्ये मेजॉरिटीने 6 लोक महानगरपालिकेचे आहेत. यात महापौर, स्थायी समिती सभापती, पक्षनेता, विरोधी पक्षनेता हे पदसिध्द सदस्य आणि दोन नगरसेवक असतील. या दोन्ही शहरांनी ते मान्य केलेले आहे. त्यांचे एसपीव्ही झाले असून त्याठिकाणी काम देखील सुरु होत आहे. मी मागच्या काळातही सांगितले की, एसपीव्ही चा कॉन्सेप्ट हा कोणाचे अधिकार काढून घेण्याकरिता नाही. आपल्याला मॉनिटरायझेशन करता आले पाहिजे याकरिता एसपीव्ही आहे. कारण एखादी एसपीव्ही तयार करतो त्यावेळी त्याच्यावर कोणतेही ओझे नसते. त्याची क्लीनचीट असते. त्यामुळे त्याला जर लँड व लिक्वीडीटी

.......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस..........

दिली तर त्याचे मॉनिटायझेशन करुन त्याचे 10 पट पैसे उभे करता येतात. म्हणून एसपीव्हीचे मॉडेल स्विकारलेले आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने दोन स्मार्टसिटीला मान्यता दिली तरी राज्य सरकारने पूर्ण दहा स्मार्टसिटींना मान्यता दिलेली आहे. उरलेल्या 8 स्मार्ट सिटीकरिता मुंबईजवळ स्वतःचा निधी असल्याने मुंबई वगळता उरलेल्या स्मार्ट सिटीकरिता राज्य सरकार निधी उपलब्ध करुन देत आहे. त्याकरिता एक स्पेशल फंड उभा करीत आहोत. सिडको, एमएमआरडीएच्या माध्यमातून नागरी भागातील संस्थांसाठी फंड उभा केला जात आहे. उरलेल्या महानगरपालिकांना स्मार्ट बनविण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. ज्यावेळी केंद्र सरकारच्या योजनेमध्ये येतील त्यावेळी टप्प्याटप्प्याने केंद्र सरकारचा निधी मिळेल तेवढाच निधी महाराष्ट्र सरकार सुध्दा देणार आहे. सध्या केंद्र सरकारकडून मिळत नसलेला निधी राज्य सरकार देत आहे. त्यामुळे भविष्यकाळात स्मार्ट सिटीमध्ये महाराष्ट्र खूप पुढे जाईल. देशातील सर्वात मोठी स्मार्ट सिटी महाराष्ट्राने सिडकोमध्ये सुरु केली. यामध्ये 17 सोयी सुरु केलेल्या आहेत. मोठ्या प्रमाणात उर्वरित काम याठिकाणी चालू आहे. स्मार्ट सिटीचे ॲप्लीकेशन कसे तयार झाले हे बघण्यासाठी बाहेरचे लोक येत आहेत. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून पथदर्शी काम हे सरकारने केलेले आहे. नागरिकरणाची वाढती मागणी पाहता हद्दवाढ मोठ्या प्रमाणात करीत आहोत त्यासाठी निधी देण्याची आवश्यकता आहे, नवीन नगरपंचायतींना निधी देण्याची आवश्यकता आहे. ही गोष्ट खरी आहे नगरपंचायती तयार केल्या पण त्यांना अजून स्टाफ दिलेला नाही. म्हणून त्यांच्या स्टाफचे पॅटर्न मंजूर केलेले आहे. यासाठी पदनिर्मितीला सुध्दा मान्यता देण्यात आलेली आहे. नवीन नगरपंचायतींकरिता बजेटमध्ये 140 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामुळे आता नगरपंचायतीचे काम देखील सुरु होऊ शकेल. हद्दवाढ होणाऱ्या महानगरपालिकांसाठी 100 कोटी आणि नगरपालिकांसाठी 80 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एक महत्वपूर्ण परिवर्तन यामध्ये असे करीत आहोत की, नगरविकास विभागाच्या माध्यमातून निधी देत असतो. नगरपालिकांच्या स्तरावर त्याचा खर्च इफेक्टिव्हली होतो का हा एक प्रश्न आहे. अनेक वेळा त्याठिकाणी बराच भ्रष्टाचार होतो, वेस्टेड इंट्रेस्ट असतात. जे.एन.एन.यु.आर.एम. काळात असे लक्षात आले की,

.......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस..........

निधी दिल्यानंतर कामे सुरु करण्यासाठी एवढा वेळ लागला. त्यामुळे त्याची कॉस्ट एस्कलेट झाली. नवीन प्रश्न निर्माण झाला की, एस्कलेटेड कॉस्ट कोणी सहन करायची. त्यामुळे अनेक प्रकल्प होऊ शकले नाही. म्हणून यामध्ये चार गोष्टींचा समावेश करायचे ठरवले आहे. यामध्ये दर्जा नियंत्रण सुरु करीत आहोत. यामध्ये सार्वजनिक बांधकाम आणि इतर विभागांची मदत घेऊन क्वालिटी कंट्रोलचे नेटवर्क सेटअप करीत आहोत. अशाप्रकारे नगरपालिका आणि महानगरपालिका असतील त्याठिकाणी जो काही निधी देतो त्याचा विनियोग होत असताना क्वालिटी योग्य आहे की नाही हे क्वालिटी कंट्रोलच्या माध्यमातून बघणार आहोत. यामध्ये थर्ड पार्टी ऑडिट सुध्दा सुरु केलेले आहे. त्यामुळे या सर्व कामांमध्ये थर्ड पार्टी ऑडिटच्या माध्यमातून लक्ष ठेवू शकणार आहोत. यामध्ये फलनिष्पत्ती म्हणजे आऊटकम इव्हॅल्युएशन ही एक गोष्ट आपण ॲड करीत आहोत. प्रकल्पाची संकल्पना काय होती आणि यामधून काय आऊटकम मिळालेले आहे याचे मॅकॅनिझम तयार करीत आहोत. स्टॅट्युटरीली काम आपण करीत आहोत. पण सनदी अधिकाऱ्याकडून सुध्दा त्याचे लेखापरिक्षण करीत आहोत. यामध्ये आपण कालमर्यादेचा समावेश करीत आहोत. लवकर काम केल्यास इन्सेंटिव्ह मिळाला पाहिजे आणि उशिरा काम केले तर शास्ती झाली पाहिजे. एखाद्या प्रकल्पावर अशी पॉलिसी असते, पण यामध्ये पॉलिसी नाही. नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये मोठमोठा निधी देतो, योजना देतो. त्या योजनेच्या कालावधीमध्ये किंवा कालावधीच्या आधी जर कोणी योजना पूर्ण केली तर त्याला ॲडीशनल फायनांन्शिअल इन्सेंटिव्ह मिळाला पाहिजे. पण त्या कालावधीपेक्षा जास्त काळ लागला तर त्याच्यावर फायनांशिअल शास्ती आली पाहिजे अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे. मुंबईच्या संदर्भात बरीच चर्चा याठिकाणी झाली.

QQ-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...........

मुंबईच्या संदर्भात बरीच चर्चा झाली. मुंबईच्या वेगवेगळया प्रक्ल्पांच्याबाबत मी यापूर्वी सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी अतिशय मुलभूत मुद्दा व्यक्त केला. मेट्रो-III च्या संदर्भात 17 जागा पाहिजे होत्या त्या तुम्हाला मिळाल्या नाहीत. त्यामुळे त्याचे नेमके काय होणार आहे ? मुळामध्ये हा प्रस्ताव महानगरपालिकेकडे पाठविण्याची आवश्यकता नव्हती. हा प्रोजेक्ट स्पेशल प्रोजेक्ट आहे. स्पेशल प्रोजेक्टबाबतच्या कायद्यामध्ये परमिशन कोणाची मागावी लागत नाही. हा प्रोजेक्ट एकदा डिक्लेअर झाल्यानंतर "Deemed to be handed over" अशा प्रकारची त्या जागांची स्थिती आहे. तरी महानगरपालिकेचे त्याबाबत काही म्हणणे असेल तर ते आपण ऐकून घेऊ. त्यामध्ये मला असे वाटते की, अनेक गोष्टी अनफाऊंडेड म्हणजे माहिती कमी गेल्यामुळे काही गोष्टी तयार झाल्या आहेत. उदाहरणार्थ त्या ठिकाणी हुतात्मा स्मारक नष्ट होणार, असे कोठे होणार नाही. कारण तो प्रकल्प इतक्या खालून जाणार आहे की त्यामुळे हुतात्मा स्मारकाला काहीच अडचण नाही. मुंबईमध्ये कोणाची हिम्मत आहे की, हुतात्मा स्मारकाला तेथे जाऊन वैगरे..... त्यामुळे अशा अनफाऊंडेड गोष्टीवर थोडेसे गैरसमज असतील तर ते आपण निश्चितपणे दूर करु.

अध्यक्ष महोदय, माझे मत एवढेच आहे की, सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील आरे.ए. कॉलनीचा विषय सातत्याने येतो. तुम्ही तिथली झाडे तोडणार वैगरे, यातील मुलभूत फरक आपण सर्वांनी समजून घेतला पाहिजे. मुळ आराखडा तयार केला त्यानुसार 2300 झाडे तोडावी लागत होती. त्यानंतर विचार केला की एवढी झाडे तोडण्यापेक्षा पलिकडे गेले पाहिजे. म्हणून पलिकडची जागा कोर्टा वैगरे जाऊन ती मिळविण्याच्या स्थितीत आहोत. ती जागा आपल्याला मिळते आहे ती जागा घेतल्यामुळे आपल्यावर दिड हजार कोटी रुपयांचा भार वाढणार आहे. कारण ती माशी लॅन्ड आहे. तेथे भराव टाकावा लागेल. त्यामुळे दिड हजार कोटी रुपयांचा भार वाढणार आहे. नव्याने जे डिझाईन तयार केले त्या डिझाईनमध्ये आपण हा विचार केला की, आपण आरे कॉलनीतच ते करायचे, तर आरे कॉलनीमध्ये 350 ते 500 च्या घरात झाडे तोडावी लागणार आहेत. आपल्याला मिळून निर्णय करायचा आहे की, दिड हजार कोटी तिथे लावायचे की, तीन ते साडेतीन हजार झाडे रिप्लान्ट कराचे

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...........

अधिक साडेतीन हजार लावून पर्यावरणाचे संतूलन ठेवून हे पैसे वाचवायचे कारण हे पैसे शेवटी माझ्या घरातील जात नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील तुमचे जात नाही, कोणाच्याच घरातील जात नाहीत. हे पैसे टॅक्स पेअरच्या घरातील जातात. समजा दिड हजार कोटीचे ठरविले तर 3500 झाडे वाचविण्याकरिता दिड हजार कोटी रुपये जास्तीचे वापरायचे, त्याचा भार कशावर येईल तर तो तिकीटावर भार येईल. ते पैसे कोणी कॉट्रॅक्टर त्याच्या खिशातून टाकणार नाही. म्हणजे तिकीटावर भार येणार आहे. तिकीट थोडेसे महाग होईल. या गोष्टींचा विचार करताना थोडासा प्रॅक्टीकल विचार करण्याची आवश्यकता आहे. म्हणून त्याचा राज्य सरकारने अंतिम निर्णय केलेला नाही. पर्यावरण हे महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील मी याच्या पलिकडे जाऊन एक गोष्ट सांगू इच्छितो की, आपण ज्यावेळेस पर्यावरणाचा विचार करतो, प्रदुषणाचा विचार करतो, त्यावेळेस झाडे का वाचवायची. कारण वातावरणात जे कार्बन फूट प्रिंट तयार होते, ते कार्बन फूट प्रिंट ऑक्सीजनच्या माध्यमातून नलिफाय करता आले पाहिजे. याकरिता जास्तीत जास्त झाडे लावली जातात. जगामध्ये कार्बन फूट प्रिंट कमी करण्याकरिता सर्वात इफेक्टीव्ह साधन काय आहे ? ते पब्लिक ट्रान्सपोर्ट आहे. पब्लिक ट्रान्सपोर्टमध्येही सर्वात इफेक्टीव्ह साधन कोणते आहे ? तर ते मेट्रो आहे. आपल्या देशांमध्ये मेट्रोकरिता पर्यावरणाची परवानगी घ्यावी लागत नाही. Because it is a prooved fact.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील त्यांनाही पटेल पण अलिकडच्या काळात तुमचा उद्योग चालू आहे, त्यांना उचकवणे, हवा भरणे त्यामुळे आधी तुम्हाला पटवून दिले तर तुमचा चेहरा तिकडे जाणार नाही इकडेच येईल. त्यांचे आमचे जमले आहे काही अडचण नाही. 5 वर्षे त्याच्याही पुढे 5 वर्षे काही चिंता नाही. त्यामुळे आरे चे पालक येथे बसलेले आहेत. ज्यावेळी कुठल्याही परिस्थितीमध्ये आर.ए.कॉलनीमधून स्टॅबिलाईजिंग लाईन नेऊ, अगदी डेपो कराचे नाही जरी ठरविले तरी स्टॅबिलाईजिंग लाईन नेऊ त्यावेळी देखिल काही झाडांची कत्तल करावी लागणार आहे. मुळामध्ये पर्यावरणाचा विचार करु त्यावेळी एकूण पब्लिक ट्रान्सपोर्ट तयार केला नाही तर कार्बन फूटप्रिन्ट किती तयार करतो ? आणि पब्लिक ट्रान्सपोर्ट केल्यामुळे किती रेडयूस करतो ? जी झाडे रिप्लॉन्ट करतो, तोडणार आहोत त्याने किती कार्बन फूट प्रिन्ट तयार होणार आहे याचा

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...........

जर नेट रेट विचार केला तर मी दाव्याने सांगतो लवकरच आकडेवारी प्रसिध्द करीन, त्याच्यामध्ये पब्लिक ट्रान्सपोर्ट तेथून नेऊन कार्बन फूट प्रिन्ट तयार करणार नाही. निश्चितपणे पर्यावरण पूरक आणि मुंबईच्या पर्यावरणाला मदत करणारे अशा प्रकारचे कार्य या माध्यमातून करु नेट रेट मुंबई ही पर्यावरण दृष्टया फायद्यामध्ये राहणार नुकसानीत जाणार नाही. तरी देखील माझा जर विचार केला तर मला रिटायरमेंट नंतर नागपूरला जायचे आहे. माझे शहर नागपूर आहे. मला इथे जन्मभर रहायचे नाही. मी मुंबईमध्ये राहतो पण मी मुंबईकर नाही. मला शेवटी माझ्या गावात मला नागपूरलाच जायचे आहे. जे मुळ मुंबईकर आहेत त्यांनी हा विचार केला पाहिजे की, आपल्या शहराला कुठे न्यायचे आहे.

अध्यक्ष महोदय, आज ज्या प्रकारचे ट्राफीक कंजेशन या शहरामध्ये दिसते आहे. मेट्रोमध्ये सर्वात महत्वाचे काय आहे ? मेट्रोमध्ये जेव्हा एक सबर्बन ट्रेन तयार करतो, त्यामध्ये एक स्टेशन दोन ते अडीच किलो मीटर एवढया दूर असते त्यामध्ये दोन स्टेशनमध्ये एवढे अंतर असल्यामुळे तेथे स्टेशनवर उतरलेल्या माणसाला दुसरा ट्रान्सपोर्ट वापरावाच लागतो. मेट्रोमध्ये दर 500 मीटरवर स्टेशन असते. मेट्रोचा टर्न अराऊंड टाईम हा फास्ट असतो. ज्यावेळेस आपण इंटिग्रेशन ऑफ ट्रान्सपोटेशन सिस्टीम करतो इंटिग्रेशनमध्ये सर्वात महत्वाचा रोल मेट्रो करीत असते. म्हणून मेट्रोची टर्न अराऊंड टाईम आणि 500-500 मीटरवर स्टेशन देता येतात त्याच्यामुळे पलिकडचा ट्रान्सपोर्ट आहे तो त्याला कमी लागतो. प्रत्येकाला घराच्या जवळपास ती मेट्रो मिळते. म्हणून मेट्रोचे जाळे तयार करण्याचा प्रयत्न करतो आहोत. मला एवढे काम निश्चित करुन जायचे आहे की, ज्या दिवशी मी रिटायर्ड होऊन नागपूरला जाईन त्या दिवशी मुंबईच्या लोकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, नागपूरच्या माणसाला देखिल मुंबई बद्दल तेवढच प्रेम होते. किंबहूना मुंबईचे जे पब्लिक ट्रान्सपोर्ट आहे. त्याच्यामध्ये बदल करण्याचे काम नागपूरच्या माणसाने या ठिकाणी येऊन केले. हा फूट प्रिंट मला निश्चितपणे तयार करायचा आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपल्याला पर्वा सांगितले होते की, मेट्रोचे दोन टेंडर काढलेले आहेत. मला सांगताना आनंद वाटतो की, मेट्रो-VII चे टेंडर सांगित्याप्रमाणे ते उघडले, ओपन झाले त्याचा आम्ही वर्कआर्डर देतो आहोत. टेंडर 10 टक्के बिलोने गेलेले आहे. त्याच्यामध्ये काही प्रॉब्लेम नाही आहे.

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...........

मेट्रो-2A याचे टेंडर पुढच्या 15 दिवसात उघडतो आहे. त्याचा देखिल वर्कऑर्डर देणार आहोत. मेट्रो-VII आणि मेट्रो-2A मध्ये तुम्हाला सन 2019 मध्ये नेणार म्हणजे नेणारच. ही तारीख सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांनी दिलेली आहे. तुम्हाला माहिती आहे की, ते माझे जवळचे मित्र आहेत. त्या दिवशी मी मेट्रोच्या संदर्भातील आपल्यापुढे माहिती मांडलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मी नगरविकासाच्या माध्यमातून एवढेच सांगू इच्छितो की, देवणारच्या डंम्पिंग ग्राऊंडच्या संदर्भात एस.आय.टी. वैगरे केली होती. एस.आय.टी.ची चौकशी झाली. त्या चौकशीचा रिपोर्ट आमच्या सरकारसमोर आला. त्याबाबत हाय कोर्टात देखील केस झाली. आमच्या सरकारने तो स्वीकारला. स्वीकारल्यानंतर त्याच्यावर पुढची कारवाई झाली. त्याच्यामध्ये ज्या काही ॲनॉमॉलिज होत्या त्यामुळे कॉन्ट्रॅक्ट रद्द झाला. त्यातील ॲनॉमॉलिज पूर्ण मला पाठ नाहीत. कारण तो स्वीकारुन बरेच दिवस झाले. त्यामध्ये काही ॲनॉमॉलिज होत्या त्या आपण स्वीकारल्या. आता देवनारमध्ये वेस्ट टू एनर्जी करायचे तेथे डंम्पिंग करायचे नाही. जे काही करायचे ते प्रक्रिया करायची या दृष्टीने महानगरपालिकेने वेस्ट टू एनर्जी या प्रकल्पाची कारवाई वेगाने सुरु केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख उपस्थित नाहीत. त्यामुळे मी त्याचे फारसे उत्तर देत नाही. त्यातील काही गोष्टीचे अगोदर उत्तर दिलेले आहे.

RR-1 ........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले की, मुंबईतील स्ट्रीट वेंडींग पॉलीसीचा विषय पेंडींग आहे. एकीकडे फेरीवाल्यांमुळे लोक त्रस्त आहेत. दुसरीकडे गरीब समाजाकरिता वेंडींग झोन तयार न केल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत आहे. एकदा आपण नवीन झोन तयार केले तर त्यांचे रेग्युलरायझेशन करु शकू. आज ते विखुरलेले आहेत, त्यांच्यापासून मुंबईकरांना होणाऱ्या त्रासातून आपण मुक्त होऊ शकाल. याबाबत महानगरपालिकेला तत्काळ निर्देश देण्यात येतील की, या पॉलीसीप्रमाणे निश्चित कालावधीमध्ये वेंडींग झोन किंवा हॉकींग झोन करावेत. आपल्याकडे वेंडींग झोनला आपण हॉकींग झोनही म्हणतो. सन्माननीय सदस्य श्री.संदीप नाईक यांनी विचारलेल्या मुद्दयांबाबत मी सांगितले आहे. मी येथे घोषित करो किंवा न करो पण सन्माननीय सदस्य श्री.कालीदास कोळंबकर यांनी मांडलेले विषय आम्हाला मान्य असतात.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाविषयी बोलताना रेट ऑफ कन्व्हीक्शनबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. आपण दोन प्रकारे रेट ऑफ कन्व्हीक्शन मोजत असतो. केंद्र सरकारची एन.सी.आर.बी. संस्था आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी एन.सी.आर.बी. च्या संबंधित कागदपत्रे येथे वाचून दाखविली आहेत. त्यांनी सांगितले आहे की, एन.सी.आर.बी. च्या रिपोर्टप्रमाणे महाराष्ट्र गुन्हयांमध्ये खूप वर गेलेला आहे. पण मी याबाबत सांगू इच्छितो की, हा 2014 चा हा रिपोर्ट आघाडी सरकारच्या काळातील आहे. यामध्ये तुमच्या किंवा आमच्या शासनाचा संबंध आहे असे मी म्हणणार नाही. आपण दिलेल्या आकडेवारीनुसार सांगितले की, महाराष्ट्र हा देशात गुन्हेगारीमध्ये नंबर वन झालेला आहे. पण मी सांगू इच्छितो की, आपण सांगितलेली आकडेवारी 2014 ची आहे. 2015 ची आकडेवारी आता कमी आलेली आहे पण त्यावर मी नंतर बोलेल. मी सांगू इच्छितो की, एन.सी.आर.बी. केवळ आय.पी.सी. चे गुन्हे मोजते. राज्यातील गृह विभाग आपल्याकडील स्पेशल ॲक्टचे गुन्हे देखील यामध्ये मोजतो. या दोन्ही पॅरामीटरचा विचार केला तर एन.सी.आर.बी. प्युअरली आय.पी.सी.चे गुन्हे मोजते. याचा विचार केला तर 2009 मध्ये आपण 9 टक्क्यावर होतो, 2014 मध्ये आपण 14 टक्क्यावर पोहचलो होतो. आता मात्र एन.सी.आर.बी.प्रमाणे 35 टक्क्यावर पोहचलो आहोत. आपण राज्यातील स्पेशल कायद्याचा रेट ऑफ कन्व्हीक्शन मोजतो. आपले संचालनालय तो अहवाल दरवर्षी प्रकाशीत करते, त्याचा विचार

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

केला तर आपण 52 टक्क्यावर पोहचलो आहोत. याबाबतचे स्टेटमेंट मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. जेणेकरुन सभागृहातील सदस्यांना याची माहिती मिळेल व सदस्यांचे फार प्रश्न उरणार नाहीत. मला नमूद करावेसे वाटते की, आमचे शासन सत्तेवर आल्यानंतर रेट ऑफ कन्व्हीक्शनबाबत 14 निर्णय घेतले आहेत. याचा परिणाम असा झाला की, रेट ऑफ कन्व्हीक्शन झपाटयाने वाढत गेला आहे. अगोदर आपला रेट ऑफ कन्व्हीक्शन खाली जात होता. मुळामध्ये गुन्हे किती घडतात हे महत्वाचे आहे, त्याचबरोबर किती गुन्हेगार सापडतात व किती गुन्हेगारांना शिक्षा होते हे सुध्दा महत्वाचे आहे. गुन्हेगारांना शिक्षा झाली नाही तर गुन्हे करण्याची प्रवृत्ती वाढते. आज मला सांगताना आनंद वाटतो की, महाराष्ट्र रेट ऑफ कन्व्हीक्शनमध्ये शेवटच्या क्रमांकावर होता. आताच्या एक वर्षाच्या कालावधीत पहिल्या काही राज्यामध्ये महाराष्ट्र चालला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी फुल टाईम गृहमंत्र्याची मागणी केलेली आहे. याबाबत सांगतो की, मी ओव्हरटाईम गृहमंत्री आहे. आपला सल्ला मी अधूनमधून घेत असतो. त्यामुळे त्याचा फायदा मला निश्चितपणे होतो. रेट ऑफ कन्व्हीक्शन वाढत आहे. प्रमुख गुन्हयांमध्ये झालेली घट सांगून मी आपला फार वेळ घेणार नाही. या सभागृहात कायदा व सुव्यवस्थेची चर्चा येईल तेव्हा त्यावर सांगता येईल.

अध्यक्ष महोदय, काही चांगली कामे आपण करु शकलो. यामध्ये सीसीटीएनएस आहे. सीसीटीएनएस हा प्रोजेक्ट केंद्र सरकारने सर्व राज्यांना दिलेला आहे. तीन वर्षात कोणतेही राज्य हा प्रोजेक्ट करु शकले नाही, आपले राज्यही करु शकले नाही. पण एका वर्षामध्ये आम्ही सर्व पोलीस स्टेशन सीसीटीएनएसअंतर्गत कव्हर केलेले आहेत. सर्व मेजर कार्यालये त्याच्याशी इंटीग्रेट केलेले आहेत. आता 1100 पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर कंप्लीट इलेक्ट्रॉनिक्स पध्दतीने होत आहे. झिरो एफआयआर केला तर तो इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समीट होतो. तत्काळ तो सेंट्रल सर्व्हरला जेथे स्टॅटेस्टीकल डाटा स्टोअर होतो तेथे जात आहे. इलेक्ट्रॉनिकली एफआयआरची कॉपी समोरच्या व्यक्तीला आपण देऊ शकतो. आता इलेक्ट्रॉनिकली केलेल्या एफआयआरची प्रिंटआऊट आपण देत आहोत. त्यामुळे आता मोठा क्रिमीनल डेटाबेस तयार करण्याचे काम सुरु झालेले आहे.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

हा देशातील पहिला प्रकल्प आहे की तो गो लाईव्ह झालेला आहे. हा प्रकल्प आपण गो लाईव्ह करु शकलो आहोत. यामधील विविध ॲप्लीकेशन सांगण्याकरिता वेळ नाही, पुन्हा कधी तरी सांगेल. महत्वाची ॲप्लीकेशन्स आपण त्यामध्ये तयार केलेली आहेत, त्यासोबत महिलांकरिता डिस्ट्रेस कॉलचे ॲप्लीकेशन आपण सुरु केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मला एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की, आपण ऑपरेशन मुस्कान चालविले आहे. राज्यामधील मिसींग चिल्ड्रेनबाबतचे हे ऑपरेशन आहे. मध्यंतरी सुप्रीम कोर्टाने एक निर्णय दिला होता. या निर्णयाचा कसा फायदा होतो ते सांगतो. असा निर्णय का दिला असावा असे वाटते. सुप्रीम कोर्टाने सांगितले की, कोणताही मुलगा हरवला तर तो किडनॅप झाला आहे असे समजून गुन्हा दाखल करण्यात यावा. त्यामुळे अचानकपणे किडनॅप झालेल्या मुलांची संख्या मागील 2-3 वर्षे मोठया प्रमाणावर दिसायला लागली. पण आपल्या पोलिसांनी ऑपरेशन मुस्कान सुरु केले व यामध्ये हरविलेली किंवा कॅडनॅप झालेली दुसऱ्या फेजमध्ये 629 मुले शोधून काढली होती ती त्यांच्या परिवाराला परत केलेली आहेत. हे काम दोन फेजमध्ये केलेले आहे. पहिल्या फेजमध्ये 3192 मुले व दुसऱ्या फेजमध्ये 629 मुले हरविली किंवा किडनॅप झाली होती, ही सर्व मुले परत करण्याचे काम केलेले आहे. राज्यामध्ये व देशामध्ये हा सर्वात मोठा आकडा आहे. इतक्या मोठया प्रमाणात पोलिसांनी या मुलांना शोधून काढून, त्यांच्या फॅमिली शोधून काढून त्यांच्यापर्यंत ही मुले पोहचवली आहेत. मला वाटते की, आपल्या पोलीस दलाच्या या कामगिरीबाबत आपण त्यांचा निश्चितपणे बहुमान केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील सीसीव्हीसीबाबत आपणास कल्पना आहे की, यातील पहिला फेज आपण सुरु करु शकलो आहोत. दुसऱ्या फेजचे काम एप्रिलअखेर आपण जवळजवळ पूर्णत्वास नेत आहोत. याच वर्षी तिसऱ्या फेजचे काम करुन 2016 या वर्षात संपूर्ण मुंबई सीसीटीव्ही सर्व्हीलन्सखाली येणार आहे. पुणे शहर सीसीटीव्ही सर्व्हीलन्सखाली ऑलरेडी आलेले आहे. या व्यतिरिक्त आणखी सहा शहरे आपण सीसीटीव्ही सर्व्हीलन्सखाली आपण आणत आहोत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....4

श्री.देवेंद्र फडणवीस .....

सीसीटीव्हीमुळे खूप महत्वाचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत, वेळेची कमतरता असल्यामुळे आता ते सांगत नाही. पण त्याचा काय फायदा होतो आणि किती गुन्हे उघडकीस आले याची देखील माहिती माझ्याकडे आहे. कारागृह सुरक्षेबाबत आपण काही महत्वाचे निर्णय घेतलेले आहेत.

यानंतर SS-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

त्या ठिकाणी अत्याधुनिक यंत्रणा उभी करुन कारागृहे कशा प्रकारे अधिक चांगले करता येईल,याकरिता शासनाने प्रयत्न सुरु केलेला आहे. मी याबाबत आता जास्त बोलत नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी कस्टोडियल डेथ संदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत मी स्वत: माहिती घेतलेली आहे. ही गोष्ट खरी आहे. त्याच्यामध्ये ही जी काही डेथ झाली, शिर्डी पोलीस स्टेशन ठाणे अंमलदार अयुब बाबुलाल शेख गार्ड डयुटी कर्मचारी श्री.अब्दूल रजाक शेख, श्री.एम.बी माने. श्री.आर.डी आव्हाड यांना निलंबित करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांची बदली करण्यात आली आहे. वरिष्ठ अधिका-यांकडून या संपूर्ण घटनेची चौकशी करण्याचे काम सुरु आहे. अशा प्रकारे यापुढे कस्टोडियल डेथ होऊ नये, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.अतूल भातखळकर यांनीही एका कस्टोडियल डेथचा मुद्दा उपस्थित केला होता. या संदर्भात शासन उचित निर्देश देऊन आवश्यक ती कारवाई करेल.

अध्यक्ष महोदय, गृह विभागांतर्गत बंदरे हा विषय येतो. बंदरे या विषयासंदर्भातही शासनाने महत्त्वपूर्ण कार्यवाही करण्याची सुरुवात केलेली आहे. शासनाने आता पोर्ट पॉलिसी तयार केलेली आहे. गुजरात मेरिटाईम बोर्डामध्ये 309 दशलक्ष टनची क्षमता तयार केलेली आहे. त्यामुळे त्यांचे महसूली उत्पन्न 600 कोटी रुपये आहे. महाराष्ट्राची क्षमता 25 दशलक्ष टन इतकी असून त्यातून मिळणारे महसूली उत्पन्न 100 कोटी रुपये इतकेच आहे. पोर्टलेड डेव्हलपमेंटमधून उद्योग उभा राहतो. या उद्योगातून रोजगार मिळतो. तसेच, पोर्टलेड विकासातून राज्याला महसूलही प्राप्त होतो. या माध्यमातून राज्याला 1,000 कोटी रुपयांचा महसूल मिळणे अपेक्षित आहे. गुजरात राज्याला जो किनारा लाभलेला आहे, तो महाराष्ट्राला लाभलेल्या किना-याएवढा ब्लेस्ड नाही. खरेतर वेस्टर्न कोस्ट महाराष्ट्राला लाभलेला आहे गुजराथला नाही. पोर्टलेड डेव्हलपमेंट अंतर्गत 3 पोर्टचे काम सुरु केलेले आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

केंद्र शासन आणि राज्य शासन यांनी मिळून पोर्ट कनेक्टिव्हिटीकरिता एसपीव्ही मॉडेल पोर्ट कन्सेशनल कंपनी तयार केलेली आहे. जयगड पोर्टपर्यंत खाजगी कंपनीच्या माध्यमातून रेल्वे लाईन नेण्यास सुरुवात केलेली आहे. इतरही पोर्ट कनेक्टिव्हिटीचे काम सुरु केलेले आहे.

श्री.कालिदास कोळंबकर : अध्यक्ष महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त चैत्य भूमी,दादर येथे भीम ज्योत प्रज्वलित करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कालिदास कोळंबकर म्हणत आहेत, त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी घाटकोपर येथे 1100 घरे तयार आहेत, त्यांचा कब्जा घेण्याबाबत शासनाला अतिशय चांगली सूचना केलेली आहे. असे म्हटल्याबरोबर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश महेता म्हणाले की, घाटकोपर येथे 1100 घरे तयार आहेत, हे मला माहिती नाही आणि आपल्याला कसे कळले ? यासंदर्भात त्यांनी जर माननीय गृहनिर्माण मंत्री यांना सविस्तर माहिती दिली तर तातडीने ती घरे शासनाच्या माध्यमातून कब्जात घेतली जातील.

अध्यक्ष महोदय, पोलिसांना घरे देण्याकरिता 12,000 घरांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्याकरिता कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे. या तीन वर्षांमध्ये सर्व रेकॉर्ड तोडून पोलिसांना घरे तयार करण्याचे काम शासनाकडून हाती घेतले जाणार आहे. पोलिसांना स्वतःचे घर मिळाले पाहिजे, याकरिताही सर्व प्रकारचे कन्सेशन त्यांना देण्याकरिता कार्यवाही चालू आहे. याकरिता वेगवेगळया ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे 2 व 4 एफएसआय देण्यात आलेला आहे. याकरिता शासन योजना तयार करीत आहे. जे गरीब पोलीस आपल्यासाठी राबतात, त्यांना सेवानिवृत्तीनंतर स्वतःचे झोपडेदेखील मिळत नाही. प्रत्येक पोलिसाला घर मिळाले पाहिजे, हाच या मागील हेतू आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.बच्चु कडू यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत मुलभूत गोष्टी सांगितलेल्या आहेत. याबाबत मी आश्वस्त करु इच्छितो की, ज्यांनी ज्यांनी जे जे प्रपत्र देणे अपेक्षित असते, ते आले की नाही हे मी स्वतः तपासून त्यावर उचित कार्यवाही करेल. शासन,प्रशासन या सर्वांकरिता कायदे आहेत. कायद्यांचे पालन केले नाही तर ती योग्य बाब नाही. मंत्रालयात लावण्यात येणा-या रांगेसंदर्भातीलही प्रश्न आता ऑनलाईन अपॉईंटमेंटच्या माध्यमातून डायरेक्ट वेळेवर प्रवेश देऊन मिटविण्यात येणार आहे. याकरिता नवीन सिस्टम डेव्हलप करण्याचे कम चालू आहे. यासंदर्भातील कार्यवाही चालू आहे. शासनाचा प्रयत्न असा आहे की, मंत्रालयात यायची आवश्यकताच पडली नाही पाहिजे. अधिकारांचे जेवढे डिसेंट्रलायजेशन करता येईल, तेवढे करण्याचा प्रयत्न सरकारच्या माध्यमातून चालू आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांनी रावणवाडी येथे पोलीस स्टेशनच्या मागणीसंदर्भात मुद्दा मांडला होता. या संदर्भात देखील शासन सकारात्मक विचार करेल. तसेच, शेतक-यांवर ज्या भागामध्ये आंदोलनासंदर्भातील गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत, ते गुन्हे परत घेण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, विधी व न्याय विभागाच्या किती केसेस झाल्या, हे सांगून मी आता सभागृहाचा वेळ घेत नाही. या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी कोर्टची जी मागणी आहे, त्याबाबत शासन सकारात्मक विचार करेल. बिलोरा एअरपोर्टसंदर्भात पुढील आठवडयात बैठक घेणार आहे. या संदर्भातील काम पूर्ण होत आले आहे, पुढील आठवडयातील बैठकीमधील बैठकीत संबंधित कामही मार्गी लागेल.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मी सभागृहाला विनंती करतो की, सन 2016-2017 या वर्षाकरिता गृह विभागाच्या 12,517,19,68,000 रुपयांच्या मागण्या, सामान्य प्रशासन विभागाच्या 1,58,76,36,000 रुपयांच्या मागण्या, नगरविकास विभागाच्या 14,801,76,13,000 रुपयांच्या मागण्या, विधी व न्याय विभागाच्या 1,256,40,1,000 रुपयांच्या अर्थसंकल्पीय मागण्या मंजूर कराव्यात.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता ( गृहनिर्माण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, यापूर्वी मी उत्तराचे भाषण केले परंतु अनवधानाने माझे दोन ते तीन मुद्दे सांगायचे राहून गेले, ते मी आता सांगत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल व सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी मुंबईतील संक्रमण शिबिराच्या पुनर्वसनासंदर्भातील मुद्दा मांडला होता. शासनाने संक्रमण शिबिराच्या पुनर्वसनाचे धोरण तयार केलेले आहे. या धोरणाप्रमाणे जे लोक आता संक्रमण शिबिरामध्ये राहत आहेत, त्यांना सर्वांना तेथेच घरे देण्यात येतील. मूळ ग्राहकाकडून संक्रमण शिबिरातील घर घेतलेले परंतु कित्येक वर्षांपासून तेथेच राहत असलेल्यांचाही यामध्ये समावेश करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये 5-7 ठिकाणी फाळणीच्या वेळी जे काही रिफ्युजीस आलेले आहेत, त्या रेफ्युजीस कॉलनीच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव आलेला आहे. तेथे कै.हशु अडवाणी रिफ्युजी पुनर्वसन योजना राबविण्यात येणार आहे. केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या माध्यमातून बीपीटीच्या 7000 झोपडयांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहर आणि उपनगरामध्ये डिफेन्सची जागा व केंद्र शासनाच्या बाकीच्या जमिनीवर पुनर्वसन करण्याची योजना एकत्रितपणे राबविण्यासंबंधी केंद्र आणि राज्याचे एकमत झालेले आहे. त्याचा एमओयू करून त्या जमिनीवर देखील पुनर्वसन होणार आहे. एवढेच मुद्दे मला मांडावयाचे होते.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी अतिशय सविस्तरपणे उत्तर दिलेले आहे. मी माननीय गृहमंत्र्यांचे श्वानाच्या विषयाकडे लक्ष वेधणार आहे. माननीय गृहमंत्र्यांनी 242 ट्रेंन्ड डॉग राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे आहेत, अशी माहिती दिलेली आहे. 242 ट्रेंन्ड डॉगसला एक हॅन्डलर आणि 1 डॉग मास्टर असून, त्यांच्या संख्येत वाढ करावी अशी माझी सूचना आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, जरूर आवश्यकतेप्रमाणे वाढविण्यात येतील.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. योगेश सागर )** : आता मी सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक ए-1, ए-2, ए-3, ए-4, ए-5, ए-6, ए-7, ए-9, बी-1, बी-2, बी-3, बी-4, बी-5, बी-6, बी-7, बी-8, बी-9, बी-10, बी-11, बी-12, एफ-2, एफ-3, एफ-4, एफ-5, एफ-7, एफ-8, जे-1, जे-2, जे-3, जे-4, जे-5, क्यू-2, क्यू-3, क्यू-4 आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

----------

......2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आता म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्तावासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांच्या भाषणाला सुरुवात केली जाणार आहे. परंतु, आता मुख्यमंत्री महोदय हे सभागृहातून बाहेर जात आहेत. त्यामुळे सदर प्रस्तावास कोणते मंत्री उत्तर देणार आहेत ? आज चर्चा सुरु करायची की सोमवारी करायची ?

**तालिका सभाध्यक्ष** : आज चर्चा सुरु करु. पहिल्या प्रथम सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी त्यांच्या भाषणाला सुरुवात करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहात आवश्यक ती गणपूर्ती नसल्यामुळे म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्ताव सोमवार, दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी चर्चेला घेण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी चर्चेला सुरुवात करावी. त्यानंतर जे वक्ते बोलणार असतील त्यांना भाषण करण्याची संधी देण्यात यावी. सभागृहात आता मुख्यमंत्री नसले तरी सन्माननीय सदस्यांनी पॉईंटेड बोलावे, जेणेकरुन त्यांची उत्तरे देणे शक्य होणार आहे. आज जर म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्तावासंबंधी चर्चा घेतली नाही आणि ती सोमवारी घेतली तर त्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवरील कार्यक्रम पुढे जातो. आता विरोधी पक्षाचा म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्ताव आहे, त्यानंतर शासकीय विधेयके आहेत. वेळ वाया घालविण्याची काहीच गरज नाही. आज कामकाजपत्रिकेवर अशासकीय कामकाज असून, ते देखील पूर्ण करावयाचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मी विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांचे भाषण होणार असे ठरलेले आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाचा म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्ताव आहे. त्यानंतर दोन शासकीय विधेयके आहेत. त्यानंतर अडीच तासाचे अशासकीय कामकाज देखील आहे. अशा वेळी कोणती चर्चा पहिल्या प्रथम घेणार आणि कोणती चर्चा घेणार नाही, याबाबत माननीय संसदीय कार्यमंत्री यांनी सभागृहाला माहिती देण्याची आवश्यकता आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय वित्तमंत्री निवेदन करणार आहेत.

.......3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, विधिमंडळ अस्तित्वात आल्यापासून कोकणातील विकासाच्या संदर्भात एकदाही विधानसभेत चर्चा झालेली नाही. कोकणातील विकासाच्या संदर्भातील एखादी चर्चा सभागृहात उपस्थित करण्याबाबत मी माननीय अध्यक्षांची भेट घेतलेली आहे. मी माननीय गटनेत्यांना विनंती करुन इच्छितो की, आज त्या प्रस्तावासंबंधी सभागृहात चर्चा होणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ नसल्यामुळे ते जरी सभागृहात थांबले नाही तरी चालणार आहे. परंतु, माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आज आम्ही जे मुद्दे उपस्थित करणार आहोत, अशा सर्व मुद्यांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तरे दिली पाहीजेत अशी माझी विनंती आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आता आपल्याकडे व्हिडीओ सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांचे संपूर्ण भाषण व्हिडीओ सुविधेच्या माध्यमातून बघणार आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्यांना मी उत्तर देणार आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे. आता माननीय वित्तमंत्री निवेदन करीत आहेत.

.......4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : बीम्स प्रणाली बंद झाल्याने देयके मंजूर होऊ शहली नाहीत

**मु. शी.** : बीम्स प्रणाली बंद झाल्याने देयके मंजूर होऊ शहली नाहीत या विषयावर सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी उपस्थित केलेला मुद्दा.

श्री. सुधीर मुनगंटीवार ( वित्तमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी बीम्स प्रणाली बंद झाल्याने देयके मंजूर होऊ शहली नाहीत या विषयाच्या अनुषंगाने मुद्दा उपस्थित केला होता, त्यानुसार आपण निदेश दिल्याप्रमाणे, मी पुढील निवेदन करीत आहे :-

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

.......5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहात आवश्यक ती गणपूर्ती नसल्यामुळे म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्ताव सोमवार, दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी चर्चेला घेण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रस्ताव सोमवारी चर्चेला घेणार असेल तर तो स्पेशल सिटींगमध्ये घेऊ नये, अशी माझी विनंती आहे. रेग्युलर कामकाजामध्ये प्रस्ताव चर्चेला घेऊन कोकणातील जनतेला न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे. प्रश्नोत्तराच्या तासानंतर सदरहू प्रस्तावासंदर्भातील चर्चा घेण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय अध्यक्ष प्रस्ताव केव्हा घ्यायचा हे ठरविणार आहेत. सोमवार, दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहात आवश्यक ती गणपूर्ती नसल्यामुळे आपल्याला नियमानुसार कोणतेही कामकाज घेता येत नाही. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी सभागृहात आवश्यक ती गणपूर्ती ठेवण्याची जबाबदारी आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, असे केले तर अशासकीय कामकाज पुढील 100 वर्षात कधीच होणार नाही. अशासकीय कामकाजासाठी गणपूर्तीची आवश्यकता लागत नाही. परंतु, शासकीय कामकाज करण्यासाठी गणपूर्तीची आवश्यकता लागते, याची सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी चर्चेला सुरुवात करावी. माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत.

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे. पुर:स्थापनार्थ अशासकीय विधेयके घेण्यात येतील. पुढील कामकाज घ्यावे किंवा कसे हे नंतर ठरविले जाईल.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये कोकणातील एकूण 75 सन्माननीय सदस्य काम करीत आहेत.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय अध्यक्षांनी निश्चित केलेल्या कामकाजानुसार सोमवार दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी सकाळी 10 ते सकाळी 11.45 वाजेपर्यंत विशेष बैठक आयोजित केली जाणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, स्पेशल सिटींमध्ये कोकणातील जनतेच्या विकासासंदर्भातील प्रस्तावाला न्याय मिळणार नाही. तसेच सकाळी सन्माननीय सदस्यांची उपस्थिती खूपच कमी असते. मी आता चर्चेस सुरुवात करीत आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रस्ताव सोमवार दिनांक, 4 एप्रिल, 2016 रोजी नियमित बैठकीत चर्चेला घेण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, कोकणातील जनतेच्या विकासासंदर्भातील चर्चा खूप महत्वाची आहे. सदरहू प्रस्तावासंबंधी चर्चा अतिशय चांगली व्हावी याकरिता सोमवार दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी प्रश्नोत्तराच्या तासानंतर घेतली तर सर्व सन्माननीय सदस्यांना त्यामध्ये भाग घेण्यास सोयीचे जाणार आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सोमवार, दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. मग अशा वेळी उपस्थित करण्यात आलेला म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्तावासंदर्भातील चर्चा किती वेळ घेणार हा देखील प्रश्न निर्माण होणार आहे. सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्या मंजूर करुन घेणे हे पहिल्या प्रथम सर्वात महत्वाचे कामकाज आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रस्तावासंदर्भातील चर्चा आम्ही अडीच तासात संपविण्यासाठी सहकार्य करु.

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे. आता अशासकीय कामकाजाला सुरुवात केली जाईल. विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या प्रस्तावासंदर्भातील चर्चा सोमवार दिनांक, 4 एप्रिल, 2016 रोजी प्रश्नोत्तराच्या तासानंतर घेतली जाईल. त्या दिवशी कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी स्थगन किंवा औचित्याचे मुद्दे देऊ नयेत अशी माझी विनंती आहे.

आता अशासकीय कामकाजाला सुरुवात केली जाईल.

**पृ.शी.** : मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XI OF 2016.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, 1888.)

ॲड. पराग अळवणी ( विलेपार्ले ) : अध्यक्ष महाराज, सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक क्रमांक 11 मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1988 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : अनुमती देण्यात आली आहे.

ॲड. पराग अळवणी : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक क्रमांक 11 मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) विधेयक

L.A. BILL NO. XII OF 2016.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.)

श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महाराज, सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 12 महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, 1971 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 12 मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

--------------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XLV OF 2015.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्र.45 महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महाराज, हे विधेयक आणण्याच्या पाठीमागची भूमिका मी स्पष्ट केलेली आहे. 1965 मधील कलम 189 अन्वये मालमत्ता करामध्ये तिप्पट कराची आकारणी करण्याची तरतूद आहे. याचा अर्थ ही तिप्पट कराची आकारणी जन्मभर राहणार आहे त्यामुळे नागरी भागातील मागासवर्गीय, मजूर, सामान्य नागरीक या अधिनियामुळे त्रस्त झालेले आहेत. म्हणून ही तरतूद वगळावी, या हेतुने हे विधेयक या सभागृहात आणण्यामागचा उद्देश आहे. मंत्री महोदय या विधेयकाचा इतिहास आपण मागील प्रोसिडिंग काढून बघितले तर आपल्या लक्षात येईल. हे विधेयक नागपूर येथे डिसेंबर 2007 मध्ये हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी चर्चेला आणले, त्यावेळी तत्कालीन मंत्री श्री.राजेश टोपे होते. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे मंत्री महोदयांनी ऐकून घेतले नाही. लोकप्रतिनिधिंना विश्वासात घेतले गेले नाही. शासनाने उल्हासनगर येथील बांधकामे नियमित करण्यासाठी काकोडकर समिती नेमली होती. त्या समितीतील एक शिफारस घेतली आणि या सभागृहात हे विधेयक आणले. त्यावेळी सन्माननीय मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस, तसेच सन्माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी विरोधी पक्षात असताना त्यावेळी आक्षेप घेतला होता. तेव्हा बहुमताने विधेयक मंजूर झाले आणि ते विधानपरिषदेत गेले. दिनांक 1 ऑगस्ट 2007 रोजी हे विधेयक जेव्हा विधानपरिषदेत चर्चेला गेले तेव्हा सर्व सन्माननीय सदस्यांनी एक मताने चिकित्सा करण्यासाठी संयूक्त समितीकडे पाठवावे असा आग्रह धरला होता. या

...3

श्री.सुरेश हाळवणकर....

विधेयकावर शेवटी 17 विरुध्द 17 असे मतदान झाले. जशी समसमान मॅच होऊन टॉय होतो तसे झाले. तत्कालीन माननीय सभापतींनी सरकारला वाचविले आणि आपले कास्टींग व्होट त्या ठिकाणी दिले. असे हे जुलमी विधेयक या सभागृहात मंजूर झाले आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.गिरीश बापट यांनीही त्या विधेयकाला विरोध केला होता. मंत्री महोदयांचे नाव त्या प्रोसिडिंगमध्ये आहे. हे विधेयक घाईगडबडीने आणू नका, चिकित्सा समितीकडे पाठवा, परंतु तत्कालीन सरकाने आपले म्हणणे ऐकून घेतले नाही. या विधेयकात सुधारणा करणे किती गरजेचे आहे म्हणून मी मुद्दाम हे रेकॉर्डवर आणत आहे. या विधेयकाचा परिणाम जनतेवर झालेला आहे. देशतील 11 कोटी 24 लाख जनता म्हणजे निम्म्यापेक्षा जास्त लोक हे शहरी भागात राहतात. महाराष्ट्रातील 230 नगरपालिका, 110 नगरपंचायती आणि 26 महापालिकांमध्ये ही सुधारणा झाल्यामुळे असा एक जुलमी कायदा तयार झाला आहे. या कायद्यामध्ये बांधकाम नियमित होत नाही तोपर्यंत जन्मभर तीन पट मालमत्ता कराची आकारणी केली जाणार आहे. महापालिका 267 (अ) आणि नगरपालिका 198(अ) मध्ये सुधारणा केल्यामुळे याचा फटका 500 ते 1000 चौ.फुटाची घरे असणाऱ्या सर्वसामान्य माणसाला बसला आहे. या सामान्य नागरिकांनी जी घरकुले बांधली होती, ती एमआरटीपी कायद्यामध्ये कधीच नियमित होणार नव्हती, अशा बांधकामांना परवानगी देत येत नाही. म्हणून अशा ठिकाणी सरकारने शास्ती लावून मालमत्ता कर वसूल करण्याच्या उद्देशाने हा जनतेवर बोजा लावलेला आहे. खरेतर सरकारने वाढलेल्या नागरिकरणाबाबत मूलभूत बदल करणे आवश्यक होते. गुंठेवारी, टी.पी. स्किम, इनामी जमीन, गावठाणाचा परिघ वाढविणे अशा मूलभूत सुधारणा न करता या राज्यामध्ये 70 ते 80 टक्के नागरी भागातील लोकांची घरे अनियमित झाली. सरकारने नियमामध्ये बदल न केल्यामुळे हा गोंधळ या महाराष्ट्रात निर्माण झाला. सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी महसूल विभागात 110 निर्णय घेतले आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरी भागातील सुधारणांसाठी 55 ते 56 प्लॅन ऑन लाईन केलेले आहेत. याचे विधेयकात जोपर्यंत रुपांतर होत नाही तोपर्यंत हे सरकार गतीमान झाले आहे, असा संदेश लोकांमध्ये जाणार नाही. हा संदेश जनतेमध्ये जाण्यामध्ये आपण कमी पडतो. मंत्री महोदय आपण निर्णय तर खूप घेतले, परंतु त्याचे कायद्यात रुपांतर होणे गरजेचे आहे. हा गोंधळ

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुरेश हाळवणकर....

थांबविण्यासाठी या महानगरपालिका आणि नगरपालिका या दोन्ही कायद्याच्या सुधारणा अंतर्गत दिनांक 28 सप्टेंबर रोजी एक परिपत्रक जाहिर केलेले आहे. या परिपत्रकाच्या अनुषंगाने अनेक समित्या नेमलेल्या आहेत. आता या समित्यांमध्ये वेळ न घालविता या कायद्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. माझ्या मतदारसंघातील इचलकरंजी शहर ज्याला मँचेस्टर शहर असे म्हणतात तेथे एक लाख लोक राहतात. छोटी छोटी कामगारांची ही घरे आहेत. शास्तीचे विधेयक लागू केल्यानंतर त्याची महाराष्ट्र राज्यात कोठेही अंमलबजावणी झाली नसून ती फक्त माझ्या मतदारसंघातील एका "अ" वर्ग नगरपालिकेत झाली. यामुळे कामगारांची 5537 घरे ही शास्तीच्या फेऱ्यामध्ये अडकली. त्यांना नोटिसा दिल्या गेल्या. जवळपास 6 कोटी 30 लाख रुपयांची मागणी झाली. या सामान्य नागरिकांची 500 ते 1000 चौ.फुटाची घरे आहेत. या कायद्याची अंमलबजावणी केवळ एका नगरपालिकेत लागू केली. या कायद्याची सक्तीने अंमलबजावणी झाली तर महाराष्ट्रातील सर्व नगरपरिषदांमधील सर्वसामान्यांची घरे ही नगरपालिकेला हस्तांतरित करावी लागतील. बेदखल करावी लागतील त्यामुळे नगरपालिका ही सर्व घरे ताब्यात घेईल, एवढी ही गंभीर बाब आहे. या कायद्याचा गोंधळ निर्माण झालेला आहे. टी.पी. योजनेमुळे माझ्या शहरामध्ये सन 1972 पासून या योजनेची अंमलबजावणीच झालेली नाही. 1972 ते 2016 या गेल्या 45 वर्षाच्या कालावधीत 22 हजार घरे नियमित झाली नव्हती. मी आपले अभिनंदन करीन की, परवा यासंदर्भात आपण बैठक घेतली आणि या घरांची मोजणी करून ही 22 हजार घरे नियिमित करण्याचा आदेश दिला. आपल्या आदेशाचे नगरविकास विभागाने पालन केलेले नाही. मोजणीचे आदेश जोपर्यंत काढले जात नाहीत तोपर्यंत 22 हजार घरे नियमित करता येणार नाहीत.

यानंतर VV-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश हाळवणकर ....

अध्यक्ष महोदय, मी या निमित्ताने शेवटी एवढेच सांगणार आहे की, या संदर्भात मी राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना दिनांक 10.11.2014 रोजी एक पत्र दिले होते. ते मुख्यमंत्री झाल्यानंतर माझी पहिली मागणी हीच होती. कायदेमंडळाचा अभ्यास असणारे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्यावर बसल्यानंतर या कायदेमंडळात नवीन कायदे लवकर तयार व्हावेत हीच अपेक्षा आहे. मुख्यमंत्री महोदयांनी मला शब्द दिला की, हिवाळी अधिवेशनात आपण हा कायदा रद्द करू. हा कायदा चुकीचा झालेला आहे, हे मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केले. 16 जुलैला मी स्मरणपत्रही दिले. परंतु, तरीही हिवाळी अधिवेशनात व याही अधिवेशनात तो कायदा आला नाही.

अध्यक्ष महोदय, हा कायदा अत्यंत चुकीचा आहे. नगरपरिषदांचे उत्पन्न वाढविण्यासाठी किंवा पुढच्या काळामध्ये अनधिकृत बांधकामे होऊ नयेत या भावनेने जरी हा कायदा केला असेल, एसी केबीनमध्ये बसून त्यांनी शिफारस केली असेल. परंतू आम्ही प्रत्यक्षात ग्राऊंडवर काम करणारे लोकप्रतिनिधी आहोत, या कायद्याचा किती मोठा फटका महाराष्ट्रातील नागरिकरणात असलेल्या नगरपालिकेतील नागरिकांना बसणार आहे याची आम्हाला जाणीव आहे. कोणताही लोककल्याणकारी कायदा करीत असताना तुम्ही शास्ती लावा. परंतु, ही बांधकामे कधी तरी रेग्युलराईज करण्याचे नियमही त्याच बरोबर तयार केले असते, तर मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी स्वतःची बांधकामे नियमित करून घेतली असती.

मंत्री महोदय माझी आपणांस विनंती आहे की, मी गेली 3-4 वर्षे खूप अभ्यास करून, यातील सर्व माहिती गोळा केलेली आहे. तत्कालीन सरकारने केलेला कायदा रद्द करणे आवश्यक आहे, त्यामुळे मी ही कायदेशीर सुधारणा सुचविलेली आहे. या कायद्याच्या मसुद्याला आपण आज मान्यता द्यावी, म्हणजे नवीन विधेयक मांडण्याची आवश्यकता भासणार नाही, एवढी विनंती करून मी माझे मनोगत संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

प्रश्न प्रस्तुत झाला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील ( नगरविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश हाळवणकर यांनी या अशासकीय विधेयकाद्वारे जी काही छोटी, लोअर इन्कम ग्रुपची घरे आहेत ...

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. योगेश सागर )** : मंत्री महोदय सरकार हे विधेयक दोन्ही अधिवेशनात आणणार होते. आपण या संदर्भातील सरकारची मानसिकता स्पष्ट करावी.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, मी सरळ त्याबाबतच सांगू काय ?

**तालिका सभाध्यक्ष** : तुम्ही स्वीकारणार असाल तर तसे सांगावे.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या अशासकीय विधेयकात नमूद केलेले मुद्दे, सूचनांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत मंत्रिमंडळाने दि. 10.3.2016 रोजीच्या बैठकीत निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने मुंबई महापालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 मध्ये सुधारणा कराव्या लागतील. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सुधारणांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री. सुरेश हाळवणकर : अध्यक्ष महोदय, मी दीड वर्षांपासून ही मागणी करीत आहे. याची कालमर्यादा सांगितली की, या अधिवेशनाच्या शेवटपर्यंत आणू किंवा आणखी 6 महिन्यांमध्ये आणू किंवा ही जी शास्ती लावलेली आहे, तिला स्थगिती देऊ असे काही तरी ठोस आश्वासन आपण द्यावे, अशी माझी आपणास विनंती आहे. मंत्री महोदय, आपण करणार आहात, याबद्दल आपले अभिनंदन.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, मी आधीच सांगितले आहे की, शासनाचे हे करण्याचे ठरलेले आहे. त्यामुळे मी तारखेसहित सांगेन की, दिनांक 10.3.2016 रोजीच्या बैठकीत मंत्रिमंडळाचा हा निर्णय झालेला आहे. त्यामुळे लवकरात लवकर परंतु, कधी कधी काय असते की, काही कोर्टाचे बायडिंग असते, कधी अजून काही असते. अलीकडच्या काळात तुम्हाला माहीत आहे की, दिघ्यामध्ये जे काही घडले त्यानंतर कोर्टाने एक स्ट्रीक्चर पास केले आहे. अशाप्रकारचे कुठलेही धोरण करावयाचे असेल तर ॲडव्हकेट जनरल यांनी प्रथम ते धोरण आमच्याकडे घेऊन यावे, आमच्याकडून अप्रुव्ह करावे आणि अप्रुव्ह केल्यानंतर मग ते लागू करावे, असे शासनाला

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील .....

कडक स्ट्रीक्चर दिले होते. हे बांधत असताना आपण एमआरटीपीनुसार स्टॉप वर्कचे आदेश देतो परंतु, ते थांबत नाही, त्यामुळे एमआरटीपी कोठे कमी पडत आहे का, यासाठीही पुनर्विचार करायला सांगितलेले आहे. आमचे ॲडव्हकेट जनरल तेथे गेल्यानंतर त्यांनी त्यांना सांगितले की, आम्ही अशी अशी ड्राफ्ट पॉलिसी तयार केलेली आहे. त्यावर त्यांचा विश्वास नव्हता. ते म्हणाले की, प्रथम कॅबिनेटने अप्रुव्ह केल्यानंतर पुन्हा आमच्याकडे घेऊन या आणि मगच आम्ही ते मानू. काही काही वेळेस आपल्याला अशा सर्व गोष्टींतून जावे लागते. परंतु, सरकार याबाबतीत सकारात्मक आहे. मी स्वतः लक्ष घालून पुन्हा जेव्हा कॅबिनेटची बैठक होईल त्यावेळेस याचा पाठपुरावा करुन लवकरात लवकर याची पूर्तता करु.

अध्यक्ष महोदय, माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश हाळवणकर यांनी हे विधेयक मागे घ्यावे.

श्री. सुरेश हाळवणकर : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांच्या उत्तराने पूर्ण समाधानी नाही, परंतु आपण मंत्री महोदयांना अडवू शकत नाही. मंत्री महोदयांनी ठोस आश्वासन न देता न्यायालय काय म्हणेल वगैरे सांगितले आहे. हे विधेयक लॉ व ज्युडिशिअरीनेच तयार करुन दिलेले असल्याने आज आपण ते स्वीकारले असते तर क्रांतिकारक निर्णय झाला असता. शासनाला किंवा ॲडव्होकेट जनरल यांना वेगळे काही विचारण्याची गरज नव्हती. तरीही मी आपल्या उत्तरावर विश्वास ठेवतो. आपण कर्तबगार मंत्री असल्याने कदाचित मुख्यमंत्री महोदयांच्या मागे लागून हे बिल आपण लवकरात लवकर आणाल व महाराष्ट्रातील नागरी भागात राहणाऱ्या नागरिकांची यातून मुक्तता कराल, असा विश्वास मी व्यक्त करतो. आपण उद्याच्या उद्या त्या 22 हजार घरांच्या मोजणीबाबतचे आदेश द्यावेत, ही विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, हे विधेयक मागे घेण्यासाठी मला सभागृहाने अनुमती द्यावी.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

...............



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक
L.A. BILL NO. LXIX OF 2015.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPA-LOKAYUKTAS ACT, 1971)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अतुल भातखळकर ( कांदीवली पूर्व ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 69 महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, 1971 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, 2015 आज मी या सभागृहात मांडत आहे. आपल्या सर्वांनाच माहीत आहे की, या लोकायुक्तांच्या एका विधेयकावरुन, एका प्रश्नावरुन उभ्या देशाने गेल्या काही वर्षांपूर्वी एक मोठे व्यापक जन आंदोलन छेडले. एक चांगला लोकपालाचा कायदा या देशात केंद्र व राज्य सरकारमध्ये आला पाहिजे, अशाप्रकारचा आग्रह जनतेने धरला आणि त्याला प्रतिसाद देत त्यावेळेच्या लोकसभेने केवळ केंद्राचाच कायदा तयार केला अशातला भाग नाही, तर राज्यानेसुध्दा कोणत्या प्रकारचा कायदा करावा, याविषयी सुध्दा एक मॉडेल ॲक्ट त्यावेळेस लोकसभेने पास केला.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र हे असे एक राज्य आहे की, ज्या राज्याने लोकायुक्ताचा कायदा अख्ख्या देशात सन 1971 मध्ये सर्वात प्रथम पारीत केला. त्यामुळे मला महाराष्ट्रातील एक नागरिक म्हणून जणू अभिमान वाटतो की, असा कायदा करणारे अख्ख्या देशातील पहिले राज्य कोणते असेल तर ते महाराष्ट्र आहे. हा जो सन 1971 चा आपला कायदा आहे, त्या कायद्यात काळाच्या ओघात अनेक त्रुटी निर्माण झालेल्या आहेत, त्या त्रुटी दूर कराव्यात या हेतूने आज हे सुधारणा विधेयक मी या ठिकाणी मांडलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मी अत्यंत अल्पवेळात यात काय सुधारणा अपेक्षित आहेत, तेवढ्याच मांडणार आहे. मी असे म्हटले की, महाराष्ट्र हे या प्रकारचा लोकायुक्तांचा कायदा आणणारे पाहिले राज्य आहे परंतु, जेव्हा देशातील अनेक अभ्यासकांनी निरनिराळ्या राज्यातील अशाप्रकारच्या कायद्यांचा अभ्यास केला, तेव्हा अभ्यासकांचे यावरही एकमत झाले की, सर्व

श्री. अतुल भातखळकर ....

राज्यातील सर्वात एकप्रकारे बोथट अशा स्वरूपाचा कोणता कायदा असेल तर, तो आपल्या राज्यातला आहे. त्याची अनेक कारणे आहेत. या कायद्याच्या अंतर्गत जितका निधी देण्याची आवश्यकता होती, तितका निधी दिला गेला नाही.

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, माझ्या या प्रस्तावित सुधारणा विधेयकामध्ये मी ज्या काही सुधारणा सुचविल्या आहेत, त्या प्रामुख्याने या सन 1971 च्या कायद्यातील त्रुटींच्या संदर्भातील आहेत.

अध्यक्ष महोदय, सन 1971 मध्ये आपण जो लोकायुक्तांचा कायदा पास केला होता, त्याच्यामध्ये सर्वात मोठी त्रुटी कोणती असेल तर, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त नेमत असताना त्यांचे क्वालिफिकेशन काय असले पाहिजे, याचा या कायद्यात कोठेही उल्लेख नाही.

UU-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतूल भातखळकर.....

परंतु लोकसभेने पारीत केलेला कायदा पाहिला तर त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान जज किंवा रिटायर्ड जज आणि हाय कोर्टाचे विद्यमान जज किंवा रिटायर्ड जज अशा प्रकारची तरतूद केलेली आहे आणि म्हणून मी या कायद्याच्या माध्यमातून सूचना केली आहे की, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश हे लोक आयुक्त म्हणून नेमले गेले तर लोक आयुक्तांकडून आपल्याला जे काम अपेक्षित आहे, ते अधिक प्रभावी पद्धतीने केले जाईल. त्याकरिता मी लोक आयुक्त कायद्यामध्ये हा अत्यंत महत्त्वाचा बदल सूचविलेला आहे.

अध्यक्ष महोदय, आपला लोक आयुक्त कायद्याच्या कक्षेमध्ये कोणकोण येते. तर मंत्रिमंडळाचे सदस्य या कायद्याच्या कक्षेत येतात. परंतु आमदार या कायद्याच्या कक्षेत येत नाहीत. म्हणून अनेक समाजातील घटक असे आहेत ज्यांना आपण पब्लीक सर्वंट म्हणू शकतो, जे या कायद्याच्या कक्षेमध्ये येत नाहीत. ही फार मोठी त्रुटी या कायद्यामध्ये राहिलेली आहे. म्हणून माझ्या कायद्याद्वारे ही त्रुटी दूर करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. मी या कायद्याद्वारे हे सुचवले आहे की, माननीय मुख्यमंत्री, विधानसभा व विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य, त्याचबरोबर ऑटोनॉमस बॉडीज्, बोर्ड जे राज्याच्या कायद्या अंतर्गत स्थापीत केलेले आहेत, या सर्व प्राधिकरणांचे अधिकारी या कायद्याच्या अंतर्गत आले पाहीजे, अशा प्रकारची सूचना माझ्या कायद्याद्वारे सूचविलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मी तिसरी सुधारणा प्रामुख्याने सुचवलेली आहे. ती म्हणजे हा लोक आयुक्त कायदा 1971 सालचा होता. तसेच 1988 साली भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा पास झाला. या कायद्यांतर्गत येणाऱ्या घटकांना या कायद्यामध्ये समाविष्ट केले नव्हते. याचे कारण म्हणजे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा हा 1988 साली पारीत केला होता. म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 याच्या अंतर्गत ज्या, ज्या बाबी येतात या सर्व बाबी आपल्या नवीन कायद्याच्या अंतर्गत आल्या पाहीजे, अशा प्रकारची महत्वपूर्ण सूचना मी या ठिकाणी केलेली आहे. याचे कारण असे आहे की, आताच्या कायद्यामध्ये एखादी तक्रार आल्यानंतर ती घ्यायची किंवा घ्यायची नाही, याचे काही नियम, निकष दिलेले आहेत. परंतु ते नियम, निकष अत्यंत व्हेग आहेत. आपण पाहीले असेल. आपल्या कोणाच्याही स्मरणात असे येत नाही की, लोकायुक्तचा पहीला कायदा पास केल्यानंतरसुद्धा या कायद्यामुळे कोणाला शिक्षा झाली आहे. अशा प्रकारची फार मोठी उदाहरणे

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतूल भातखळकर.....

आपल्या डोळ्यासमोर नाही. म्हणून मी हा सुधारणा कायदा या ठिकाणी प्रस्तावित केलेला आहे. ज्यामुळे इन्व्हेस्टीगेटीव्ह एजन्सी, प्रॉस्युकेशन विंग ही सुद्धा या लोक आयुक्तांना मिळेल. अशा पद्धतीने मिळाल्यानंतर आणि मी सुचविलेल्या सुधारणा यामध्ये अंतर्भूत केल्या तर आपला लोक आयुक्ताचा कायदा अधिक सक्षम प्रकारचा होईल. त्यामुळे राज्यामध्ये भ्रष्टाचार असेल त्याला यातून मोठ्या प्रमाणात प्रतिबंध करता येऊ शकेल. भ्रष्टाचारी लोकांना शासन करण्यामध्ये नवीन प्रस्तावित कायद्याचा मोठा उपयोग होईल. म्हणून या प्रस्तावित सुधारणा मी या कायद्याच्या अंतर्गत केलेल्या आहेत. धन्यवाद.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील (विधी व न्याय राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अतूल भातखळकर यांनी अतिशयम मूलभूत सूचना केलेल्या आहेत. 1971 मधील लोक आयुक्त आणि लोक उप आयुक्त असा आपला अधिनियम आहे. यामध्ये जर एखाद्या ठिकाणावरुन कुठल्या भ्रष्टाचाराची, अनियमिततेची तक्रार प्राप्त झाल्यानंतर ॲड्रेसल फोरम असेल तर त्या फोरमला जो हेड करतो, त्या हेडला ज्याप्रमाणे लोकसभेने पारित केलेल्या कायद्याप्रमाणे केंद्रामध्ये सुप्रीम कोर्टाचे किंवा हाय कोर्टाचे माजी न्यायाधीश दिले जातात, त्याच पद्धतीने महाराष्ट्रात देखील लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त म्हणून त्याच स्तरातील, त्याच उंचिचे, किंवा तेवढी अनुभवी आणि तेथे काम केलेली व्यक्ती असायला पाहीजे, अशी एक सूचना त्यांनी मांडली.

अध्यक्ष महोदय, या लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्तच्या ॲम्बीटमध्ये ज्या प्रमाणे मंत्री किंवा मंत्रिमंडळाचे सदस्य येतात, परंतु विधीमंडळाचे सदस्य व विविध महामंडळे किंवा ऑटोनॉमस बॉडीज्, वेगवेगळ्या प्राधिकरणाचे अध्यक्ष किंवा सदस्य या सर्वांना देखील त्या ॲम्बीटमध्ये आणले पाहीजे, ही दुसरी सूचना त्यांनी मांडली.

अध्यक्ष महोदय, त्याचसोबतच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत ज्या बाबी येतात, त्याबाबत देखील त्यांनी सांगितले. कारण उद्देश सारखा आहे आणि काम देखील तेच करायचे असेल तर 1971 च्या लोक आयुक्त कायद्यामध्ये या सर्व बाबींचा समावेश करण्यात यावा, अशी त्यांनी तिसरी सूचना मांडलेली आहे. त्याचसोबत ते अंतर्भूत केल्यास त्याकरिता जे इन्व्हेस्टीगेशन एजन्सी लागतात आणि प्रोसिक्रुशनर जी सीस्टीम लागते ती सुद्धा या लोक आयुक्तांना आणि या स्ट्रक्चरला भेटेल, अशी त्यांनी शेवटची सूचना केली.

अध्यक्ष महोदय, ही बाब सत्य आहे. आपण देखील पहातो की, लोक आयुक्तांच्या सर्व सचोटीमधून किंवा या स्ट्रक्चरमधून बऱ्याचशा तक्रारी बाहेर येत नाही किंवा कोणाला शिक्षा झाली किंवा काही ॲड्रेस मिळाला. याला कारण हे देखील असेल की, या सर्व अनुभवाचा किंवा या सर्व स्ट्रक्चरमधून जो माणूस तावून सलाखून जातो आणि ज्याला ते सर्व ज्ञान असते किंवा त्याही पेक्षा त्या पदावर काम केलेली व्यक्ती तेथे बसविल्यास ती व्यक्ती अधिक इफेक्टीवली करु शकते.

अध्यक्ष महोदय, या सर्व आपण मांडलेल्या सर्व सूचनांसंदर्भात मी सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. अतूल भातखळकर यांनी सादर केलेल्या अशासकीय विधेयकाबाबत नमूद



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील.....

करण्यात येते की, 1971 च्या कायद्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे आणि होता. तथापि केंद्र शासनाच्या लोकपाल अधिनियम 2013, दिनांक 16 जानेवारी 2014 रोजी राजपत्रीत प्रसिद्ध झाला आहे. लोकपाल अधिनियमातील विविध तरतुदींचा अभ्यास करुन लोक आयुक्त विधेयक 2016 चे प्रारुप तयार केले असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. हे विधेयक ज्या वेळी विधीमंडळाच्या विचारार्थ मांडण्यात येईल, त्यावेळी या अशासकीय विधेयकातील सुचनांचाही विचार करण्यात येईल. वरील वस्तुस्थिती विचारात घेता सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. अतूल भातखळकर, यांनी सादर केलेले उक्त अशासकीय विधेयक मागे घेण्याबाबत त्यांना विनंती करण्यात येत आहे. त्यांनी ही विनंती मान्य करावी, अशी मी आपल्या मार्फत त्यांना विनंती करतो.

श्री. अतूल भातखळकर : अध्यक्ष महोदय, हे विधेयक मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

विधेयक सभागृहाच्या अनुमतीने मागे घेण्यात आले.

---*---

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शि. :** मुंबई महानगरपालिका दुसरी सुधारणा विधेयक.
L.A. BILL NO. LXVII OF 2015.
(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, 1888.)

ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्र.67- मुंबई महानगरपालिका अधिनियम 1988 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, सदर विधेयक मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये एक छोटासा पण आवश्यक असा बदल करण्यासाठी या सदनासमोर मांडत आहे. मुंबई महानगरपालिका कायदा 1888 मध्ये बनलेला आहे. त्यामध्ये तशा अर्थाने सर्वात महत्वाचे दोन कलम आहेत. कलम 61 मध्ये "Matters to be provided for by the Corporation" याचा अर्थ मुंबई महापालिकेवर बंधनकारक करण्यात आलेली काही कर्तव्य दिलेली आहेत.

...XX/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार.....

बंधनकारक कर्तव्य पारपाडण्याकरिता आवश्यक निधीची तरतूद महानगरपालिकेने केली पाहिजे. सदरहू कामे पारपाडण्याचे बंधन महानगरपालिकेवर आहे. मुंबई महानगरपालिकेच्या कलम 63 मध्ये शहराच्या आवश्यकतेनुसार व विकासासाठी अन्य काही कामे महानगरपालिकेने करावी, असे सांगितले आहे. परंतु ही कामे अधिनियमातील कलम 61 प्रमाणे बंधनकारक नसून ती स्वच्छाधिनतेने आहेत. अशा प्रकारची ही ऑब्लीगेटरी आहेत. या समस्येबाबतची माहिती मुंबईतील सर्व सन्माननीय सदस्यांना आहे. बीएमसी ॲक्ट सन 1888 तयार झाला त्यावेळची मुंबई शहराची स्थिती व आज सन 2016 मधील स्थितीत फरक आहे.

अध्यक्ष महोदय, या अशासकीय सुधारणा विधेयकाच्या माध्यमातून मी बीएमसी ॲक्टच्या कलमामध्ये बदल सुचवू इच्छित आहे. अधिनियमातील कलम 63 मधील (डी) मध्ये असे सांगितले आहे की, "laying out or the maintenance of public parks, gardens or recreation grounds." याचा अर्थ मुंबई शहरामध्ये मोकळ्या जागा, मैदाने, खुली मैदाने, मनोरंजन मैदाने यासंदर्भातील विकास कामे बीएमसी ॲक्ट मधील कलम 63 नुसार आयुक्तांनी स्वच्छेने म्हणजे त्यांना वाटले तर करावयाच्या कर्तव्यात नमूद आहेत. कलम 63 मधील "ऐच्छिक" या शब्दाऐवजी "बंधनकारक" हा शब्द समाविष्ट करुन ही बाब बंधनकारक म्हणून महानगरपालिका आयुक्तांच्या कर्तव्यात टाकण्यात यावी, असे मी प्रस्तावित करतो. याचे कारण असे की, बीएमसी ॲक्ट, 1888 मध्ये तयार करण्यात आला. त्यावेळी इंग्रजांच्या काळात ओपन स्पेस डेव्हलप करणे कदाचित ऐच्छिक असू शकेल. परंतु त्यानंतर सन 1947 मध्ये भारत स्वतंत्र झाला त्यावेळी आयलॅण्ड शहराची मूळ लोकसंख्या होती 18 लाख व उप नगराची लोकसंख्या साडे चार लाख होती. आता सन 2015-16 मध्ये मुंबई शहरात 35 लाख व मुंबई उप नगरामध्ये 90 लाखांच्या दरम्यान लोकसंख्या आहे. त्यामुळे बीएमसी ॲक्टनुसार सन 1888 मध्ये मोकळी मैदाने प्रिझर्व करणे, ठेवणे, ब्यूटीफाय करणे, मेन्टेन करणे हे बंधनकारक नव्हते. परंतु ते आता बंधनकारक करणे अतिशय, अशी मुंबई शहरातील लोकांची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माहे सप्टेंबर, 2015 मध्ये मुंबई शहरामध्ये मोकळ्या जागा ॲडॉप्शनवर देण्याची एक पॉलिसी आणण्यात आली, त्यामुळे या शहरामध्ये मोठा गदारोळ झाला. याचे कारण

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार.....

असे की, या शहरातील नागरिक स्वत:ला मोकळा श्वास मिळवून देणाऱ्या मोकळ्या जागेसंबंधी अतिशय जागरुक आहेत. त्यामुळे ॲडॉप्शन किंवा केअर टेकर या माध्यमातून हे भूखंड, मोकळ्या जागा किंवा मनोरंजन मैदाने खाजगी संस्थांना दिली गेली तर सामान्य माणूस त्या ठिकाणी जाण्याच्या अधिकारापासून काही अंशी वंचित होणार आहे. सामान्य माणसाचा अधिकार वंचित होऊ नये याकरिता महानगरपालिका आयुक्ताने हे काम स्वत: करावे. त्याकरिता महानगरपालिकेने आवश्यक निधी खर्च करावा व नागरिकांकरिता 24 तास ती मैदाने खुली ठेवण्यात यावी, अशी जनतेची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आजच्या स्थितीत डी.पी.प्लॅन प्रमाणे मुंबईतील मोकळ्या जागेमध्ये 1 लाख 68 प्लॉट्स आरक्षित ठेवण्यात आलेले आहेत. या प्लॉटचे क्षेत्र एकरमध्ये सांगावयाचे झाले तर मुंबईच्या 437 स्क्वेअर कि.मी. क्षेत्रफळामधील जवळपास 1200 एकर मोकळी जागा उपलब्ध आहे. सध्या फुटबॉल हा प्रसिध्द खेळ आहे. "मन की बात" मध्ये माननीय पंतप्रधान महोदयांनी फुटबॉल बद्दल जनतेला आवाहन केले आहे. फुटबॉलच्या भाषेत अंदाजे सांगावयाचे झाले तर 588 इंटरनॅशनल फुटबॉल ग्राऊंड बनू शकतील एवढ्या मोकळ्या जागा मुंबई शहरामध्ये आज उपलब्ध आहेत. या मोकळ्या जागेच्या विकासाच्या बाबीसंबंधी आयुक्ताच्या कर्तव्यात बंधनकारक केले नाही तर तो म्हणू शकतो की माझ्याकडे असलेल्या बजेटमधून मैदानांचा विकास, बगिचांचा विकास, मनोरंजन मैदाने खुली करणे ही कामे करण्याचे मला बंधन नाही. ही बाब आयुक्तांना बंधनकारक नसल्याने या जागांचा विकास खाजगी संस्था, खाजगी विकासक किंवा इतर संस्था यांच्यामाध्यमातून करुन या जागा त्यांच्या घशात घालण्याचा राजकीय हेतूने विचार होऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या 51 हजार कोटी रुपयांच्या ठेवी फिक्स डिपॉझिटमध्ये आहेत. मी केवळ अभ्यासाकरिता ही माहिती काढली होती त्यानुसार यासर्व 1200 एकर मोकळ्या भूखंडाच्या विकासासाठी 150 कोटी रुपयांपेक्षा अधिक वार्षिक खर्च येणार नाही. मुंबई हे 1 कोटी 40 लाख लोकसंख्या असलेले शहर आहे. दररोज वाढणारे हे शहर आहे. खुल्या जागांसाठी व मोकळ्या श्वासासाठी लढणारे हे शहर आहे. महानगरपालिकेच्या 51 हजार



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार.....

कोटी रुपयांच्या ठेवी असणारे हे शहर आहे. अशा या शहरातील मोकळ्या जागांच्या विकासासाठी 100 ते 150 कोटी रुपये वार्षिक खर्च अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत "मुंबई मिरर" या वर्तमानपत्रामध्ये आज बातमी आली आहे की, "BMC force to stall open spaces plan." यासंदर्भात महानगरपालिकेने डिफेन्समध्ये सांगितले आहे की, आमच्याकडे मेन्टनन्स करण्यासाठी आज योजना नाही. त्यामुळे आयुक्तांच्या कर्तव्यामध्ये मोकळ्या जागांचा विकास करणे ही बाब बंधनकारक केली पाहिजे. आयुक्तांवर हे बंधन घातले नाही तर या मोकळ्या भूखंडावर अनधिकृत झोपड्या बांधण्यात येतील, इन्क्रोचमेंट होईल. अशी स्थिती निर्माण झाली तर आपण आपल्या पुढील पिढीला मुंबईमध्ये टुरिझम म्हणून गार्डन दाखवू शकू अशी 4-5 गार्डन शिल्लक राहतील. म्हणून मोकळ्या जागांच्या विकासाचे बंधन आयुक्तांच्या कर्तव्यात समाविष्ट करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे आजच्या वर्तमानपत्रातील बातमीने देखील स्पष्ट होते. Lets make it as a mandatory duty. म्हणून मुंबई महानगरपालिका ॲक्ट मधील कलम 63 प्रमाणे कलम 61 मध्ये "बंधकारक" असा शब्द प्रयोग वापरण्यात यावा, असा मी या अशासकीय सुधारणा विधेयकाच्या माध्यमातून शासनासमोर प्रस्तावित करतो.

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी बदलत्या काळानुसार व प्राथमिकतेनुसार महत्वाचा बदल मुंबई महानगरपालिका ॲक्ट, 1988 मधील अधिनियमात सूचविला आहे. ॲक्टमधील 61 कलमाखाली काही कामे बंधनकारक स्वरुपाची आहेत. त्यामध्ये रस्ता, ड्रेनेज, मुलभूत गरजा व त्याकरिताची तरतूद महानगरपालिकेला बंधनकारक आहे. तसेच, ॲक्टमधील कलम 63 मध्ये स्वेच्छाधीन बाबीमध्ये खुल्या जागा, रिक्रेशन ग्राऊंड, प्ले-ग्राऊंड, बगीचे, मनोरंजन केंद्रे, यांचा समावेश आहे. ही बाब सन 1888 मध्ये ऐच्छिक असेल. परंतु आज या राज्याचे शहरीकरण देशाच्या तुलनेमध्ये सर्वात जास्त झपाट्याने वाढणारे आहे. देशाच्या पातळीवर ॲव्हरेज अर्बनायझेशन 30 टक्के आहे. आपल्या राज्याचे अर्बनायझेशन 43 ते 45 टक्के म्हणत असलो तरी ते त्यापेक्षा अधिक आहे, हे आपणा सर्वांना माहीत आहे. कारण आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणात फ्लोटींग पॉप्युलेशन येत

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार.....

असते. कलम 63 मधील बाब ऐच्छिक ठेवली तर कदाचित प्रायव्हेट पार्टनरच्या माध्यमातून या गोष्टी एक्स्प्लॉईट करत किंवा त्याला पाहिजे त्या त्याच्या व्हीम्स व विशेषवर ते डेव्हलप करतो.

यानंतर YY-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील......

अशा प्रकारचे क्वीझ होत होत तो काही प्ले ग्राऊंड आपण बघतो. आता हे दिसायला दुर्मिळ झालेले आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी मांडलेल्या सूचना व बाबी कलम 63 मध्ये नमूद आहेत, त्या कलम 61 मध्ये समाविष्ट करण्याची त्यांनी सूचना केलेली आहे. सन्माननीय सदस्यांना मला सांगावेसे वाटते की, जी काही सूचना आहे त्या संदर्भात लवकरात लवकर म्हणजे आताच मी याठिकाणी निर्णय जाहीर करतो की, कलम 63 मधील सर्व बाबी कलम 61 मध्ये समाविष्ट करण्यासंबंधी पुढच्या बैठकीमध्ये जी काही प्रोसिजर ॲडॉप्ट करावी लागेल ती शासन करेल. यासंबंधी चांगली सूचना मांडल्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार सुध्दा मानतो. धन्यवाद.

अध्यक्ष महोदय मी सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना विनंती करतो की, त्यांनी प्रस्तावित केलेले अशासकीय विधेयक मागे घ्यावे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय राज्यमंत्री यांना धन्यवाद देतो की, त्यांनी अतिशय महत्वाच्या व आवश्यक विषयामध्ये तातडीने निर्णय घेतला. मुंबईकरांशी खऱ्या अर्थाने अतिशय महत्त्वाचा निर्णय आणि घोषणा माननीय मुख्यमंत्री आणि माननीय राज्यमंत्री यांनी केलेली आहे. हे बंधनकारक कर्तव्यांमध्ये आणल्यामुळे मुंबईतील 1200 एकर जागा आता कमिशनरने स्वतःच्या खर्चातून मेंटन करायला बंधन असल्यामुळे अन्य कोणाच्या घशात जाणार नाही. सन्माननीय मंत्री महोदयांनी आता पुढच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये प्रस्ताव मांडण्याचे सांगितले.

अध्यक्ष महोदय, हे विधेयक मागे घेण्यासाठी मला सभागृहाने अनुमती द्यावी.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

-----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. XXV OF 2015**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS ACT, 1948.)

श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्र.25 महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो

अध्यक्ष महोदय, एक बहुत ही जरूरी सुधारणा मैंने यहां पर रखी है. जैसा कि श्री रणजीत पाटीज जी ने अपने पिछले भाषण बताया है. बड़ी तेजी से शहरीकरण हो रहा है. 1948 का जो ॲक्ट बनाया गया था, उसमें आज तक बहुत सारे चेंजस हो गए. कारोबार बदल गए, कारोबार करने का जरिया बदल गया, पहले छोटी छोटी किराणे की दुकाने थी. आज वह मॉल में तब्दील हो गए है. नए नए कॉल सेंटर्स आ गए है. बड़े बड़े हॉस्पिटल्स हर जगह बन गए है. हर शहर बढ़ गया है. सुबह 9.00 बजे दुकान खोलकर रात को 10.00 बजे दुकान बंद कर देना लोगों को तकलीफ दे रहा है. दुकानदारों को तकलीफ हो रही है. ग्राहकों को परचेस करने के लिए समय नहीं मिलता है. मुंबई और महाराष्ट्र में जो नई पीढ़ी है, अलग अलग जगह पर काम करती है, उनको बहुत तकलीफ होती है. इसलिए मैंने यह सुधारणा विधेयक लाया है कि रात को 10.00 बजे तक की जो परमिशन थी, उसको बढ़ाकर 12.00 बजे तक कर दिया जाए. सभी स्टॅब्लीशमेंट को ब्लैंकेट परमिशन होनी चाहिए. आज ऐसा कोई कानून नहीं है कि आप हमसे परमिशन मांगे और हम आपको 12.00 बजे तक की परमिशन दे देंगे. कुछ जगह ऐसी है कि जहां पर दुकान रात भर खुली रखी जा सकती है. आज किसी अमीर आदमी को फाईव्ह स्टार होटल में कॉफी पीनी है तो वह ताजमहल होटेल में जाकर 500 रुपये खर्च कर सकता है. लेकिन किसी सामान्य आदमी को चाय पीनी हो या किसी दोस्त को चाय पिलानी है तो चाय की दुकान खुली नहीं है. आज के दौर में लोगों तक पहुंचने के लिए, लोगों को सुविधा देने के लिए मेरा आपसे अनुरोध है कि इस विधेयक में सुधारणा करके, 10.00 बजे तक का, शॉप ॲण्ड स्टॅब्लीश का जो टाईम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लिमिट है, उसको बढ़ाकर 12.00 बजे तक का किया जाए, ताकि लोगों को इसका फायदा हो.

3.....



**तालिका सभाध्यक्ष** (श्री योगेश सागर) : 24 घंटा.....

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, 24 घंटे की तो मांग है. लेकिन दुकान 24 घंटे चालू नहीं रख सकते तो कम से कम जो जरूरतें हैं, खाने-पीने की है, खरीदारी की है, लोगों की रोजमर्रा जिंदगी की जरूरतें हैं. उसके लिए 12.00 बजे तक का समय किया जाए. मेडिकल स्टोर्स......रेस्टॉरन्ट के लिए आप 24 घंटे नहीं कर सकते है तो मैंने समय बढ़ाने के लिए जो मांग की है, उस बात को आप मान लीजिए.

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता (कामगार मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांनी अशासकीय बिलाच्या माध्यमातून सर्व आस्थापना, हॉटेल, दुकाने यांना रात्री 12 वाजेपर्यंत सुरु ठेवण्याबाबत सरसकट अनुमती द्यावी अशा प्रकारचे विधेयक मांडलेले आहे. या संबंधातील कायदा सन 1948 च्या कलम 11 पोटकलम 1 यामध्ये सुधारणा करुन 12 वाजेपर्यंत दुकाने उघडी ठेवावीत असे सन्माननीय सदस्यांनी सूचित केले आहे. या कायद्यांतर्गत सन 2011 मध्ये तरतूद करुन पूर्वी 8.30 वाजेपर्यंतचा वेळ होता तो आपण 10.00 वाजेपर्यंत केला. इतर पान, विडी, सिगारेट अशा दुकानांना रात्री 11.00 वाजेपर्यंतची सूट या कायद्याच्या माध्यमातून दिली. त्यानंतर सन 2013 मध्ये रात्री 11.00 चे विधेयक मंजूर केल्यानंतर माननीय राष्ट्रपतींच्या मंजूरीसाठी गेले आणि ते मंजूर होऊन सन 2013 मध्ये आले. सन 2013 मध्ये कायदा प्रस्तापित करीत असताना सन 2011 मध्ये सूचविलेल्या अटी व शर्तीमध्ये सन 2013 चे परिपत्रक काढत असताना त्यात काही सूट देऊन त्यात मार्च, 2016 मध्ये शासनाने निर्णय केला की, आठवड्याच्या 7 ही दिवस व्यावसायिक व्यवसाय करु शकतात. त्यांना सुट्टीच्या दिवशी बंद ठेवण्याचे बंधन राहणार नाही. परंतु कर्मचाऱ्यांना एक दिवसाची सुट्टी द्यावी लागेल. अत्यावश्यक वस्तुंसाठी शहरामध्ये ज्या ठिकाणी रात्रभर किंवा लोकवस्तीच्या ठिकाणी आवश्यकता असेल त्या ठिकाणी आजही अशा व्यवसायिकांना 12 किंवा त्यापेक्षा अधिक वेळ व्यवसाय चालू करायचा असेल तर त्यासाठी शासनाकडे एक अर्ज करावा लागतो. शासन त्या अर्जावर तात्काळ म्हणजे 8 दिवसाच्या आत मंजूरी देते. या संदर्भात संपूर्ण मुंबई शहरामध्ये प्रत्येक विभाग आणि गल्लीमध्ये तसेच संपूर्ण महाराष्ट्रात सरसकट कायदा करण्याची आवश्यकता नाही. वेळोवेळी अशा कायद्याची आवश्यकता पडेल त्यावेळी करण्यात येईल. आज या अशासकीय बिलाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल आणि सभागृहाला एवढेच सांगू शकतो की, आवश्यक व अनिवार्य आहेत अशा आस्थापनांनी जर शासनाकडे अर्ज केला तर त्यांना रात्री 12 ते रात्री 1.30 वाजेपर्यंतचे परिपत्रक आहे. त्यामध्ये जे विषय अत्यावश्यक आहेत तशा प्रकारच्या आस्थापनांना परवानगी देण्याचा निर्णय शासनाने केलेला आहे.

ZZ-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता........

अशा कितीही आस्थापना येऊ देत त्यांनी मागितल्याप्रमाणे 24 तास तास दुकाने उघडे ठेवण्याची परवानगी देऊ, परंतु त्यांना शासनाला अर्ज करावा लागेल. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, या प्रावधानाचा उपयोग करुन महाराष्ट्रच्या ज्या-ज्या विभागात इन्सेंन्शिअल वस्तूंची दुकाने आहेत किंवा आस्थापना उघडी ठेवण्यासंबंधीचा अर्ज शासनाकडे दिला पाहिजे. तर त्यांना अनुमती दिली जाईल.

अध्यक्ष महोदय मी सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांना विनंती करतो की त्यांनी त्यांचे विधेयक मागे घ्यावे.

श्री.अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, हे विधेयक मागे घेण्यासाठी मला सभागृहाने अनुमती द्यावी.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

**तालिका सभाध्यक्ष** : मी सभागृहाची बैठक आता स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक आता सोमवार, दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 31 मिनिटांनी
सोमवार, दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION